# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, रविवार ६ जूलै २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठ १०+४










## पक्षीय झेंडे दूर ठेवत 'आवाज मराठी'चा

**मुंबई/प्रतिनिधी :** हिंदी सक्तीच्या विरोधात पाच जुलै रोजी निघणा-या मोर्च्या ऐवजी वरळी डोम सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या मेळाव्यात ढोल, ताशे, लेझीम, दहीहंडीचे थर, ब्रास बॅन्ड पथक, आणि 'सुरु झाले नवीन पर्व मराठीचा आम्हास गर्व' सारख्या घोषवाक्याचे फलक अशा मराठमोळ्या वातावरणात 'ठाकरे' बंधूंच्या 'आवाज मराठीचा' नेत्रदिपक कार्यक्रम पार पडला.कार्यक्रमाला आलेल्या उपस्थितांनी डावे उजवे न करता दोन्ही ठाकरे यांच्या आगमनापासून ते प्रस्थानापर्यंत सारखाच प्रतिसाद दिला.पावसाळ्याचे दिवस असल्याने हा मेळावा वरळी येथील राष्ट्रीय क्रीडा संकुल (वरळी डोम) सारख्या बंदीस्त सभागृहात घेण्यात आला. सभागृहाची प्रेक्षक क्षमता आठ हजार असली तरी सभागृह खचाखच भरले होते. . मेळाव्यासाठी सकाळी आठ वाजल्यापासून सर्वपक्षीय कार्यकर्ते आणि मराठी माणसाने हजेरी लावण्यास सुरुवात केली. दोन्ही पक्षातील कार्यर्त्यांच्या मनोमिलनाचे साक्षीदार होण्यासाठी हजर होते.वरळी डोमच्या प्रवेशद्वाराजवळ ढोल, ताशे, लेझिमने ताल धरला होता. जय जवान गोविंद पथकाने दहीहंडी पूर्वीच दहीहंडीचे थर रचून निमंत्रितांना सलामी दिली. 'आम्ही सारे भाउ भाउ मराठीचा गौरव गाउ', 'सुरु झाले नवीन पर्व मराठीचा आम्हाला गर्व' सांगणारी घोषवाक्य फलक सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. 'लाभेल आम्हास भाग्य बोलतो मराठी, जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी' वाक्याने सर्वांचे स्वागत केले गेले. सभागृहात वरळीच्या 'आस्तिक ब्रास बॅन्ड' पथकाने सर्वांची मने जिंकून घेतली. 'जय जय महाराष्ट्र पासून ते ये गो दांडयावरी' पर्यंतच्या गाण्यांवर उपस्थितांनी चांगलाच ठेका धरला. बसलेल्या खूर्चीवर उभे राहून नृत्य करण्याचा मोह अनेक महिलांना आवरता आला नाही.

व्यासपीठावर आगळेवेगळे आगमन-उध्दव ठाकरे व राज ठाकरे यांचे व्यासपीठावरील आगमन एखाद्या चित्रपटाच्या प्रीमियर शो ला साजेसे होते. व्यासपीठावरील उजव्या व डाव्या बाजूच्या विंग मधून एकाच वेळी दोन ठाकरे यांचा प्रवेश झाला. त्यावेळी सभागृहातील झगमगणारे दिवे काही क्षणासाठी बंद करण्यात आले. उपस्थित लोकांनी उत्सफूर्तपणे तात्काळ मोबाईलचे दिवे (टॉर्च) लावले. हा प्रसंग नेत्रदिपक होता. एकाचवेळी सभागृहात हजारो लुकलुकणार दिव्यांचा काजव्याप्रमाणे झगमगाट झाला आणि दोन ठाकरेंनी व्यासपीठावर प्रवेश केला. त्यावेळी उपस्थितांनी एकच जल्लोष केला. टाळ्या, शिटया, घोषणा, चित्कार यांचा पाउस सभागृहात पडला. उध्दव ठाकरे यांनी राज ठाकरे यांना येउन मिठी मारली. राज ठाकरे यांनी मात्र जागेवरुन हलण्याची फारशी तसदी घेतली नाही. छत्रपती शिवाजी महाराज्यांच्या पुतळ्याला दोन्ही भावांनी एकाच वेळी पुष्पहार अर्पण केले. महापुरुषांच्या प्रतिमेला नमस्कार करण्याचे सौजन्य उध्दव ठाकरे यांनी दाखविले. उध्दव ठाकरे यांनी साधा राखाडी रंगाचा कुर्ता घातला होता तर राज ठाकरे यांनी नेहमीप्रमाणे पाढ-या रंगाचा कुर्तावर निळ्या रंगाचा मफलर (स्टोल) घेतला होता. त्यांनी घातलेली लाल रंगाची मोजडी मात्र सर्वांचे लक्ष वेधणारी होती. दोन्ही भावांच्या भाषणाला मराठी श्रोत्याने सारखाच प्रतिसाद दिला. भाषणाची अमोघ वाणी लाभलेल्या राज ठाकरे यांना मात्र काकणभर जास्तच प्रतिसाद मिळाला. सरतेशेवटी दोन भावांचे, दोन भावजयांचे, दोन चुलत भावांचे फोटोसेशन झाले. व्यासपीठावर फक्त दोन ठाकरे होते. राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे, जितेंद्र आव्हाड, रासपचे महादेव जानकर, शेकापचे जंयत पाटील, काँग्रेसचे भालचंद्र मुणगेकर, भाकपचे प्रकाश रेड्डी, माकपचे डॉ. अजित नवले, मराठी भाषा अभ्यासक दीपक पवार, अभिनेत्री, तेजस्विनी पंडीत, अभिनेता भरत जाधव, सिध्दार्थ जाधव उपस्थित होते.

### सन्माननीय उद्धव ठाकरे

# जमलेल्या माझ्या तमाम मराठी बांधवांनो



### राज ठाकरेंच्या भाषणाने मेळाव्याची सुरूवात

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात 'हिंदी सक्ती'चा निर्णय महायुती सरकारकडून झाल्यानंतर महाराष्ट्रामध्ये एकच संतापाची लाट पसरली. याविरोधात उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी संयुक्त मोर्चा काढण्याचा इशारा दिल्यानंतर अवघ्या काही दिवसांमध्येच सरकारला हिंदी सक्तीचा जीआर रद्द करावा लागला. या सर्व पार्श्वभूमीवर आज (५ जुलै) विजय मेळावा वरळी डोममध्ये झाला. या मेळाव्याला संबोधित करताना राज ठाकरे यांनी हिंदी सक्तीवरून घणाघाती प्रचार केला. राज ठाकरे यांनी बोलताना सुरुवातीलाच 'सन्माननीय उद्धव ठाकरे' म्हणत उपस्थितांची मने जिंकली. त्यानंतर त्यांनी नेहमीप्रमाणे माझ्या जमलेल्या मराठी बांधवांनो अशी सुरुवात केली. आजवर कोणालाच जमलं नाही ते फडणवीसांनी करून दाखवल्याचा टोलाही राज यांनी लगावला.

राज म्हणाले की, आजच्या मेळाव्याला घोषणा हीच आहे- कोणताही झेंडा नाही मराठी हाच अजेंडा. मराठीकडे कुणी वाकड्या नजरेने पहायचं नाही. (पान २ वर)

### जे बाळासाहेबांना, इतरांना जमले नाही ते फडणवीसांना जमले

भाषणाच्या सुरुवातीलाच राज ठाकरे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना खास ठाकरी शैलीमध्ये जोरदार टोला लगावला आहे. जे बाळासाहेबांना जमले नाही, इतरांना जमले नाही, ते देवेंद्र फडणवीस यांनी करून दाखवले, असे राज ठाकरे म्हणाले. आज हिंदी सक्तीविरोधाचा मोर्चा निघायला पाहिजे होता.मराठी माणूस कसा सर्व बाजूंनी एकवटतो, याचे एक चित्र मोठ्या प्रमाणावर उभे राहिले असते. पण नुसत्या मोर्चाच्या चर्चेनेच माघार घ्यावी लागली. आजचाही मेळावा शिवतीर्थावर मैदानात व्हायला पाहिजे होता. मैदान ओसंडून वाहिले असते. पण पाउस आहे. आज २० वर्षांनंतर मी आणि उद्धव एका व्यासपीठावर येत आहोत जे माननीय बाळासाहेबांना जमले नाही, जे अनेकांना जमले नाही, ते देवेंद्र फडणवीसांना जमले, असे विधान राज ठाकरे यांनी या सभेच्या निमित्ताने झालेल्या ठाकरे बंधूंच्या ऐक्यावरून केले.

## एकत्र आलोय ते एकत्र राहण्यासाठीच -उध्दव ठाकरे



**मुंबई/प्रतिनिधी :** तब्बल २० वर्षांनी राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे या मेळाव्याच्या निमित्ताने एकत्र आले. यावेळी उद्धव ठाकरेंनी 'एकत्र आलोय ते एकत्र राहण्यासाठीच' अशी मोठी घोषणा केली. दरम्यान, महाराष्ट्र सरकारने त्रिभाषा सूत्रातील हिंदी भाषेच्या सक्तीचा निर्णय मागे घेतल्यानंतर आज मुंबईत ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचा विजयी मेळावा पार पडला. तब्बल २० वर्षांनी हे दोन्ही बंधू एका व्यासपीठावर एकत्र आल्याने राजकीय वर्तुळात अनेक चर्चांना उधाण आले आहे. या मेळाव्यात उद्धव ठाकरे यांनी एकत्र आलोय ते एकत्र राहण्यासाठीच अशी महत्त्वपूर्ण घोषणा केली. यामुळे आता मनसे आणि शिवसेना एकत्र येणार असल्याचे संकेत मिळत आहेत. या विजयी मेळाव्याच्या सुरुवातीला राज ठाकरे यांनी उपस्थितांना संबोधित केले. त्यानंतर बोलताना उद्धव ठाकरे यांनी राज ठाकरे यांच्या भाषणाचे कौतुक केले. राज आणि माझी भेट व्यासपीठावर झाली. पंचायत अशी, त्यांनी मला सन्माननीय उद्धव ठाकरे म्हटलं. साहजिकच (पान २ वर)





### ठाकरे बंधूंच्या एकीचे एम.के. स्टॅलिन यांनी केलं स्वागत



**मुंबई :** राष्ट्रीय शिक्षण धोरणातील त्रिभाषा सूत्राच्या विरोधातील लढ्यात आघाडीची भूमिका घेतलेले तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी हिंदी सक्तीविरोधात राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या एकत्र येण्याचे स्वागत केले आहे. शिवसेनेचे (ठाकरे गट) प्रमुख उद्धव ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी महाराष्ट्रात त्रिभाषा सूत्राच्या अंमलबजावणीला कडाडून विरोध दर्शवला आहे. या धोरणाच्या अंमलबजावणीसंबंधीचे आदेश राज्य सरकारने मागे घेतल्याचा विजय साजरा करण्यासाठी, शनिवारी (पान २ वर)

### म्हणून सरन्यायाधीश मराठीतून बोलतो म्हणाले !



**मुंबई :** देशाचे ५२ वे सरन्यायाधीश भूषण गवई यांचा शनिवारी शासकीय विधि महाविद्यालयात सत्कार करण्यात आला. त्यावेळी, उपस्थितांना मराठीतून संबोधित करू की इंग्रजीतून याबाबत आपण थोडे गोंधळलेलो असल्याचे सरन्यायाधीश म्हणाले. त्यावर उपस्थितांमधून मराठीतून बोला सांगण्यात आल्यानंतर मराठीतून बोलू ? सगळ्यांना समजेल का ? असा प्रश्न गवई यांनी केला. तसेच, ठीक आहे महाराष्ट्रात सध्या जे सुरू आहे, ते पाहता मी मराठीतूनच बोलतो, असे म्हणत भाषणाला सुरूवात केली. सरन्यायाधीशांच्या या मिश्किल टिप्पणीवर सभागृहात हशा पिकला.

### ठाकरेंच्या एकत्र येण्याने कार्यकर्त्यांमध्ये उत्साह

**मुंबई-** हिंदी सक्तीच्या विरोधात उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे एकत्र आल्यामुळे दोघांच्याही कार्यकर्त्यांमध्ये उत्साह निर्माण झाला आहे. पालिकेच्या निवडणुकीच्या तोंडावर हे दोन बंधू एकत्र आल्यामुळे पक्षाच्या स्थानिक कार्यकर्त्यांबरोबरच इच्छुक उमेदवारांमध्येही उत्साहाचे वातावरण आहे. मात्र शिवसेना (ठाकरे) आणि मनसे यांचे मतदारसंघ सारखेच असल्यामुळे पालिकेच्या निवडणूकीच्यावेळी मतांचे एकत्रिकरण होईल पण काही जागा मनसेसाठी सोडाव्या लागतील याचीही आता चर्चा होउ लागली आहे. गेल्या कित्येक दिवसांपासून महाराष्ट्राच्या राजकारणात ठाकरे बंधू एकत्र येणार का याचे तर्कवितर्क लावले जात होते. शनिवारच्या विजयी मेळाव्यानंतर या चर्चेला पूर्णविराम मिळाला आहे. मात्र (पान २ वर)

## महिला अत्याचार प्रकरणांत 'मोक्का' लागू ?

### उपमुख्यमंत्री अजित पवार यांची माहिती

**पुणे/प्रतिनिधी :** महिलांवरील अत्याचाराच्या गंभीर घटनांमध्ये महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मोक्का) लावण्याचा विचार सुरू आहे. याबाबत मंत्रिमंडळाच्या बैठकीत चर्चा झाली असून, कायदेशीर बाबी तपासण्याच्या सूचना दिल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितली. चिंतामणी ज्ञानपीठ आणि अप्पा रेणुसे मित्र परिवार यांच्या वतीने आयोजित गुरु जन गौरव समारंभात अजित पवार यांच्या हस्ते उद्योजक अरुण फिरोदिया, ज्येष्ठ संपादक विजय कुवळेकर आणि ज्येष्ठ नृत्यांगना शमाताई भाटे यांना गौरवण्यात आले.पवार म्हणाले, महिलांच्या



सुरक्षेबाबत कायदा आणि सुव्यवस्था चोख असावी, यासाठी वेळोवेळी कायदे करण्यात आले आहेत. अशा प्रकरणांवर कठोर भूमिका घेण्याचा शासनाचा प्रयत्न असतो. कोंढवासारखी प्रकरणं पुढे आल्यानंतर समजतं की वस्तुस्थिती काहीशी वेगळी होती. काही गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक अत्यंत नीच वर्तन करतात, त्यामुळे समाजात अस्वस्थता निर्माण होत असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. पवार म्हणाले, माणसाचे वय कितीही झाले तरी शेवटपर्यंत शिकण्याची गरज असते. आपण सगळं काही जाणतो असं समजण्याचं कारण नाही. प्रत्येकाच्या आयुष्यात गुरूचे स्थान अत्यंत महत्त्वाचे असते. गुरू म्हणजे अंधार दूर करून ज्ञानाचा प्रकाश देणारा. आजच्या स्पर्धेच्या (पान २ वर)

## राज्यातील कंत्राटदारांचे 89 हजार कोटी रूपये थकले

### ■ संतप्त कंत्राटदारांची निदर्शने ■

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील कंत्राटदार आणि सुशिक्षित बेरोजगार अभियंते संकटात सापडले आहेत. गेल्या तीन ते चार वर्षांपासून या कंत्राटदारांची बिले मिळालेली नाहीत. त्यामुळे राज्यभर ठीकठिकाणी आंदोलने होउ लागली आहेत. महाराष्ट्र शासन एकीकडे हजारो कोटींच्या नव्या योजनांच्या घोषणांचा पाउस पाडत आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार राज्याची आर्थिक स्थिती भक्कम असल्याचे दावे करतात. प्रत्यक्षात मात्र राज्य शासनाकडे विकास कामे केलेल्या कंत्राटदारांची बिले देण्यास पैसे नाहीत. त्यामुळे राज्यात अतिशय गंभीर स्थिती निर्माण झाली आहे.यासंदर्भात राज्यातील कंत्राटदार असोसिएशनने मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. गेल्या महिन्यात याबाबत उच्च न्यायालयाने राज्य शासनाला नोटीस बजावली आहे. अर्थमंत्री अजित पवार आणि संबंधित विभागांकडून त्याचे उत्तर अपेक्षित आहे, अशी माहिती नाशिकच्या कंत्राटदार संघटनेने दिली.धुळे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जिल्हा मजूर फेडरेशन आणि धुळे जिल्हा कॉन्ट्रॅक्टर असोसिएशन (पान २ वर)

### घरच्या मैदानातही नीरजला 'गोल्ड'

*बंगळुरु/वृत्तसंस्था :* *दोन वेळचा ऑलिम्पिक चॅम्पियन अन् भारताचा गोल्डन बॉय नीरज चोप्रा याने घरच्या मैदानात रंगलेल्या आंतरराष्ट्रीय भालाफेक स्पर्धेत गोल्डन कामगिरी करून दाखवलीये. बंगळुरु मध्ये पार पडलेल्या NC Classic स्पर्धेत ८६.१८ मीटर थ्रोसह नीरज चोप्रानं सुवर्ण पदक पटकावले आहे. केनियाचा ज्युलियस येगो याने ८४.५१ मीटर थ्रोसह रौप्य तर श्रीलंकेच्या रुमेश पथिरेज याने ८४.३४ मीटर थ्रोसह कांस्यवर नाव कोरले.*



## नाशिक जिल्ह्यात मोठा भूखंड घोटाळा उघड

### महसूल मत्र्यांनी अधिका-याला थेट घरीच पाठवले

**नाशिक/प्रतिनिधी :** नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील संगमेश्वर परिसरात गट क्रमांक १४/अ या ग्रीन झोन क्षेत्रातील जमिनीवर अवैध भूखंड वाटपाचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या जमिनीचे १६ मोठ्या तुकड्यांमध्ये विभाजन करून त्यातून तब्बल २७२ लहान भूखंड तयार करण्यात आले. विशेष म्हणजे, यापैकी २५८ भूखंडांची नोंदणीही अधिका-यांकडून करण्यात आल्याचे निष्पन्न झाले आहे.याप्रकरणी तत्कालीन प्रांताधिकारी उद्धय किसवे यांना तातडीने निलंबित करण्याचे आदेश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत. किसवे यांच्या कार्यकाळात (६ जून २०११ ते १५ सप्टेंबर २०१३) हे सर्व व्यवहार झाले असून, या प्रकरणाची विभागीय चौकशी करण्यात येईल, तसेच, २०१३ ते २०१९ या सहा वर्षांतील मुद्रांक अधिका-यांनी किती दस्तांची नोंद केली, याचीही प्राथमिक चौकशी सुरू असून, दोषींवर निलंबनाची कारवाई करण्यात येणार आहे. भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात ही लक्षवेधी सूचना मांडली. पडळकर म्हणाले, मालेगावमधील स्टॅम्प विक्रेते जाकीर



आणि आरिफ अब्दुल लतीफ यांनी भूखंड विक्रीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात नागरिकांची फसवणूक केल्याचे उघड झाले आहे. विशेष बाब म्हणजे संबंधित जमीन १६ मार्च २०१३ रोजी वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रूपांतरित करण्यात आली होती. मात्र, १४ फेब्रुवारी २०२३ रोजी तत्कालीन अप्पर जिल्हाधिका-यांनी घेतलेल्या निर्णयानुसार हा बदल रद्द ठरविला.

## अल्लू अर्जुनच्या वडिलांची ईडीकडून चौकशी

### अल्लू अरविंदवर १०० कोटी रुपयांच्या बँक फसवणूक आणि मनी लॉंड्रिंगचा आरोप

**बंगळुरु/वृत्तसंस्था :** पॅन इंडिया स्टार अल्लू अर्जुनचे वडील आणि प्रसिद्ध तेलुगू निर्माता अल्लू अरविंद मनी लॉंड्रिंग आणि बँक फसवणूक प्रकरणात ईडीसमोर हजर झाले. ईडीने शुक्रवारी हैदराबादमध्ये त्यांची तीन तास चौकशी केली. ही चौकशी १०१.४ कोटी रुपयांच्या बँक फसवणूक आणि मनी लॉंड्रिंग प्रकरणाशी संबंधित होती. हे प्रकरण रामकृष्ण इलेक्ट्रॉनिक्स आणि रामकृष्ण टेलिट्रॉनिक्स (RTPL) या दोन कंपन्यांशी संबंधित आहे. ईडी कार्यालयातून बाहेर पडल्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. यामध्ये त्यांनी सांगितले की, त्यांनी २०१७ मध्ये एक मालमत्ता खरेदी केली होती. हा खटला त्याशी संबंधित आहे. ग्रेट आंध्रने शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये ते म्हणतात - 'मी कायद्याचे पालन करणारा नागरिक आहे. तपास योग्यरित्या पुढे जावा यासाठी मी ईडीला सहकार्य करत आहे.' तसेच, त्यांनी सांगितले की ते या प्रकरणाशी संबंधित माहिती देउ शकत नाहीत, कारण एजन्सी अजूनही त्याची चौकशी करत आहे. हे प्रकरण रामकृष्ण इलेक्ट्रॉनिक्स आणि रामकृष्ण टेलिट्रॉनिक्सच्या आर्थिक अनियमिततेशी संबंधित आहे. इंडिया टुडेच्या वृत्तानुसार, या तपासासाठी ईडीने हैदराबाद, कुर्नूल आणि गाझियाबादसह अनेक ठिकाणी छापे टाकले आहेत. आंध्र बँकेने दाखल केलेल्या तक्रारीनंतर हे प्रकरण



उघडकीस आले. आता ही बँक युनियन बँक ऑफ इंडिया म्हणून ओळखली जाते. बँकेने दाखल केलेल्या तक्रारीत असे म्हटले आहे की, रामकृष्ण इलेक्ट्रॉनिक्स आणि रामकृष्ण टेलिट्रॉनिक्स समूहाने बँकेकडून मिळालेल्या कर्जाचा गैरवापर केला आहे. बंगळुरूमध्ये, सीबीआयने रामकृष्ण इलेक्ट्रॉनिक्स, आरटीपीएल आणि त्यांचे संचालक आणि भागधारक व्ही. राघवेंद्र, व्ही. रवी कुमार आणि इतरांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या कंपन्या मोबाईल फोनची विक्री आणि विपणन करण्यात गुंतल्या होत्या. त्यांनी ओपन कॅश क्रेडिट (ओसीसी) सुविधेअंतर्गत कर्ज घेतले होते.




# पोदार प्रेप येथे योग इन मड डे उत्साहात साजरा

**अमरावती/प्रतिनिधीः-** पोदार प्रेप येथे योग इन मड डे चे आयोजन पोदार प्रेप डायरेक्टर डॉ. स्वाती वत्स यांच्या संकल्पनेतून करण्यात आले होते. योग इन मड हा अभिनव उपक्रम येथे पार पडला. हा विशेष उपक्रम मातीशी सृजनशील मैत्री व योग साधनेचा आत्मिक अनुभव यांचा मनमिळावू संगम साधण्यात आला. मातीच्या नैसर्गिक स्पर्शातून मिळणाऱ्या संवेदना आणि योगाच्या माध्यमातून होणारे शरीर व मनाचे संतुलन यामुळे सर्वांनी एक वेगळाच आनंद अनुभवला कार्यक्रमाचे उद्दिष्ट स्पष्ट करताना मुख्याध्यापिका वरदा पाठक यांनी मृदा व योग यांचे जीवनातील महत्त्व विशद केले. त्यांनी सांगितले की निसर्गाच्या जवळ जाणे व शरीर मनाला एकत्र घेऊन जाणारा योग मुलांच्या समतोल विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा




आहे तसेच पोदार इंटरनॅशनल शाळेचे प्राचार्य नितीन कोळी यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.त्यांनी आपले विचार व्यक्त करताना सांगितले की पोदार प्रेप मध्ये मातीसारख्या सृजनशील घटकांसोबत योगाचा संगम केल्याने मुलांमध्ये सर्जनशीलता, संवेदनशीलता, आत्मविश्वास आणि पालक मुलांमधील नात्याची जुळवणी अधिक घट्ट होते. या कार्यक्रमासाठी शाळेचे जनरल मॅनेजर अमन टेमुर्णे आणि शाळेच्या मेंटॉर सजीथा मॅम यांनी मुलांना व विद्यार्थ्यांना व शिक्षकांना विशेष शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांच्या वयोगटा नुसार माती रंगरेषा मित्र माती आणि योगा चिखलपाक कला, पायातील मस्ती ,योगातील मस्ती ,चिखलहस्त ,योगमुद्रा चिखलतील मनसोक्त खेळ अशा विविध रचनात्मक आणि मजेशीर उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. पालकांनी मुलांसोबत कार्यक्रमाचा मनसोक्त आनंद लुटला. अशा प्रकारचे कार्यक्रम पोद्दार प्रेप या शाळेमध्ये नेहमीच साजरे केल्या जातात आणि त्याकरीता सर्व पालकांनी शाळेच्या मुख्याध्यापिका वरदा पाठक यांचे भरभरून कौतुक केले तसेच अशा प्रकारचे आनंददायी कार्यक्रम नेहमीच आयोजित करावे असे सुद्धा सुचविले.शाळेचे प्रशासकीय अधिकारी पंकज आकांत आणि सहकारी यांच्या विशेष सहकार्यामुळे शाळेचा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.शाळेचे शिक्षक वृंद सारिका खटे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तसेच या कार्यक्रमाला यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी शाळेचे शिक्षक वृंदा निलीशा खेरे ,पल्लवी जोशी ,रोमा गेही, वर्षा बाकडे ,सोनाली मोरे व धनश्री यांनी मोलाचे योगदान दिले.

# ऑर्किड सिटी इंटरनॅशनल स्कूलमध्ये आषाढी एकादशी उत्साहात

**अमरावती/प्रतिनिधीः-** ऑर्किड सिटी इंटरनॅशनल स्कूल नवसारी, अमरावती येथे आज दि.५ जुलै २०२५ रोजी आषाढी एकादशीचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून पांडुरंगाच्या भक्तीने संपूर्ण वातावरण पवित्र आणि भक्तिमय केले.कार्यक्रमाची सुरुवात वारकऱ्यांच्या वेशात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या दिंडी सोहळ्याने झाली. काही विद्यार्थ्यांनी विठ्ठल रुखमिनीची वेशभूषा करून दर्शन घडविले. छोट्या चिमूकल्यांनी रिंगण करून



टाळ-मृदंगाच्या गजरात 'विठू माऊली, रखुमाई माऊली' च्या जयघोषाने संपूर्ण शाळा दुमदुमून टाकली.

विद्यार्थ्यांनी अभंग, भजन, नृत्यनाटिका आणि गीतांद्वारे संत तुकाराम व संत ज्ञानेश्वरांच्या कार्याचा गौरव केला.मुख्याध्यापिका वर्षा राठोड शर्मा यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांनी भक्ती आणि संस्कृती यांचा समतोल राखत हा कार्यक्रम साजरा केल्याबद्दल कौतुक केले. तसेच मराठी शिक्षिका संगीता साबळे (वानखडे) यांनी वारकरी संप्रदाय आणि आषाढी एकादशीचे महत्व सांगून विद्यार्थ्यांना सदाचरण आणि साधेपणाचे महत्त्व पटवून दिले.संगीत शिक्षिका संगीता पवार यांनी अपार मेहनत व कार्यक्रमाचे नियोजन करून हा कार्यक्रम उत्कृष्टपणे पार पाडला. तसेच सर्व शिक्षक वृंदाचा सहभाग लाभला. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये अध्यात्मिक जाणीव तसेच सांस्कृतिक मूल्यांची रुजवणूक झाली. सर्वांनी या उपक्रमाचे मनःपूर्वक स्वागत केले. शाळेच्या मुख्याध्यापिका वर्षा राठोड शर्मा मॅडम, व्यवस्थापन समीती गौरी मॅडम, ममता ठाकरे मॅडम, अंगद सर यांनी आपली उपस्थिती दर्शवून कार्यक्रमाची शोभा वाढविली व सर्व चिमूकल्यांचे कौतुक केले.

# श्रीमती हिराबाई गोयनका कन्या विद्यालयात भव्यदिंडीचे आयोजन

## -विठू माऊलीच्या नामघोषात गजर, रिंगण घालत नवचैतन्य

**धामणगाव रेल्वे/प्रतिनिधीः-** महाराष्ट्राचे आराध्य दैवत,वारकऱ्यांचे श्रद्धास्थान, संत शिरोमणी 'विठू माऊली'! आषाढी एकादशीनिमित्त वैष्णवांचा मेळा पंढरपुरात जमला व हजारो दिंड्या पताक्यांच्या गजरात पंढरीच्या पांडुरंगाचे लाखो भक्तांनी 'याची देही याची डोळा' दर्शन घेतले व कृतकृत्य झाल्याचे समाधान मिळवले. याचेच औचित्य साधून धामणगाव एज्युकेशन संस्थेद्वारा संचालित श्रीमती हिराबाई गोयनका कन्या विद्यालयात दिनांक ०५ जुलै २०२५ शनिवार रोजी सकाळी १० वाजता भव्यदिंडीचे आयोजन करण्यात आले होते.वर्ग ५ ते १० च्या विद्यार्थिनींनी विठू माऊलीच्या नामघोषात गजर व पावली टाळ घेत, रिंगण घालत, भजनाने धामणगाव नगरीत एक चैतन्यच भरून टाकले. प्रथम विठ्ठलाच्या पालखीचे शाळा समितीच्या अध्यक्षा आदरणीय शोभा देवी राठी व शाळेच्या मुख्याध्यापिका देशपांडे मॅडम यांच्या हस्ते विठ्ठल व रुखुमाई यांचे तुळशीपत्र ,पुष्पहार घालून पूजन केले गेले. शाळेतून पालखी दिंडीला सुरुवात झाली. प्रभात विभागातील विठ्ठलाच्या वेशभूषेत तुळशी हरीश पुरोहित तर रुक्मिणीच्या वेशभूषेत स्वरा अमोल काळमेघ (वर्ग ५ पाझंरा ) तर माध्यमिक विभागातील विठ्ठलाच्या वेशभूषेत प्रयोगी गोडबोले(वर्ग १० नंदिनी) व लक्ष्मी धांदे (८ अलकनंदा) तर विधी चौधरी १० (नंदिनी) व भूमिका साळवीकर (१० पयोष्णी) या विद्यार्थिनी रुक्मिणीच्या वेशभूषेत होत्या . तर इतर विद्यार्थिनी वारकऱ्यांच्या वेशभूषेत तुळशी वृंदावन घेऊन दिंड्या पताका घेऊन सहभागी झाल्या होत्या.यासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका देशपांडे मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले. शाळेचे शिक्षक, शिक्षिका शिक्षकेतर कर्मचारी दिंडीत सहभागी झाले. प्रथम शास्त्री चौकातील गजानन महाराज मंदिरात पूजन करण्यात आले. 'एक पेड़ माँ के नाम' या उपक्रमांतर्गत



वृक्षदिंडीची सुरुवात करण्यात आली. यामध्ये शाळेच्या मुख्याध्यापिका देशपांडे व उपमुख्याध्यापक राठोड तसेच इको क्लबचे प्रमुख वडगिरे यांच्या हस्ते नागरिकांना वृक्षाची रोपटे भेट म्हणून देण्यात आली.दिंडी धवणेवाडी येथील विठ्ठल रुक्मिणीच्या मंदिरात पोहोचली.तेथे शाळेच्या मुख्याध्यापिका देशपांडे , तसेच इतर शिक्षक शिक्षिका व विद्यार्थिनींनी विठ्ठल रुक्मिणी च्या मूर्तीचे पूजन करून, रिंगण घालून टाळ, लेझीम ने पावली घेत, दिंडी वाजत गाजत भजन म्हणत टाळ मृदुंगाच्या गजराने शाळेच्या आवारात पोहोचली. त्यानंतर विद्यार्थिनींनी टाळ,लेझीम चे रिंगण घालून परत विठुरायाच्या नामाचा गजर करत भक्तीचा आनंद घेतला. त्यानंतर वर्ग ९ व १० च्या विद्यार्थिनींनी समूह भजन गायन केले. या दिंडीच्या यशस्वीतेसाठी शाळेच्या मुख्याध्यापिका देशपांडे , उपमुख्याध्यापक राठोड , पर्यवेक्षिका टेंभुर्णे तसेच शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर बंधू यांचे सहकार्य लाभले. त्यानंतर शाळेच्या मुख्याध्यापिका देशपांडे यांनी सुद्धा चिमुकल्या वारकऱ्यासोबत विठ्ठलाचा जयघोष केला.

# १ व १० वरिल उर्वरित

## परतवाडा येथील अल्पवयीन

रिक्षा चालकाचा क्रमांक देखील नोंद केला होता. त्यामुळे पोलिसांना ऑटो चालकाचा शोध घेण्यास मोठी मदत मिळाली. कलम ७४,११८,(१),१३७ (२) बीएनएस सहकलम ८ पोक्सोनुसार आरोपी जाफर खान सुभेदार खान याच्याविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले. एमएच ३० ई ९४९७ या क्रमांकाचा ऑटो देखील ताब्यात घेतला आहे.

## परवाना दरवाढ, वॅट वाढीचा बार

आहे. तेथे सात लाख कर्मचारी काम करतात. खाद्य सामग्रीवर पण सहा लाख लोक अवलंबित आहे. तेरा लाख कुटुंबांचा उदरनिर्वाह या व्यवसायावर निर्भर आहे. जिल्ह्यात धाबे आणि इतर ठिकाणी दारू अवैधरित्या विकली जाते. यासंदर्भात काही वेळा जिल्ह्यात बंद पुकारण्यात आला. शासनाच्या नवीन निर्णयामुळे परमिट रूम बंद होण्याच्या मार्गावर पोहचले आहे. राज्यातील लाडक्या बहिणींना खुश करण्यासाठी दारू व्यापाऱ्यांवर सरकारने लाठी चालवली आहे, असा आरोप नितीन मोहोड यांनी केला. यासंदर्भात हॉटेल हरियाली येथे विदर्भ बार असोसिएशन च्या पदाधिकारी व सदस्यांची बैठक बोलविण्यात आली होती.यामध्ये ३२५ परमिट रूमचे संचालक हजर होते. वॅट वृद्धी रद्द करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वाशिम, नागपूर, चंद्रपूर, गोंदिया, भंडारा, वरोरा येथील पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. सर्वांनी शासनाच्या निर्णयाचा विरोध केला आणि १४ ला बंद ठेवण्याच्या निर्णय घेतला. बंद करून जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार आहे. पत्रकार परिषदेत नितीन मोहोड यांच्यासोबत परविंदसिंह भाटिया, मालवीय, रामदास राऊत, रवींद्र सिंग राणा, दिलीप बजाज, पंकज जयस्वाल, राजू जयस्वाल, राजू राजगूरे, पवनीकर, अग्रवाल, देशमुख, उपस्थित होते.

## शहरामध्ये टॅक्सच्या नावाखाली

करणे म्हणजे मोठा जाच आहे. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांकडे हा दंड माफ करण्याचा सर्वाधिकार असावा अशी आग्रही मागणी आणि या प्रश्नाचे गांभीर्य अमरावती पदवीधर मतदार संघाचे आमदार धीरज लिंगाडे यांनी सभागृहाच्या लक्षात आणून दिले.

मुंबई येथे पावसाळी अधिवेशन दरम्यान विधान परिषदेमध्ये आमदार धीरज लिंगाडे यांनी विविध लोकहिताच्या प्रश्नांना हात घातला आहे. मालमत्ता धारकांच्या अतिशय महत्त्वाच्या मुद्द्यावर त्यांनी आवाज उठवला. मालमत्ता धारकांच्या बाबत हा अतिशय महत्त्वाचा मुद्दा ठरला आहे. बहुतांश मालमत्ता धारक या टॅक्स प्रणालीच्या दोन टप्प्यांच्या बाबतीत अनभिज्ञ आहेत.

नगरपालिकेचे माध्यमातून कॉम्प्युटराईज टॅक्स बिल देण्यात आल्यानंतर दोन टप्पे पाडण्यात आलेले आहेत. पहिल्या टप्प्यात ऑक्टोबर पर्यंत जर टॅक्स बिल पेड केली नाही तर त्यावर दोन टक्के दर महिन्याला अतिरिक्त भार लावण्यात येतो. याला दंड म्हणावं तर हा अतिरिक्त बोजा आहे. पुढच्या टप्प्यातही हीच परिस्थिती आहे. हे सॉफ्टवेअर संपूर्ण नगरपालिकांमध्ये कॉमन लावण्यात आलेले आहेत. त्यामुळे त्यांच्याही मर्यादा आहेत. यासंदर्भामध्ये नागरिकांची मोठ्या प्रमाणात ओरड आहे. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांना हा दंड माफ करण्याचे सर्वाधिकार स्थानिक पातळीवर देण्यात यावेत यातून नागरिकांना सुविधा निर्माण होईल अशी आग्रही मागणी या दंड आकारणी संदर्भामध्ये आमदार धीरज लिंगाडे यांनी केली.

## भाजप संत गाडगेबाबा मंडळ व

प्रज्वल कडु, राहुल गवळी, किर्ती वाघमारे, रेखा मौर्य, कोषाध्यक्ष पदी चतुर बागडे, ओ.बी.सी. मोर्चा अध्यक्षपदी गजानन चिंचोळकर, महिला मोर्चा अध्यक्षपदी तुलसी बिरेली, युवा मोर्चा अध्यक्षपदी साहील बुंदेले, अनुसुचित जाती मोर्चा पदी प्रतिक गायगवाड, अनुसुचित जमाती मोर्चा पदी प्रदिप चव्हाण, अल्पसंख्यांक मोर्चा अध्यक्षपदी नईम अली नियाज अली, अध्यात्मीक मोर्चा अध्यक्ष पदी जुगलकिशोर ओझा, किसान मोर्चा अध्यक्ष पदी संजय ठाकरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

## २२ दिवसाच्या बाळाला गरम

हवाली केले. माहिती मिळताच अचलपूर पोलिसांनी तात्काळ कारवाई करत महाराष्ट्र जादूटोणा प्रतिबंधक अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. पोलिसाजवळ बाळाच्या आईने देखील स्वीकार केले की, त्यांनी बाळ ठीक व्हावे म्हणून तांत्रिकाच्या माध्यमातून गरम सळाखीने चटके दिले. हा उपचार नव्हे तर अघोरी अत्याचार आहे. मानवतेला लाजवणारी ही घटना आहे. आदिवासी समुदायाची प्रगती व्हावी, विकासाच्या मुख्य प्रवाहात त्यांना आणावे यासाठी सरकार अनेक प्रयत्न करीत आहे. परंतु तरीदेखील येथील लोकांचा आरोग्य व्यवस्थेवर जराही विश्वास नाही, ते आपल्या अनेक आजारावर तंत्र मंत्र क्रिया करतात. बाळाला गंभीर चटके दिल्याने त्याची तब्येत आणखीनच खालावली आहे. त्याला सरकारी हॉस्पिटल मध्ये दाखल करण्यात आले आहे.यापूर्वी देखील मेळघाटात अशा प्रकारचे अघोरी अत्याचार व उपचाराच्या घटना समोर आल्या होत्या. पोलीसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल करून तपासात घेतला आहे.

## नेट मीटर मंजुरीसाठी लाच

असलेल्या तक्रारदाराने दोन ग्राहकांसाठी २ किलोवॅट क्षमतेचे सोलर पॅनल बसवले होते. त्यानंतर नेट मीटरसाठी महावितरण कार्यालयात अर्ज केला असता, सहाय्यक अभियंता नितीन भगत याने एका किलोवॅटसाठी १००० रुपये या दराने एकूण ४ हजार रुपये लाचेची मागणी केली. तक्रारदाराने ही माहिती लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती यांना दिली. खात्रीशीर पडताळणी करून गुरुवारी (दि.४ जुलै) सायंकाळी ६.४५ वाजता वरुड येथील मुलताई चौकातील 'साई पान सेंटर' येथे सापळा रचण्यात आला. यावेळी नितीन भगत याने तडजोडीनंतर ३ हजार रुपये स्वीकारले आणि त्याच क्षणी अधिकाऱ्यांनी त्याला रंगेहाथ पकडले. या प्रकरणी वरुड पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक मारुती जगताप, अपर पोलीस अधीक्षक सचिंद्र शिंदे, तसेच पोलीस उप अधीक्षक सुनील किनगे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाईत निरीक्षक निलीमा सातव, चित्रा मेसरे, योगिता ठाकरे, उपेंद्र थोरात, वैभव जायले, शैलेश कडू, आशीष जांभोळे, राजेश बहिरट आणि सतीश कितुकले यांचा सहभाग होता.

## मध्यप्रदेशातून आलेल्या ४५० लिटर

गावठी दारू वाहून नेली जात होती. दोन्ही वाहनांच्या मागील सीटवर नॉयलॉनच्या पोत्यांमध्ये बांधलेल्या ७ रबरी ट्युबमध्ये एकूण ४५० लिटर गावठी दारू साठवून मध्यप्रदेशातून महाराष्ट्रात आणली जात होती. या प्रकरणी पोलिसांनी नितेश सोमलाल धुर्वे (वय २४) व सुरेंद्र मनसूख नरे (वय २३, दोघेही रा. धाना, उमरी ता. पट्टन, जि. बैतूल (मध्यप्रदेश) यांना अटक केली आहे. त्यांच्यावर महाराष्ट्र दारूबंदी कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई डॉ. राजेश देशमुख (आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई) व प्रसाद सुर्वे (सहआयुक्त, मुंबई) तसेच डॉ. पराग नवलकर (प्रभारी विभागीय उपआयुक्त, अमरावती विभाग) व शशिकांत गर्जे (अधीक्षक, अमरावती) यांच्या मार्गदर्शनाखाली भरारी पथक, अमरावती, संतोष पी. वायाळ (प्रभारी निरीक्षक) व आकाश जाधव (प्रभारी दुय्यम निरीक्षक) यांच्या नेतृत्वाखाली एस.एस. पेंढारकर, आर.पी. मोकलकर, पी.आर. भोरे, के.एम. मातकर, महिला जवान व्ही.बी. पारखी व डी.डी. मानकर यांनी संयुक्तपणे केली. या प्रकरणाचा पुढील तपास प्रभारी निरीक्षक संतोष वायाळ करत आहेत.

## खुनाच्या गुन्ह्यातील फरार

शोध घेणे सुरूच ठेवले. मध्यप्रदेशातील महू येथे आरोपी लपून बसल्याची माहिती मिळाल्यानंतर मपोउपनि तनुजा खोब्रागडे यांच्या पथकाने तात्काळ धाड टाकून चार आरोपींना ताब्यात घेतले. त्यामध्ये अकील खान नजिर खान (वय ५२), रा. ओकापूर रोड, अकोट फाईल, देहाना खातून अकील खान (वय ४५), रा. अकोट फाईल, सुलताना बी शेख इमरान (वय ३०), रा. खदान, अकोला, समीन बी हुसेन खान (वय २६), रा. सिंधी कॅम्प, अकोला यांचा समावेश आहे.

सदर आरोपींना अटक करून अकोट फाईल पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आले असून त्यांच्याकडून पुढील तपास सुरू आहे. तपास अधिकारी म्हणून सपोनि जनार्धन खंडेराव पुढील तपास करीत आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अप्पर पोलीस अधीक्षक अभय डोंगरे, उपविभागीय पोलिस अधिकारी सतीश कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि शेख रहीम, सपोनि जनार्धन खंडेराव, मपोउपनि तनुजा खोब्रागडे, एएसआय अनिस पठाण, प्रशांत इंगळे, योगेश काटकर, संतोष चिंचोळकर, हर्बल श्रीवास, ईमरान शाह, गिरीश तिडके, अमिर, मिताली राऊत, गोपाल ठोंबरे (सायबर सेल) यांनी केली.

## लॉटरी सेंटरच्या आड ऑनलाइन

पोलिसांनी जप्त केलेल्या मालामध्ये ९,४०० रोख, एक मोबाईल आणि ऑनलाइन जुगारासाठी वापरण्यात येणारे साहित्य यांचा समावेश आहे. एकूण जप्तीची रक्कम ४८,६०० इतकी आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरीया, उपायुक्त गणेश शिंदे, उपायुक्त श्याम घुगे, सहायक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात सहाय्यक पोलीस निरीक्षक महेश इंगोले, संजय वानखडे, महेंद्र येवतीकर, गजानन ढेवले, दीपक सुंदरकर, मनोज ठोसर, आस्तिक देशमुख, संग्राम भोजने, मंगेश शिंदे, योगेश पवार, राजीक रायलीवाले, विशाल वाकपांजर, सागर ठाकरे, चेतन कराडे, संदीप खंडारे, चेतन शर्मा, राहुल दुधे यांनी केली.

## तेरा फूट लांबीच्या अजगराने

अंदाजे २० किलो वजनाच्या बकरीला आपली शिकार बनविण्याचा प्रयत्न केला.सुरवाडी खुर्द शेत शिवारात परिसरातील भूषण भोंबे यांच्या बकऱ्या नेहमीप्रमाणे आजही शुक्रवारी चरण्यासाठी गेल्या होत्या.त्याच भागात भला मोठा अजगर दडून बसला होता. याची कल्पना त्या बकरीला नव्हती.अजगराने बकरीला आपल्या ताब्यात घेतले व पाहता पाहता घट्ट आळा बकरीला मारला.हा आळा मारल्याने अजगराला कमालीचा त्रास होत होता.ही बाब काही लोकांच्या निदर्शनास येताच त्यांनी ही माहिती सर्पमित्र अविनाश पांडे यांना दिली.तेव्हा सर्पमित्रांनी अजगराच्या तावडीतून त्या बकरीला वाचवण्यासाठी खूप प्रयत्न केले. परंतु बकरीचा यात जीव वाचला नाही. मात्र अजगराचे प्राण वाचवण्यात ते यशस्वी झाले. सर्पमित्र अविनाश पांडे यांनी अजगराला सुरक्षितपणे पकडल्यानंतर त्याला वन विभाग येथे नोंद करून नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले. ज्यामुळे त्याला नवीन जीवन मिळाले.

सुरवाडी भागात अजगराने बकरीला आवळल्याने तिचा मृत्यु झाला.या घटनेची नोंद घेण्यात आली असून मृतक बकरीचा देखील पंचनामा करण्यात आला.सर्पमित्राने अजगराला सुखरूप पकडून आणले,याची नोंद घेतल्यानंतर अजगराला नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले.

**-एस डब्ल्यू घोडमाडे, वनपाल,तिवसा**

## जिल्हा काँग्रेस कमिटीच्यावतीने

, शहर व ग्रामीण भागातील मंडळ अध्यक्ष मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून काँग्रेस नेते बबलू देशमुख यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, 'निवडणुका फक्त काही महिन्यांवर येऊन ठेपल्या असून, प्रत्येक कार्यकर्त्याने आपला मंडळ हा निवडणुकीचा किल्ला समजून कामाला लागले पाहिजे. मंडळ मजबूत तर मत मजबूत.'

ते पुढे म्हणाले की, काँग्रेस पक्षाची विचारधारा लोकशाही व सर्वसामान्यांच्या हक्कांसाठी लढणारी आहे. ती जनतेपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वाचे काम मंडळ अध्यक्षांचे आहे. प्रत्येक प्रभाग, वॉर्ड, गाव पातळीवर काँग्रेसचा झेंडा अधिक भक्कमपणे फडकवण्यासाठी कामाला चालना देणे आवश्यक आहे. या बैठकीत मंडळ निहाय नियोजन, मतदार यादीतील तपशील, युवकांमध्ये जनजागृती, महिला सहभाग वाढविणे, सोशल मीडियाचा प्रभावी वापर यावरही चर्चा झाली. कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा काँग्रेसचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी संयुक्तरीत्या केले.

शेवटी उपस्थित मंडळ अध्यक्षांनी संघटनेच्या आदेशानुसार पुढील कामकाजासाठी सज्ज असल्याची ग्वाही दिली. यावेळी प्रमोद दाळू, श्रीकांत बोंडे, निशांत जाधव, नामदेव तनपुरे, सहदेव बेलकर, महेंद्र गैलवार, समीर पाटील, प्रवीण सवयी, प्रदीप देशमुख, शरद भेटाळू, राहुल बोडके उपस्थित होते.

## इंस्टाग्रामवर पिस्टलसह 'माफिया

परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. मॉल व्यवस्थापक संजय मांगो यांनी राजापेठ पोलिस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर पोलिसांनी तत्काळ तपास सुरू केला. तक्रारीची दखल घेत पोलीस निरीक्षक पुनीत कुलट यांच्या मार्गदर्शनाखाली डिटेक्टिव्ह शाखेचे प्रमुख पोलिस हवालदार मनीष करपे तपासाला लागले. गुप्त माहितीच्या आधारे संबंधित तरुणाची ओळख पटवण्यात आली. त्याचे नाव ओम सागर जाधव (रा. अमरावती) असे असून, त्याला त्याच्या राहत्या घरातून ताब्यात घेण्यात आले. त्याच्या मोबाईलवरील इंस्टाग्राम खात्यावर ती रील आढळून आली. चौकशीत त्याने व्हिडीओत स्वतः असल्याची कबुली दिली.

पोलिसांनी विचारणा केल्यानंतर आरोपीने सांगितले की, ती प्लास्टिकची खेळण्याची बंदूक होती. तपासात हेही स्पष्ट झाले. मात्र समाजात भीती पसरवणारा प्रकार केल्यामुळे पोलिसांनी पिस्टल जप्त करून आरोपीवर कायदेशीर कारवाई केली.

राजापेठ पोलिसांनी सर्व युवकांना इशारा दिला आहे की, अशा प्रकारच्या 'दहशत निर्माण करणाऱ्या' व्हिडीओ क्लिप्स सोशल मीडियावर टाकल्यास कडक कारवाई करण्यात येईल.

००००००००००००००००००००००००००

## जमलेल्या माझ्या तमाम

कुणाला न विचारता निर्णय लादला. तुमच्याकडे सत्ता आहे विधान भवनात आणि आमच्याकडे सत्ता आहे रस्त्यावर. दादासाहेब भुसे आले होते. म्हणत होते, मी काय बोलतो ते ऐकून घ्या. मी म्हणालो, ऐकून घेईल पण ऐकून घेणार नाही.

## एकत्र आलोय ते एकत्र

आहे, त्याचंही कर्तृत्व आपण सर्वांनी पाहिलं आहे, असे उद्धव ठाकरे म्हणाले. त्यांनी आपल्या भाषणाची सुरु वात सन्माननीय राज ठाकरे आणि जमलेल्या माझ्या तमाम मराठी हिंदू माता-भगिनींनो अशी केली. उद्धव ठाकरे यांनी मेळाव्याकडे सर्वांचे लक्ष भाषणापेक्षा त्यांच्या एकत्र दिसण्यावर असल्याचे नमूद केले. माझ्या भाषणाची काही गरज आहे, असे वाटत नाही. आजच्या कार्यक्रमाची घोषणा झाल्यावर सर्वांचे लक्ष भाषणाकडे आहे. पण भाषणापेक्षा आमचं एकत्र दिसणं याकडे सर्वांचं लक्ष आहे, असेही ते म्हणाले.

## ठाकरे बंधूंच्या एकीचे एम.के.

त्यांनी मराठीचा आवाज हा मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्यात उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे २००५ नंतर प्रथमच एकाच व्यासपीठावर एकत्र आले होते. यावेळी उद्धव ठाकरे यांनी, एकत्र राहण्यासाठीच एकत्र आलो आहोत, असे जाहीर केले. तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन हे त्रिभाषा सूत्राच्या विरोधात आघाडीवर आहेत. त्रिभाषा सूत्रांतर्गत, पहिलीपासून विद्यार्थ्यांना त्यांची मातृभाषा आणि किमान एक अन्य भारतीय भाषा यासह तीन भाषा शिकणे बंधनकारक आहे.

## ठाकरेंच्या एकत्र येण्याने

आता नव्या शक्यतांवर चर्चा रंगू लागली आहे. या दोन्ही पक्षांचे बालेकिल्ले एकच आहेत त्यामुळे निवडणूकीला हे दोन्ही पक्ष एकत्रितपणे सामोरे जातील का याबाबत शंका व्यक्त केली जात आहे. मात्र या दोन भावांनी एकत्र यावे ही कार्यकर्त्यांचीच इच्छा होती. त्यामुळे त्यातून काहीतरी मार्ग निघेल अशी आशा कार्यकर्ते व्यक्तकरीत आहेत. २०१७ च्या पालिका निवडणूकीत मनसेचे केवळ सात नगरसेवक निवडून आले होते. तर २०१२ च्या निवडणूकीत तब्बल २८ जागा मनसेने मिळवल्या होत्या. त्यामुळे मुंबईतील या २८ प्रभागांमध्ये मनसेचे आजही मतदार आहेत. त्यामुळे मनसेच्या इच्छुक उमेदवारांचेही यंदाच्या पालिका निवडणूकीकडे लक्ष लागले होते. दोन बंधू एकत्र आले तरच निवडणूक लढवायची असाही निर्धार अनेकांनी केला आहे.मतांची विभागणी झाल्यामुळे होणारे नुकसान परवडणारे लक्षात आल्यामुळे आता दोन्ही पक्षाच्या कार्यकर्त्यांना आता ठाकरे बंधू एकत्र आल्यास फायदा होईल असा विश्वास वाटतो. शिवडी, परळ, विशेषतः दादर, माहीम हे या दोन पक्षांचे समान मतदारसंघ आहेत. या सगळ्या मतदार संघांवर सध्या उद्धव ठाकरे यांच्या पक्षाचा वरचष्मा असला तरी काही जागा मनसेसाठी सोडाव्या लागणार आहेत. इतर कोणाशीही युती आघाडी केली तरी जागा सोडाव्या लागतातच त्यामुळे मनसे आणि शिवसेनेने एकत्र येउन निवडणूक लढवली तर मत विभाजनाचा फटका तरी बसणार नाही, असा विश्वास या दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांना वाटतो आहे.

## महिला अत्याचार प्रकरणांत

काळात गुरू-शिष्य नातं पूर्वीसारखं राहिलेलं नाही. पण खरा गुरू शिष्याच्या शरीर, मन, बुद्धी आणि आत्मा यांना घडवतो आणि त्याला योग्य वाट दाखवतो. संघर्षाचा मार्ग शिकवतो, कठीण प्रसंगांना सामोरे जाण्याची ताकद देतो.अरुण फिरोदिया परदेशातील नामवंत संस्थांमध्ये शिक्षण घेतल्यानंतर भारतात परत आले आणि त्यांनी आपले ज्ञान, कौशल्य आणि दूरदृष्टी देशाच्या प्रगतीसाठी वाहून दिली.

## राज्यातील कंत्राटदारांचे

यांच्या वतीने जिल्हाधिका-यांना निवेदन देण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर या सुशिक्षित बेरोजगार अभियंते आणि कंत्राटदारांनी निदर्शने केली. शासनाकडून बिले मिळत नसल्याने हे कंत्राटदार आर्थिक संकटात सापडले आहेत. राज्यभरातील सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग, राष्ट्रीय आरोग्य मिशन आणि अन्य विभागांची विकास कामे पूर्ण केल्यावर बिले सादर करण्यात आली आहेत. ८९ हजार कोटी रुपयांची बिले थकित आहेत.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला | वाशिम | बुलडाणा

■ रविवार, ६ जुलै २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

epaper : janmadhyam.com
mail : jmakola.thakur@gmail.com


## समन्वयाने काम करून विहित मुदतीत अपूर्ण कामे पूर्ण करावीत- डॉ. भारत बास्टेवाड

■ प्रतिनिधी | वाशिम ■

**जिल्ह्यातील विविध विकास योजनांची अंमलबजावणी व अपूर्ण कामांची पूर्तता या संदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयातील राजे वाकाटक सभागृहात २ जुलै रोजी महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत डॉ. भारत बास्टेवाड यांनी विविध शासकीय यंत्रणांना समन्वयाने काम करून विहित मुदतीत अपूर्ण कामे पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश दिले.**



### आढावा बैठक संपन्न

यावेळी रोहयो विभागाचे राज्य समन्वयक अभय तिजारे, उपवनसंरक्षक अभिजित वायकोस, उपजिल्हाधिकारी रोहयो कैलास देवरे, सर्व तहसीलदार, सर्व बिडीओ यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत सन २०२२-२३ व २०२४-२५ या कालावधीत विविध यंत्रणांनी केलेल्या आणि अपूर्ण असलेल्या कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यात रोहयो, घरकुल, सिंचन विहीर, फळबाग, रस्ते, ग्रामपंचायत योजना, रेशीम, वनविभाग, कृषी, जलसंधारण व जलसंपदा विभागांची कामे विशेषतः अधोरेखित करण्यात आली.

डॉ. बास्टेवाड यांनी सांगितले की, 'रोहयो' ही ग्रामविकासाची मुख्य आधाररचना आहे. त्यामुळे त्यावर विशेष भर देत कामे वेगात पूर्ण करावीत. त्यांनी आगामी नियोजनाची माहितीही घेतली आणि कामांमध्ये गती आणण्यावर भर दिला.

दरम्यान, त्यांनी दिलेल्या सूचनांनुसार पुढील गोष्टींवर तातडीने कृती करण्याचे आदेश देण्यात आले आहेत: सर्व अपूर्ण कामे तत्काळ पूर्ण करावीत. सर्व अपूर्ण कामांची कुशल निधीसाठी विहित प्रपत्रांद्वारे मागणी करण्यात यावी. फळबाग, सिंचन विहीर व रस्त्यांची कामे प्रथम प्राधान्याने पूर्ण करावीत. सर्व संबंधित यंत्रणांनी कामावर विशेष लक्ष केंद्रित करून कामे गतीने पूर्ण करावीत. या बैठकीत प्रशासनाच्या विविध विभागांचे अधिकारी, संबंधित योजनांचे समन्वयक उपस्थित होते. दिलेल्या सूचनांची तातडीने अंमलबजावणी करणे आवश्यक असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

## ब्राह्मण सभाच्या वतीने गुणवंताच्या सत्काराचे आयोजन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

ब्राह्मण सभा वाशीम च्या वतीने २०२५ मध्ये १० वी १२ मध्ये उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभाचे रविवार, १३ जुलै रोजी लोकमान्य टिळक स्मारक भवन (जुनी रमेश टॉकीज) याठिकाणी सायंकाळी ५:३० वाजता आयोजन करण्यात आले आहे. ज्या विद्यार्थ्यांना वर्ग १० मध्ये ८० टक्के व वर्ग १२ मध्ये ७५ टक्के च्या वर गुण मिळाले आहेत अशा सर्व ब्राह्मण समाजातील विद्यार्थ्यांने आप - आपल्या गुण पत्रिकेची सत्यप्रत ब्राह्मण सभेच्या सभासादा जवळ १० जुलै पर्यंत जमा कराव्यात. त्यानंतर आलेल्या गुणपत्रिकेचा विचार करण्यात येणार नाही. यासाठी गजानन बावणे टिळक चौक चामुंडा देवी रोड (८८३०५८५१७४२) गजानन काळपांडे टिळक चौक व दूर्गा देवी चौक (८३०८६२५५४८३) प्रसाद निरखी सिव्हिल लाईन, तहसील कार्यालय जवळ (९४२२१६४१०६४) श्याम संगवई यांचेशी संपर्क साधून गुणपत्रिका द्याव्या, असे आवहान करण्यात आले.

## हरवलेले ८ मोबाईल मूळ मालकांना परत



■ प्रतिनिधी | कारंजा ■

पोलीस स्टेशन कारंजा शहर येथे CEIR (Central Equipment Identity Register) पोर्टलच्या माध्यमातून हरवलेले एकूण ८ मोबाईल हँडसेट मूळ मालकांना परत करण्यात आले. या मोबाईल्सची एकूण किंमत सुमारे १,५०,९००/- इतकी आहे.

या कार्यवाहीमध्ये पोलीस कॉन्स्टेबल पोकॉ/ ३०२ जावेद बेनीवाले यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांनी ठाणेदार मा. दिनेशचंद्र शुक्ला यांच्या मार्गदर्शनाखाली हरवलेले मोबाईल्स शोधून काढण्याचे काम अत्यंत नेटाने आणि तंत्रज्ञानाच्या सहाय्याने पार पाडले. सर्व मोबाईल मूळ मालकांशी संपर्क साधून त्यांना पोलीस स्टेशनमध्ये बोलावण्यात आले. मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, कारंजा यांच्या उपस्थितीत सर्व मोबाईल धारकांना त्यांचे मोबाईल सुस्थितीत परत करण्यात आले. मोबाईल प्राप्त झाल्यावर अनेक मालकांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंद स्पष्ट दिसून येत होता. या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये पोलीस प्रशासनाविषयी विश्वास वाढला असून, हरवलेली वस्तू परत मिळवण्यासाठी ऍंपोर्टल किती प्रभावी ठरू शकते, याचे उत्तम उदाहरण या माध्यमातून सादर झाले आहे.

## प्रत्येक प्रभागात हॉस्पिटल उघडून ओपीडी सुरु करा - आम आदमी पार्टीची मागणी

### उद्या ७ जुलैपासून साखळी उपोषण, मागण्या मंजूर न झाल्यास आमरण उपोषणाचा इशारा

■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला महानगरपालिकेच्या हद्दीतील प्रत्येक प्रभागात जनतेच्या आरोग्यासाठी मनपा प्रशासनाने हॉस्पिटल सुरु करून त्यामधून दररोज ओपीडी सेवा सुरु करावी, अशी जोरदार मागणी आम आदमी पार्टीने केली आहे.

या मागणीसाठी पक्षाच्या महानगर अध्यक्ष अल्हाद मसूद अहमद खान यांच्या नेतृत्वात उद्या ७ जुलैपासून मनपा कार्यालयासमोर साखळी उपोषण करण्यात येणार असून, मागण्या मान्य न झाल्यास आमरण उपोषण छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

पक्षाच्या वतीने करण्यात आलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, प्रत्येक प्रभागात हॉस्पिटल आणि नियमित ओपीडी सेवा, सर्व मनपा शाळांमध्ये डिजिटल एलईडी बोर्ड, टेबल-खुर्च्या-बेंच, पंखे, शुद्ध पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह आणि सुशोभीकरण, हद्दवाढ प्रभागांमध्ये सिमेंट रस्ते आणि नाल्यांची उभारणी, शहरातील नागरिकांना दररोज किंवा एक दिवसाआड नियमित पाणीपुरवठा, १० हजार रुपयांपेक्षा जास्त घरकर भरत असलेल्या नागरिकांना हप्त्यांमध्ये भरण्याची सवलत, २०१७ मध्ये वाढवलेला घरकर कमी करून पूर्वीच्या दरावर फक्त १० टक्के वाढ नागरिकांना मान्य अशा मागण्या करण्यात आल्या आहे.

ग्रीन अकोला – हेल्थी अकोला हे ध्येय ठेवून, अकोल्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी हे आंदोलन केले जात असून, या आंदोलनात महानगर अध्यक्ष अल्हाद मसूद खान यांच्यासह जिल्हाध्यक्ष कैलास प्राणजाळे, प्रदेश महासचिव अरविंद कांबळे, सुखदेवराव गोपनारायण, रफिक, गजानन बुडूकले, प्रा. प्रदीप कुमार गवई, आकिब खान, अशोक शेगोकार, श्रावण रंगारी, प्रकाश सिरसाट, माणिकराव मोरे आणि इतर पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी होणार आहेत.

## सरपंच-सचिवांवर त्वरित गुन्हे दाखल करण्याची पँथरची मागणी



■ प्रतिनिधी | वाशिम ■

गट ग्रामपंचायत जांब (ता. मंगरुळपीर) येथील सरपंच आणि सचिव यांच्या विरोधात सखोल चौकशीनंतरही अद्याप कारवाई न झाल्याने संतप्त प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. दलित पँथर सामाजिक संघटनेचे केंद्रीय कार्याध्यक्ष व बिगर सातबारा शेतकरी संघटनेचे प्रमुख भाई जगदिशकुमार इंगळे यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे निवेदन सादर करत दोषींवर त्वरित गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे.

ग्रामपंचायतीच्या कारभारात मोठ्या प्रमाणावर आर्थिक अनियमितता, अपहार आणि गैरव्यवहार झाल्याचे गट विकास अधिकारी एम.एम. कुलकर्णी यांनी आपल्या अहवालात स्पष्ट केले आहे. त्यानुसार सरपंच सौ. सुनीता अजय खिराडे आणि सचिव कु. सीमा डी. सुर्वे यांच्यावर खालील प्रकारचे गंभीर आरोप करण्यात आले आहेत.

## देशसेवेतून निवृत्त झालेल्या जवानाचे जंगी स्वागत

■ प्रतिनिधी | वाशिम ■

भारतीय सैन्यात सलग २० वर्षे सेवा बजावून सेवेतून निवृत्त झालेले तालुक्यातील सुरकंडीचे सुपुत्र हवालदार निजाम कान्हा बेनेवाले यांचे १ जुलै रोजी गावात जंगी मिरवणूक काढून जल्लोषात स्वागत करण्यात आले.

सूरकंडी येथील जि. प. शाळेच्या प्रांगणात झालेल्या या कार्यक्रमात देशभक्तीमय वातावरण निर्माण झाले होते. निजाम बेनिवाले हे २००५ मध्ये भारतीय सैन्यात मिलिट्री मध्ये दाखल झाले होते. ११८ प्रादेशिक सेनेत त्यांनी सलग २० वर्षे सेवा दिल्यानंतर दि. ३० जून रोजी ते सेवेतून निवृत्त झाले. यादरम्यान त्यांनी जम्मू काश्मीर, सिमला, पठाणकोट, आदींसह विविध ठिकाणी देशाचे रक्षण केले. सेवेतून निवृत्त झाल्यानंतर गावात दाखल होताच सर्वप्रथम वाशिम येथील कृऊबास समोर त्यांचे स्वागत



करण्यात आले. यानंतर सुरकंडी येथे त्यांची वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत गावातील लहान थोरांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. रॅलीच्या समारोपानंतर स्वागत समारंभ झाला. जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात झालेल्या स्वागत समारंभाच्या अध्यक्षस्थानी माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष कॅप्टन साईदास वानखेडे हे अध्यक्षस्थानी होते. यावेळी मंचावर सत्कारमूर्ती सेवानिवृत्त हवालदार निजाम बेनिवाले, त्यांचे वडील कान्हा बेनिवाले, सुभेदार विष्णू जाधव, हवालदार रमेश भगत, हवालदार योगेश वानखेडे, हवालदार गजानन गाडेकर, हवालदार रामा उगले, हवालदार अनिल खराटे, सुभेदार सुरेश अढाव, समनक जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष डॉ. रामकृष्ण कालापाड, आर्मीमॅन इस्माईल बेनिवाले, रतन इरतकर, अविनाश चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक बुद्धू रेघीवाले, जिल्हा क्रीडा अधिकारी किशोर बोंडे, माजी आ. लखन मलिक, माजी मुख्याध्यापक प्रभाकर ताकवाले, मुख्याध्यापक प्रशांत परळकर , सहाय्यक शिक्षक अनिल सुर्वे, पंचायत समिती सदस्य भिकासाहेब बेनीवाले , कराटे प्रशिक्षक सुनील देशमुख, संभाजी ब्रिगेडचे विभागीय अध्यक्ष गजानन भोयर आदी मान्यवर उपस्थित होते.

## आज धम्मचक्र प्रवर्तन दिन महोत्सव निमित्त संयुक्त सभा

■ प्रतिनिधी | अकोला ■

भारतीय बौद्ध महासभेच्या विद्यमाने दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा धम्मचक्र प्रवर्तन दिन महोत्सव अतिशय उत्साहात साजरा करण्यासाठी एड बाळासाहेब आंबेडकर प्रणित सर्व विंग्सच्या संयुक्त सभेचे आयोजन आज रविवार दिनांक ६ जुलै २०२५ रोजी दुपारी ठिक १.००वाजता आबासाहेब खेडकर सभागृह, अकोला या ठिकाणी केले आहे.

दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा धम्मचक्र प्रवर्तन दिन ३ ऑक्टोबर २००२५ ला उत्साहात साजरा करण्याच्या अनुषंगाने भारतीय बौद्ध महासभा, वंचित बहुजन आघाडी, वंचित युवक आघाडी, महिला आघाडी, विद्वत सभा, भारिप बहुजन महासंघ, संम्यक विद्यार्थी आंदोलन या सर्व विग्सच्या पदाधिकाऱ्यांची अतिशय



महत्त्वाची सभा आयोजित केलेली आहे. यामध्ये येणाऱ्या धम्मचक्र प्रवर्तन दिन महोत्सव निमित्ताने नियोजन, आयोजन आणि व्यवस्थापन या सर्व विषयांवर ईत्तंभूत चर्चा होणार आहे. त्याकरिता सर्व विंग्सच्या आजी माजी पदाधिकाऱ्यांनी, केंद्रीय शिक्षक, शिक्षिका, बोधाचार्य, उपासक उपासिका, हितचिंतक व निष्ठावान कार्यकर्ते यांनी या संयुक्त सभेला उपस्थित राहावे. असे आवाहन भारतीय बौद्ध महासभे ने केले आहे.

### संस्थेचे मुळ नोंदणी पत्र गहाळ

किशोर लोणकरणजी बंग, वय अं. ६७ अध्यक्ष रघुनाथजी बंग धर्मदाय ट्रस्ट, कारंजा लाड, यास नोंदणी क्रमांक ई १४७ (अकोला), व नविन ई १० (वाशिम) असे असुन सदर ट्रस्टचे मुळ नोंदणी प्रमाणपत्र माझे कडुन दिनांक ०५/०६/२०२५ रोजी मेन लाईन कारंजा लाड परीसरामध्ये सकाळी अंदाजे ११ ते १२ वाजताचे दरम्यान गहाळ झाले आहे. सदर प्रमाणपत्राचा मी शोध घेतला असता ते मला मिळाले नाही. तरी कुणाला आढळल्यास खालील मोबाईल क्रमांकावर संपर्क करावा ९४२२१३४०१६.

### संस्थेचे मुळ नोंदणी पत्र गहाळ

किशोर लोणकरणजी बंग, वय ६७ अध्यक्ष, श्रीमती सदासुखी बंग धर्मदाय ट्रस्ट, कारंजा लाड, यास नोंदणी क्रमांक ई १४८ (अकोला), व नविन ई ११ (वाशिम) असे असुन सदर ट्रस्टचे मुळ नोंदणी प्रमाणपत्र माझे कडुन दिनांक ०५/०६/२०२७ रोजी मेन लाईन कारंजा लाड परीसरामध्ये सकाळी अंदाजे ११ ते १२ वाजताचे दरम्यान गहाळ झाले आहे. सदर प्रमाणपत्राचा मी शोध घेतला असता ते मला मिळाले नाही. कुणाला आढळल्यास खालील मोबाईल क्रमांकावर संपर्क करावा.

मोबाईल क्रं. ९४२२१३४०१६

## उद्घाटनापूर्वीच आरोग्य मंदिरामध्ये चोरांचा उच्छाद

■ प्रतिनिधी | वाशिम ■



ग्रामीण भागा पर्यंत आरोग्य सुविधा पुरविण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय आरोग्य मिशन अंतर्गत वाशिम जिल्ह्यातील कोळगाव बुद्रुक तालुका मालेगाव येथे करोडो रुपये खर्चून आयुष्यमान आरोग्य केंद्राची उभारणी प्रशासनाने सात वर्षांपूर्वी केली आहे. परंतु गेल्या सात वर्षापासून ही इमारत रिकामी असून तिचा कोणताही उपयोग आरोग्य विभागाला अजून झाला नाही. बांधकाम झाल्यानंतर आरोग्य विभागाच्या ताब्यात संबंधित ठेकेदाराकडून ही इमारत येण्यापूर्वीच या इमारतीत बसविण्यात आलेले लाईट व पंखे आदी साहित्य चोरीला गेल्याने आरोग्य विभागाने संबंधित इमारत ताब्यात घेण्यास नकार दिला. या चोरी संबंधी मालेगाव पोलिसांमध्ये २०२२ मध्ये आरोग्य विभागाने तक्रार सुद्धा दिली. ही इमारत आरोग्य विभागाने ताब्यात घेतली नसल्याने संबंधित ठेकेदाराकडे या इमारतीची देखरेख करण्याची जबाबदारी होती. ठेकेदाराने ही जबाबदारी योग्य रीत्या पार न पाडल्याने इमारत गेल्या सात वर्षापासून बेवारस आहे . यातील साहित्य चोरीला तर गेले आहे, परंतु याबरोबरच या इमारतीमध्ये पावसाळ्यामध्ये नागरिकांनी घाण करून ठेवलेली आहे. येथे काही नागरिक गुरेढोरे सुद्धा बऱ्याच वेळात बांधतात . इमारतीच्या आसपास विविध प्रकारच्या रानटी वनस्पतींचे साम्राज्य पसरले आहे. या इमारती मध्ये सध्याच्या परिस्थितीत घाणीचे साम्राज्य पसरले असून संडास, बाथरूम,किचन ओटा, खिडक्यांची तोडफोड सुद्धा झालेली आहे. ही इमारत ठेकेदाराने लवकरात लवकर दुरुस्त करून द्यावी आणि आरोग्य विभागाने त्या इमारतीमध्ये रुग्णालय सुरू करावे जेणेकरून या रुग्णालयाचा फायदा या परिसरातील दहा ते पंधरा गावांना होतो. अशी मागणी गावकरी यांच्या वतीने करण्यात येत आहे.

## शोषणमुक्त समाज हेच अ.भा.ग्राहक पंचायतचे ध्येय -डॉ.मेहरे

■ प्रतिनिधी | वाशिम ■

प्रत्येक व्यक्ती जन्मापासून तर मृत्यूपर्यंत ग्राहक असतो. केवळ अधिकारांची जाणीव नसल्याने ग्राहकांचे अनेक क्षेत्रात शोषण होते. ग्राहकांना त्यांच्या अधिकाराप्रती जागृत करून त्यांना शोषणापासून वाचविणे. तसेच शोषणमुक्त समाजाची निर्मिती हेच अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे ध्येय असल्याचे प्रतिपादन अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे विदर्भ प्रांत अध्यक्ष डॉ. नारायणराव मेहरे यांनी केले.

येथील स्वामी विवेकानंद महाविद्यालयात ग्राहक पंचायतच्या जिल्ह्यातील प्रमुख कार्यकर्त्यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी सभेचे अध्यक्ष ग्राहक पंचायतचे विदर्भ प्रांत अध्यक्ष डॉ. नारायणराव मेहरे तर प्रमुख अतिथी म्हणून विदर्भ प्रांत सचिव चारुदत्त चौधरी,विदर्भ प्रांत संघटनमंत्री अभय खेडकर, महिला आघाडीच्या डॉ. शोभाताई गायकवाड, जिल्हाध्यक्ष जुगलकिशोर कोठारी, जिल्हा सचिव ॲड. सुधीर घोडचर यांची उपस्थिती होती. यावेळी सभेला मार्गदर्शन करताना डॉ. मेहरे म्हणाल की, दिवसेंदिवस प्रश्नांचे स्वरूप बदलत आहे. त्यामुळे ग्राहकांना जागृत करण्यासाठी ग्राहक पंचायतच्या कामाची आवश्यकता वाढते आहे.

## वैभव वाघमारे यांना जनतेने दिली निरोपाची भावनिक सलामी!

*एखाद्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बदली अथवा सेवानिवृत्ती निमित्त त्यांना निरोप समारंभ देण्याची शासकीय प्रथा सर्वश्रुत आहे. मात्र, लोकाभिमुख आणि पारदर्शक प्रशासकीय सेवा देऊन बदली झालेले कर्तव्यदक्ष मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांना अधिकारी, कर्मचाऱ्याऐवजी जिल्ह्यातील सामान्य जनतेचे प्रतिनिधी आणि सामाजिक कार्यकर्ते यांनी जिल्हा परिषदेमध्येच कार्यक्रम घेऊन वाघमारे यांना निरोप दिला. ही ऐतिहासिक आणि अभुतपूर्व अशी घटना आहे. सरकारी अधिकारी- कर्मचारी म्हणजे जनतेचे सेवक असा संकेत आहे. त्यानुसारच सीईओ वाघमारे यांची कारकीर्द राहिली आहे. मात्र, जिल्हा परिषदेचे कर्मचारी यांनी हा संकेत पायदळी तुडवला असल्याचे बोलल्या जात आहे.*

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांची मुंबई येथे बदली झाली आहे. त्यांनी आपल्या कार्यकाळात केलेल्या उत्कृष्ट कार्यामुळे त्यांची एक आदर्श छबी जिल्ह्यात निर्माण झाली होती. त्यांच्या या आदर्श कार्याची दखल घेत सामान्य नागरिकांच्या वतीने 'वुई सपोर्ट सीईओ' ग्रुपच्या वतीने दि. ४ जुलै रोजी जि. प. मध्ये सत्कार करून त्यांना निरोप देण्यात आला.



मागील १७ महिन्यांपूर्वी वाशिम जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून वैभव वाघमारे हे रुजू झाले होते . त्यांनी आपल्या कार्यकाळात सर्वप्रथम जिल्हा परिषद अंतर्गत कर्मचाऱ्यांना आपल्या दैनंदिन कार्याची जाणीव करून देत शिस्त लावली. यानंतर सर्वच विभागांचे कार्य उत्कृष्टरित्या सुरू झाले. प्रत्येक कर्मचारी आपली जबाबदारी योग्य रितीने सांभाळत होते. याचा परिणाम म्हणजे जनतेची कामे वेळेत व्हायला लागली. भ्रष्टाचारावर नियंत्रण आले.

सीईओ वाघमारे यांनी जिल्हा परिषदेच्या सर्व शाळांना रंगरंगोटी करून शाळांचा परिसर सुशोभित केला. यामुळे शाळा बोलू लागल्या, शिक्षकांना ज्ञानदान करण्यासाठी सकारात्मक वातावरण तयार झाले. अनेक शाळांनी गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यास सुरुवात केली.

साहेबांनी आपल्याकडे तक्रारी घेऊन येणाऱ्या प्रत्येक नागरिकास आपले दालन सदोदित खुले ठेवले. त्यामुळे नागरिकांच्या समस्या तात्काळ मार्गी लागत होत्या. त्यांच्या या कार्यामुळे जिल्ह्याचे मिनी मंत्रालय आदर्शवत अशी कामगिरी करत होते. असे असताना तीन वर्षांचा कार्यकाळ पूर्ण होण्याआधीच त्यांची बदली अतिरिक्त विकास आयुक्त औद्योगिक विभाग मुंबई येथे झाली. त्यांची वाशीम येथून बदली झाल्यामुळे जिल्ह्यातील सर्व सामान्य नागरिकांमध्ये कमालीची अस्वस्थता पसरली. शासनाने कार्यकाळ पूर्ण होण्याआधीच साहेबांची बदली का केली. असा प्रश्न सामान्य जनता विचारू लागली होती. त्यामुळे 'साहेब आपण आम्हाला हवे आहात' असे म्हणत अनेक सामान्य नागरिकांनी सीईओ वाघमारे यांची भेट घेतली. यावेळी सीईओ वाघमारे यांच्याशी हितगुज करतांना साहेबांच्या उत्कृष्ट कार्याप्रती अनेक जणांच्या डोळ्याच्या कडा ओल्या झाल्या होत्या. साहेब, आपण आम्हाला हवे आहात, आमच्या आकांक्षित जिल्ह्याला पुढे नेण्यासाठी आपण पाहिजे होतात, अशी आर्त हाक उपस्थितांनी दिली.

यावेळी शासनाने बदली केल्यामुळे मला जावे लागेल. असे सांगून आपण मला भरभरून प्रेम दिले. सहकार्य केले म्हणूनच मी चांगले कार्य आपल्या जिल्ह्यात करू शकलो. असे उद्गार सीईओ वाघमारे यांनी काढले. यावेळी अनेकांनी साहेबांच्या कार्याप्रती मनोगत व्यक्त केले. यामध्ये, डॉ. भगवानराव गोटे, इंजि. सिताराम वाशिमकर, विनोद पट्टेबहादूर, राजकुमार पडघान, अतिश देशमुख, परमेश्वर अंभोरे, विजयराव शिंदे, गजानन इढोळे, राजू कोंघे, गजानन धामणे, मिलिंद सुर्वे, विनोद तायडे, पप्पू घुगे , रंजनाताई पारिस्कर, दिलीप अवगण, प्रविण पट्टेबहादूर, दत्ता शिंदे, सुनीता कांबळे, अतुल राऊत आदीसह बहुसंख्य नागरिक उपस्थित होते.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १३ ■ अंक २२१ ■ रविवार, ६ जुलै २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# सकाळी विठ्ठल विठ्ठल......! सायंकाळी अल्ला हु अकबर....!

## -आज अनोखा सहयोग एकाच दिवशी दोन विभीन्न सण

**सिंदी (रेल्वे) मोहन सुरकार :** यंदा अनोखा सहयोग पाहायला मिळणार. सकाळी सर्व हिंदु बांधव आषाढी एकादशी निमित्त टाळ मृदुंगाच्या गजरात विठ्ठल विठ्ठल नामाचा गजर करणार तर.. सायंकाळी मुस्लिम बांधव पवित्र मोहरम ताजिया सणानिमित्त अल्ला हु अकबरचा गजर करणार....!





विविधतेने नटलेल्या भारत देशात देश एक आणि अनेक बोली, अनेक पेहराव, अनेक जाती, अनेक धर्म, अनेक खानपान, अनेक संस्कृतीने नटलेला देश आहे.

तरी एकसंघ आहे. देशावर कोणतेही संकट आले कि विवीधता असलेला भारत देश एकजुट होतो आणि संकटावर तुटुन पडतो.

विवीध धर्माचे सण उत्सव मोठ्या गुना गोविंदाने येथे साजरे होतात.

यंदा मात्र अविचितच घडले एकाच दिवशी आषाढी एकादशी हा महाराष्ट्राचे आराध्य दैवत विठ्ठलाचा सण समंध वारकरी मोठ्या उत्साहात साजरा करतात तर मुस्लिम धर्मीयांचा मोहरम हा सण जो बहुसंख्य हिंदू सुध्दा मनवतात तो एकाच दिवशी म्हणजे आज रविवार (ता.६) रोजी साजरा होणार आहे.

दोन्ही परस्पर विरोधी संस्कृती असलेल्या समाजातील धर्मातील महत्वाचे असे हे सण एकाच दिवशी येणे हा सुवर्ण योगच म्हणावा लागेल. सकाळी संपूर्ण महाराष्ट्रात आराध्य दैवत विठु माऊलींच्या जयजयकारात भक्ती रसात हिंदू तल्लीन होत विठ्ठल विठ्ठल चार गजर करणार.!

तर सायंकाळी मुस्लिम धर्मीयांचा मोहरम ताजिया सणानिमित्त स्वाऱ्या निघणार. डोल्यांचे पुजन होणार. आणि अल्लाहु. अकबर.. चा आवाज गुंजणार.!

# वर्धा गुन्हे शाखेला गांजा विक्रेताला पकडण्यात 'यश'

## -एसपींचा आदेश धडकताचः वर्ध्यात २० किलो गांजा जप्त

**वर्धा जनमाध्यम :** शहरात दिवसेंदिवस अमली पदार्थांची वाहतूक व विक्री होत असल्याने पोलीस अधीक्षकांनी आरोपींना आवरा असे आदेश देताच, स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ओडीसा येथून आणलेला २० किलो गांजा वर्ध्यातील रेल्वे स्थानक जवळील दयाल नगर परिसरात दोन आरोपींकडून जप्त केला. २० किलो गांजासह ५ लाखांचा मुद्देमाल जप्त करीत तीन आरोपींना गजाआड केले आहेत.

अवैध धंद्यात यश मिळविण्यासाठी ओडीसा येथून पुरी अजमेर (गाडी संख्या २०८२३) ने गांजा विकत आणून त्याची वर्ध्यात विक्री करीत असलेल्या आरोपी यश पासून शहरातील किरकोळ विक्रेते अमली पदार्थांची विक्री करीत होते. महाविद्यालयातील तरुण पिढी अमली पदार्थांच्या आहारी गेली होती. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक अनुराग जैन यांनी पोलीस अधिकाऱ्यांची बैठक घेतली आणि अमली पदार्थांची विक्री व वाहतूक करणाऱ्या गुन्हेगारांना आवरा असे आदेश देताच, अधिकारी कामाला लागले आणि विविध प्रकारचे गोपनीय माहिती घेतली. ओडीसा येथून रेल्वेने अमली पदार्थांची



वाहतूक होत असल्याची माहिती मिळताच, वर्धा रेल्वे स्थानक जवळील दयाल नगर परिसरात आरोपींवर पाळत ठेवण्यात आली. आरोपी सूरज शंकरसिंग चव्हाण वय (२७) रा बंगाली कॅम्प हनुमान मंदिराचे मागे इंदिरा नगर चंद्रपूर, ह मु ए एम मॉल बेसा व विजय नामदेव दुधकवरे वय (३३) रा इंदिरा नगर आर्वी नाका वर्धा या दोघांना चौकशी करिता ताब्यात घेतले. दोघांकडून चौकशी केली असता, यश सुरेश बेमाल वय (२८) रा सावंगी मेघे वर्धा व अमीर नाशीर खॉं पठाण रा इंदिरा नगर आर्वी नाका वर्धा या दोघांच्या सांगण्यावरुन ओडीसा येथील मदन सा यांचेकडून अमली पदार्थ विकत आणले असल्याचे सांगण्यात आले. ओडीसा येथून दोन सुटकेस मधून आणलेला गांजा ताब्यात घेण्यासाठी दोघेही मुख्य आरोपी रेल्वे स्थानक बाहेर उभे होते. स्थानिक गुन्हे शाखेचे पथक दिसताच आरोपी अमीर नाशीर खॉं पठाण याने पळ काढला तर तीन आरोपींना गजाआड करण्यात आले. दोन आरोपींकडून २० किलो १११ ग्रॅम गांजा किंमत ४ लाख २२२० रुपयांसह ५ लाख ३ हजार २२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई पोलीस अधिक्षक अनुराग जैन यांचे निर्देशाप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद चौधरी, उपोनी प्रकाश लसुंते, बालाजी लालपालवाले, पो.अं. मनोज धात्रक, अरविंद येनुरकर, रोशन निंबोळकर, महादेव सानप, पवन पन्नासे, रवि पुरोहित, अक्षय राऊत, विनोद कापसे, अभिषेक नाईक व फॉरेन्सिक विभागाचे स.फौ. अनिल साटोणे, अजित धांदरे व पो.हवा. मंगेश धामंदे यांनी केली.

# आज पासून रसुलाबादात आषाढी सप्ताह

## -१२ जुलै रोजी काल्याचे कीर्तन दहीहंडी व यात्रा

**रसुलाबाद जनमाध्यम :** आज पासून आषाढी एकादशी निमित्त रसुलाबाद मध्ये शिवलिंग श्री शिवा लीलामृत पारायण सप्ताहाचे आयोजन करण्यात येत आहे, विठ्ठल रुक्मिणी देवस्थान रसुलाबादच्या वतीने हे आयोजन करण्यात आले आहे, पवित्र कैलास मानसरोवर प्रदक्षिणा करून आलेले शिवभक्त गुरुदेव श्री मोरेश्वर क्षीरसागर महाराजांचा श्री गुरु पौर्णिमा आषाढी सप्ताह सुरू होत आहेत. हा सप्ताह आज दि ६ ते १२ जुलै दरम्यान राहणार आहे. आज सकाळी ९ ते ११ पर्यंत शिवलीलामृत पारायण होईल दुपारी १२ ते ४ एक लक्ष पार्थिव शिवलिंग पूजन होईल संध्याकाळी ४ ते ६ श्री शिव महापुराण कथा होईल अशा पद्धतीचा दररोजचा कार्यक्रम राहणार आहे.

# वृक्षारोपणाने जागतिक वन सप्ताह साजरा

## -एस एस एन जे महाविद्यालयातील छात्र सैनिकांचा उपक्रम



**देवळी जनमाध्यम :** दरवर्षीप्रमाणे यावर्षीही जागतिक वन सप्ताह निमित्त २१ महाराष्ट्र बटालियन एनसीसी अंतर्गत स्थानिक एस एस एन जे महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेना पथकातील छात्र सैनिकांनी महाविद्यालयाच्या परिसरात दहा वृक्षरोप लावून 'झाडे लावा, वने वाचवा' हा संदेश समाजापर्यंत पोहोचवला.

वृक्षारोपण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सुनिता सोनारे तर प्रमुख अतिथी म्हणून एनसीसी अधिकारी कॅप्टन मोहन गुजरकर व प्राध्यापिका श्रीमती मुनेश्वर उपस्थित होत्या. महाविद्यालयाच्या प्रांगणात एनसीसी छात्र सैनिकांनी वृक्षारोपण केले. याप्रसंगी रेंजर साक्षी येळणे, अंडर ऑफिसर मयुरी पेटकर, सार्जंट निशांत शितळे, कंपनी सार्जंट मेजर कल्याणी लिखार व पायल चौके यांनी 'झाडे वाचवा जंगल वाचवा' हा संदेश दिला. यशस्वीते करिता अंडर ऑफिसर सौरभ साव, अंडर ऑफिसर रितेश बुटे, कंपनी सार्जंट मेजर कल्याणी लिखार, विकी पेंदोरकर व सैनिकांनी प्रयत्न केले.

संचालन सार्जट कोमल शितळे तर आभार स्नेहा मडकाम हिने मानले.

# बहार नेचर फाउंडेशनचा अभ्यास दौरा

## सारस संवर्धनासाठी सर्वांगीण प्रयत्नांची गरज-मुकुंद धुर्वे

**वर्धा जनमाध्यम -** महाराष्ट्रात आजघडीला केवळ ३६ सारस पक्षी उरले असून पूर्वीपेक्षा ही आकडेवारी अधिक आशादायी आहे. असे असले तरी सारस पक्षी नामशेष होण्यापूर्वीच त्यांच्या संवर्धनासाठी शासन, प्रशासन, पर्यावरणप्रेमी संस्था आणि परिसरातील नागरिक यांच्या माध्यमातून सर्वतोपरी प्रयत्न होण्याची अद्यापही नितांत गरज आहे, असे प्रतिपादन गोंदिया जिल्ह्याचे मानद वन्यजीव रक्षक मुकुंद धुर्वे यांनी दासगाव येथील छावणीत आयोजित बहारच्या अभ्याससत्रात केले.



बहार नेचर फाउंडेशनद्वारे वर्धापन दिनानिमित्त गोंदिया जिल्ह्यात सारस संवर्धन अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. या दोन दिवसीय दौऱ्यात पहिल्या दिवशीच्या अभ्यास सत्रात मुकुंद धुर्वे यांनी सारस पक्ष्याचा अधिवास, जोडीदाराची निवड, प्रजनन, समज गैरसमज, पर्यावरणीय दृष्टिकोन आदी शास्त्रीय माहिती चित्रफितीद्वारे सादर केली. वनविभागाच्या पुढाकारासोबतच सारस पक्ष्यांचा अधिवास असलेल्या गावातील भातशेती करणाऱ्या परिवारांचेही या संवर्धनात मोठे योगदान असल्याचे धुर्वे यांनी सांगितले. दुसऱ्या दिवशी पावसाळी वातावरणातच सारसमित्र मुकुंद धुर्वे व संजय आकरे यांच्या मार्गदर्शनात परिसरातील विविध ठिकाणी सारसपक्ष्याची शोध मोहीम सुरू झाली आणि दासगाव येथील कोल्हे परिवाराच्या धानशेतीत अभ्यासकांना अखेर सारस पक्ष्याचे विलोभनीय दर्शन घडून आले. यावेळी बहारच्या दहाव्या वर्धापन दिनानिमित्त अतिथींना दहा प्रकारच्या प्रजातीच्या फुलांची रोपटी आणि वर्धा जिल्ह्याची पक्षीवैभव सूची देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. प्रवासादरम्यान पशुपक्ष्यांचा नामोल्लेख असलेल्या म्हणी व वाक्प्रचार, निसर्गगाणी, सिनेगीत, काव्य सादरीकरण आदी कलात्मक उपक्रम राबविण्यात आले. बहार नेचर फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. बाबाजी घेवडे, मानद वन्यजीव रक्षक संजय इंगळे तिगावकर, उपाध्यक्ष दीपक गुढेकर, सचिव जयंत सबाने, सहसचिव देवर्षी बोबडे, अतुल शर्मा, डॉ. आरती प्रांजळे घुसे, दर्शन दुधाने यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या अभ्यास दौऱ्यात विविध वयोगटातील ३५ पर्यावरणप्रेमी सहभागी झाले होते.

या उपक्रमात वनरक्षक मनेशकुमार सज्जन, सुषमा शर्मा, सुभाष मुडे, आशा घेवडे, याकुब शेख, अंजुम शेख, भारती गोमासे, आकाश जयस्वाल, प्रा. मोनिका जयस्वाल, मेघा गुढेकर, सुरज बोदिले, पल्लवी बोदिले, राकेश काळे, मनोज अस्वले, निवास उरकुडे, मोहन सोनुने, प्रतीक्षा गेटमे, सायली जगताप, नम्रता सबाने, संस्कृती जयस्वाल, चैतन्य घुसे, अभिनव गोमासे, सुर्वी बोदिले, स्वराज गुढेकर, ओजस्वी अस्वले, केतकी काळे, सुविर बोदिले, कबीर जयस्वाल यांचा सहभाग होता.

# स्कूल ऑफ स्कॉलर्सचे विद्यार्थी ऑल इंडिया रेडिओवर

**वर्धा जनमाध्यम :** अभिमानाच्या क्षणी, वर्धा येथील स्कूल ऑफ स्कॉलर्सच्या विद्यार्थ्यांनी 'इंद्रधनुष' या विषयावर ऑल इंडिया रेडिओच्या विशेष रेडिओ कार्यक्रमात सहभाग घेतला. त्यांच्या सादरीकरणात आषाढी एकादशीचे आध्यात्मिक महत्त्व आणि महाराष्ट्राच्या संत परंपरेवर सुंदर प्रकाश टाकण्यात आला, ज्यामध्ये संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव आणि संत एकनाथ यांच्या शिकवणी सादर करण्यात आल्या.

विद्यार्थ्यांनी वारी यात्रेची भक्ती प्रभावीपणे व्यक्त केली, या राज्याचा सांस्कृतिक आणि आध्यात्मिक वारसा साजरा केला. या व्यासपीठाने त्यांचे संवाद कौशल्य, जीवन कौशल्ये आणि सांस्कृतिक समज विकसित केली.


या कार्यक्रमाचे मार्गदर्शन प्राचार्य सुरेश लडके यांनी केले आणि शिक्षक सुनीता फुलकर, अश्विनी चव्हाण, संजली हिवसे, वर्षा मेश्राम, प्रणिता देशमुख, निखिल वाटकर आणि वैभव झाडे यांनी सहकार्य केले.

# सावंगी मेघे रुग्णालयात पुन्हा कॉक्लियर इम्प्लांट शस्त्रक्रिया

## दोन कर्णबधिर बालकांना लाभली आवाजाची देणगी

**वर्धा जनमाध्यम -** सावंगी मेघे येथील आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालयातील कान, नाक व घसारोग विभागाद्वारे कॉक्लियर इम्प्लांटेशन उपक्रमांतर्गत जन्मतः कर्णबधिर असलेल्या दोन बालकांवर कॉक्लियर इम्प्लांट शस्त्रक्रिया करीत त्यांना त्यांचा आवाज उपलब्ध करून देणारी बोलकी भेट देण्यात आली.

जवाहरलाल नेहरू वैद्यकीय महाविद्यालय व सावंगी रुग्णालयातील कान, नाक व घसारोग विभाग प्रमुख डॉ. श्रद्धा जैन यांनी गडचिरोली येथील दोन वर्षीय रुद्रांश आणि स्थानिक रहिवासी अडीच वर्षीय हिमिका या दोन बालरुग्णांवर कॉक्लियर इम्प्लांट शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्णत्वाला नेल्या. हिमिका हिची कॉक्लियर इम्प्लांट शस्त्रक्रिया मुख्यमंत्री निधीतून करण्यात आली आणि विशेष म्हणजे या योजनेअंतर्गत ही वर्धा जिल्ह्यात करण्यात आलेली ही पहिलीच शस्त्रक्रिया होय. तर, रुद्रांशची शस्त्रक्रिया राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत करण्यात आली. या शस्त्रक्रियेमुळे जन्मजात कर्णबधिरता असलेल्या बालकांच्या श्रवणक्षमतेत वाढ होऊन कालांतराने ते सर्वसामान्य बालकांसारखे बोलू लागतात. श्रवणशक्ती कमी असलेल्या बालकांचे आणि तरुणांचेही जीवन आमूलाग्र बदलणारी ही उपचारपद्धती होय.



कॉक्लियर इम्प्लांटेशन उपक्रमाला दत्ता मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्था अभिमत विद्यापीठाचे प्रधान सल्लागार सागर मेघे, कुलगुरू डॉ. ललितभूषण वाघमारे यांचे प्रोत्साहन व मार्गदर्शन लाभले. तरराष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत आर्थिक मदत व मुख्यमंत्री निधी उपलब्धतेसाठी रुग्णालय संचालक डॉ. चंद्रशेखर महाकाळकर, मुख्य वैद्यकीय अधीक्षक डॉ. अभय मुडे, विशेष कार्य अधिकारी संजय इंगळे तिगावकर यांचे प्रशासकीय सहकार्य लाभले.

**वेळीच उपचार करून बालकांना बोलते करा - डॉ. श्रद्धा जैन**

बालकांच्या जन्मानंतर त्यांचे हाकेला प्रतिसाद न देणे किंवा आवाजाचा स्रोत शोधण्यात असमर्थ असणे, हे श्रवणशक्ती कमी असण्याचे सुरुवातीचे लक्षण होय.

लहान मुले साधारणतः वयाच्या एक ते दोन वर्षांदरम्यान बोलण्यास सुरुवात करतात. या वयात अस्पष्ट बोलणे किंवा पूर्ण वाक्य न बोलणे, तोंडी आदेशांना प्रतिसाद न देणे, समवयस्क मुलांमध्ये कमी मिसळणे, अशा अनेक गोष्टींचा समावेश पूर्वलक्षणांमध्ये होतो. ही मुले शाळेत गेल्यावर त्यांचे अभ्यासात लक्ष लागत नाही, वर्गमित्रांशी व्यवस्थित संवाद होत नाही आणि त्यांच्या व्यक्तिमत्व विकासात सतत अडथळे निर्माण होत राहतात. पालकांनी वेळीच काळजी घेतली तर बालकांमधील मूकबधिरता शंभर टक्के दूर सारता येते, असे कॉक्लियर इम्प्लांट तज्ज्ञ डॉ. श्रद्धा जैन यांनी सांगितले.

# शासकीय आश्रमशाळेत व्यायाम शाळा व कुस्तीची मॅट द्या

## -मुख्यमंत्री फडणवीस यांना महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष तडस यांनी दिले पत्र

**वर्धा जनमाध्यम :** महाराष्ट्रातील कुस्तीला प्रोत्साहन देण्यासाठी विविध स्तरांवर प्रयत्न करणे आवश्यक आहे. यामध्ये खेळाडूंना प्रशिक्षण देणे, स्पर्धा आयोजित करणे आणि कुस्तीला लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी जनजागृती करणे, शालेय स्तरावर कुस्तीचे वर्ग सुरू करणे, आश्रमशाळा तसेच शाळांमध्ये कुस्तीचे वर्ग सुरू करून लहानपणापासूनच मुलांना या खेळाची ओळख करून देणे आवश्यक असल्याने शासकीय आश्रमशाळांमध्ये व्यायाम शाळा व कुस्तीची मॅट उपलब्ध करुन देण्यात यावे अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष माजी खासदार रामदास तडस यांनी केली आहे.

मल्लविद्येचे माहेरघर म्हणून मानल्या जाणाऱ्या भारतात अजूनही कुस्ती मोठ्या प्रमाणात खेळल्या जाते. कुस्ती हा भारताचा पारंपरिक खेळ आहे आणि मनोरंजनाचे जुने साधन आहे. पुर्वी कुस्ती हा खेळ फत पुरुषांसाठी होता. आता महिलाही सक्रीयपणे सहभागी होत आहेत. देशात हरयानानंतर महाराष्ट्रातील पुरुष व महिला पहेलवानांनी राज्य, राष्ट्रीय, राष्टकुल व आंतरराष्ट्रीय स्तरावर आपले कर्तृत्व सिद्ध केले आहे व देशासाठी अनेक पदके प्राप्त केली आहे. यामध्ये अनेक आदिवासी मुलांचा समावेश आहे. महाराष्ट्रातील पहेलवान गरीब परिस्थीतीतून आलेले असुन महाराष्ट्रातला पहेलवान कुठेही कमी नाही. राज्य, राष्ट्रीय, राष्टकुल, आंतरराष्ट्रीय स्तरावर



आपले कर्तृत्व सिद्ध केले आहे.

देशासाठी अनेक पदकं प्राप्त केली आहेत. महाराष्ट्रातील पहेलवानाना लहानपणापासूच कुस्तीसाठी प्रेरित करणे आवश्यक आहे. महाराष्ट्रात राज्य, राष्ट्रीय, राष्टकुल व आंतरराष्ट्रीय दर्जाचे पहेलवान घडविण्यासाठी महत्त्वपुर्ण निर्णय घेणे आवश्यक आहे. राज्यात मोठ्या प्रमाणात आश्रमशाळा आहे.

तिथे सोईसुविधा उपलब्ध असुन राज्यातील शासकीय आश्रमशाळेमध्ये व्यायाम शाळा व कुस्तीची मॅट उपलब्ध करुन दिल्यास निश्चितच त्याचा फायदा कुस्तिगीर घडविण्यासाठी होईल असेही मुख्यमंत्री फडणवीस यांना पाठवलेल्या पत्रात माजी खासदार तडस यांनी नमुद केले आहे.

# हिंदी विश्व विद्यापिठात कुलपती नाही, कुलगुरू शब्द वापरा

## अभाविपचे निवेदन

**वर्धा जनमाध्यम :** वर्ध्यात महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठ स्थापन करण्यात आले. अशा परिस्थितीत, विद्यापीठाच्या प्रमुखासाठी वापरण्यात येणारा शब्द देखील त्याच विचारसरणीचे प्रतिबिंबित झाला पाहिजे. कुलगुरू हा शब्द भारतीय परंपरेत रुजलेल्या गुरु-शिष्य संस्कृतीचे प्रतीक आहे आणि हा शब्द लिंग-तटस्थ, आदरयुत आणि सांस्कृतिक दृष्ट्या योग्य असताना येथे दस्तावेजावर कुलपती हाच या शब्द सुरुवातीपासुन वापरल्या जात आहे. कुलपती ऐवजी कुलगुरू या शब्दाचा वापर हिंदी विश्व विद्यापिठात प्रचलीत करण्यात यावा या मागणीचे निवेदन अखिल भारतीय विद्यार्थी परिषद महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठ शाखा वर्धा यांनी विद्यापीठाच्या कुलसचिवांना दिले.

निवेदनात नमुद केल्यानुसार, विद्यापिठाच्या हिंदी भाषेत असलेल्या सर्व कागदपत्रं, प्रमाणपत्रं आणि शैक्षणिक पत्रव्यवहारांमध्ये 'कुलपती' या शब्दाऐवजी 'कुलगुरू' हा शब्द वापरण्याची मागणी केली आहे. देशातील अनेक विद्यापिठे आणि राज्य सरकारांनी या दिशेने ठोस पावले उचलली आहेत. यात जवाहरलाल नेहरू विद्यापिठाने (जेएनयू) जून २०२५ मध्ये 'कुलपती' ऐवजी 'कुलगुरू' हा शब्द वापरण्यास अधिकृतपणे सुरुवात केली. राजस्थान सरकारने २०२५ च्या सुरुवातीला उच्च शिक्षण विधेयकात सुधारणा केली. मध्यप्रदेश सरकारनेही या प्रकरणाची दखल घेत प्रस्ताव मंजूर केला आहे.



कुलपती ऐवजी कुलगुरू या एका शब्दाच्या बदलामुळे विद्यापीठ केवळ त्याच्या स्थापनेच्या मूळ भावनेच्या जवळ जाणार नाही तर विद्यार्थ्यांमध्ये भाषा आणि संस्कृतीबद्दल अभिमान, श्रद्धा आणि समज विकसित होईल. हा निर्णय भारतीय ज्ञान परंपरा आणि आधुनिक प्रशासकीय जाणीवेबद्दल आदराचा संगम ठरेल. विद्यापीठ प्रशासनाने या सांस्कृतिक आणि भाषिक संवेदनशीलता लक्षात घेऊन या विषयावर सकारात्मक निर्णय घ्यावा आणि विद्यापीठाच्या सर्व कागदपत्रांमध्ये आणि औपचारिक संवादांमध्ये 'कुलगुरू' हा शब्द वापरला जावा अशी अपेक्षा व्यक्त केली. निवेदन देतेवेळी अभाविप वर्धा विभागाचे संयोजक अभिषेक द्विवेदी, मंत्री वेदिका मिश्रा, उपाध्यक्ष सायली पिपरे, सहसचिव शुभ्रांशू कुमार पांडे आणि कार्यकर्ते उपस्थित होते.


**प्रोसेस क-४७०३/२०२५**
**एम.जे.सी.कं. ११७/२०२५**
**आशाताई सागरजी पुनवटकर व ३ वि. निरंक,**
**पेशी ता. ०८/०८/२०२५**

## जाहीरनामा

वर्धा येथील **सह दिवाणी न्यायाधिश, कनिष्ठ स्तर, वर्धा यांचे न्यायालयात, एम.जे.सी.कं. ११७/२०२५, आशाताई सागरजी पुनवटकर व ३ वि. निरंक, पेशी ता. ०८/०८/२०२५** सदरहु केसमध्ये **सागर सदाशिवराव पुनवटकर** हे मयत असुन त्यांचा मृत्यु दि. २७/०५/२०१७ रोजी झालेला आहे. अर्जदार के ०१ आशाताई सागरजी पुनवटकर, ०२. शितल सागरजी पुनवटकर, ०३. शिल्पा राजुजी भुतकर व ०४. अपर्णा रंजित कांबळे हे मयत यांचे कायदेशीर वारसदार आहे. अर्जदार यांनी मयत **सागर सदाशिवराव पुनवटकर** यांचा मृत्यू पश्चात या न्यायालयात मुंबई रेगुलेशन ॲक्ट १८२७ चे प्रमाणे वारसान प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे.

सदरहू केसमध्ये कोणासही काही आपत्ती असल्यास अथवा काही सांगावयाचे असल्यास त्यांनी हया जाहीरनाम्याच्या तारखेपासुन एक महीन्याचे आत **सह दिवाणी न्यायाधिश, कनिष्ठ स्तर, वर्धा यांचे न्यायालयात** हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या आणि सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहु कोर्ट अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यास कायदेशीर वारसहक्क कायद्या अन्वये प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज तारिख २७/०६/२०२५ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिले.

**आदेशान्वये**
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर**
**दि, २७/०६/२०२५**

# विद्यार्थी नात्याने नवीन विषयांचा प्रांजळपणे अभ्यास करणेही गरजेचे-सरन्यायाधीश गवई

## मुंबई उच्च न्यायालयाच्या वतीने गौरव समारंभाचे आयोजन

**मुंबई/प्रतिनिधी :** विविध आव्हानात्मक परिस्थितींचा सामना करतांना वेळप्रसंगी प्रत्येक नवीन विषयाचा विद्यार्थी या नात्याने प्रांजळपणे अभ्यास करणेही गरजेचे असल्याचे प्रतिपादन सरन्यायाधीश भूषण गवई यांनी केले.हॉटेल ताज महल पॅलेस येथे मुंबई उच्च न्यायालयाच्या वतीने सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या गौरव समारंभाचे आयोजन करण्यात आले. यावेळी, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे, न्यायमूर्ती दीपांकर दत्ता, न्यायमूर्ती प्रसन्न वराळे, न्यायमूर्ती उज्ज्वल भुयान, न्यायमूर्ती अतुल चांदूरकर व तेजस्विनी गवई हे उपस्थित होते. यावेळी सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या हस्ते मुंबई उच्च न्यायालयातील लाईव्ह स्ट्रीमिंग प्रणालीचे तसेच वाय फाय सेवेचे उद्घाटन करण्यात आले. सरन्यायाधीश भूषण गवई म्हणाले, प्रत्येकाने आपल्या क्षेत्रात काम करतांना तळमळीने आणि सदसद्विवेकबुद्धी जागृत ठेवून काम करण्यावर भर देणे महत्त्वाचे आहे. नव्या पिढीतील सहका-यांना सकारात्मक दृष्टिकोनाने प्रेरित करणे आणि त्यांच्यातील अंगभूत गुणांना अधिक सक्षम करणे हे वरिष्ठांचे कर्तव्य आहे. याबरोबरच काम आणि कार्यालयीन जबाबदा-या यामध्ये संतुलन राखणेही गरजेचे आहे. उच्च न्यायालयाने नव्याने उपलब्ध करून दिलेल्या आधुनिक सुविधा नागरिकांसाठी नक्कीच उपयुक्त ठरतील असा विश्वास सरन्यायाधीश श्री. गवई यांनी व्यक्त केला. न्यायमूर्ती दीपांकर दत्ता, न्यायमूर्ती प्रसन्न वराळे, न्यायमूर्ती उज्ज्वल भुयान, न्यायमूर्ती अतुल चांदूरकर यांनी मनोगतात सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या कारकीर्दीचा गौरव केला.






## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यापन कारकीर्दीस 90 वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त शासकीय विधी महाविद्यालय येथे स्मृतिपटलाचे अनावरण

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची अध्यापन कारकीर्दही प्रेरणादायी -सरन्यायाधीश भूषण गवई

**मुंबई/प्रतिनिधी :** विविध विषयांचे अभ्यासक व तज्ञ असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे व्यक्तिमत्त्व विधीज्ञ, अर्थतज्ञ, समाजशास्त्रज्ञ असे बहुआयामी होते. शिक्षण क्षेत्रातील बहुमोल योगदानाबरोबरच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची अध्यापन कारकीर्दही मोलाची आणि प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन सरन्यायाधीश भूषण गवई यांनी केले.

शासकीय विधी महाविद्यालय येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्राध्यापक आणि प्राचार्य, कारकीर्दीला ९० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त स्मृतीपटलाचे अनावरण आणि सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण आर. गवई यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. यावेळी मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे, न्यायमूर्ती मनिष पितळे, महाधिवक्ता बिरेंद्र सराफ व प्राचार्या डॉ. अस्मिता वैद्य हे उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यावर व जीवनावर आधारित चित्र प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. शासकीय विधी महाविद्यालयाच्या वतीने मानपत्र देउन सरन्यायाधीश भूषण गवई यांचा गौरव करण्यात आला. विविध संस्था तसेच मान्यवरांनीही यावेळी सरन्यायाधीश गवई यांचा गौरव केला. सरन्यायाधीश भूषण गवई म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे व्यक्तिमत्व व्यासंगी व बहुआयामी होते. ते एक उत्कृष्ट शिक्षक असल्याने त्यांच्या विविध क्षेत्रातील योगदानाबरोबरच त्यांची अध्यापन कारकीर्दही प्रेरणादायी ठरली. शासकीय विधी महाविद्यालयात अध्यापनाचे कार्य करीत असतानाच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजातील दुर्बल घटकांवरील अन्यायाला वाचा फोडण्याचे कार्य सुरू केले. १९३५ च्या गव्हर्मेंट ऑफ इंडिया या ॲक्टमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान मोलाचे ठरले. शासकीय विधी महाविद्यालयाला देदीप्यमान शैक्षणिक वारसा लाभला असून अनेक विधीज्ञ या महाविद्यालयातून घडले. महाविद्यालयाच्या विविध समित्यांचे वैशिष्ट्यपूर्ण कार्यही अभिनंदनीय आणि अनुकरणीय असल्याचे गौरवोद्गार श्री गवई यांनी काढले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ज्या महाविद्यालयात अध्यापनाचे कार्य केले त्या ठिकाणी गौरव होणे व शासकीय विधी महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी असल्याचा सार्थ अभिमानाचे असल्याचेही श्री गवई यांनी नमूद केले. प्राचार्य अस्मिता वैद्य प्रास्ताविकात म्हणाल्या, शासकीय विधी महाविद्यालयाला देदीप्यमान शैक्षणिक वारसा लाभला असून अनेक नामवंत विधीज्ञ या महाविद्यालयाने घडविले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून १९३५ मध्ये अध्यापन कारकीर्दीस सुरुवात केली. न्यायशास्त्रासारख्या अत्यंत गहन विषयाचे अध्यापन डॉ. आंबेडकर करीत असत. या महान कार्याला ९० वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या गौरवार्थ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विधी सेवा क्षेत्रात महाविद्यालयाच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असल्याचेही वैद्य यांनी सांगितले. या कार्यक्रमास सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती हेमंत गोखले, न्यायाधीश रेवती ढेरे, न्यायाधीश नीला गोखले, कुलगुरू डॉ. दिलीप उके, कुलगुरू डॉ. हेमलता बागला, कुलगुरू डॉ. अपूर्वा पालकर, कुलगुरू डॉ. गोसावी, प्रधान सचिव सुवर्ण केवले, सिनियर कौन्सेल रॉफिक दादा, बार कौन्सिल अध्यक्ष विठ्ठल कोंडे-देशमुख, प्रिन्सेस आशाराणी गायकवाड व मान्यवर उपस्थित होते.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखीचे दर्शन




**पंढरपूर/प्रतिनिधी :** आषाढी शुद्ध एकादशी निमित्ताने वाखरी येथे पोहोचलेल्या आळंदी येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळयाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भेट देउन श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखीचे दर्शन घेतले. मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या समवेत पालखी खांद्यावर घेउन दिंडी सोहळयात सहभाग घेतला.

वातावरण टाळ, मृदंग आणि विठू माउलीच्या नाम गजरात भक्तीरसात न्हाउन निघाले. प्रारंभी श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखीचे प्रमुख विश्वस्त योगी निरंजन नाथ यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांचे श्री माउलींची प्रतिमा देउन स्वागत केले.वाखरी येथे जिल्हा प्रशासनामार्फत वारकरी, भाविक यांच्यासाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या सोयीसुविधांची पाहणी देखील मुख्यमंत्री फडणीस यांनी केली. वारक-यांसाठी करण्यात आलेल्या सुविधांबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले.यावेळी आमदार समाधान आवताडे, आमदार गोपीचंद पडळकर, अभिजित पाटील, विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार, विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, महापालिका आयुक्त सचिन ओंबासे, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, माजी आमदार राम सातपुते यांच्यासह हजारो वारकरी भाविक उपस्थित होते.

## ‘वारकरी’ अत्याचार प्रकरणातील दोन्ही आरोपी जेरबंद

**पुणे/प्रतिनिधी :**पुण्याजवळील दौंड परिसरात पंढरपूरसाठी निघालेल्या वारक-यांना कोयत्याच्या धाकाने लुबाडल्याची घटना घडली होती. इतकेच नाही तर वारक-यांसोबत असलेल्या एका अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचारही करण्यात आले. याप्रकरणी दोन अनोळखी आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. तर आरोपींना पकडण्यासाठी पुणे ग्रामीण पोलिसांची दहा वेगवेगळी पथके तैनात करण्यात आली होती. तर आज दौंड लैंगिक अत्याचार प्रकरणातील दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे. पुणे ग्रामीण पोलिस या आरोपींची कसून चौकशी करत आहेत. दरम्यान, पुणे ग्रामीण भागातील सराईत गुन्हेगार, संशयित गुन्हेगार यांच्याकडे कसून चौकशी सुरू होती. त्यासाठी ग्रामीण पोलिसांनी या दोन्ही आरोपींचे स्केच तयार केले आहेत. आणि त्या आधारे तपास सुरू आहे. वारक-याची लूट आणि अतिप्रसंग प्रकरणातील आरोपीचे रेखाचित्र (स्केच) पुणे ग्रामीण पोलिसांकडून जारी करण्यात आले होते.वारक-यांचा एक टेम्पो सोमवारी मध्यरात्री पंढरपूरच्या दिशेने निघाला होता. पहाटे साडेचार वाजण्याच्या सुमारास ते दौंडजवळील स्वामी चिंचोली परिसरात चहा पिण्यासाठी थांबले होते. यावेळी दुचाकीवरून आलेल्या दोघांनी या वारक-यांच्या डोळ्यात मिरची पूड फेकली. त्यांच्यासोबत असणा-या महिलांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने काढून घेतले. इतकेच नाही तर याच वारक-यांसोबत असणा-या एका अल्पवयीन तरुणीला चहाच्या टपरीमागे घेउन जात तिच्यासोबत लैंगिक अत्याचार केले. त्यानंतर आरोपी फरार झाले आहेत. पंढरपूरच्या वारी दरम्यान घडलेल्या या घटनेने एकच खळबळ उडाली आहे.

## बिहारमध्ये विशेष सखोल पुनरीक्षण (SIR) यशस्वीरित्या सुरू

**मुंबई/प्रतिनिधी :** बिहार राज्यात भारत निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनरीक्षण उपक्रमांतर्गत १.५ कोटी घरांना बूथ स्तर अधिकारी यांनी दिलेली पहिली भेट पूर्ण झाली आहे. २४ जून २०२५ रोजी बिहारमधील ७.९० कोटी मतदारांपैकी ८७ टक्के म्हणजेच ६,८६,१७,९३२ गणना फॉर्म वितरित करण्यात आले आहेत.यासारख्या कारणांमुळे अजूनही काही घरांपर्यंत BLO पोहोचू शकलेले नाहीत. याचे कारण घरे बंद असणे, प्रवासावर असलेले नागरिक, स्थलांतरित कुटुंबे किंवा मृत मतदार असू शकतात. BLO या दरम्यान प्रत्येकी तीन वेळा भेटी देतील, त्यामुळे वितरित फॉर्मची संख्या पुढील काळात अधिक वाढेल, अशी अपेक्षा आहे.गणना फॉर्म ऑनलाईन देखील उपलब्ध असून ECI च्या संकेतस्थळावर (https://voters.eci.gov.in) आणि ECINET App वर अंशत? भरलेले फॉर्म डाउनलोड करता येतात. मतदार स्वतःही भरलेले फॉर्म ECINET App वर अपलोड करू शकतात.

**1.5 कोटी घरांची पहिली BLO भेट पूर्ण**
**87 टक्के गणना फॉर्म वितरित**

## चाकणकर-खडसे यांच्यात पुन्हा जुंपली

**जळगाव/प्रतिनिधी-**राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला आघाडीचे अध्यक्ष रोहिणी खडसे यांच्यात पुन्हा एकदा आरोप-प्रत्यारोप झाले. रोहिणी खडसे यांनी चाकणकर यांची योग्यताच काढली. त्यामुळे नव्या वादाला तोंड फुटले आहे.रोहिणी खडसे यांचे स्वीय सहाय्यक पांडुरंग नाफडे आणि त्यांच्या पत्नी सीमा नाफडे यांच्यात कौटुंबिक वाद आहे. या वादातून नाफडे यांनी पोलिसांत आपल्या पतीविरोधात तक्रार केली आहे. पती-पत्नीच्या या वादात राजकीय संधी म्हणून रोहिणी खडसे यांनाही गोवण्याचा प्रयत्न झाला. महिला आयोगाच्या अध्यक्ष चाकणकर यांनीही जळगाव जिल्ह्याचा दौरा केला. या दौ-यात त्यांनी नाफडे यांच्या पत्नीची आवर्जून भेट घेतली. यावेळी चाकणकर यांच्या उपस्थितीत झालेल्या पत्रकार परिषदेत नाफडे यांनी रोहिणी खडसे यांचे समर्थक आपल्याला दमबाजी करतात



असा दावा केला. यावरून खडसे आणि चाकणकर यांच्यात चांगलीच राजकीय खडाजंगी सुरू आहे. रूपाली चाकणकर या आपल्या पदाचा राजकारणासाठी वापर करतात. पक्षाच्या कार्यकर्त्यांना वाचविण्यासाठी आणि मदत करण्यासाठी त्या झटत असतात. त्यामुळे त्या महिला आयोगाच्या अध्यक्षपदासाठी लायक नाहीत. त्यांच्याकडे ती पात्रता नाही. त्यामुळे चाकणकर यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी खडसे यांनी केली. श्रीमती नाफडे यांच्या वादाशी आपला काहीही संबंध नाही. श्रीमती नाफडे यांनी पोलिसांत दिलेल्या तक्रारीत माझा कुठेही उल्लेख नाही. मात्र चाकणकर यांनी आपल्या दौ-यात नाफडे यांना आपले नाव घेण्यास प्रवृत्त केले. त्यामुळेच श्रीमती नाफडे यांनी माझे नाव घेतले आहे. या संदर्भात कायदेशीर प्रक्रियेला सामोरे जाण्यास आपण तयार असल्याचे श्रीमती खडसे यांनी सांगितले. यावेळी श्रीमती खडसे यांनी पुन्हा एकदा श्रीमती चाकणकर यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. चाकणकर यांनी त्याला रोखठोक प्रत्युत्तर देताना, श्रीमती खडसे यांनी माझी काळजी करू नये. मी महिला आयोगाने काय करावे, आणि त्याची जबाबदारी काय याबाबत सक्षम असल्याचे म्हटले आहे.

## ‘कोटक महिंद्रा’च्या शाखा व्यवस्थापकाने ग्राहकांचे 31 कोटी रूपये जुगारासाठी लुटले

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** जुगार व सट्टेबाजीच्या आहारी गेलेल्या कोटक महिंद्रा बँकेच्या एका शाखा व्यवस्थापकाने बिहार सरकारच्या बँक खात्यातील तब्बल ३१ कोटी रुपयांहून अधिक रकमेचा अपहार केला आहे. अपहार केलेली ही रक्कम या शाखा व्यवस्थापकाने दक्षिण आफ्रिका आणि फिलीपिन्स येथील गेमिंग ॲप्सद्वारे जुगार व सट्टेबाजीसाठी परदेशात पाठवली.

हा प्रकार झाकण्यासाठी व्यवस्थापकाने कोटक महिंद्रा बँकेच्या अनेक ग्राहकांचे आधार व केवायसी तपशील गैरप्रकारे वापरले आणि त्या आधारे २१ बोगस खाती उघडली. या बोगस खात्यांचा वापर तो सट्टेबाजीमधून आलेली बेकायदेशीर रक्कम जमा करण्यासाठी करायचा. ही फसवणूक उघडकीस आल्यानंतर कोटक महिंद्रा बँकेने आरोपीला कामावरून काढून टाकले. त्यानंतर पोलिसांनी २०२१ मध्ये शाखा व्यवस्थापकाविरुद्ध खटला दाखल केला होता. २०२१ मधील ही फसवणूक कोटक महिंद्रा बँकेला अंतर्गत देखरेख प्रणालीद्वारे आढळली. यानंतर संबंधित कर्मचा-याला बँकेतून नोकरीवरून काढून टाकण्यात आले. बँकेने अहवाल दिल्यामुळे आणि तपास संस्थांना सहकार्य केल्यामुळे

kotak
Kotak Mahindra Bank

आरोपीला अटक करण्यात आली आणि त्याच्याकडून अपहार केलेल्या निधीचा मोठा भाग वसूल करण्यात आला. आम्ही योग्य कायदेशीर मार्गांनी या प्रकरणाचा पाठपुरावा करत आहोत. सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे, असे बँकेने ईकॉनॉमिक टाईम्सशी बोलताना सांगितले. अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) या प्रकरणाचा मनी लॉंड्रिंगच्या दृष्टिकोनातून तपास केला. यामध्ये असे आढळून आले की, तो परदेशातील संस्थांचा वापर करून चोरीचे पैसे लॉंड्रिंग करत असे. यानंतर ईडीने याची माहिती २०२५ मध्ये बिहार पोलिसांना दिली. त्यानंतर २७ जून २०२५ रोजी बिहार पोलिसांनी या व्यवस्थापकावर दुसरा गुन्हा दाखल केला. या प्रकरणाबाबत बिहार पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेचे डीआयजी मानवजीत सिंग ढिल्लन यांनी ईटी वेल्थ ऑनलाइनला सांगितले की, या शाखा व्यवस्थापकाने चेक क्लोनिंग फसवणुकीचा वापर केला. त्याने बिहार सरकारच्या जिल्हा भूसंपादन अधिका-यांच्या नावाने जारी केलेल्या चेकवर बनावट स्वाक्षरी केली आणि तो वटवला. चेकवरील स्वाक्षरी नमुना स्वाक्षरीशी जुळते की नाही, हे ठरवण्यासाठी शाखा व्यवस्थापक हा सर्वोच्च अधिकारी असल्याने, ही फसवणूक पकडणे कठीण झाले.

## ठाकरेंचा मेळावा

## ठाकरे बंधूंना पाहण्यासाठी मराठी माणूस एकवटला

## डोम खचाखच, रस्त्यावरही गर्दी



**मुंबई/ प्रतिनिधी-**ठाकरे बंधूंच्या विजयी मेळाव्याला याचि देही, याचि डोळा अनुभवण्यासाठी नागरिकांनी वरळी डोमबाहेर गर्दी केली . डोममधील आसनव्यवस्था पूर्ण भरलेली असतानाही त्यापेक्षा दुप्पट गर्दी डोमबाहेर झालेली पाहायला मिळाली. ज्यानंतर गेटबाहेर उभ्या असलेल्या नागरिकांनी गेट तोडून आतमध्ये प्रवेश मिळवला. महाराष्ट्र नवनिर्माण सेना पक्षाचे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे हे तब्बल २० वर्षांनंतर एकत्र आले आहेत. या दोन्ही भावांनी एकत्र यावे, अशी इच्छा अनेक दिवसांपासून मराठी माणसाकडून व्यक्त करण्यात येत होती. पण विजयी मेळाव्यानिमित्त का असेना पण दोन्ही भाउ एकत्र आले असल्याने त्यांचे हे एकत्र येणे याचि देही, याचि डोळा पाहण्यासाठी मराठी माणसाने वरळी डोमच्या बाहेर एकच गर्दी केली आहे. वरळी डोम खचाखच भरलेला असतानाही या डोमच्याबाहेर तिन्ही गेटसमोर नागरिकांची गर्दी पाहायला मिळाली. पण अखेर उत्साही नागरिकांनी गेट तोडून डोममध्ये प्रवेश मिळवला. वरळी डोम येथे मराठी विजयी मेळावा होत आहे. या मेळाव्याच्या ठिकाणी तुफान गर्दी झाली आहे. राज आणि उद्धव ठाकरे यांना ऐकण्यासाठी राज्याच्या कानाकोप-यातून लोक आले आहेत.वरळी डोमच्या प्रवेशद्वारावर जमलेले कार्यकर्ते आत घुसण्यासाठी अट्टाहास करताना पाहायला मिळाले. ज्यामुळे त्यांना आवरताना पोलिसांनाही नाकीनउ आले. अनेक लोक त्यांच्याकडे असलेला पास दाखवताना पाहायला मिळाले. वरळी डोमच्या प्रवेशद्वारावर महिला आणि पुरुष कार्यकर्त्यांची मोठी गर्दी झाली.नागरिकांनी आत जाण्यासाठी रेटा सुरू केल्यानंतर अखेर गेट उघडल्यानंतर लोक आत पळत सुटले. या मेळाव्यात स्टेजवर फक्त राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे दोघेच बसले तर, इतर सर्व मान्यवर स्टेजखाली पहिल्या ओळीत बसले. भाषणं फक्त ४ जणांची होणार तर रश्मी ठाकरे, शर्मिला ठाकरे, अमित ठाकरे आणि आदित्य ठाकरे हे देखील एकत्रच दिसले. ठाकरे कुटुंबीय व्यासपीठासमोर पहिल्या रांगेत बसले होते.

## आम्ही फ्लॉवर की फायर आहोत हे पुढच्या निवडणुकीत दिसेल

**मुंबई/ प्रतिनिधी-**उद्धव ठाकरे यांनी भारतीय जनता पक्षासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर जोरदार टीका केली. या टिकेनंतर आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांना प्रत्युत्तर देत थेट सूचक इशाराच दिला आहे. आम्ही फ्लॉवर की फायर आहोत हे पुढच्या निवडणुकीत दिसेल, असं एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. तसेच तीन वर्षांपूर्वी फक्त अर्ध्याच दाढीवरून हात फिरवला होता तरी ते अद्याप सावरले नाहीत, असं म्हणत शिंदेंनी उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली. खरं म्हणजे तीन वर्षांपूर्वी धो डाला अब उठेगा नहीं साला, हा डायलॉग उद्धव ठाकरे यांनाच शोभून दिसतो. मी तीन वर्षांपूर्वी अर्ध्याच दाढीवरून हात फिरवला होता तरी ते आडवे झाले आणि अजून सावरले नाहीत. आता उद्धव ठाकरे कुणाचा तरी हात पकडून उठण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे उद्धव ठाकरे यांना अशा प्रकारचं बोलणं शोभत नाही. त्यासाठी मनगटात जोर लागतो, फक्त बोलून काही होत नाही, असं एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. आता एवढंच सांगतो की मेळाव्यात एकाने मराठीबाबतची तळमळ बोलून दाखवली आणि दुस-याने सत्तेसाठी आणि खुर्चीसाठी मळमळ बोलून दाखवली. झेंडा नाही, अजेंडा नाही असं काही लोक म्हणत होते. मेळाव्यातील एका वक्त्याने ते पाळलं, तर दुस-याने स्वार्थाचा झेंडा आणि सत्तेचा आजेंडा बोलून दाखवला. उद्धव ठाकरेंच्या भाषणात एक जळजळ आणि मळमळ होती हे दिसून आलं. मराठी माणूस मुंबईबाहेर का फेकला गेला? मुंबईतील मराठी माणसांचा टक्का का कमी होत गेला? याचं उत्तर त्यांनी दिलं पाहिजे, असं एकनाथ शिंदे म्हणाले आहेत. एकाच्या भाषणात मराठीची तळमळ दिसली आणि दुस-याच्या भाषणात सत्तेसाठी मळमळ होती ती दिसली. हा दोन्हीमधला फरक आहे. उद्धव ठाकरे माझ्यावर कायम टीका करतात. मात्र, मी त्यांच्या टीकेला कामाने उत्तर देतो. कामामधून उत्तर दिलं म्हणून आम्हाला लोकांनी पुन्हा कौल दिला.



## ‘तहात’ जिंकण्याचा प्रयत्न; भाजपाचा पलटवार

**मुंबई/ प्रतिनिधी-**वीस वर्षांनंतर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे मराठी भाषेसाठी एकाच मंचावर एकत्र आले. याच दरम्यान उद्धव ठाकरे यांनी जोरदार भाषण करत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना टोला लगावला. यानंतर आता भाजपाने यावर पलटवार केला आहे. भाषेचे प्रेम वगैरे काही नव्हतेच निवडणुकीत हरणार म्हणून कुटुंब तहात जिंकण्याचा प्रयत्न! असे म्हणत निशाणा साधला आहे. भाजपाचे नेते आशिष शेलार यांनी आपल्या ट्वीटर अकाउंटवरून याबाबत ट्वीट केले आहे. भाषेसाठी नाही ही तर.. निवडणुकीसाठी जाहीर मनधरणी! महापालिका निवडणुका जवळ आल्यामुळे भाजपाला घाबरलेल्या उबाठा सेनेला आता भाउबंदकी आठवली ज्या भावाला घराबाहेर काढले त्याची जाहीर मनधरणी करण्यासाठी आजचा वरळीचा कौटुंबिक स्नेहमिलनाचा कार्यक्रम होता. भाषेचे प्रेम वगैरे काही नव्हतेच आणि ते यांच्या लेखी नाहीच! महापालिकेतील सत्ता मिळवण्यासाठी आणि पुन्हा मुंबईची लुटमार त्यासाठी सत्ता.. यासाठी केलेली ही केविलवाणी धडपड आहे. श्रीमान उद्धव ठाकरे यांनी राज ठाकरे यांच्याशी केलेली हातमिळवणी म्हणजे निवडणुकीत हरणार म्हणून कुटुंब तहात जिंकण्याचा प्रयत्न! असे आशिष शेलार यांनी म्हटले आहे.म मराठीचा नाहीच सत्तेचाच. गेले अनेक दिवस दोन भाउ एकत्र येणार म्हणून सुरू असलेला अंक एकदाचा आज उघडला आणि या दोघांकडून अपेक्षा असणा-याच्या मनांत निराशाच आली कारण मराठी, मराठी भाषा याबद्दल काय होतं या कार्यक्रमात?



## ‘ठाकरे ब्रँड असता, तर बाळासाहेब हयात असतानाच २८८ आमदार आले असते

**मुंबई/प्रतिनिधी :** शिवसेनेच्या (उद्धव ठाकरे) एक्स अकाउंटवरही उद्धव ठाकरे, राज ठाकरे, आदित्य ठाकरे आणि अमित ठाकरे यांचा एकत्रित फोटो शेअर करत त्याला ठाकरे ब्रँड असा कॅप्शन दिला आहे. दरम्यान, ही पोस्ट आणि ठाकरे बंधूंच्या या विजयी मेळाव्यावर प्रतिक्रिया देताना एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी, ठाकरे ब्रँड असता, तर बाळासाहेब हयात असतानाच शिवसेनेचे २८८ आमदार निवडून आले असते, असे विधान केले आहे.एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी लातूरमध्ये माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांना उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या विजयी मेळाव्याबाबत विचारण्यात आले. यावर प्रतिक्रिया देताना आमदार गायकवाड म्हणाले, हे बघा, १५ वर्षांपूर्वी एकत्र आले असते, तर काहीतरी परिणाम जाणवला असता. पण उद्धव ठाकरे बाळासाहेबांचा विचार सोडून गेले. राज ठाकरे यांनीही आता टाळीला टाळी द्यायला खूप उशीर केला आहे. मला नाही वाटत की महाराष्ट्रात याचा फार काही फरक पडेल. यावेळी पत्रकारांनी संजय गायकवाड यांना ठाकरे ब्रँडबाबत प्रश्न विचारला. तेव्हा आमदार गायकवाड म्हणाले, तो आता राहिलेला नाही. आता तुम्ही लोकांची किती कामं करता, त्यांच्या किती संपर्कात राहता, यावर सगळं अवलंबून आहे. जर ठाकरे नावाचा ब्रँड असता, तर बाळासाहेब हयात असताना २८८ आमदार निवडून आले असते. तेव्हा पण आपण ७०-७४ च्या पुढे कधी गेलो नाही.



# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## विठ्ठलाची ओढ

अवघाचि संसार सुखाचा करीन ।
आनंदे भरीन तिन्ही लोक ।।
जाईन गे माये तया पंढरपुरा ।
भेटेन माहेरा आपुलिया ।।
बाप रखुमादेविवरु विठ्ठलेचे भेटी ।
आपुले संवसाटी करुनी राहे ।।

अवघ्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या पंढरीनाथ श्री विठ्ठलाच्या भेटीची आर्त ओढ भाविक मनाला कशी लागते हे माऊली श्री ज्ञानोबारायांनी या गोड अभंगातून नेमकेपणाने सांगितलेले आहे. विठ्ठल-रखुमाई हे भक्तांचे माय-बापच आहेत आणि पंढरी हे माहेरच आहे. संत एकनाथांनीही 'माझे माहेर पंढरी, आहे भिवरेच्या तीरी, बाप आणि आई, माझी विठ्ठल-रखुमाई' असे एका अभंगात म्हटलेले आहे. अशा विठ्ठलभेटीच्या ओढीने वर्षातील अनेक एकादशींना वारकरी पंढरीला जात असतात. त्यामध्ये आषाढी एकादशीचे एक वेगळेच महत्त्व आहे. देवशयनी किंवा आषाढी एकादशी हा वारकरी संप्रदायाचा सर्वात मोठा उत्सव असून, रविवारी त्यानिमित्त नेहमीप्रमाणेच अवघी पंढरी दुमदुमणार आहे. लाखोंच्या संख्येने वारकरी आणि भक्त पंढरपुरात विठ्ठल दर्शनासाठी दाखल होतील. देवशयनी एकादशी ही हिंदू पंचांगातील एक महत्त्वाची तिथी आहे.वैष्णवांसाठी या पवित्र दिवसाचे विशेष महत्त्व आहे. या दिवशी भगवान विष्णू क्षीरसागरात शेषनागावर निद्रिस्त होतात. यानंतर भगवान विष्णू कार्तिक महिन्याच्या शुक्ल पक्षातील एकादशीला म्हणजेच प्रबोधिनी एकादशीला जागे होतात. हाच काळ चातुर्मास म्हणून ओळखला जातो. आषाढी एकादशी म्हणजे चातुर्मासाची सुरुवात असते. या दिवशी विष्णूला प्रसन्न करण्यासाठी उपासना आणि उपवास केले जातात. धार्मिक मान्यतेनुसार विशेषतः या दिवशी भगवंताच्या नामस्मरणात तल्लीन व्हावे, भगवान विष्णूची कथा ऐकावी आणि मंत्रांचा जप करावा, असा प्रघात आहे. आषाढी वारीनिमित्त यंदाही महाराष्ट्र आणि उत्तर कर्नाटकातील लाखो भाविक लोक विठ्ठलनामाचा गजर करत, भूवैकुंठ पंढरीकडे पायी चालत येत आहेत. 'जेव्हा नव्हते चराचर । तेव्हा होते पंढरपूर' अशी ख्याती असलेल्या पंढरपुरात पोहोचताच चंद्रभागेत स्नान करून विठ्ठलाचे दर्शन घेतले जाईल.या दिवशी शेगाव येथून संत गजानन महाराजांची, आळंदीहून ज्ञानेश्वरांची, देहूतून तुकारामांची, त्र्यंबकेश्वरातून निवृत्तिनाथांची, पैठणहून एकनाथांची, मुक्ताईनगर येथून मुक्ताबाईंची आणि उत्तर भारतातूनही कबीरांची पालखी येते. ज्ञानदेव-नामदेवांपासून ते निळोबांपर्यंत म्हणजे १३ व्या शतकाच्या शेवटच्या चरणापासून ते १७ व्या शतकाच्या मध्यापर्यंतचा, जवळपास पाच शतकांचा काळ हा प्रामुख्याने वारकरी संत साहित्याच्या निर्मितीचा काळ आहे. खेड्यापाड्यातील सर्वसामान्यांपर्यंत पोहोचलेल्या वारकरी साहित्याने मराठी भाषा घडवण्यात मोलाचा वाटा उचलला. पण त्याचसोबत मराठी माणसाच्या विचारपद्धतीवरही अनुकूल प्रभाव पाडला. निळोबाराय पिंपळनेरकर हे वारकरी संप्रदायातील अखेरचे संत कवी. वारकरी संतांचा कवित्वाशी जवळचा संबंध असतो. निळोबांच्या पश्चात पुढे आलेल्या शाहिरांवर संतकाव्याचा स्पष्ट प्रभाव दिसून येतो. विठ्ठल, पंढरपूर आणि संतांची महती सर्व शाहिरांनी गायलेली आढळते. तुकोबांचे कनिष्ठ पुत्र नारायणबाबा यांनी देहू देवस्थानचे संस्थान केले. ज्ञानेश्वर आणि तुकाराम यांची संयुक्त पालखी सुरू करून, तिला ज्ञानबा-तुकाराम या भजनाची जोड दिली.देहूमधील तुकोबांच्या वंशजांचे देवस्थान व फड ही वारकरी पंथातील एक मुख्य परंपरा होय. मधल्या काळात तुकोबांचे शिष्य निळोबाराय पिंपळनेरकर यांच्याकडून प्रचलित झालेली शिष्यपरंपरा, शंकरस्वामी सिन्नरकर यांच्या मार्फत वासकरांच्या घराण्यात आली. मल्लाप्पा वासकर हे या घराण्याचे मूळ पुरुष होत. देहूतील देहूकरांचे एक घराणे पंढरीला येऊन, त्यांनी तेथे स्वतंत्र फड स्थापन केला होता. नंतर आणखी एक घराणे येऊन, त्यांनीही एक स्वतंत्र फड मांडला. अशाप्रकारे देहूकर आणि वासकर अशा दोन्ही परंपरा पंढरीत आल्या. देहूतही गोपाळबाबा, पांडुरंगबाबा, मुरलीधरबुवा यांच्यासारखे विद्वान आणि कर्तबगार पुरुष होऊन गेले. लोकहितवादींनी वारकरी संप्रदायाच्या परंपरेबद्दल आत्मीयतेने आणि गौरवाने लिहिले आहे.ज्याच्या गळ्यात माळ व हातात पताका, तो कोणत्याही जातीचा असला, तरी त्याची एकच जात आहे, असे वैष्णव समजतात. वारीत सर्व जातींचे भाविक एकमेकांच्या पायी पडतात, याचा उल्लेख लोकहितवादींनी केला आहे. वारकरी सत्य बोलण्याची प्रतिज्ञा करतात आणि अभंग गात व नामस्मरण करत पंढरपुरास, देहूस व आळंदीस जातात. ऊन-पाऊस, थंडी-वारा यांची पर्वा न करता लोक अनेक पावले चालत राहतात. श्रीमंत सरदार संत हैबतबाबा आरफळकर यांनी लष्करी साज व शिस्तीमध्ये माऊलींचा पालखी सोहळा सुरू केला, जो अजूनही त्याप्रमाणेच होत आहे. शतकानुशतके चाललेल्या या वारीत कितीही अडचणी आल्या, तरी माळकऱ्यांच्या मार्गक्रमणेत बाधा येत नाही. पंढरीची वारी ही एक साधना आणि व्रत आहे. स्वकमाईतून दिंडीला पाचशे ते काही हजार रुपये वारकऱ्यांकडून भिशी दिली जाते.अनेक ठिकाणी दिंड्यांच्या पंगती ठरलेल्या असतात; तर बऱ्याच ठिकाणी अन्नदातांकडून अन्नदान केले जाते. सरकारने वारीच्या वाटेवर करायच्या सोयी-सुविधांसाठी किंवा इतर मदतीसाठी निधी खर्च करावा, अशी सूचना केली जात आहे. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचे ठाकूर बुवा समाधी येथे पार पडलेले सुरेख गोल रिंगण आणि पालखी सोहळा भेटीतून ज्ञानेश्वरमाऊली आणि सोपानदेव यांची बंधुभेट याने यावेळचा गुरुवारचा दिवस संस्मरणीय ठरला. तर दुसरीकडे, तुकोबांच्या पालखी सोहळ्यात तोंडले बोंडले येथे धावा केला. दोन्ही संतांच्या पालख्यांचा पंढरपूर तालुक्यात प्रवेश झाला असून, लाखो भाविकांना विठुरायाच्या दर्शनाची ओढ लागलेली आहे. महाराष्ट्राला सुखसमृद्धी लाभो, हीच आषाढी एकादशीनिमित्त पंढरीनाथाच्या चरणी प्रार्थना!

# भारताची ऊर्जा सुरक्षा – एक अभ्यास

**हॉर्मुझची सामुद्रधुनी बंद झाल्यास जागतिक ऊर्जा अस्थिरता निर्माण होईल, परंतु संभाव्य त्या संकटाला तोंड देण्यासाठी भारत इतर देशांपेक्षा अधिक चांगल्या प्रकारे तयार आहे. ऊर्जा स्त्रोतांमध्ये विविधता, मुत्सद्दी सहभाग, मजबूत शुद्धीकरण पायाभूत सुविधा आणि पर्यायी ऊर्जा विकासामुळे भारताने एक लवचिक ऊर्जा सुरक्षा चौकट तयार केली आहे.**



हॉर्मुझची सामुद्रधुनी ही जागतिक ऊर्जा पुरवठा साखळीतील एक महत्त्वाची आणि संवेदनशील ठिकाण आहे. जगातील सुमारे २० टक्के तेल आणि नैसर्गिक वायूची (LNG) निर्यात याच मार्गातून होते. त्यामुळे येथे उद्भवणारा कोणताही भू-राजकीय तणाव, दहशतवादी हल्ला किंवा संघर्षामुळे इंधनाच्या किमतीत वाढ होऊन पुरवठा अनिश्चित बनू शकतो, ज्यामुळे ऊर्जा आयातीवर अवलंबून असलेल्या देशांसाठी मोठी चिंता निर्माण होते.

भारताने आपली ऊर्जा सुरक्षा वाढविण्यासाठी अनेक द्विपक्षीय आणि बहुपक्षीय ऊर्जा करार केले आहेत. मध्यपूर्वेवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी भारताने कच्च्या तेलाच्या आयात स्त्रोतांमध्ये सक्रियपणे विविधता आणली आहे. रशिया-युक्रेन संघर्षानंतर भारताने सवलतीच्या दरातील रशियन 'युराल्स' कच्च्या तेलाची आयात लक्षणीयरीत्या वाढवली आहे. आता ही आयात भारताच्या एकूण आयातीच्या ३५ टक्क्यांपेक्षा जास्त आहे. महत्त्वाचे म्हणजे हे तेल हॉर्मुझची सामुद्रधुनी टाळून येते.

भारताने अटलांटिकमार्गे अमेरिकेतून कच्च्या तेलाची आणि एलएनजीची आयात वाढवली आहे. नायजेरिया आणि अंगोलासारखे देश भारताच्या कच्च्या तेलाची गरज मोठ्या प्रमाणात पूर्ण करतात. त्यांच्या पुरवठ्याचा मार्ग वेगळा आहे. ब्राझील आणि गयाना हे भारताच्या ऊर्जा विविधीकरणामध्ये अलीकडचे महत्त्वाचे भागीदार म्हणून उदयास आले आहेत.

संयुक्त अरब अमिराती, इराक आणि सौदी अरेबियाकडून आयात अजूनही सुरू आहे. मात्र पर्यायी मार्ग (उदा. रेड सी, सुएझ कालवा) वापरल्याने हॉर्मुझवरील अवलंबित्व कमी होते. भारताने ऊर्जा संकटांना तोंड देण्यासाठी धोरणात्मक पेट्रोलियम साठा (स्ट्रेटेजिक पेट्रोलियम रिझर्व्ह) तयार केला आहे, जो देशासाठी एक महत्त्वपूर्ण ऊर्जा बफर (Energy Buffer) म्हणून काम करतो. भारताची सध्याची 'एसपीआर' क्षमता ५.३ दशलक्ष टनांपेक्षा जास्त आहे (सुमारे ३९ दशलक्ष बॅरल्स), जी राष्ट्रीय मागणीच्या ९-१० दिवसांसाठी पुरेशी आहे. सार्वजनिक तेल विपणन कंपन्यांकडे असलेल्या साठ्यासह एकत्रित केल्यास भारताकडे सुमारे ३०-३५ दिवसांचा बफर उपलब्ध आहे. भारताने विशाखापट्टणम, मंगळूर आणि पादूरसारख्या ठिकाणी हे साठे तयार केले आहेत. हे साठे देशाच्या तेलाच्या गरजा महत्त्वपूर्ण कालावधीसाठी पूर्ण करू शकतात, ज्यामुळे पुरवठ्यातील व्यत्ययांपासून संरक्षण मिळते.

भारताचे रशिया आणि यूएईसारख्या देशांशी दीर्घकालीन करार आहेत, ज्यामुळे किमती आणि पुरवठ्यात स्थिरता येते. विशेषतः रशियासोबत रुपये-रुबल (INR-RUB) व्यवहारांमुळे भारताला डॉलरच्या किमतीतील चढ-उतारांपासून स्वतःचे संरक्षण करण्यास मदत होते.

शुद्धीकरण क्षमतेच्या बाबतीत भारत जागतिक स्तरावर पहिल्या पाच देशांमध्ये आहे. भारत कच्च्या तेलाची आयात करतो आणि त्याचे देशांतर्गत शुद्धीकरण करतो, ज्यामुळे लवचिकता आणि मूल्यवर्धन वाढते. भारताची शुद्धीकरण क्षमता देशाच्या गरजेपेक्षा खूप जास्त आहे.

भारताने इथेनॉल मिश्रण, बायो-डिझेल, ग्रीन हायड्रोजन आणि सौर/पवन ऊर्जेमध्ये लक्षणीय प्रगती केली आहे. सरकारने आपल्या ऊर्जा मिश्रणामध्ये अक्षय ऊर्जेचा वाटा वाढवण्यासाठी महत्त्वाकांक्षी लक्ष्ये निश्चित केली आहेत, ज्यामुळे कालांतराने जीवाश्म इंधनावरील अवलंबित्व कमी होण्यास मदत होईल. 'नॅशनल ग्रीन हायड्रोजन मिशन'सारख्या उपक्रमांचे उद्दिष्ट भारताला स्वच्छ ऊर्जेमध्ये जागतिक नेता बनवणे आहे, ज्यामुळे तेल आयातीवरील अवलंबित्व आणखी कमी होईल. भारताने आपल्या ऊर्जा पायाभूत सुविधांच्या विकासावर लक्ष केंद्रित केले आहे, ज्यात खालील गोष्टींचा समावेश आहेः

शुद्धीकरण प्रकल्प – भारताकडे जगातील सर्वात मोठ्या शुद्धीकरण क्षमतेपैकी एक आहे, ज्यामुळे ते विविध स्त्रोतांकडून कच्च्या तेलावर कार्यक्षमतेने प्रक्रिया करू शकते आणि ऊर्जा सुरक्षा वाढवते.

लॉजिस्टिक्स (परिवहन व्यवस्था) – पाइपलाइन, बंदरे आणि वाहतूक नेटवर्पमधील गुंतवणुकीमुळे ऊर्जा आयात व वितरण अधिक सुलभ होते, ज्यामुळे पुरवठा साखळीतील व्यत्यय आणि असुरक्षितता कमी होते. भारत देशांतर्गत तेल आणि वायू उत्पादन वाढवण्यासाठी जोरदार प्रयत्न सुरू केले आहेत.


अन्वेषण आणि उत्पादन – सरकारने तेल आणि वायू क्षेत्रात परदेशी गुंतवणूक आकर्षित करण्याच्या उद्देशाने धोरणांद्वारे अन्वेषण आणि उत्पादनास प्रोत्साहन दिले आहे.

वायू उत्पादन – शेल वायू (Shale Gas)आणि ऑफशोअर ड्रिलिंगमधील उपक्रमांद्वारे देशांतर्गत वायू उत्पादन वाढवल्याने आयातीवरील अवलंबित्व कमी होण्यास मदत होते.

हॉर्मुझची सामुद्रधुनी बंद झाल्यास जागतिक ऊर्जा अस्थिरता निर्माण होईल, परंतु संभाव्य त्या संकटाला तोंड देण्यासाठी भारत इतर देशांपेक्षा अधिक चांगल्या प्रकारे तयार आहे. ऊर्जा स्त्रोतांमध्ये विविधता, मुत्सद्दी सहभाग, मजबूत शुद्धीकरण पायाभूत सुविधा आणि पर्यायी ऊर्जा विकासामुळे भारताने एक लवचिक ऊर्जा सुरक्षा चौकट तयार केली आहे. यामुळे युद्ध किंवा दहशतवादी हल्ल्यांमुळे देशाला तेल पुरवठा व्यत्ययाला तोंड द्यावे लागण्याची शक्यता कमी आहे. या उपाययोजना केवळ भारताची ऊर्जा सुरक्षा वाढवत नाहीत तर संभाव्य संकटांविरुद्ध एक मजबूत बफरदेखील प्रदान करतात.

**ब्रिगेडियर हेमंत महाजन**

# विठ्ठल भेटीचा सुख सोहळा



महिनाभर पंढरीच्या वाटेवर लाखो वैष्णव हाती टाळ, मृधुंग, तुळशी, पताकांचे भार सांभाळत संतांचा व विठ्ठल नामाचा गजर करीत अखेर आषाढी एकादशीला पंढरपुरात दाखल होतात. चंद्रभागेचे स्नान करून पंढरीच्या पांडुरंगाचे दर्शनाने देह सुखावला जातो. असा विठ्ठल भेटीचा त्रिभुवनीं सोहळा पाहून भक्तीच्या महासागरात देव सुद्धा सुखावतो. आषाढी एकादशी हा वैष्णवांचा सर्वात मोठा सुख सोहळा होय. असा सुख सोहळा पाहण्यासाठी अनेक मैलांचे अंतर कापीत भक्त पंढरपूरला जातात. विठ्ठल भेटीचा सुख सोहळा अनुभवण्यासाठी.

**पंढरीचे सुख नाहीं त्रिभुवनीं ।**
**प्रत्यक्ष चक्रपाणी उभा असे।।**
**त्रिभुवनीं समर्थ ऐसें पैं तीर्थ ।**
**दक्षिण मुख वाहात चंद्रभागा ।।**

संत चोखामेळा महाराज आपल्या अभंगातून पंढरपूरच्या सुखाचे वर्णन करतात. पंढरपूर मध्ये जे सुख आहे, ते इतर कोणत्याही ठिकाणी नाही. विठ्ठल अर्थात चक्रपाणी तो प्रत्यक्ष उभा आहे. स्वर्ग, पृथ्वी, पातळ या तिन्ही लोकांत अर्थात त्रिभुवनात पंढरपूर सारखे समर्थ तीर्थ नाही.

दक्षिणेकडे वाहणाऱ्या चंद्रभागा नदीचा विठ्ठल चरणाला स्पर्श झाल्याने ती पवित्र आहे. वैष्णव या चंद्रभागेत स्नान करणे पवित्र मानतात.

**सकळ संतांचा मुगुटमणी देखा।**
**पुंडलीक सखा आहे जेथें।।**
**चोखा म्हणे तेथें सुखाची मिराशी।**
**भोळ्या भाविकांसी अखंडित ।।**

पुढे संत चोखामेळा म्हणतात संतांसाठी वारकऱ्यासाठी पंढरपूर हे मुकुटाप्रमाणे आहे. तिथे विठ्ठलाचा भक्त आणि सखा पुंडलिक उभा आहे. अश्या सुखाची मिरास व सुखाचा ठेवा आहे. निस्सीम भोळी भक्ती करणाऱ्या भक्तांना पंढरपुरात आल्यावर अखंडित सुख मिळते. आषाढी एकादशी पर्यंत महिनाभर पंढरीच्या वारीचे नैसर्गिक संकटाना मोडीत काढून भक्तजन सारे पंढरपुरात जमा होतात. चंद्रभागा, भक्त पुंडलिक व विठ्ठलाचे दर्शन घेवून सुखावतात. हा विठ्ठल भेटीचा सोहळा संपन्न करतात.

**सावळे सुंदर रूप मनोहर। राहो निरंतर हृदयी माझे ।।**
**आणिक काही इच्छा आम्हां नाही चाड । तुझे नाम गोड पांडुरंगा ।।**
**जन्मोजन्मी ऐसें मागितले तुज । आम्हांसी सहज दयावे आता ।।**
**तुका म्हणे तुज ऐसे जी दयाळ । धुंडिता सकळ नाहीं आम्हां ।।**

निस्सीम भक्ती भाव असणाऱ्या संतांना व भक्तांना पंढरपूरच्या देवाकडून काय हवे आहे. ते संत तुकाराम महाराज आपल्या अभंग वाणीतून व्यक्त होतात. देवाचे सावळेरूप सुंदर व मन हरण करणारे रूप माझ्या हृदयात नीरा राहो. नाम गोड असल्याने नामाशिवाय दुसरी कोणतीच इच्छा नाही. विठ्ठल नामाच्या भजनात संत तुकाराम महाराजांना तल्लीनता मिळाली. तीच पंढरपूरला जाणाऱ्या भाविकाला मिळत असते.

**विठ्ठल वळसे पाटील**
पुणे -८४८४०६६०४२
vithalvalse@gmail.com

# मराठी शाळा बंद पडण्याला जबाबदार कोण?

**माझेही मत**

एकीकडे मराठी सक्तीचा अध्यादेश निर्गमित होत असतानाच दुसरीकडे जिल्हा परिषदेच्या १८००० मराठी माध्यमाच्या शाळा बंद होण्याच्या मार्गावर आहेत.नव्या शैक्षणिक वर्षात महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातील शाळांमध्ये पटसंख्या २०पेक्षा कमी झाली आहे. यामुळे कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद होण्याच्या मार्गावर आहेत. राज्य सरकारकडून पावसाळी अधिवेशनात याबाबतची माहिती देण्यात आली आहे.राज्यात जिल्हा परिषदेच्या एकूण १ लाख ८ हजार शाळा आहेत. त्यापैकी १८०००शाळांमध्ये २०पेक्षा कमी पटसंख्या असल्याची नोंद करण्यात आली आहे.

मराठी शाळा बंद पडत आहेत, याला जबाबदार कोण, हे नेमके सांगता येणार नाही. याचे कारण अनेक घटक या गोष्टीला कारणीभूत आहेत. शासन आणि प्रशासन यांच्यातील हलगर्जीपणा आहेच. मात्र सोबत मराठी माणूस सुद्धा आहे.त्यामुळे नेमके दोषी,कोण हे सांगता येणार नाही.याच प्रश्नातील दुसरा प्रश्न म्हणजे, तंत्रज्ञान युक्त मराठी शाळा झाल्यास चालतील का?

आज आपण २१व्या शतकाच्या प्रगतीचे साक्षीदार आहोत ते अपवाद वगळता बहुतांश सगळेचजण मराठी माध्यमांमधून शिकून आलेलो आहोत.असे कितीतरी लोक आहेत ज्यांनी ५ व्या इयत्तेमध्ये आल्यावर ABCD शिकली आहे.तरीही, आज आपण कोणत्याही इंग्रजी संभाषणामध्ये(लिखित किंवा मौखिक) तसूभरही कमी पडत नाही..पण कळीचा मुद्दा असा आहे की, आपल्यापैकी बहुतांशजण आज आपल्या पाल्यांना मराठी शाळांमध्ये शिकवण्यास अजिबातच इच्छुक नाहीत.मराठी शाळांमधील शिक्षणाचा दर्जा कमी प्रतीचा असतो हा सांप्रत समज. आपण सर्वांनी ज्या प्रतिकूल परिस्थितीमध्ये संघर्ष करून आजचे दैदिप्यमान यश मिळवले आहे ते आपण कुठेतरी विसरतो आणि संघर्षाविना मिळालेले यश हे चिरकाल टिकत नाही हे विसरत आहोत.एखाद्या रोपट्याला जर पाण्याची ओढाताण, खतांची/खाण्याची अनुपलब्धता आणि प्रतिकूल हवामान यांची जर सवयच नसेल तर तो निसर्गात दीर्घकाळासाठी जगण्यासाठी लायक ठरत नाही हा निसर्गाचा साधा पण मूलभूत नियम आहे.

पुढच्या पिढीला उत्तम सोयी-सुविधा पुरवण्याच्या नादात त्यांची संघर्षाची उर्मी नष्ट करत चाललो आहोत.त्याला पालक, सरकार आणि प्रशासन जबाबदार आहे.मराठीत पाल्य शिकला तर त्याच्या पोटापाण्याची योग्य सोय होणार नाही, असे पालकांना वाटते. इंग्रजी ज्ञानभाषा असू शकते, मात्र मराठीत शिकलो तर जगात मागे राहील, हा समज पूर्णतः चुकीचा आहे. एकीकडं, राज्य सरकारनं सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर करुन कमी पटसंख्येच्या शाळा बंद करणार नाही, अशी भूमिका घेतली आहे. मात्र, संच मान्यतेच्या निकषांमुळे शाळांना शिक्षक मिळणार नसल्याने अप्रत्यक्षरित्या शाळा बंद पडण्याची भीती आहे. सध्या १०० पैकी ८० विद्यार्थी सीबीएसई आणि आयसीएसई मध्ये जातात, तिथे मराठी भाषेला दुसरी भाषा म्हणून शिकवले जाते.

एकट्या मुंबईत मराठी शाळांमधली विद्यार्थी संख्या गेल्या दहा वर्षात एक तृतीयांश झालेली आहे. १ लाख २ हजार वरून ती




आता ३५ हजार झालेली आहे.महाराष्ट्रात सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी विद्यार्थ्यांना पहिली भाषा म्हणून मराठी भाषा शिकवण्याची सक्ती करण्याची गरज आहे. संस्थाचालक, पालक आणि सरकारने याकडे लक्ष देण्याची गरज आहे. मराठी शाळा चालकांनी विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमांच्या शाळांप्रमाणे सोयी सुविधा पुरवण्याकडे देखील लक्ष देण्याची गरज आहे.

**प्रा.डॉ. सुधीर अग्रवाल**
वर्धा ९५६१५९४३०६

## तुझा विसर न व्हावा...!

आज आषाढी एकादशी आहे. समस्त महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या पांडुरंगाची, श्रीविठ्ठलाची मोठ्या भक्तीभावाने पूजा, आराधना, व्रत व उपवास करण्याचा पवित्र दिवस. भगवान पांडुरंगाच्या दर्शनाच्या ओढीने महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून पंढरपूरच्या दिशेने तहानभूक विसरून उन्हा-पावसाची, कशाचीही तमा न बाळगता गेल्या महिनाभरापासून खडतर प्रवास करत शेकडो मैल पायी निघालेल्या वारकऱ्यांचा आणि पांडुरंगाच्या भेटीचा दिवस! टाळ, मृदूंगाचा गजर व हरिनामाचा जयघोष करत असंख्य वारकऱ्यांसोबत पंढरीकडे मार्गस्थ झालेल्या संतांच्या पालखी सोहळ्याचा आनंद घेण्याचा व संतांचे दर्शन घेण्याचा दिवस. या दिवशी देव चार महिन्यांसाठी निद्रिस्त होतात असा समज आहे, म्हणून आषाढी एकादशीला देवशयनी एकादशी असेही म्हटले जाते. तसेच या एकादशीला पद्मा एकादशी असेही एक नाव आहे. या दिवसापासून चातुर्मासही सुरू होईल आणि १ नोव्हेंबरला देवउठनी एकादशीला चातुर्मास संपेल. पंढरीराया, विठुराया, विठोबा, पांडुरंग, विठू माऊली, पंढरीनाथ, विठाई अशा अनेक नावांनी संतांनी ज्या पांडुरंगाला साद घातली त्याच्या चरणी पवित्र्याने भारलेल्या या दिवशी सर्वांना सुख, समाधान लाभावे हीच प्रार्थना! हेचि दान देगा देवा, तुझा विसर न व्हावा...!

**-प्रदीप मोरे**

संवाद

## आदीगुरु व्यास

गुरुपौर्णिमेच्या दिवशी प्रत्येक शिष्य आपल्या गुरूंचे पूजन करून त्यांना गुरुदक्षिणा देतात. या दिवशी व्यासपूजा करण्याची देखील प्रथा आहे. गुरुपरंपरेमध्ये महर्षी व्यासांना सर्वश्रेष्ठ गुरु मानले जाते. सर्व ज्ञानाचा उगम हा महर्षी व्यासांपासूनच होतो. त्यामुळेच 'व्यासोच्छिष्टम् जगत्सर्वम्' सर्व असे म्हटले जाते. याचा अर्थ असा होतो की, सर्व जगाचे ज्ञान व्यासांनी उष्टे केलेले आहे म्हणजेच व्यासांना ज्ञात नाही असे काहीच नाही. महर्षी व्यासांनी अठरा पुराणांची रचना करून भक्तीमार्ग सोपा केलेला आहे. व्यासांइतका हिंदू तत्त्वज्ञानाचा विस्तार अन्य कोणीही केलेला नाही. असा कोणताही व्यवहार नाही की, ज्याच्यावर महर्षी व्यासांनी मार्गदर्शन केले नाही. यासाठी सांस्कृतिक विचार ज्या पिठावरून मांडले जातात, व्यक्त केले जातात त्या पिठाला व्यासपीठ असे म्हणतात.

**दिपाली गित**

## पंढरीच्या वारीतील वारीपण हरवत चालले...

पंढरपूरच्या आषाढी वारीमध्ये शहरी नक्षलवाद्यांचा शिरकाव झाला असल्याचा गंभीर आरोप शिवसेना शिंदे गटाच्या आमदार मनीषा कायंदे यांनी विधानपरिषदेत पॉईंट ऑफ इन्फॉरमेशनच्या माध्यमातून केला आहे. अर्बन नक्षलवादी संविधान दिंडी, पर्यावरण वारी आणि नास्तिक वादी यासारख्या वेगवेगळ्या नावाखाली ठिकठिकाणी वारीमध्ये जाऊन पथनाट्य करतात.विधानसभेत त्यांनी केलेल्या या आरोपाची सरकार द्वारा यथोचित चौकशी होऊन त्यावर योग्य कारवाई होणार. अलीकडील काळात वारीचा मूळ उद्देश, सामाजिक समानता, भक्ती आणि समरसता, बाजूला पडत असल्याचे दिसत आहे. त्याऐवजी दिंडीत नाचणे, गाणे वेगवेगळ्या वेशभुषा करून मिरवणे, एखादया पर्यटन ठिकाणी सहलीसाठी जाण्यासारखे जात दिंडी मध्ये सामील होणे. या सगळ्यांच्या रील बनवून सोशल मीडियावर टाकणे.अलीकडे तर खाजगी लोकप्रिय मराठी मालिकेतील नटनट्या द्वारा वारकऱ्यांच्या मुलाखती घेणे त्या वाहिन्यांवर दाखविणे याचा नुसता धुमाकूळ चालला आहे.

**अविनाश देशपांडे**

# उत्तर भारतातील कुख्यात रायफल व काडतूस तस्कर 'कामरान अहमद' देहरादून येथून अटकेत!

## स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळची ऐतिहासिक कारवाई; मोठ्या प्रमाणावर शस्त्रसाठा जप्त

जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - जिल्ह्यातील गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी यवतमाळ पोलिसांकडून सुरू असलेल्या विशेष मोहिमेत आजवरची सर्वात मोठी शस्त्रविरोधी कारवाई करण्यात आली आहे. उत्तर भारतातील कुख्यात रायफल व काडतूस तस्कर 'कामरान अहमद' याला देहरादून, उत्तराखंड येथून अटक करण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले आहे.

ही मोठी कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्या आदेशाने पार पडली. ३० जून २०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने यवतमाळ शहरातील दर्डा नगर परिसरातून रणवीर रमन वर्मा (वय ३०) यास ताब्यात घेतले होते. त्याच्या वाहनातून विविध प्रकारची ५ अग्नीशस्त्रे, ३५० जिवंत काडतूस, एक धारदार तलवार, बुलेट प्रुफ जॅकेट, रायफल स्कोप व इतर शस्त्रसाठा असा तब्बल ७ लाख ७८ हजार ५०० रुपयांचा



मुद्देमाल जप्त करण्यात आला होता. मात्र मुख्य सूत्रधार हा देहरादूनमध्ये असल्याची माहिती मिळाली त्यावरुन या प्रकरणाचा अधिक तपास करताना रणवीर वर्मा याने सदर शस्त्रे उत्तर भारतातील तस्कर कमरान अहमद (रा. देहरादून, उत्तराखंड) याच्याकडून खरेदी केल्याचे उघड झाले. त्यामुळे मा. पोलीस अधीक्षक यांच्या आदेशाने सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष मनवर व पथकाला देहरादून येथे रवाना करण्यात आले. तेथे सखोल माहिती गोळा करून सापळा रचण्यात आला आणि कामरान अहमद याला मोठ्या शिताफीने अटक करण्यात आली. आरोपीला स्थानिक न्यायालयात हजर करून ट्रान्झिट वॉरंट घेऊन यवतमाळ येथे आणण्यात आले. न्यायालयाने त्यास ७ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे, तर रणवीर वर्मा याला ३ दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली आहे. कामरान अहमद याचे मोठे शस्त्रतस्करी नेटवर्क असून त्याच्या टोळीत आणखी कोण सहभागी आहेत, याचा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडून सुरू आहे. जिल्ह्यात एवढ्या प्रमाणात अवैध शस्त्रे पोहोचवण्याचे मोठे नेटवर्क असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. या प्रकरणातून अनेक धागेदोरे पुढे येण्याची शक्यता आहे.

पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक पियुष जगताप, पोलीस निरीक्षक सतिश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि संतोष मनवर, सपोनि पवन राठोड, सफौ/योगेश गटलेवार, पोहवा/अजय डोळे, पोहवा/प्रशांत हेडाऊ, पोहवा/निलेश राठोड, पोहवा/रितुराज मेडवे, पोशि/आकाश सहारे यांच्या पथकाने कारवाई पार पाडली. ही कारवाई जिल्ह्यातील आतापर्यंतची सर्वात मोठी शस्त्र जप्तीची कारवाई मानली जात असून, पोलिसांच्या या धडाकेबाज भूमिकेमुळे शस्त्र तस्करीच्या मोठ्या जाळ्यावर आघात झाल्याचे बोलले जात आहे.

### जप्त शस्त्रांचा तपशील

| शस्त्र व साहित्य | नग | अंदाजे किंमत |
|---|---|---|
| रायफल | १ | १,००,०००/- |
| १७७ एअर गन | १ | ५०,०००/- |
| डबल बोअर शॉट गन | १ | १,००,०००/- |
| ३२ मेड इन ऑर्डिनन्स फॅक्टरी रिव्हॉल्वर | १ | १,००,०००/- |
| CROSSBOW ROYAL हंटींग गन | १ | १,००,०००/- |
| विविध प्रकारचे ३५० जिवंत काडतूस | ५ | १०,०००/- |
| बुलेट प्रुफ जॅकेट | १ | ५०,०००/- |
| धारदार तलवार | १ | ५,०००/- |
| नग हंटींग बाण (ACTIVE ARCHERY कंपनी) | ६ | ६,६,०००/- |
| ४ फायबर व लाकडी बॉडी बट | ४ | २०,०००/- |
| ३ रायफल स्कोप | ३ | ३०,०००/- |

# बेरोजगार तरुणांच्या नावावर १०० कोटींचा सायबर घोटाळा उघड

## पांढरकवड्यातून देशव्यापी सायबर रॅकेट उघडकीस

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ - यवतमाळ जिल्ह्यातील पांढरकवडा तालुक्यातून तब्बल १०० कोटी रुपयांचा सायबर फसवणूक घोटाळा उघडकीस आला असून, यात अनेक गावांतील सुशिक्षित बेरोजगार तरुणांचा वापर करून देशभरात पैशांची बेकायदेशीर उलाढाल करण्यात आली आहे. भद्रावती (जि. चंद्रपूर) येथील राहुल शेडमाके हा या घोटाळ्याचा मुख्य सूत्रधार असल्याचे प्राथमिक चौकशीत समोर आले आहे.

या प्रकरणामुळे शेकडो बेरोजगार तरुणांचे भवितव्य धोक्यात आले आहे. माजी नगराध्यक्ष संतोष बोरले यांनी या गंभीर प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाईची मागणी स्थानिक विश्राम गृह यवतमाळ येथील आयोजित पत्रकार परिषदेत केली. पांढरकवडा तालुक्यातील चोपण, वसंतनगर, शिवणी, वाघोली, जरुं, तसेच आसपासच्या गावांतील शेकडो बेरोजगार, सुशिक्षित तरुणांना 'मनरेगा' (MREGS) अंतर्गत नोकरी देतो, असे आमिष दाखवून त्यांच्या नावावर बँक ऑफ महाराष्ट्र, पांढरकवडा शाखेत खाती उघडण्यात आली. या खात्यांचे यूपीआय आयडी, एटीएम कार्ड, इंटरनेट बँकिंगचे संपूर्ण व्यवहार राहुल शेडमाके व त्याच्या साथीदारांनी स्वतःकडे ठेवले. यानंतर देशातील विविध राज्यांतून त्या खात्यांमध्ये करोडो रुपयांचे व्यवहार करून, परस्पर पैसे काढण्यात आले. महाराष्ट्र बँकेतील व्यवस्थापनावर संशय व्यक्त केला जात असून बँकेचे व्यवस्थापक यांची चौकशी करण्यात यावी कारण इतक्या मोठ्या आर्थिक उलाढाल दरम्यान बँक ऑफ महाराष्ट्र, पांढरकवडा शाखेच्या व्यवस्थापनाची भूमिका संशयास्पद वाटत आहे. खातेदारांना कोणतीही पूर्वकल्पना न देता कोट्यवधी रुपयांचा अपहार झाला असून, बँकेच्या अंतर्गत कर्मचाऱ्यांच्या सहभागाशिवाय हे शक्य नसल्याचा आरोप संतोष बोरले यांनी केला आहे. या प्रकारामुळे शेकडो निर्दोष तरुणांवर सायबर गुन्हे दाखल झाले आहेत. त्यांची बँक खाती गोठवण्यात आली असून, भविष्यात आयकर विभागाकडूनही त्यांच्या विरोधात चौकशी होण्याची भीती आहे. एका चुकीच्या जाळ्यात अडकवून त्यांचे सामाजिक आणि आर्थिक आयुष्य उध्वस्त करण्याचा प्रकार सुरू असून भद्रावती तालुक्यातील राहुल शेडमाके हा या संपूर्ण फसवणूक रॅकेटचा एक भाग असून या प्रकरणात A पासून तर Z पर्यंत मुख्य सूत्रधार कोण असून शक्तो व त्याचे देशभरात जाळे पसरले असल्याचा संशय आहे. पांढरकवड्यातील ग्रामीण भागातील तरुणांना गंडवून त्यांच्या नावावर आर्थिक गैरव्यवहार करण्यासाठी या टोळीने मोठे रॅकेट संपूर्ण राज्यात पसरले असल्याची विश्वसनीय माहिती पुढे येत आहे. त्यामुळे या संदर्भात सखोल चौकशी करून न्याय मिळावा अशी मागणी यावेळी बेरोजगार, निर्दोष तरुणांनी केली.

### संतोष बोरले यांची मागणी गरीब तरुणांना न्याय द्या

या संपूर्ण प्रकरणात निर्दोष गरीब तरुणांची होणारी आर्थिक व मानसिक फरफट रोखण्यासाठी तातडीने सीबीआय मार्फत चौकशी करावी, दोषींवर कठोर कारवाई करावी, व त्यांना न्याय द्यावा अशी मागणी माजी नगराध्यक्ष संतोष बोरले यांनी केली आहे. तसेच, निर्दोष युवकांवरील सायबर गुन्हे मागे घेऊन त्यांची बँक खाती पुन्हा सुरु करावीत, अशीही मागणी करण्यात आली आहे.

# सावधान वणीकर बनावटी विक्रीपत्राच्या आधारावर सातबा-यात फेरफार!

जनमाध्यम प्रतिनिधी

वणी - वणी तालुक्यात दलालांचे जाळे झपाट्याने वाढत असून, आता बनावट विक्रीपत्रांच्या आधारे सातबारा उताऱ्यावर फेरफार केल्या जात असल्याचे धक्कादायक प्रकार समोर येत आहेत. अनेक नागरिकांनी प्रामाणिकपणे पैसे देऊन जमिन-विक्री घेतली असताना, त्या जमिनीवर अन्य व्यक्तींच्या नावाने फेरफार होत असल्याच्या घटना उघडकीस येत आहेत. विशेषम्हणजे या सगळ्या प्रकाराला स्थानिक तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांचे 'आश्रय' असल्याची जोरदार चर्चा आहे.

बनावट कागदपत्रांचा वापर करून शेतजमिनी, प्लॉट्स, घरे विकल्याचे दाखवले जाते आणि त्याच आधारावर फेरफार करून बनावट सातबारा तयार केला जातो. त्यामुळे मूळ मालक असलेल्या व्यक्तींच्या जमिनीवर नाहक कब्जा मिळवण्याचे उद्योग काही दलालांकडून सुरू आहेत. या सगळ्या प्रकारात तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांची हातमिळवणी असल्याचा आरोप होत असून, सर्वसामान्यांची जबरदस्त फसवणूक केली जात आहे. अनेक प्रकरणांमध्ये मूळ विक्री न होताही, बनावटी दस्ताच्या आधारे सातबाऱ्यावर फेरफार होत आहे. त्यामुळे संबंधित व्यक्तींच्या नावावर नोंद चढवून जमिनींचे व्यवहार होतात. यामुळे जमीन विकत घेणारे, अथवा मूळ मालक असणारे नागरिक मोठ्या अडचणीत सापडत आहेत. परिणामी, मेहनतीचे पैसे गुंतवूनही त्यांना जागा अथवा मालमत्तेचा हक्क मिळत नाही.

शासकीय रेकॉर्ड हे अत्यंत गोपनीय व कायदेशीर स्वरूपाचे असतात. मात्र वणी तालुक्यात या गोपनीय कागदपत्रांच्या नोंदीत थेट हस्तक्षेप होत आहे. तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे, अथवा संगनमताने, दलालांकडून बनावट दस्त तयार होतात आणि त्याच आधारे फेरफार करण्याचे प्रकार वाढले आहेत. या गंभीर प्रकाराकडे प्रशासनाने तातडीने लक्ष देणे गरजेचे आहे. बनावट विक्रीपत्रांच्या आधारे फेरफार करण्याचा हा सगळा प्रकार थांबविण्यासाठी दोषींवर कडक कारवाई व्हावी अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

# कंत्राटदाराच्या गलथानपणामुळे शाळा व गाव झाले चिखलमय, नागरिकांन मध्ये प्रचंड असंतोष

जनमाध्यम प्रतिनिधी

बाभुळगाव : पाणी पुरवठा कंत्राटदाराने जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणातून पाण्याची पाईप लाईन टाकण्याकरित खोदकाम केले परंतु त्याचे काँक्रिट न केल्याने शाळेचा प्रांगणात चिखल साचला आहे. या चिखलामुळे लहान विद्यार्थी घसरून पडत असून त्यांना दुखापत होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. बाभुळगाव नगर पंचायत हद्दीत नविन पाणी पुरवठा योजनेचे काम गेल्या सहा महिन्यांपासून सुरू आहे. त्यासाठी शहरातील रस्ते खोदून त्यात पाईप लाईन टाकण्यात आली. काही ठिकाणी खोदलेल्या नालीमध्ये काँक्रीटीकरण करण्यात आले. मात्र अनेक ठिकाणी अद्यापही संबंधीत कंत्राटदाराने काँक्रीटीकरण न करता फक्त मातीकाम केल्याने पावसामुळे आजच्या घडीला शहर चिखलमय झाले आहे. या चिखलयुक्त रस्त्यांवरून जातांना दुचाकीस्वार, शाळकरी विद्यार्थी, जेष्ठ



नागरिकांना कमालीचा त्रास सहन करावा लागत आहे.

नगर पंचायत बाभुळगाव, येथे पाणी पुरवठा योजनेच्या कंत्राटदाराने निकृष्ठ दर्जाचे काम केल्यामुळे वार्ड क्र. 2 व 3 विविध समस्या निर्माण झाल्या असून नागरिकांना प्रचंड मनःस्ताप सहन करावा लागत आहे. सदरच्या कामामुळे वार्डमध्ये घाणीचे साम्राज्य पसरल्याबाबत संबंधीत कामाची सखोल चौकशी करून दोषींवर कडक कार्यवाही करण्यात यावी असे निवेदन वॉर्ड क्र.2 व 3 येथील नागरिकांनी दि.2 जुलै रोजी नगर पंचायत अधीक्षक मार्फत जिल्हाधिकारी यांना दिले आहे.पाणी पुरवठा ठेकेदारांनी पाईप लाईन टाकताना सदर कंत्राटदाराने रस्त्यांवर नाली खोदून पाईपलाईन टाकली असून ती अत्ता माती, मुरुम टाकून बुजविण्यात आली आहे.

सदरचे काम करताना कंत्राटदाराने पाईपलाईन खोल न टाकता वरवर टाकल्याने भविष्यात ती फुटण्याची शक्यता नाकारता येत नाही. संबंधीत कंत्राटदाराने काही ठिकाणी अद्यापही काँक्रिटीकरण केलेले नसल्याने पावसाच्या पाण्यामुळे रस्ते चिखलमय झाले आहेत .असे तक्रारीत नमूद केले आहे. या निवेदनावर न्यामत अली, उमर मियांखा पठाण,कमलाबाई गंगाधर मडावी,नंदनी नारनवरे, मंदा बताले, शाहिस्ता अहेमद अली, शब्बीर खान, मनवर अली आदींच्या स्वाक्षऱ्या आहे.


पाणी पुरवठा कंत्राटदाराने वार्ड क्र. 12 मधील रस्ते खोदून ठेवल्याने अख्खा वार्ड चिखलमय झाला आहे. पाईपलाईनसाठी खोदलेली माती सिमेंट रस्त्यावर आल्याने आता तेथे घसरगुंडी निर्माण झाली आहे. आजच्या घडीला या रस्त्यांवरून चालणे सुद्धा नागरिकांना कठीण झाले आहे.

याबाबत नागरिकांनी वारंवार नगर पंचायत प्रशासन व संबंधीत कंत्राटदाराला सांगितले, मात्र त्याचा काहीच उपयोग झाला नाही. अशीच काहीशी परिस्थीती वार्ड क्र. 8 मध्ये सुद्धा आहे.

त्यामुळे येथील नागरिक मुख्याधिकारी यांना निवेदन देण्यासाठी गेले होते, मात्र तेथे मुख्याधिकारी उपस्थित नसल्याने त्यांनी त्यांच्या नामफलकाला पुष्पहार घालून रोष व्यक्त केला होता.

# वेचक

## आपटी येथील पाण्याच्या टाकीचे बांधकाम कासव गतीने, बांधकाम विभागाचे दुर्लक्ष



राळेगाव - तालुक्यातील आपटी (रामपूर) येथे गावमध्ये जल जीवन मिशन अंतर्गत पाण्याच्या टाकीचे काम कमीत कमी 1 वर्षपासून रखडले असून त्यांचं काम खूप कासव गतीने चालू आहे,पाण्याच्या टाकीचीप्रथम फवडेल असा काम रोड फोडून पाईप लाइन टाकल्याने गावात नागरिकांनाच्या घरासमोरील खड्डे पडल्यामुळे छोटा मोटा अपघात घडू शकते तर याला जबाबदार कोण? प्रशासन की ठेकेदार असणार आहे असा प्रश्न गावकऱ्य मध्ये पडला आहे. ठेकेदाराला गावकऱ्यांनी पाण्याच्या टाकिच्या कामा बद्दल विचारणा केली असता त्यांनी सांगितले की बांधकाम विभागाकडे निधी उपलब्ध नाही असे सांगण्यात आले आहे. तर गावात पाईप लाइच्या खड्ड्यामुळे गावाकऱ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे तर प्रशासनाने लवकरात लवकर गावातल्या पाईप लाइनचे खड्डे बरोबर करून द्यावे आणि टाकीचे काम लवकर पूर्ण करावे अशी गावाकऱ्यांची प्रशासनाकडून अपेक्षा व्यक्त केली आहे.

## विठु माऊली मंदीरात आषाढी एकादशीनिमित्त विविध कार्यक्रम



यवतमाळ : भोसा परिसरातील महाजन लेआऊटमधील विठु माऊली मंदिरात रविवार, ६ जुलै रोजी आषाढी एकादशीचे औचित्य साधून विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. २ मार्च रोजी श्री विठ्ठल रखुमाई मुर्ती व श्री गुरु माऊली पादुका यांची प्राणप्रतिष्ठा बोपापूर येथील श्री संत महंत अंबीका भारती यांच्या हस्ते पार पडला होता. रविवारी सकाळी ५ वाजता अभिषेक, फराळप्रसाद, भजन कार्यक्रम चे आयोजन केले आहे. तरी जास्तीत जास्त नागरीकांनी कार्यक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन आयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.



## यवतमाळ शहर पोलीस ठाण्यात १४४ बेवारस मोटरसायकलींचा लिलाव; ५.५५ लाख रुपयांची विक्री

यवतमाळ - यवतमाळ शहर पोलीस ठाण्यात जमा असलेल्या बेवारस व विविध गुन्ह्यातील जप्त १४४ मोटर सायकलींचा लिलाव दिनांक ४ जुलै रोजी पोलीस ठाण्याच्या प्रांगणात पार पडला. सदर लिलाव प्रक्रियेत एकूण ७६ वाहन खरेदीदारांनी सहभाग घेतला. लिलाव प्रक्रियेत मोहम्मद उमेर मोहम्मद शमी, रा. कळम चौक, इस्लामपुरा, यवतमाळ यांनी सर्वाधिक ५,५५,०००/- रुपयांची बोली लावली. परिणामी संपूर्ण १४४ मोटरसायकली त्यांना देण्यात आल्या. सदर लिलाव प्रक्रिया पोलीस निरीक्षक रामकृष्ण जाधव (ठाणेदार, पो.स्टे. यवतमाळ शहर), नायब तहसीलदार राजेश कहारे तसेच दोन पंच यांच्या उपस्थितीत व संपूर्ण 'इन-कॅमेरा' पद्धतीने पार पडली. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक पियुष जगताप, उपविभागीय पोलीस अधिकारी दिनेश बैसाणे यांच्या मार्गदर्शनात यवतमाळ शहर पोलीस ठाण्याचे ठाणेदार पोलीस निरीक्षक रामकृष्ण जाधव व पोलीस अंमलदार यांनी केली. या लिलावमुळे पोलीस ठाण्यातील जागा मोकळी झाली असून, पुढील काळात देखील अशा प्रकारचे अधिकृत लिलाव आयोजित करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

# कामे उपलब्ध करून देण्यासाठी बारमाही कामगारांचे आमरण उपोषण सुरू

## सहा दिवस लोटले तरीही दखल नाही; उपोषणकर्त्यांची तब्येत खालावली

जनमाध्यम प्रतिनिधी

पुसद - तालुक्यातील पुसदोश वनपरिक्षेत्र व श्रेवाळपिंप्री परिक्षेत्रातील गेल्या १० ते ११ वर्षांपासून काम करत असलेले वन कामगार यांना कामावरून कमी करण्यात आल्यामुळे वन कामगारावर सध्या उपासमारीची वेळ आली आहे. त्यांनी बारमाही कामे मिळविण्यासाठी प्रादेशिक उपवन विभागाला वारंवार पाठपुरावा केला होता. गेल्या ९ जून महिन्यात साखळी उपोषण देखील केले होते. परंतु त्यांच्या मागण्यांकडे उपवन विभाग तसेच वनमंत्र्यांचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे त्यांच्या हक्काच्या मागण्यांसाठी वनमंत्र्यासह उपवन संरक्षकाचे लक्ष वेधून घेण्यासाठी मंगळवार दि.१ जुलैपासून वनभवन पुसद उपवन विभाग कार्यालयासमोर सामुहिक आमरण उपोषण सुरू केले आहे. ज्या लोकांना २४० दिवस



झाले किंवा १० वर्षे झाले अशा लोकांना कायम केल्याशिवाय काढता येत नाही किंवा त्यांना कामावरून वंचित ठेवता येत नाही व नुकसान भरपाई सुद्धा देण्यात यावी असे वरिष्ठांचे आदेश असून तरीसुद्धा आम्हाला कामावरून कमी करून नवीन मजुरांना लावण्यात आले हा आमच्यावर अन्याय आहे. आमच्या परिवारासहित आमच्यावर उपासमारीची वेळ आली असल्यामुळे आम्ही वनमजूर आमरण उपोषणाला बसले आहे असे निवेदनात सुद्धा म्हटले आहे. वन कामगार सेवा ज्येष्ठतेनुसार फळींच्या कामाप्रमाणे कामे देण्यात यावी, नियुक्ती दिनांकापासून ते अखेरपर्यंत वर्षनिहाय संरक्षण मजुर म्हणून केलेल्या कामाचे एम.बी. बुकची छायांकित प्रत देण्यात यावी, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन दुय्यम संवर्ग) महाराष्ट्र राज्य दिनांक १२/५/२०२४ च्या कानुसार माहिती पाठविण्यात आली की नाही याची माहिती देण्यात यावी. हे आंदोलन स्व.वसंतराव नाईक यांच्या जयंती दिनापासून रमाशंकर शुक्ला,दारासिंग पवार, जनार्धन गिरी, बळीराम आडे, विलास चव्हाण, उत्तम मिरासे व भिमराव चव्हाण, इत्यादी लोकांनी आमरण उपोषण आंदोलन सुरू केले आहे.

# आझाद समाज पार्टीच्या आंदोलनाने प्रशासनाची उडाली झोप!

## पाणीटंचाईने विरोधात आझाद समाज पक्षाचे पैनगंगा नदी पात्रात जलसमाधी आंदोलन

जनमाध्यम प्रतिनिधी



ढाणकी - शहरात गेल्या अनेक महिन्यापासून भीषण पाणी टंचाई निर्माण झाली असून ढाणकीतील नागरीकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. प्रशासनाला वारंवार मागणी करूनही पाण्याचा प्रश्न सुटत नसल्यामुळे अखेर आझाद समाज पक्षाच्या वतीने शेकडो कार्यकर्त्यांसह गांजेगाव येथील पैनगंगा नदीपात्रात उतरून दि.04 जुलै 2025 रोजी केले. जलसमाधी आंदोलन केले.

ढाणकी पासून 6 कि.मी अंतर कापत आंदोलक नगरपंचायत च्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करीत गांजेगाव येथील पैनगंगा नदिपात्रात जिल्हाध्यक्ष प्रशांत उर्फ जॉन्टी विनकरे यांच्या नेतृत्वात घोषणाबाजी देत नदीपात्रात उतरले, यावेळी माझा समाज पक्षाचे नेतृत्वात देवानंद पाईकराव ,संतोष जोगदंडे,गोलू मुनेश्वर,अतुल वाढवे,पप्पु गायकवाड,प्रफुल दिवेकर, समाधान राऊत,धम्मपाल गायकवाड,विष्णू वाढेकर,गौतम कांबळे, ओम खोपे ,शब्बीर भाई, संतोष गायकवाड, अब्दुल लाला, सचिन वाहुळे, सिमा गायकवाड, पुजा गायकवाड, संगीता घुगरे, लता राऊत, कमल विनकरे, छायाबाई वाठोरे, मनिशा भगत, सुरेखा विनकरे, अर्चना मुनेश्वर, पिंकी गायकवाड, कमल विनकरे,सन्नमाला राऊत, आरती राऊत, चंद्रकला पावकोरे,शिला गायकवाड, समर गायकवाड,,इ.कार्यकर्ते महिला व आबाल वृध्दासह मोठ्या संख्येने नदिपात्रात उतरून न.प प्रशासनाच्या विरोधात घोषणा देत पाणी टंचाई दुर करण्यासाठी तातडीने उपाय योजना करण्याची मागणी लावून धरली. यावेळी बिटरगाव पोलीस स्टेशनचे ठाणेदार पांडुरंग शिंदे हे पोलीस प्रशासनाच्या फौज फाट्यासह उपस्थित होते तसेच उमरखेड तहसीलचे नायब तहसीलदार विध्यासराव सावे, न.प.चे मुख्याधिकारी रविंद्र राऊत, पटवारी जगताप, भंडारे यांनी आंदोलकांशी चर्चा केली. आणि लवकरात लवकर पाणी टंचाई निवारण करण्याचे आश्वासन दिले. मात्र आंदोलक जलसमाधी घेण्याच्या मुद्यावर ठाम होते. दरम्यान आंदोलकांनी नगरपंचायत शासनाला धारेवर धरल्यामुळे आहे का तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

> नगरपंचायत प्रशासनाने एक महिन्याच्या आत पाणीपुरवठा सुरळीत करून यास जबाबदार असणाऱ्या कर्मचाऱ्यांची चौकशी करण्याचे आश्वासन दिले नगरपंचायत आश्वासनाची पूर्तता न केल्यास या पुढचे जलसमाधी आंदोलन सहस्त्रकुंड धबधब्यात करण्यात येईल याची प्रशासनाने नोंद घ्यावी. - **प्रशांत उर्फ जॉन्टी विणकरे जिल्हाध्यक्ष आजाद समाज पार्टी यवतमाळ**

# राष्ट्रवादी काँग्रेस (श.प) पक्षाकडून बाजार समितीमधील असुविधांचा भंडाफोड

जनमाध्यम प्रतिनिधी

## शरद मैंद यांच्या नेतृत्वात पोलखोल



पुसद - येथील कृषि उत्पन्न बाजार समिती प्रांगणात भरणाऱ्या भाजी मंडीतील प्रचंड असुविधांचा भंडाफोड काल राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) पक्षातर्फे प्रदेश सरचिटणीस शरद मैंद यांच्या नेतृत्वात करण्यात आला.या असुविधांची तात्काळ दखल घेण्याबाबत पक्षातर्फे निवेदन देण्यात आले.त्यानुसार बिकट अवस्थेत असलेले पुसद तालुक्यातील अनेक शेतकरी आर्थिक हतबल तरच्या म्हणून भाजी उत्पादन करीत आहेत. तालुक्यातील शेवटच्या टोकापासून शेतकरी भल्या पहाटे कृषी उत्पन्न बाजार समिती आवारातील मंडी मध्ये भाजी विक्री साठी येतो. मात्र भाजीची हर्रासी होते त्या आवारात असंख्य असुविधांचा शेतकऱ्यांना सामना करावा लागतो.

पावसाळ्याच्या दिवसात या परिसरात मोठ्या प्रमाणात चिखलाच्या साम्राज्यामध्ये मच्छर व अन्य कीटकांच्या सानिध्यात सकाळी ५ते ८ वाजेपर्यंत हर्रासी सुरु असते. त्याचा या परिसरात वावरणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या आरोग्यावर विपरीत परिणाम पडतो. तसेच चिखलमय जमिनीवर भाजी ठेऊन हर्रासी होत असल्यामुळे ही भाजी उपभोगात आणणाऱ्या हजारो नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. चिखलमय जमिनीवरुन भाजी भरलेले कटले, हातगाडे ओढण्यासाठी त्रास सहन करावा लागतो त्यामुळे या संपूर्ण परिसरात युद्ध पातळीवर गट्टू किंवा मजबूत काँक्रिटीकरण करण्याची गरज आहे दूर खेडे गावावरून सकाळी ४वाजता आलेल्या ग्रामीण शेतकऱ्यांसाठी किंवा व्यापाऱ्यांसाठी भाजी मंडी आवारात प्रसाधन गृह., (मुतारी ),पिण्याचे शुद्ध पाणी उपलब्ध करून देण्याची गरज आहे. भाजी मंडी परिसरात सकाळी ५ वाजता अंधारात व्यवहार सुरु होत असल्यामुळे या भागात पुरेशी लाईट व्यवस्था करण्याची गरज आहे. शेतकरी हिताच्या वरील सुविधा तात्काळ उपलब्ध करून द्यावा अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन उभारण्यात येईल असा इशारा शरद मैंद यांच्या नेतृत्व व मार्गदर्शनात आदी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार चे तालुका व युवक राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार, शहर व युवक राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पुसद तालुका एस टी सेल राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार. सोसिअल मीडिया पुसद तालुका व पुसद शहर राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार सामाजिक न्याय विभाग पुसद तालुका व शहर राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार चे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी निवेदनातून दिला.२००६ पासुन बाजार समिती प्रांगणात मंडी सुरु झाली. १८ वर्षापासून वरील असुविधा बाबत अनेक राजकीय, सामाजिक संघटना, वर्तमान पत्रातुन आवाज उठविल्या गेला.मात्र बाजार समिती, लोकप्रतिनिधी यांनी आजपर्यंत दुर्लक्ष करत गेले.

# ढाणकी येथे ३० खाटांच्या ग्रामिण रुग्णालयास मंजुरी प्रदान करा : शिवसेना (शिंदे)



जनमाध्यम प्रतिनिधी

ढाणकी : येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्याबाबतचा प्रस्ताव, मा. जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, यवतमाळ यांचे पत्र क्रमांक ९०२३-२४/२४ दिनांक २८-०६-२०२४ रोजीचे पत्र तसेच उपसंचालक आरोग्य सेवा, अकोला मंडळ, अकोला २८४५०-५३ दि. २८-६-२०२४ यांचे वरील विषयासंदर्भात पत्र सहसंचालक आरोग्य सेवा, रुग्णालये (राज्यस्तर) मुंबई येथील कार्यालयास प्राप्त झाले असुन, पुढील कार्यवाहीस्तव मौजा ढाणकी ता. उमरखेड जि. यवतमाळ येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे श्रेणीवर्धन ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय मध्ये रूपांतर लवकरात लवकर करावे याकरीता शिवसेना (शिंदे) ढाणकी तर्फे जिल्हा शल्यचिकित्सक यवतमाळ मार्फत सहसंचालक आरोग्य सेवा रुग्णालये राज्यस्तर मुंबई यांना निवेदन देण्यात आले. तसेच जिल्हाचे पालकमंत्री संजय राठोड यांना सुद्धा, ढाणकी व परिसराची मागणी पाहता याप्रकरणी गांभीर्याने लवकरात लवकर लक्ष घालून काम पूर्ण करावे अशी मागणी शिवसेना (शिंदे) तर्फे निवेदनातून करण्यात आली. याप्रसंगी शिवसेना तालुकाप्रमुख प्रवीण पाटील मिरासे, शिवसेना ढाणकी शहर प्रमुख संजय सल्लेवाड, सुनील मांजरे, शेख इरफान व सुरेश जाधव हे उपस्थित होते.


## संक्षिप्त




### 'एक पेड माँ के नाम' उपक्रमांतर्गत वृक्षारोपण

**अमरावती-**श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट अमरावती द्वारा संचालित डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय उत्तमनगर अमरावती येथे राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने मा. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्या दहा कोटी वृक्ष लागवड मोहिमे अंतर्गत आणि 'एक पेड माँ के नाम ' या शासनाच्या उपक्रमा अंतर्गत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कमलाकर पायस यांच्या हस्ते महाविद्यालय परिसरामध्ये वृक्षारोपण करण्यात आले.याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कमलाकर पायस यांनी पर्यावरणाचे रक्षण करणे ही आजच्या काळाची असून मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करून वृक्ष संवर्धन करणे आवश्यक आहे. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कमलाकर पायस, रासेयो कार्यक्रम अधिकारी, डॉ. प्रकाश म्हस्के, सह याप्रसंगी प्रा. पी. आर. एस. राव,डॉ. श्याम तंत्रपाळे,डॉ. सुनील कुमार,डॉ. शुध्दोधन कांबळे,डॉ. प्रदीप अंबोरे,डॉ. प्रकाश म्हस्के, प्रा. डॉ. राजेश देशमुख, डॉ. प्रशांत खेडकर, प्रा. जी.एच. पांडे,डॉ. एस.बी. सांगोले, प्रा. दिपाली पडोळे, प्रा. प्रकाश बोरकर, प्रा. अनिल धोटे, प्रा. प्रवीण विधाते, प्रा. शंकर लाहोटी, प्रा. राजेश बोराडे, प्रा. हर्षवर्धन देशमुख,डॉ. ज्ञानेश्वर भगत, डॉ. अनिल पाचकुडके, प्रा. रुद्रा चोपकर, विजय इंगळे,राजेश नाखले,किशोर बिजवे, प्रफुल धार्मिक,सुशांत युनाते, भाग्यश्री वानखडे, सागर शिरसाट, रोशन वैद्य व समस्त विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### वाळलेले झाड; अपघाताला आमंत्रण...



**अमरावती-परतवाडा महामार्गावरील आसेगाव पूर्णा जवळील कडूलिंबाचे वाळलेले झाड अपघाताला निमंत्रण ठरत असून याकडे सार्वजनिक बांधकाम खात्याचे दुर्लक्ष होत आहे. संबंधित विभाग मोठ्या दुर्घटनेची वाट पाहत आहे की काय? असा प्रश्न येणाऱ्या जाणाऱ्यांना पडला आहे.**
(छाया- किशोर मोकलकर, आसेगाव पूर्णा)

### डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय डायलिसिस सुविधा

**अमरावती-**श्री शिवाजी शिक्षण संस्था व्दारा संचालित डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय येथे किडनी आजाराने ग्रस्त रूग्णांसाठी मोफत डायलिसिस सुविधा उपलब्ध आहे. जेव्हा किडणीची कार्यक्षमता अगदीच कमी होते किंवा किडणी पूर्णपणे काम बंद करते, तेव्हा औषधे घेऊनसुध्दा किडणी रोगाची लक्षणे वाढू लागतात, अशा अवस्थेत डायलिसिसची आवश्यकता भासते. पीडीएमसी येथील डायलिसिस युनिट मध्ये १६ अद्ययावत डायलिसिस मशिन कार्यरत असून, किडनी विशेषज्ञ डॉक्टरांच्या सुपरव्हिजनमध्ये डायलिसिस सुविधा प्रदान केली जाते. महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजने अंतर्गत किडनी आजारावरील संपूर्ण उपचार मोफत उपलब्ध झालेले आहे. अमरावती जिल्हयातील व बाहेरील किडनी आजाराने ग्रस्त रूग्णांनी या सेवेचा लाभघेण्याचे आवाहन श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री हर्षवर्धनजी देशमुख, संस्थेचे पदाधिकारी, महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख, वैद्यकीय अधिक्षक डॉ. पवन टेकाडे व प्रशासकीय अधिकारी डॉ. स्वप्नील मोहोड यांनी केले आहे.

# शेंदूरजना बाजार येथे अवैध दारूविक्रीला उधाण

## ग्रामसभेने घेतला दारूबंदीचा ठराव,तिवसा पोलिसांना निवेदन

**तिवसा/वार्ताहर**
तालुक्यातील श्री संत अच्युत महाराजांची पुण्यभुमी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शेंदूरजना बाजार येथे अवैध दारूविक्रीला चांगलेच उधाण आले आहे.या गैर प्रकाराकडे तिवसा पोलिसांचे दुर्लक्ष होत असल्याचे बोलले जात आहे.गावात कायम दारूबंदी व्हावी,अवैध धंदे बंद करण्यात यावा,याबाबतचा ठराव ग्रामपंचायतने घेतला असून तिवसा पोलिसांना याबाबत निवेदन दिले आहे. गेल्या काही महिन्यांपासून तिवसा शहरापासून ३ किलोमीटर अंतरावर असलेल्या शेंदुरजना बाजार या गावात काही दारूविक्रेत्यानी अवैधरित्या दारूविक्री चालविली आहे.ही दारूविक्री ऐन वस्तीत व रहदारीच्या भागात खुलेआम होत असल्याने गावातील नागरिकांना याचा कमालीचा त्रास सहन करावा लागत आहे.तरुणाई व्यसनाच्या आहारी जाऊ नये,दारूमुळे आरोग्याची हानी होऊ नये,घरात व गावात भांडण-तंटे,शिवीगाळ, मारहानीसारखे प्रकार वाढू नये म्हणून या अवैध प्रकाराला आळा बसावा, संतांच्या भूमीत असे अवैध धंदे बंद करावे,यासाठी येथील ग्रामपंचायत प्रशासनाने ठराव घेतला असून संबंधित तिवसा पोलीस स्टेशन,तहसील कार्यालय आदींना निवेदन दिले आहे. धार्मिक कार्यक्रमाची रेलचेल असलेल्या या संतांच्या भूमीत अवैध दारूविक्रीचा हा व्यवसाय चालविणाऱ्यावर कठोर कारवाई का केली जात नाही,असा प्रश्न उपस्थित केल्या जात आहे.

> **अवैध दारूविक्री बंद करण्याबाबत ठराव**
> गावात शांतता व सौहार्दाचे वातावरण राहावे,तरुणाई व्यसनाच्या आहारी जाऊ नये,अवैध दारूमुळे आरोग्याची हानी होऊ नये,म्हणून ही अवैध दारूविक्री बंद करण्यात यावी.याबाबत एप्रिल महिन्यात ग्रामसभेत ठराव घेण्यात आला. गुरुवारी तिवसा पोलीस स्टेशनला निवेदन देण्यात आले.
> **आशा चौधरी,** सरपंच,ग्रा पं शेंदुरजना बाजार

> शेंदूरजना बाजार येथील अवैध दारूविक्रीबाबत नागरिकांचे निवेदन प्राप्त झाले आहे. त्याठिकाणी दारूविक्रेत्यांवर कारवाई केल्या आहेत.आता तातडीने दारूविक्रेत्यावर निश्चितपणे कारवाई करून हा प्रकार बंद केल्या जाईल.
> **-प्रदीप शिरस्कार, ठाणेदार,तिवसा.**

### दुसरे परिवर्तन विचारवेध साहित्य संमेलन आज

**अमरावती-**परिवर्तन प्रबोधिनी, बिलीव्ह फाऊंडेशन व सृजन साहित्य संघ शाखा अमरावती द्वारा आयोजित राज्यस्तरीय दुसरे परिवर्तन विचारवेध साहित्य संमेलन अमरावती येथील कांचन रिसॉर्ट मध्ये ६ जुलै रोजी संपन्न होणार आहे. या संमेलनाचे अध्यक्ष म्हणून जेष्ठ साहित्यिक श्री रा. गो चवरे पुणे, स्वागताध्यक्ष लेखिका व उद्योजिका कांचन उल्हे अमरावती तर उद्घाटक म्हणून जेष्ठ लेखिका शिलाताई गहलोत अकोला, हे मान्यवर उपस्थित राहतील.ग्रंथदिंडीने साहित्य संमेलनाची यशस्वी सुरुवात संमेलनाध्यक्ष प्रा. डॉ. रा.गो. चवरे यांचे हस्ते विविध मान्यवरांच्या उपस्थितीत ग्रंथपूजनाने होणार असून त्यानंतर संमेलनाचे यथोचित उदघाटन पार पडेल. याप्रसंगी अमरावती भूषण, जीवनगौरव,परिवर्तन गौरव, परिवर्तन सेवा गौरव या पुरस्कारांचे वितरण होणार असून परिवर्तन पर्व, साहित्य प्रवाह संमेलन विशेषांक या पुस्तकांसह अनेक नामांकित लेखकांच्या पुस्तकांचे देखील प्रकाशन पार पडणार आहे.यांनंतर परिसंवाद, निमंत्रितांचा गझल मुशायरा, निमंत्रितांचे कविसंमेलन व समारोपिय कार्यक्रम पार पडेल. साहित्यिक व रसिक मंडळींनी साहित्य संमेलनाला उपस्थित राहण्याचे आवाहन करणयात आले आहे.

## स्मार्ट मीटरला विरोध;नागरिकांची विद्युत कार्यालयावर धडक



**अचलपूर/वार्ताहर**
अचलपूर, चांदूरबाजार या दोन्ही तालुक्यांत जबरदस्तीने घरांत स्मार्ट मिटर लावल्यात जात असल्याने नागरिकांनी याचा विरोध केला आहे. संतप्त नागरिक परतवाडा शहरातील महावितरण विभागाच्या कार्यालयावर धडकले होते. अचलपूर, चांदूरबाजार तालुक्यातील शहर व ग्रामीण भागात महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळातर्फे स्मार्ट मीटर बसविण्याचे काम जोमात सुरू आहे. हा कंत्राट ज्या कंपनीला मिळाला त्या कंपनीचे कर्मचारी ग्राहकाची संमती न घेता जबरदस्ती स्मार्ट टीओडी मीटर बसवित आहे. ज्या शेतकरी, शेतमजूर ज्यांना दोनशे रुपये रोजंदारी आहे, त्या वीज ग्राहकाला तीन ते चार हजार रुपयांचे बिल दिले जात आहे. त्यामुळे आर्थिक दुर्बल घटकातील नागरिक हतबल झाले आहे. अशा तक्रारी प्राप्त झाल्यामुळे महाराष्ट्र धनगर विकास परिषदेचे माधव अवघड, अक्षरा लहाने, बाळासाहेब वानखडे, संदीप पाचखरे यांच्या नेतृत्वात शेकडो नागरिका परतवाडा शहरातील विद्युत कार्यालयावर धडकले होते. यावेळी निवेदन देण्यात आले. आंदोलनात माजी नगरसेवक बाळासाहेब वानखडे, मनोज जामनेकर, विलास रहाटे, अक्षरा लहाने, माधव अवघड, संदीप पाचघरे, आशिष म्हेत्रे, योगेश थोरात, अमित मुंदळकर, अंकुश मोहोळ, रुपेश लहाने, दत्तराज विचे, अभिनय बोरवार, गजानन नांदणे, गणेश जावरकर, सागर भांनगे, रामेश्वर नांदणे, अतुल आमझरे, विठ्ठल पाटील, जयसिंग गाडेराव, आकाश प्रजापती, अमन वर्मा, विलास धोटे, हरीश पुडके, पंकज भोरे, लखन गवई, विनोद झोड, संतोष अडगोकार, निलेश बायवार, निलेश साहु, माया ठाकरे, उर्मिला पाजनकर, पुष्पा ड्युट उपस्थित होते.

## तिवसा तालुक्यातील ४५ ग्रामपंचायतींमध्ये महिलांसाठी सरपंच पद आरक्षित

**अमरावती/का.प्र.**
तिवसा तालुक्यातील एकूण ४५ ग्रामपंचायतींमध्ये आगामी सार्वत्रिक निवडणुकांसाठी 'सरपंच' पद हे महिलांसाठी आरक्षित करण्यात आले आहे.

ग्रामपंचायत अधिनियम आणि शासनाच्या अधिसूचनेनुसार, १३ जून २०२५ पासून पुढील पाच वर्षांच्या कालावधीसाठी ग्रामपंचायतींमध्ये सरपंच पद (महिलांसाठी) आरक्षित ठेवण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. आरक्षण निश्चितीसाठी तिवसा येथील तहसीलदार सभागृहात सोडत काढण्यात येणार आहे. या सोडतीद्वारे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नामाप्र प्रवर्गातील महिला आरक्षणासह सरपंच पदांसाठी जागा जाहीर केल्या जातील.यावेळी सर्व ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच, सदस्य आणि नागरिक यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन तिवसा तहसीलदार डॉ. मंजूर कळसे यांनी केले आहे.

## फुले,शाहू,आंबेडकरांच्या तत्वज्ञानातूनच बहुजन नेतृत्व-देशमुख

**आसेगाव पूर्णा/वार्ताहर**
आज समाजात योग्य नेतृत्वाच्या अभावामुळे सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय क्षेत्रातील ज्वलंत समस्या मोठ्या प्रमाणात वाढलेल्या आहेत. समूह शक्तीचे महत्व लक्षात न घेतल्याने समाज दिशाहिन होत चालला आहे. त्यामुळे सरकारवर उचित दबाव पडत नसल्याने संविधान विरोधी मनमानी कारभाराने लोकशाही धोक्यात आलेली आहे. त्यासाठी शाहू, फुले आंबेडकरांना अभिप्रेत असलेले कार्यकर्ते निर्माण होणे ही काळाची गरज आहे. शाहू, फुले, आंबेडकरांच्या सामाजिक विचारांनीच अनाचाराविरूध्द संघर्ष करणारी युवा नेतृत्वं तयार होऊ शकतात असे प्रतिपादन लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघ या समाजाभिमुख राष्ट्रीय संघटनेचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष संजय एम देशमुख यांनी केले.



राजमाता जिजाऊ बहुउद्देशीय संस्था, पूर्णानगर व लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघ, यांच्या संयुक्त विद्यामाने पोहरा पूर्णा (आसेगाव पूर्णा ) येथे आयोजित संजय सरवटकर यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने आयोजित परिसंवादामध्ये ते बोलत होते. लेडी गव्हर्नर डॉ. कमलताई गवई, ह्या कार्यक्रमाच्या उद्घाटक तर भदन्त बुध्दघोष महाथेरो अध्यक्षस्थानी होते. प्रमुख अतिथी म्हणून लोकस्वातंत्र्य उपाध्यक्ष प्रदीप खाडे, राष्ट्रीय पदाधिकारी पुष्पराज गावंडे, केन्द्रीय सचिव राजेन्द्र देशमुख उपस्थित होते. अमरावती जिल्हाध्यक्ष संजय बि. देशमुख, अख्तर काजी, राहुल वाकपैंजण, ॲड. दीपक सरदार, यांची यावेळी विचारमंचावर प्रमुख उपस्थिती होती. यावेळा अनेकानी यात' फुले, शाहू, आंबेडकर यांना अपेक्षित कार्यकर्ता' या विषयावर आपले मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक संजय सरवटकर, संचालन वाय. एम. रामटेके तर आभारप्रदर्शन भारत वरठे यांनी केले. कार्यक्रमाला लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघ चांदुर बाजार शाखा, धामणगाव रेल्वे, अचलपूर तसेच जिल्ह्यातून अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

## पी.आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालयतर्फे संत्रा उत्पादक शेतकऱ्यांसाठी प्रशिक्षण

**अमरावती/का.प्र.**
सायट्रस इस्टेट चांदूर बाजार तर्फे खरपी येथे संत्रा उत्पादक शेतकऱ्यांकरिता प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये पी.आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालय चे प्राचार्य व सेवानिवृत्त कीटकशास्त्रज्ञ डॉ. अनिल ठाकरे यांनी संत्रा पिकावरील जून- जुलै मध्ये येणाऱ्या संभाव्य कीड,रोग आणि खत व्यवस्थापन तसेच खते, जिवाणू संवर्धने बुरशीनाशकद्वारे व्यवस्थापन कसे करावे याबाबत चर्चेद्वारा संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. शेतक-यांना वर्षभर भेडसावणाऱ्या विविध समस्या जसे- सल काढणे, बोर्डे पेस्ट, आणि उन्हाळी आणि पावसाळी फळगळ व्यवस्थापन याबाबत मार्गदर्शन करून त्यांच्या शंकांचे निरसन केले. सदर प्रशिक्षणाचा ४० पेक्षा जास्त संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी मार्गदर्शनाचा लाभ घेतला.प्रशिक्षणानंतर डॉ. ठाकरे यांनी बोदड, ता.चांदूर बाजार येथील संत्रा उत्पादक नितेश अरूणपंत भोजने याचे संत्रा क्षेत्राला भेट दिली. त्यावेळी सायट्रस सीला या कीडीचा प्रादुर्भाव कमी प्रमाणात आढळून आला परंतु फळे तडकणे आणि कडक होणे अश्या समस्या दिसून आल्या.सायट्रस सिला व मावा या किडीचे व्यवस्थापनासाठी थायमिथोकझाम २५ॅउ ६० ते ८० ग्राम किंवा डायमिथोएट ३० इ.सी.ॅ ४०० मिली किंवा डायफेणथायुरान ५०ॅइ ४००. ग्राम प्रति २०० लिटर पाण्यामध्ये मिसळून आळीपाळीने १० ते १५ दिवसाचे अंतराने भौगोलिक परिस्थिती नुसार योग्य पद्धतीने पूर्ण झाडावर फवारणी करावी तसेच फळे तडकणे आणि कडक झालेल्या फळांचे व्यवस्थापनासाठी उॅं- ३ॅ ३ ग्राम ३ कॅल्शियम नायट्रेट ॅ २ किलो ३ बोरान ३०० ग्राम प्रति २०० लिटर पाणी या प्रमाणे फवारणी करावी असे आवाहन डॉ. अनिल ठाकरे यांनी केले.



संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी एकरी ३० पिवळ्या चिकट सापळ्या चा फेब्रुवारी ते नोव्हेंबर दरम्यान जमिनीपासून १.५ मीटर उंचीवर वापर आवर्जून करावा म्हणजे संत्रा पिकावरील सायट्रस् सिला ,मावा, फुलकीडे , काळी माशी, पांढरी माशी, फळमाशी, पाने पोखरनारी अळी, या सात कीडीचे प्रौढ अवस्थेत चांगले व्यवस्थापन करता येते अशी माहिती शेतकऱ्यांना देण्यात आली.संचालन आणि आभारप्रदर्शन सिट्रस इस्टेटचे प्रभारी प्रविण मोहोड यांनी केले.

## न्यायालयातील प्रलंबित प्रकरणे मार्गी लावण्यासाठी जिल्ह्यात 'मध्यस्थीद्वारे विशेष अभियान' सुरू

**अमरावती/का.प्र.**
जिल्ह्यात न्यायालयीन प्रक्रियेवरील ताण कमी करून प्रलंबित प्रकरणांचा जलद निकाल लागावा, यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व न्यायालयांमध्ये ३० सप्टेंबरपर्यंत ९० दिवसांसाठी 'राष्ट्रासाठी मध्यस्थी' ही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण आणि सर्वोच्च न्यायालयाच्या मध्यस्थी व सलोखा प्रकल्प समितीने संयुक्तपणे आखलेली ही मोहीम, सरन्यायाधीश न्या. भूषण गवई आणि न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या मार्गदर्शनाखाली देशभर राबविली जात आहे. या मोहिमेत वैवाहिक वाद प्रकरणे, अपघात दाव्यांची प्रकरणे, घरगुती हिंसाचाराची प्रकरणे, चेक बाउंस केसेस, व्यावसायिक वाद प्रकरणे, सेवा बाबी, गुन्हेगारी दंडनीय प्रकरणे (फौजदारी तडजोड प्राप्त नसणारी प्रकरणे सोडून), ग्राहक वाद प्रकरणे, कर्ज वसुलीची प्रकरणे, विभाजन प्रकरणे, निष्कासन प्रकरणे, जमीन अधिग्रहण प्रकरणे आणि इतर योग्य दिवाणी प्रकरणे मध्यस्थीद्वारे सोडविली जातील. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष सुधाकर यार्लगड्डा आणि सचिव डी.एस. वमने यांनी सर्व वकील मंडळी आणि पक्षकारांना आवाहन केले आहे प्रकरणे या ९० दिवसांच्या विशेष मोहिमेमध्ये मिटवण्यासाठी संबंधित न्यायालयात अर्ज करावा. तसेच प्रकरणांबाबत अधिक माहितीसाठी नजीकच्या संबंधित जिल्हा किंवा तालुका न्यायालयाशी संपर्क साधावा.

## आकांक्षा प्रकाशनच्या राज्यस्तरीय कथास्पर्धेत प्रा. प्रसेनजीत तेलंग यांची 'कूप' कथा व्दितीय

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**
आकांक्षा प्रकाशनाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय कथास्पर्धा-२०२५चा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला असून, चांदूर रेल्वे (अमरावती) येथील प्रा. प्रसेनजीत तेलंग यांच्या 'कूप'या दीर्घकथेला व्दितीय पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. महाराष्ट्राबरोबरच, राज्यबाहेरून व बाहेर देशातूनही या कथस्पर्धेसाठी कथाकारांनी आपल्या कथा पाठविल्या होत्या. लीलाधर दवंडे यांना प्रथम तर संध्या दानव व सोनाली करमरकर यांना तृतीय पुरस्कार विभागून देण्यात आला आहे.



आकांक्षा प्रकाशन व्दारा आयोजित ही कथा स्पर्धा गत चार वर्षांपासून आयोजित केली जाते. प्रा. प्रसेनजीत तेलंग हे ललित निबंध, वैचारिक लेखन, समीक्षा, काव्य या प्रकारात सतत लेखन करणारे आघाडीचे नाव असून, अनेक नियतकालिकांत, दिवाळी अंकांत त्यांचे लेखन प्रकाशित झाले आहे. ते प्रगतीशील लेखक संघाचे राज्य कार्यवाह म्हणून साहित्य चळवळीत घडाडीचे कार्यकर्ता लेखक म्हणून ओळखल्या जातात. आकांक्षा प्रकाशनाच्या वतीने होणाऱ्या समारंभात हा पुरस्कार सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती, या कथास्पर्धेच्या संयोजक प्रसिद्ध लेखिका व सामाजिक कार्यकर्त्या अरुणा सबाणे यांनी दिली आहे.

# आंबेडकरी साहित्यातूनच संपूर्ण जगाचे कल्याण-डॉ.वामन गवई

**अमरावती/का.प्र.**
आंबेडकरी कवी गायक ग़ज़लकारांनी 'अ' फॉर आंबेडकर,'बी' फॉर बुद्ध अशी नवीन बाराखडी, नवीन स्वर, नवीन व्यंजन, नवे व्याकरण, नवे अलंकार, नवे वृत्त, नवे विचार, नवे विषय तसेच नवनिर्मिती करून आंबेडकरी स्वप्न सत्यात उतरविण्याचा ध्यास घेतला असल्याने आंबेडकरवादी बौद्ध साहित्यातूनच संपूर्ण जगाचे कल्याण होऊ शकते. असे प्रतिपादन आंबेडकरी विचारवंत डॉ. वामन गवई यांनी केले.

ते प्रा. सतेश्वर मोरे स्मृती प्रतिष्ठान, शिल्पकार फाउंडेशन,साप्ताहिक वज्जीसंदेश परिवार आणि गाथा प्रकाशन अमरावतीच्या वतीने आंबेडकरी ग़ज़लकार प्रा संजय घरडे यांच्या 'अल्क़ाब' या गझल संग्रहावर तथा सुरेश वंजारी नागपूर यांचा 'दशा', आणि वाशीमचे कवी महेंद्र ताजने यांचा 'खूप काही आणखी' या कविता संग्रहावर 'संबोधीचे सभागृह येथे आयोजित काव्यचर्चेचे अध्यक्ष म्हणून बोलत होते.

याप्रसंगी मंचावर कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी तथा भाष्यकार म्हणून सुप्रसिद्ध कवी समीक्षक डॉ. गजानन बनसोड, आंबेडकरी ग़ज़लकार प्रा. संजय घरडे, प्रा. सुनीता इंगळे, कवी सुरेश वंजारी , साप्ताहिक वज्जी संदेशच्या संपादक माया वासनिक, कवी महेंद्र ताजने, विलास थोरात, संजय मोखडे, धर्मशील गेडाम आदी मान्यवर उपस्थित होते.प्रा. संजय घरडे यांच्या 'अल्क़ाब'


काव्यचर्चेचे यशस्वी आयोजन

या ग़ज़ल संग्रहावर भाष्य करताना प्रा. डॉ. गजानन बनसोड म्हणाले की, आंबेडकरी ग़ज़ल वामन अर्डकांपासून लिहिल्या जाऊ लागली असून प्रा. संजय घरडे यांची ग़ज़ल ही सर्वार्थाने वेगळी आहे.'अल्क़ाब' हा संग्रह आंबेडकरी ग़ज़लेतील अतिशय महत्त्वाचा संग्रह आहे. या संग्रहामुळे आंबेडकरी ग़ज़ल लिहिणाऱ्या पुढील पिढीला दिशा मिळेल असेही ते म्हणाले.

कवी सुरेश वंजारी यांच्या दशा या कवितासंग्रहावर आपले मत मांडताना सुनीता इंगळे म्हणाल्या की, दशांमधील भाषा साधी, सरळ आणि सोपी असल्याने या कविता सर्वांना समजून येतात. मान्यवरांच्या हस्ते महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या फोटोला हारार्पण व वंदन करून त्रिशरण पंचशील घेण्यात आले. तसेच काव्यचर्चेचे अध्यक्ष डॉ.वामन गवई, समीक्षक प्रा. डॉ. गजानन बनसोड,समीक्षक प्रा.सुनीता इंगळे,समीक्षक माया वासनिक यांसह कवी महेंद्र ताजने, सुरेश वंजारी व प्रा संजय घरडे यांचा शाल, पुस्तकं व पुष्प देऊन सन्मान करण्यात आला.नागपूर निळाईचे प्रा.प्रवीण कांबळे यांचा व प्रा.अस्मिता दारुण्डे हिंगणघाट यांचाही सत्कार करण्यात आला.याप्रसंगी साप्ताहिक वज्जी संदेशचा काव्यचर्चेवर आधारित विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमात ग़ज़लकार संजय घरडे, कवी सुरेश वंजारी, कवी महेंद्र ताजणे यांनी 'मी कविता का लिहितो?'यामागची भूमिका स्पष्ट केली.संचालन विलास थोरात, प्रास्ताविक संजय मोखडे, व आभार धर्मशील गेडाम यांनी मानले.कार्यक्रमाला अ. भा. आंबेडकरी साहित्य संस्कृती व संवर्धन महामंडळाच्या अध्यक्ष प्रा. डॉ.सीमा मेश्राम, संबोधीचे पदाधिकारी प्रा. डॉ.वसंत शेंडे, नारायण थोरात, गणेश थोरात, प्रकाशचंद्र नागदिवे, संडे मिशनचे सुरेंद्र घरडे, कवी समीक्षक दिपाली गवई, ग़ज़लकार सूर्यकांत मुनघाटे, जगदीश राऊत, छत्रपाल तामगाडगे, कवी रसपाल शेंद्रे, पुष्पा बोरकर, प्रामिला शेंडे,रामेकर ,डॉ.नंदकिशोर दामोधरे, देवीलाल रौराळे, सुरेश वंजारी, नगराळे, आदी अनेक मान्यवर, साहित्यिक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राजेश गरुड, आर.एस.तायडे, अस्विनी गडलिंग, क्षितिज, निलेश, दिगंबर झाडे, संगीता उत्तम राऊत, यांनी विषेश परिश्रम घेतले.

## विठ्ठलाला एक विनवणी



विठ्ठला..
पंढरीच्या रस्त्यांवर पावलं टेकणाऱ्या
विठ्ठला,
तुझ्या मूठभर करुणेच्या सावलीखाली
शेकडो जीवांची आस लपलेली आहे.

'विठ्ठल-विठ्ठल' नादात गुंजणाऱ्या तुझ्या
नावाला
आज पुन्हा एकदा हाक देतो.
तू ऐक... तू जाण
कारण आभाळ तुटले आहे
आणि माती तहानलेली आहे.

विठ्ठला...
चांगला पाऊस येऊ दे
शांत, समृद्ध करणारा,
ज्याने धरतीचा पदर ओलीचिंब होईल,
ज्याने वाऱ्याच्या गंधात हिरवळ रुजेल
आणि माणसाच्या डोळ्यांत पुन्हा
आशेचा थेंब चमकेल.

शेतकऱ्यांच्या हातांना पुन्हा
सुरकुत्यांऐवजी
मृदू धरणीचा माळ लाभू दे,
कुदळीचा आवाज
म्हणूनच तर जीवंत वाटतो,
त्यांच्या घामातून
अन्न जन्मतं
त्या अन्नाला नांगराची ओळख
आणि तुझ्या कृपेची साथ मिळू दे.

पण विठ्ठला..
फक्त शेतीच नाही
तर....
माणसंही ओलावा हरवून बसली आहेत.
डोळे सुने झालेत,
हृदयात दारं लावून घेतलीत..
कधीकाळचं 'आपुलकी' नावाचं झाड
सुकून उन्मळून पडलंय कुठंतरी...

विठ्ठला...
माणसांमध्ये माणुसकी रुजव,
धर्माच्या नावावर जळणारे वणवे विझव,
भेदांच्या भिंती पाड..
तू जो 'तुका' होता, जो 'नामा',
त्यांच्या शब्दात 'भाव' होता
तो भाव परत दे,
जेणेकरून माणूस माणसाला
पुन्हा मिठीत घेईल,
डोळ्यांतून हसू वाहील
आणि कुणी 'दु:खी' दिसलाच
तर 'आपलाच' समजेल...

विठ्ठला..
निसर्गही आता थांबू पाहतोय.
कधी वादळ, कधी रणरण,
कधी पाण्याचा महापूर...

निसर्गही 'श्वास घेतो',
त्याला दुखतं,
त्याला भीती वाटते
संकट केवळ माणसांवर नाही,
संकट निसर्गावरही आहे..

म्हणून तुला साकडं ...
माणसाला सद्बुद्धी दे,
तो स्वार्थाच्या झाऱ्यातून बाहेर पडो
आणि निसर्गाची पाठ थोपटू लागो,
जंगलं राखो...
नद्या वाचवो,
जमिनीत हरवलेला माणुसकीचा गंध
पुन्हा शोधो.

बा विठ्ठला...
तू पंढरीचा राजा असला
तरीपण तुझं राज्य
आमच्या हृदयात असावं,
जिथं माणूस आणि निसर्ग
हातात हात घालून
'हे विश्वंची माझे घर' म्हणत
एकत्र नांदतील.

विठ्ठला..
पावसासारखी कृपा कर,
निसर्ग हिरवागार कर
आणि
माणसात माणूस जागा कर..
हीच आर्त, उघड, सच्ची प्रार्थना
आज आषाढी एकादशीला
तुझ्या पायांपाशी ठेवतो आहे..
कारण...
तूच माझ्यासाठी
विश्वात्मक देव आहेस!!

**डॉ प्रमोद गारोडे**
परतवाडा, जि अमरावती
मो. ९४०५४२७९६२

# "जाईन गे माये तया पंढरपुरा"

***आषाढी एकादशी ही विठ्ठलभक्तांसाठी पर्वणी. विठ्ठल 'लोकदेव' आहे. तो सर्वांना स्वीकारणारा आणि सर्वांनी स्वीकारलेला असा आहे. विठ्ठल घराघरामध्ये पोहोचलेला आहे. कारण संतांनी आईच्या रूपात त्याचे स्वरूप आपल्यासमोर मांडले आहे. देव, वडील वा गुरुंना समजून घेण्यास विद्वत्तेची, योग्यतेची गरज असते. मात्र आईजवळ जाण्यासाठी अपार प्रेम एवढीच गोष्ट पुरेशी असते. आज त्याचीच प्रचिती येते.***



भाविकांसाठी आषाढी एकादशीचा दिवस पर्वणीपेक्षा कमी नाही. वारीची मोठी परंपरा असणाऱ्या महाराष्ट्रामध्ये या दिवसाचे मोठे महत्त्व आहे. आपल्याकडे वारीची परंपरा हजार वर्षांपासून दिसते. कारण आपले वडीलदेखील वारीला जात होते आणि त्यांनीच आपल्याला वारीच्या सोहळ्यात समाविष्ट करून विठ्ठलभक्तीच्या परंपरेमध्ये सामावून घेतले, असा उल्लेख ज्ञानेश्वर महाराज आणि निवृत्तीनाथांच्या अभंगांमध्ये आढळतो.

महाराष्ट्राचा प्राप्त इतिहास ज्ञानेश्वरांपासूनच लक्षात घेतला जात असल्याचे मानले, तर लक्षात येते की, वारीची परंपरा खूप जुनी आहे. नामदेवांच्या घरातही वारी आहे आणि तुकोबांच्या घरी तर आहेच आहे. तेव्हा सगळ्या संतांच्या जीवनात वारीचा उत्सव दिसतो. अर्थात तेव्हाची वारी कशी होती, किती मोठी होती याबाबत फारशी माहिती मिळत नाही, पण अनेक लोक आषाढी-कार्तिकीला पंढरीला जात होते हे नक्की. वारीचे आत्ताचे रूप तुकोबांचे चिरंजीव नारायण महाराजांपासून दिसू लागले, असे म्हटले जाते. त्याचे काही ठळक उल्लेख इतिहासात मिळतात. नारायण महाराजांनी तुकोबा आणि ज्ञानेश्वरांच्या पादुका एकत्र घेऊन वारीचा दंडक सुरू ठेवला.

वारी एकाच मार्गाने जात असल्यामुळे बरेच लोक सोहळ्याच्या सेवेपासून वंचित राहत होते. ही अडचण लक्षात घेऊन पुढे दोन मार्ग करण्यात आले आणि ज्ञानदेव आणि तुकोबांच्या पालख्या वेगवेगळ्या मार्गाने पंढरपूरला पोहोचू लागल्या. अधिकाधिक लोकांना सहभागी करून घेणे, हाच यामागचा हेतू होता. आजही महाराष्ट्रातील ४० ते ५० क्षेत्रांमधील दिंड्या एकत्र येतात आणि परंपरेचे पालन करत सोहळा पार पडतो. विठ्ठल हा 'लोकदेव' आहे. तो सर्वांना स्वीकारणारा आणि सर्वांनी स्वीकारलेला असा आहे. विठ्ठल घराघरांमध्ये पोहोचलेला आहे. याचे कारण संतांनी आईच्या रूपात त्याचे स्वरुप आपल्यासमोर मांडले आहे. देव, वडील वा गुरूंना समजून घेण्यास विद्वत्तेची, योग्यतेची गरज असते. मात्र आईजवळ जाण्यासाठी अपार प्रेम एवढीच गोष्ट पुरेशी असते. या नात्याने विठ्ठलाशी बांधले गेल्यामुळे तो अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचला. गाणपत्य म्हणजे फक्त गणपतीची उपासना करणारे चिंतामणी देवदेखील वारीला येऊ लागले आणि शाक्त म्हणजे फक्त देवीची उपासना करणारेही वारीला आले. अशा प्रकारे दत्तभक्त, महानुभावही यात आले. संतांनी वारीमध्ये आल्यास स्वागतच आहे, हा विचार या सगळ्या पंथापर्यंत पोहोचवला आणि त्यांनीही विठ्ठलाच्या वारीला जात असल्याचा अभिमान बाळगला. अशा तऱ्हेने विठ्ठलाची माऊली अर्थात 'विठाई माऊली' झाली.

पूर्वपीठिका अशीच सांगितली जाते की, पुंडलिक नावाचा ऋषी पंढरपुरामध्ये तपश्चर्या करत होता. त्याला भेटण्यासाठी गोपालकृष्ण तिथे आले, पण आम्ही तुझी तपश्चर्या करायची आणि मग तू इथे येऊन दर्शन द्यायचे असे न करता तू कायमस्वरुपी इथे राहा, म्हणजे आम्हाला तुला केव्हाही भेटता येईल, असा आग्रह पुंडलिकाने धरला आणि देवाने त्याचा स्वीकारही केला. या कथेनुसारही पुंडलिकाने देवाला मित्र, सखा केल्याचे दिसते. भाविकांना तो अगदी जवळचा वाटण्यामागे हेदेखील एक कारण म्हणता येईल. अन्य देवतांच्या रूपाबद्दल अशा स्वरुपाची भावना जाणवत नाही. त्यांच्याकडे अजूनही गुरूंच्या रुपातच पाहिले जाते. त्याबद्दल एक प्रकारचा धाक जाणवतो. मात्र इथे सगळेजण विठ्ठलाशी येऊन भांडतात, उराउरी भेटतात, त्याला लेकुरवाळा करतात. आईपाशी असतो तोच मोकळेपणा त्यांना त्याच्या ठायी जाणवतो. वारीचे रूपही असेच देखणे आहे.

ज्ञानेश्वर महाराज सांगतात की, खरे तर मुलाला नटण्यात काहीही रस नसतो, पण तरीही आई त्याला नटवते कारण, तिला आपली मुले तशी बघण्यातच सुख असते. आमची विठाई माऊली तशीच आहे. ती आम्हाला भक्तीप्रेमाने नटवते आणि भेटण्यासाठी, पाहण्यासाठी जवळ बोलावते. वारीच्या सोहळ्याला ज्ञानदेवांनी दिलेले हे रूप किती देखणे आहे पाहा. थोडक्यात, आईचे गोड रूप घेतल्यामुळे हा लोकदेव जनसामान्यांपर्यंत पोहोचलेला दिसतो. वारीत शिस्त आहे, परंपरेचे पालन आहे तसेच अत्यंत साधेपणाही आहे. या निमित्ताने समाज एकत्र येतो. एकमेकांमध्ये मिसळून जातो. खरे तर हा एक संस्कार सोहळा आहे, असेच म्हणता येईल. भाविक सर्व असुविधांचा स्वीकार करून आपल्या भक्तीचे, प्रेमाचे प्रगटीकरण करतात. भगवंताच्या उपासनेत रममाण होतात. तसे बघायला गेले, तर वारीतील उपासना खूप कडक असते. नियम काटेकोरपणे पाळले जातात. ठरावीक वेळी आरती, कीर्तने होतात. उपासनेची ही कठोरता पाळताना प्रत्येक वारकरी सुविधेकडे लक्ष न देता ईश्वरावरील भक्तीला प्रथम स्थान देतो. वारीच्या निमित्ताने याचा संस्कार आणि सराव होतो. वारीबद्दल ज्ञानेश्वरांचा एक वेगळा विचारही लक्षात घेण्याजोगा आहे. 'अवघाचि संसार सुखाचा करीन, आनंदे भरीन तिन्ही लोक' असे ते म्हणतात. इथे आईने म्हणजेच विठ्ठलाने मला सासरी सुखाचा संसार करायला पाठवले आहे, असे ते सांगतात आणि तो किती सुखाचा केला हे सांगण्यास दरवर्षी मी तिच्याकडे जातो, असे स्पष्ट करतात.

*जाईन गे माये तया*
*पंढरपुरा, भेटेन माहेरा आपुलिया...*

म्हणजेच वर्षभरात कोणते चांगले काम केले, कितीजणांना सन्मार्गी लावले, कितीजणांना संस्कारी केले, सजग केले हे सांगण्यास मी पंढरीला जातो.

विठ्ठलाला याबाबत सांगणे ही माझी जबाबदारी आहे, असे ते स्पष्ट करतात. ज्ञानदेवांनी वारीला इतके गोड रूप दिले आहे. ईश्वरभक्तांची मांदियाळी करून दाखवण्याचे विठ्ठलाने दिलेले काम त्यांनी स्वीकारले. एक प्रकारे त्याचा लेखाजोखा मांडण्यासाठी ते दरवर्षी पंढरीत जातात. वारीचा अशा किती तरी सुंदर पद्धतीने आणि वेगवेगळ्या आयामांनी विचार केला आहे, हेच अशा उदाहरणांमधून समोर येते. समाजामध्ये निकोप वातावरण निर्माण करण्यासाठी अशा विचारांचा फार मोठा उपयोग झाला आणि यापुढेही करून घेता येईल.

जातीपातीचा, कर्मकांडाचा विचार न करता विठ्ठलभक्तीसाठी एकत्र येण्याचा संस्कार वारीने आपल्याला दिला आहे. म्हणूनच ही संस्काराची वारी आहे. इथे प्रत्येकजण एकमेकांना 'माऊली' म्हणूनच हाक मारतो. विठाई माऊली आणि ज्ञानेश्वर हीदेखील माऊलीच...असे म्हणताना तुकोबांनी वारीमुळे भाविकांची, वारकऱ्यांची चित्ते लोण्यासारखे मऊ व्हावीत, अशी इच्छा व्यक्त केली आहे. असे झाले तर आपण एवढे कठोर का राहिलो, असे वाटून तिथल्या दगडांनाही पाझर फुटल्याखेरीज राहणार नाही, अशी भावना ते व्यक्त करतात. वारी अशीच आहे. वाळवंटात खेळ रंगताना, सावळ्या रूपाचे दर्शन घेताना, कळसाला नमस्कार करून माघारी फिरताना प्रत्येकाच्या मनात संमिश्र भावनांचा कोळ असतो आणि पुढल्या वर्षी इथेच भेटण्याची आस असते. आजचा दिवसही त्यातील एक.

**चारुदत्त आफळे**

# व्रतांचे सार: एकादशी व्रत

एकादशी हिंदू धर्मात पाळली जाणारी एक पवित्र अशी तिथी आहे.ही तिथी प्रत्येक महिन्याच्या शुक्ल आणि कृष्ण पक्ष या दोन्ही पंधरवाड्यात येते. त्यामुळे वर्षात एकूण चोवीस एकादशी येतात तर हिंदू लीप वर्षात (अधिक मासात) दोन अतिरिक्त एकादशी सुद्धा येतात. प्रत्येक पंधरवाडी एकादशीला विशेष असे महत्त्व आहे. त्याची नावे सुद्धा भिन्नभिन्न आहे. आषाढ मासातील शुक्ल पक्षातील एकादशीला 'देवशयनी आषाढी एकादशी' असे म्हणतात.

प्रत्येक एकादशी तिथी ही भगवान श्रीहरी विष्णूंना समर्पित आहे.या दिवशी भगवान विष्णूची मनोभावे पूजा आणि उपासना केली जाते. एकादशीला उपवास केल्याने मन आणि शारीरिक इंद्रियांवर नियंत्रण मिळते. तसेच आध्यात्मिक प्रगतीच्या दृष्टीने एकादशीच्या व्रताकडे बघितले जाते. पुराणानुसार पूर्वी देव आणि दानव यांच्यात युद्ध पेटले. कुंभ दैत्याचा पुत्र मृदूमान्य यांनी तप करून शंकराला प्रसन्न केले व अमरपद मिळविले.त्यामुळे तो ब्रह्मदेव, शिव, विष्णू या देवावर अजिंक्य झाला. त्याच्या भयाने देव त्रिकूट पर्वतावर आवळी (धात्री) या वृक्षातळी गुहेत दडून बसले. त्यांना आषाढी एकादशीचा उपवास करावा लागला. जोरदार पाऊस झाला, त्या पर्जन्यधारीत त्यांचे स्नान झाले. अकस्मात त्यांच्या श्वासातून एक शक्ती निर्माण झाली. गुहेच्या दारात बसलेल्या मृदुमान्य दानवाला ठार मारले. ही जी शक्तीदेवी तीच 'एकादशी' देवता होय. आषाढ महिन्याच्या शुक्ल पक्षातील एकादशीला 'देवशयनी आषाढी एकादशी' असे म्हणतात. या दिवशी श्री विठ्ठलाच्या रूपाने भगवान श्री विष्णूची पूजा केली जाते. पुढील चार महिने कार्तिकी एकादशी पर्यंत भगवान श्रीहरी विष्णू क्षीरसागरात(विश्वसागरात) शेषनागावर योगनिद्रेला जातात. म्हणून तिला 'देवशयनी एकादशी' असे नाव देण्यात आले आहे.या दिवसापासून चातुर्मासास प्रारंभ होतो. या दिवशी उपवास, पूजा अर्चा केल्याने भगवान श्रीहरी विष्णू प्रसन्न होतात.एकंदरीत देवशयनी आषाढी एकादशी धार्मिक आणि अध्यात्मिकदृष्ट्या महत्त्वाची आहे.

वारकरी संप्रदायात आषाढी एकादशीला विशेष असे महत्त्व असून मोठी एकादशी म्हणून ओळखले जाते. एकादशी व्रत करण्याचे काही नियम



आहेत. एकादशी व्रत करण्याच्या आदल्या दिवशी दशमीला एकभुक्त राहावे. एकादशीच्या दिवशी प्रातः स्नान करावे. तुळशी अर्पण करून श्रीविष्णूची मनोभावे पूजा करावी. उपवास व्रताचे पालन करावे, असे या एकादशी व्रताबद्दल सांगितलेले आहे. आपल्या वारकरी संतांचा श्रीक्षेत्र पंढरपूर येथे भव्यदिव्य असा असा सोहळा असतो. या व्रताचे पालन बहुसंख्येने महाराष्ट्रातील प्रत्येक घरामध्ये मोठ्या श्रद्धेने व भक्ती भावाने केले जाते. शांतीब्रह्म संत एकनाथ महाराजांनी या व्रताबद्दल एक आचारसंहिता अभंगातून साधकांना सांगितलेली आहे. ती पुढील प्रमाणे..

*'दशमी व्रताचा आरंभु।दिंडी कीर्तन करा समारंभु ।।*
*तेणे हा तो स्वयंभू।संतोष पावे ।।*
*एकादशी जागरण ।हरीपूजन नामसंकीर्तन ।।*
*द्वादशी क्षिरापती जाण । वैष्णव जन सेविती ।।*
*ऐसे व्रत तीन दिन।करी जो आदरे प्रेमपूर्ण ।।*
एका जनार्दनी बंधन।तया नाही सर्वथा ।।'

असा असा एका व्रताचा महिमा अनेक संतांनी गायला आहे. पवित्र पावन एकादशी व्रत देवांनी सुद्धा आचरले आहे. म्हणून आपले वारकरी संत सुद्धा इतर साधकांना सुद्धा एकादशी व्रत आचरणाचा आग्रह करतात. संत तुकाराम एका अभंगातून म्हणतात.

*'ज्यासी नावडे एकादशी। जीताची नरकवासी ।।*
*ज्यासी नावडे हे व्रत।त्यासी नरक तोही भीत ।।*
*ज्यासी घडे एकादशी। जाणे लागे विष्णुपाशा।।*
*तुका म्हणे पुण्यराशा। तोचि करी एकादशी ।।'*

आपल्या अनेक वारकरी संतांनी मानव जन्म लाभल्याबद्दल वारंवार श्री विठ्ठलाचे आभार व्यक्त केले आहे. व ती स्वतःला भाग्यवान समजतात की, जन्मोजन्मीचे बहु पुण्य आहे तेव्हा आपल्याला हे व्रत आचरण्याची भाग्य लाभले व पंढरीची वारी घडली. विठ्ठलाची सेवा घडण्याकरिता पुन्हा.. पुन्हा.. मानव जन्म मागतात.

'तरीच जन्मा यावे। दास विठोबाचे व्हावे ।।'

श्री विठ्ठलाचे सख्य असलेले पंढरपूर निवासी संत नामदेव महाराज श्री विठ्ठलाशी हितगुज करताना एका अभंगात म्हणतात.

'आषाढी कार्तिकी विसरुं नका मज।सांगतसे गुज पांडुरंग।।

साक्षात पांडुरंग परमात्मा नामदेवांशी हितगुज करताना म्हणतात. आषाढी कार्तिकीच्या या सोहळ्यात मला विसरू नका. ज्याप्रमाणे भक्तांना विठुरायाच्या भेटीची ओढ असते. तशीच तळमळ आणि ओढ भगवंताला सुद्धा भक्तांच्या भेटीची असते. हे नामदेवरायांच्या अभंगाच्या प्रमाणानुसार सिद्धच होते.

**शशिकांत म. तोटे**
दारव्हा, जि. यवतमाळ
मो:९१३०८३५४५८

## पाऊले चालती पंढरीची वाट

पाऊले चालती पंढरीची वाट,
मुखी विठ्ठल-विठ्ठल गजर सतत.

टाळ-मृदुंगाच्या नाद लहरी,
हरिपाठात रंगली अवघी वारी.

भेदभाव विसरुनी सारे,
संतांच्या वाटेवर चालती लेकरे

उन्हा-पावसात एकच आस,
विठुरायाच्या भेटीचा प्रकाश.

आळंदी देहू येती चंद्रभागा तीरा,
माउलीच्या कृपेचा पाझरतो झरा.

पावल्यांच्या ठशात श्रद्धा भरली,
भक्तिभावात वारी सारी रंगली.

वारी जपते संस्कार नवे,
संतांचे विचार उरात सवे.

पंढरीच्या वारीची पावन गाथा,
तव कृपेने सफल जीवन गाथा

**प्रा. व्ही. व्ही. कोष्टी,**

# पंढरीची वाट भक्तीचा प्रवास



***'माझं पंढरपूर माझ्या मना रे बसलं,***
***माझा विठू माझ्या अंतरी दिसला'***

हे शब्द केवळ अभंग नाहीत, तर एक अनुभूती आहे.अशा अनुभूतीचे नाव म्हणजे वारी!आजच्या धावपळीच्या जगात,जेव्हा सर्व काही डिजिटल आणि आभासी झाले, तेव्हा वारी हा अनुभव अंतःकरणाला भिडणारा असतो.ही आहे एक अशी यात्रा जी डोळ्यांनी पाहायची नसते,ती चालून मनाने अनुभवायची असते.

वारी म्हणजे काय?वारी म्हणजे फक्त एका देवळात जाणे नाही. ती एक चालती फिरती संस्कृती आहे. लाखो लोक, टाळ-मृदुंगांच्या गजरात, अभंगाच्या ओवाळण्यातून, संतांच्या पालख्या घेऊन पंढरपूरच्या दिशेने चालत जातात.वारी म्हणजे एक अनोखा प्रवास, ज्यात भक्ती आहे, समता आहे, आणि माणुसकीचा गंध आहे.

वारीत चालणे म्हणजे स्वतःशी संवाद,समाजाशी संवाद, आणि ईश्वराशीही संवाद. ही वारी म्हणजे एक भक्तीचा फेस्टीव्हल,पण त्यात फटाके नाहीत. असतो टाळांचा गजर.संगीत असते पण त ड़ीजे नव्हे, तर तुकाराम-ज्ञानेश्वरांच्या ओवींचे संगीत.युवकांचा वारीतील सहभाग एक नवीन आशा

आजचा तरुण प्रत्येक गोष्टीकडे 'What's in it for me?' या दृष्टिकोनातून पाहतो.पण वारी अशी गोष्ट आहे, जिथे 'स्वतःसाठी' काहीच नसतं, तरीही मन भरून समाधान मिळते.तरुणाई वारीत सामील होते.कोण सेवेसाठी,कोण अनुभवासाठी, कोण फोटो/ व्हिडीओ साठी,आणि काही जण शांतता शोधण्यासाठी.पण सगळ्यांचे उत्तर शेवटी एकच 'या वारीने आयुष्याच्या अर्थाकडे बघण्याची दृष्टी दिली.'

वारी तरुणांना संयम, सहिष्णुता, समतेचे मोल, आणि माणूस म्हणून जगण्याचे खरे मूल्य शिकवते. वारीतील अनुभव एक 'जीवन शाळा' आहे.वारी म्हणजे केवळ चालणे नाही – ती एक चालती जीवनशाळा आहे.

या शाळेत कोणताही subject नाही, पण शिकवले जाते – माणूस होणं! कोणतीही exam नाही, पण दिला जातो – संयम आणि सेवाभावाचा सराव.कोणताही शिक्षक नाही, पण शिकवतात – संतांची वाणी आणि समाजातील प्रत्येक सहप्रवासी.वारी शिकवते की,'तू काहीही अस – डॉक्टर, इंजिनीयर, स्टुडंट – पण सर्वात आधी तू एक भक्त आणि माणूस आहेस!'वारीत जाताना अनेक युवक स्वतःलाच शोधतात.कोणी वारी संपली तरी ती जिवनभर पुरणारी ठरते.

आज आपण जात, धर्म, भाषा, आर्थिक स्थितीवरून विभागलो गेलो आहोत.पण वारीत सर्व भेद विसरून, सगळे एकत्र चालतात. तिथं ना उच्च ना नीच – तिथे सगळे 'माऊली' आहेत.

वारी हे जिवंत उदाहरण आहे – समता आणि बंधुत्वाचे.

**उपसंहार** – वारी : चालते अध्यात्म,वारी संपते, पण तिचं समाधान संपत नाही.

पंढरपूरात जाऊन परतल्यावरही माणूस तिथंच कुठंतरी ठेवून येतो आपले मन!

वारी हे एक जीवंत उदाहरण आहे.अध्यात्माचे लोकशाहीकरण कसं करता येते याचे.

वारीमध्ये कोणालाही कोडं सोड़वावे लागत नाही, तिथं कोणताही middleman नाही – आहे फक्त एक सच्चा भक्त, आणि एक सोपा देव विठुराय!युवकांनो, चला एक पाऊल टाका पंढरीच्या दिशेने.

वारीतील अनुभव विठुरायाचे भावदर्शन.ज्यांनी वारी अनुभवली आहे,त्यांना हे माहीत आहे की त्या चालण्यात एखादा क्षण असा येतो – जिथं अचानक काळा सावळा विठू समोर उभा ठाकतो.

हा क्षण कोणाला डोळे मिटल्यावर दिसतो, कोणाला मृदंगाच्या गजरात जाणवतो, तर कोणाला अश्रूंमधून वाट काढताना.अनेक वारकऱ्यांचे अनुभव सांगतात की, वारीत चालताना थकवा आला असताना अचानक कुणीतरी पाणी दिले – आणि मनात आलं,'तोच असेल का?'

कुणीतरी पाठीवर हात ठेवून म्हणालं,'माऊली, थोडे विसाव!' – आणि वाटले, 'विठोबाच का असेल?'हे प्रसंग म्हणजे भास नव्हेत, तर श्रद्धेचा साक्षात्कार आहेत.वारीत देव मूर्तीत नाही दिसत तो चालणाऱ्या प्रत्येकात दिसतो.वारी चालताना आलेली विठोबाची अनुभूती हेच त्या भक्तासाठी खरं दर्शन ठरत

- एक वारकरी सांगतो,'मृदुंगाच्या तालात अचानक डोळे मिटले आणि वाटलं – माझ्या समोर तो उभा आहे, काळा सावळा विठू टाळाच्या गजरात मला त्याचे दर्शन झाल!'

हा अनुभव शब्दांत नाही सांगता येत, कारण हे हृदयाच्या श्रद्धेने पाहिलेले दर्शन असते .वारीमध्ये जणू असे वाटते – विठोबा कोणीतरी आपल्याच मागे चालतोय.कधी तो एखाद्या वृद्ध वारकऱ्याच्या रूपात असतो, कधी एखाद्या सेवेमध्ये, आणि कधी एखाद्या गंधाच्या झुळकीतही त्याचं अस्तित्व जाणवतं.हे दर्शन खरं की भास?ह्याचं उत्तर हेच – 'विठोबा दिसतो तो डोळ्यांनी नव्हे, श्रद्धेच्या नेत्रांनी.'

वारी ही चालती तीर्थयात्रा असली, तरी ती मुख्यतः एक भावयात्रा असते. त्या भावयात्रेच्या प्रत्येक टप्प्यावर ङविठुराया भेटतो – कधी शांततेत, कधी अश्रूंमध्ये, कधी टाळ-मृदंगाच्या गजरात!आजच्या तरुणाइ'साठी ही एक अंतःप्रेरणा आहे.भक्ती म्हणजे अंधश्रद्धा नव्हे, तर स्वतःशी संवाद साधण्याचे एक माध्यम.वारीत चालताना मिळालेली ही अदृश्य अनुभूती हेच त्या संपूर्ण यात्रेचं सार असते.

**उपसंहार:**-वारीत विठोबा आपल्याला दिसतो की नाही, यापेक्षा 'तो आपल्यात किती जाणवतो' हे अधिक महत्त्वाचे. ज्याचे मन शुद्ध, श्रद्धेने भरलेले आणि सेवाभावाने ओतप्रोत आहे, त्यालाच हे दर्शन होतं.

*'पाऊल पडते पंढरीच्या वाटे,*
*मन हरपते माऊलीच्या गाठी,*
*दिंडीसोबत चालते भक्तीची वारी,*
*नयनात मावतो विठुराय हरी'*

**डॉ. शितल अ.काळे**
विनायक विद्या मंदिर
अमरावती

# डांबरीकरण रस्त्याचे रूपांतर तलावात; अपघातात वाढ

## शिवसंग्रामने केली सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तक्रार

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील दिग्रस तुलंगा ते लावखेड, सुकळी फाटा ते चान्नी, सायवणी ते चान्नी, मळसूर ते पहाडसिंगी या मार्गांवर असलेल्या डांबरीकरण रस्त्यांची अत्यंत दयनिय अवस्था झाली असून, मोठमोठे खड्डे पडल्याने या मार्गावरून प्रवास करणे अत्यंत धोकादायक बनले आहे. विशेषतः पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर रस्ते जलमय होऊन ते 'तलावांचे' रूप धारण करत आहेत.

या मार्गावर झालेल्या अपघातांमध्ये अनेक नागरिक जखमी झाले असून, दररोज अपघाताचे प्रमाण वाढत चालले आहे. या पार्श्वभूमीवर शिवसंग्रामचे जिल्हाध्यक्ष दिलीप परनाटे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केली होती. मात्र, तक्रार देऊन एक महिना उलटूनही अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही.



दिलीप परनाटे यांनी आपल्या तक्रारीत स्पष्ट इशारा दिला आहे की, जर त्वरित रस्त्यांवरील खड्ड्यांची डागडुजी करण्यात आली नाही, तर शिवसंग्रामतर्फे रस्ता रोको आंदोलन छेडण्यात येईल.

**प्रशासनाचा ढसाळ कारभार – वाहनधारक वैतागले!**

गेल्या अनेक महिन्यांपासून पातूर तालुक्यातील रस्त्यांची चाळणी झाली आहे. ठिकठिकाणी खड्डे पडल्यामुळे वाहनचालकांना प्रवास करताना अडथळ्यांना सामोरे जावे लागत आहे. पावसात या खड्ड्यांमध्ये पाणी साचल्याने खड्ड्यांची खोली कळत नाही आणि वाहन उलटण्याचे प्रकार घडत आहेत. नागरिकांनी याला 'प्रशासनाचा ढसाळ कारभार' असे म्हटले असून, रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी केली जात आहे.

> 'पातूर तालुक्यातील अनेक रस्त्यांची अत्यंत वाईट अवस्था झाली आहे. पावसामुळे खड्ड्यांमध्ये पाणी साचून अपघातांचे प्रमाण वाढले आहे. आम्ही सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तक्रार दिली आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी त्वरित दखल घ्यावी.'
> **- दिलीप परनाटे,**
> जिल्हाध्यक्ष, शिवसंग्राम

# अकोल्यात वारकऱ्यांचा सन्मान व आशीर्वाद स्वीकारण्याचा कार्यक्रम संपन्न

## वारकरी समाज हा श्रद्धा व भक्तीचा प्रतीक : आ. सावरकर

■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोल्यातून पंढरपूरकडे प्रस्थान ठेवणाऱ्या वारकऱ्यांचा भव्य सत्कार आणि सन्मानाचा कार्यक्रम अकोला रेल्वे स्थानकावर संपन्न झाला. या कार्यक्रमात भाजप नेत्यांनी वारकऱ्यांना फराळ व जलपान देत त्यांचा सन्मान केला. सनातन धर्माच्या परंपरा व संस्कृतीचे जतन करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन आमदार रणधीर सावरकर यांनी यावेळी केले.

४८७ वारकऱ्यांना पंढरपूरला नेण्यासाठी विशेष रेल्वे गाडीची व्यवस्था करण्यात आली होती. या विशेष गाडीत बसणाऱ्या सर्व वारकऱ्यांना जलपान व फराळ देऊन गौरविण्यात आले. या वेळी भाजपा नेते व कार्यकर्त्यांनी वारकऱ्यांचा सन्मान करीत त्यांचा आशीर्वाद घेतला. कार्यक्रमात आमदार रणधीर सावरकर म्हणाले, 'सनातन धर्मावर खोटं प्रेम करण्याचं नाटक करणाऱ्यांपासून सावध राहा. वारकरी समाज हा श्रद्धा व भक्तीचा प्रतीक आहे. तो समाजाला दिशा देणारा आहे.'



यावेळी खासदार अनुप धोत्रे म्हणाले, 'पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रयत्नातून वारकऱ्यांसाठी विशेष रेल्वे गाड्यांची सुविधा सुरू करण्यात आली आहे. वारकऱ्यांचा सन्मान करणे हे आपले कर्तव्य आहे.' कार्यक्रमाचे संचालन गिरीश जोशी यांनी केले. प्रास्ताविक पवन महल्ले यांनी केले तर आभारप्रदर्शन नितीन राऊत यांनी केले.

या कार्यक्रमात विजय अग्रवाल, वसंत खंडेलवाल, संतोष शिवरकर, जयंत मसने, किशोर पाटील, वसंत बाचूका, उमेश मालू, पवन महल्ले, चंदाताई शर्मा, नितीन राऊत, माधव मानकर, गिरीश जोशी, कृष्णा शर्मा, ॲड. देवाशिष काकड, संजय गोटफोडे, दिलीप नायसे, गोपाल मुळे, नितीन पाळी, संदीप गावंडे, तुषार भिरड, अमोल गीते, किशोर कुचके, संजय कोरडे, गणेश लोड, प्रवीण हगवणे आदी उपस्थित होते.

भाजपच्यावतीने गाडीला फुगे लावून सजावट करण्यात आली होती. आकर्षक रांगोळी काढण्यात आली होती व बँड पथकाच्या गजरात वारकऱ्यांचे स्वागत करण्यात आले. 'जय श्रीराम', 'वरद विठ्ठल', 'तुकाराम महाराज की जय', 'ज्ञानेश्वर महाराज की जय' अशा जयघोषाने संपूर्ण रेल्वे स्थानक दुमदुमले होते.

या वेळी आमदार रणधीर सावरकर म्हणाले, 'भक्त गरीब असो वा श्रीमंत, श्रद्धा आणि भक्तीमुळेच भगवानाचे दर्शन होते. पैसा नव्हे, तर विश्वास आणि भक्ती हेच खरे साधन आहे.' या कार्यक्रमात अकोला, अमरावती, बुलढाणा, वाशिम, हिंगोली येथील वारकरी सहभागी झाले होते. ४८७ वारकऱ्यांना फराळ व जलपान देत सन्मानित करण्यात आले. यानंतर विठ्ठलाची महाआरती पार पडली.

**Change In Name**

I have change my name
From
**Mudassir Ahmad Rahi**
- To -
**Mudassir Ahmad Rahi Gulam Ahmad Rahi**
AddressSofi chauk ward no.5 Wadegaon, Akola Maharashtra 444502
Passport No :- M2517053

**Change In Name**

I have change my name
From
**Naved Rabbani Sayyed Burhanuddin**
- To -
**Naved Rabbani Burhanoddin**
Address Burhanoddin Shaher Javli Bes, Balapur Akola Maharastra, 444001
Passport No :- M9737270

# 'कावळा करतो काव काव, म्हणतो माणसा झाडं लाव'

## विद्यार्थ्यांनी दिला वृक्षसंवर्धनाचा संदेश!

■ प्रतिनिधी | अकोला ■

सावित्रीबाई फुले विद्यालय, कृषी नगर यांच्या वतीने वनराई चळवळीच्या वर्धापन दिनानिमित्त वृक्षसंवर्धन रॅलीचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी 'झाडे लावा – झाडे जगवा', 'पेड अन्न का दाता है, फिर क्यों काटा जाता है?' अशा घोषणांनी परिसरात पर्यावरण संवर्धनाचा जागर केला.

या उपक्रमाचे औचित्य साधून श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष महादेवराव भुईभार यांच्या हस्ते रॅलीला हिरवा झेंडा दाखवण्यात आला. त्यांनी 'पर्यावरण वाचवा, नाहीतर विनाश अटळ आहे' असा महत्त्वपूर्ण संदेश दिला. कार्यक्रमाला अकोला वनराईचे समन्वयक बबनराव कानकिरड, मुख्याध्यापिका सौ. मंदाकिनी तळोकार, शिक्षिका सौ. संगीता निचळ यांची उपस्थिती



लाभली. मुख्याध्यापिका सौ. तळोकार यांनी विद्यार्थ्यांना वनराईची प्रतिज्ञा दिली आणि पर्यावरण संवर्धनासाठी कटिबद्ध राहण्याचे आवाहन केले.

यावेळी विद्यार्थ्यांनी पालक व नागरिकांना कडुलिंब, आंबा, जांभूळ, बदाम, करवंद, वड, पिंपळ यांची रोपे भेट देऊन झाडांचे संगोपन करण्याचे आवाहन केले. जवाहर नगर, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आश्रम, गोकुळ कॉलनी, मदर तेरेसा कॉन्व्हेंट, पोस्ट ऑफिस, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कृषी नगर परिसरात प्रभातफेरीद्वारे वृक्षसंवर्धन जनजागृती करण्यात आली. पद्मविभूषण डॉ. मोहन धारिया यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त देशी, औषधी व बहुगुणी वृक्षांची लागवड करून वनराई चळवळीत सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे सुंदर संचालन ज्योती इंगळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन नेहा रंधे यांनी मानले. यावेळी नशाबंदी मंडळाच्या व्यसनमुक्ती फलकांनीही नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. शाळेतील विद्यार्थी, शिक्षक, पालक, वनराई कार्यकर्ते, नशाबंदी मंडळ व सर्वोदय मंडळाचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिष्यवृत्ती योजनेबाबत सोमवारी प्राचार्यांची कार्यशाळा

**अकोला :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शिष्यवृत्ती योजनांच्या कार्यवाहीबाबत मार्गदर्शनासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्यांची कार्यशाळा डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्यायभवनात दि. ७ जुलै रोजी होणार आहे. अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी महाडीबीटी प्रणालीवर भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, मॅट्रिकोत्तर शिक्षण फी परिक्षा फी प्रदाने, राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृती, व्यावसायिक पाठ्यक्रमांशी संलग्न असलेल्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांना विद्यावेतन व व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूती योजना राबविण्यात येत आहे. महाडीबीटी पोर्टलवरील अवलोकन केले असता २०२४-२५ या वर्षात अनुसूचित जाती प्रवर्गाचे १५ हजार २२८ अर्ज आतापर्यंत भरण्यात आले आहेत.

**जाहीर नोटीस**

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १०९३/२०२४ — प्रोसेस नं.१०२३१/२०२५
चौ.ता. ११/०८/२०२५ — दिनांक : ०२/०७/२०२५

**अर्जदार :** १. सुरेंद्र सुधाकर मिरगे २. नरेंद्र सुधाकर मिरगे दोघेही रा. यावलखेड, ता. जि. अकोला. ३. हर्षा मारोती पावसाळे रा. ताथोड नगर, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. सुधाकर उकर्डा मिरगे २. रूखनिबाई सुधाकर मिरगे.
**पत्ता :-** रा. व्दारा सुरेंद्र सुधाकर मिरगे रा. यावलखेड, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई मनमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सुधाकर उकर्डा मिरगे यांचे दि.१२/०१/२०२५ रोजी यावलखेड, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे. मयत रूखनिबाई सुधाकर मिरगे यांचे दि.२४/०२/२०२२ रोजी यावलखेड, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ११/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०२/०७/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

**वि. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), बार्शिटाकळी, जि. अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १५३/२०२५ — प्रोसेस नं.४१२/२०२५
चौ.ता. ०४/०८/२०२५ — दिनांक : ३०/०६/२०२५

**अर्जदार :** १) उल्हास रामहरी ठाकरे २) मंगेश रामहरी ठाकरे दोघेही रा. निहिदा, बार्शिटाकळी, ता. बार्शिटाकळी, जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निरंक
**मयताचा पत्ता :-** मयत : रामहरी अमृता ठाकरे
**पत्ता :-** रा. निहिदा, बार्शिटाकळी, ता. बार्शिटाकळी, जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत रामहरी अमृता ठाकरे यांचे दि.०६/०३/२०२५ रोजी निहिदा, ता. बार्शिटाकळी, जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०४/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ३०/०६/ २०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
सहा अधिक्षक
दिवाणी न्यायालय (क .स्तर), बार्शिटाकळी जि. अकोला

**जाहीर नोटीस**

**वि.सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ६३८/२०२४ — प्रोसेस नं.१०२००/२०२५
चौ.ता. २१/०७/२०२५ — दिनांक : ०१/०७/२०२५

**अर्जदार :** गौतम अनिल इंगळे रा. नागसेन नगर, शिवणी, अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** १. अनिल उत्तम इंगळे रा. नागसेन नगर, शिवणी, अकोला. २. भावना रोशन घाटेकर रा. कटारगाव ता संग्रामपूर जि. बुलढाणा
**मयताचा पत्ता :-** मयत : रत्ना अनिल इंगळे
**पत्ता :-** रा. नागसेन नगर, शिवणी, अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत क. रत्ना अनिल इंगळे यांचे दि.२८/०९/२०२२ रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपूर येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २१/०७/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०१/०७/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

# जनावरे चोरणाऱ्या चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

## चान्नी पोलिसांची कारवाई; आरोपी अद्याप फरार

■ प्रतिनिधी | खेट्री ■

चान्नी पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या पिंपळखुटा येथे जनावरे चोरीची घटना घडली आहे. या प्रकरणी चान्नी पोलिसांनी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून आरोपी अद्याप फरार आहेत.

श्रीराम गोरक्षण संस्था, पिंपळखुटा येथून गोरेराखी दररोज गायरानमध्ये जनावरे चारण्यासाठी नेत असतात. १ जुलै रोजीही नेहमीप्रमाणे सुमारे ६० जनावरे चारण्यासाठी नेण्यात आली होती. मात्र संध्याकाळी परत आणल्यानंतर मोजणी केली असता, त्यामध्ये एक गाय आणि एक वासरी कमी असल्याचे निदर्शनास आले.

यानंतर ३ जुलै रोजी अकोल्यातील गोरक्षक दलाच्या ग्रुपवर बोरगाव मंजू पोलिसांनी जनावरे पकडल्याची माहिती पोस्ट स्वरूपात आली. त्या आधारे श्रीराम गोरक्षण संस्थेचे अध्यक्ष समीर अरविंद देशमुख यांनी बोरगाव मंजू पोलीस स्टेशन गाठले. चौकशीअंती ही जनावरे म्हैसपूर येथील आदर्श गोरक्षणामध्ये जमा करण्यात आल्याचे स्पष्ट झाले. तेथे तपासणी केल्यावर हरवलेली गाय व वासरी मिळून आली.

या प्रकरणी बोरगाव मंजू पोलिसांनी चार आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला होता. त्यातील गुड्डू उर्फ सय्यद फैजान, अब्दुल मुजाहिद अब्दुल फिरोज, सज्जू कुरेशी व शहजाद कुरेशी (सर्व रा. बोरगाव मंजू, ता. अकोला) यांच्याविरुद्ध पिंपळखुटा येथील श्रीराम गोरक्षण संस्थेचे अध्यक्ष समीर देशमुख यांच्या फिर्यादीवरून ४ जुलै रोजी चान्नी पोलिसांनी विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

सध्या या चारही आरोपींचा पोलीस शोध घेत असून, ते अद्याप फरार आहेत. या प्रकरणामुळे परिसरात जनावरांच्या सुरक्षेबाबत चिंता व्यक्त होत आहे.

# आंतरराष्ट्रीय सहकार दिनानिमित्त लरातो वाणिज्य महाविद्यालयात भव्य खुली निबंध स्पर्धा

■ प्रतिनिधी | अकोला ■

श्रीमती ल. रा. तो. वाणिज्य महाविद्यालय, अकोला येथे आंतरराष्ट्रीय सहकार दिनाच्या निमित्ताने भव्य खुल्या निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. सहकार मंत्रालय, केंद्र शासन, नवी दिल्ली यांच्या संकल्पनेतून व जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था अकोला, श्रीमती लरातो वाणिज्य महाविद्यालय कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या. अकोला आणि जय मल्हार ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम पार पडला.

स्पर्धा ही सर्व वयोगटातील व सर्व स्तरातील नागरिकांसाठी



खुली ठेवण्यात आली होती. शब्दमर्यादा नसल्यामुळे जिल्हाभरातून या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. 'सहकार : २१व्या शतकातील विकासाचा मंत्र', 'सहकार : एक सामाजिक चळवळ', तसेच 'सहकार : एक भविष्यवेधी संकल्पना' या विषयांवर निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या उपक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा उपनिबंधक डॉ. प्रवीण लोखंडे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. जी. जी. गोंडाणे होते. यावेळी प्रशासन अधिकारी अभयकुमार कटके, कर्मचारी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष डॉ. जे. आर. माहेश्वरी (हेडा), उपाध्यक्ष डॉ. व्ही. एस. सुखदेवे, मानद सचिव प्रा. अतुल पिलात्रे, जय मल्हार पतसंस्थेचे अध्यक्ष श्रीराम गावंडे, व्यवस्थापकीय संचालक भास्करराव पिलात्रे यांची विशेष उपस्थिती होती.

तसेच तालुका उपनिबंधक सौ. विटणकर, अंकेक्षण अधिकारी श्री. सहारे, श्री. मनवर, पर्यवेक्षिका डॉ. के. एस. बोके, पतसंस्थेचे संचालक व विविध मान्यवरांनीही आपली उपस्थिती दर्शवली. या भव्य उपक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद, कर्मचारीवर्ग, सहकारी संस्थांचे पदाधिकारी, अधिकारी, स्पर्धक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. उपक्रमाचे संयोजन व नियोजन उत्कृष्टपणे पार पडले असून सहकार क्षेत्राच्या प्रचार-प्रसाराला नवे आयाम देणारा हा उपक्रम ठरला.

# 'प्रभातच्या वारक–यांची वारी सुखी होण्या शेतकरी'

## ४०० वारकऱ्यांच्या रिंगण सोहळ्याने आणली रंगत

■ प्रतिनिधी | अकोला ■

आषाढी एकादशीनिमित्त प्रभात किड्स स्कूलमध्ये मराठी विभागाच्या वतीने दरवर्षी आषाढी एकादशी सोहळा मोठ्या भक्ती भावाने साजरा केला जातो. विद्यार्थ्यांना महाराष्ट्राची भक्ती, शक्ती आणि संस्कृती याची जाणीव व्हावी या उद्देशाने यावर्षी देखील प्रभातच्या मराठी विभागाद्वारे 'प्रभातच्या वारकऱ्यांची वारी 'सुखी होण्या शेतकरी' या थिमला अनुसरून आषाढी एकादशी सोहळा दिनांक ५ जुलै रोजी मोठ्या उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमात शेती व शेतकऱ्यांच्या जीवनावर आधारित 'जगाचा पोशिंदा बळीराजा' हे सादरीकरण देऊन विद्यार्थ्यांनी संपूर्ण कार्यक्रम शेतकऱ्यांना समर्पित केला. कार्तिकी सोनोने या इयत्ता दुसरीच्या चिमुकलीने 'ताटी उघडा ज्ञानेश्वरा' ही नाट्यछटा सादर करून प्रेक्षकांच्या मनाचा ठाव घेतला. संगीत विभागाच्या विद्यार्थ्यांनी 'बघा उघडोनी दार' हे भक्तीगीत प्रस्तुत केले तर नृत्य विभागाच्या विद्यार्थ्यांच्या नृत्याने प्रेक्षकांची मने जिंकली. टाळ मृदुंगाच्या



गजरात पावली खेळत, फुगडीवर फेर धरत पालखी मंचावर आली. प्रभातचे संचालक डॉ. गजानन नारे, संचालिका सौ. वंदना नारे, ?ड. वल्लभ नारे यांच्या हस्ते पूजा व आरती झाली. त्यावेळी प्रभातचे सभागृह भक्तीमय झाले होते. यावेळी कार्यक्रमाला प्रभातचे सचिव नीरज आवंडेकर, प्राचार्य वृषाली वाघमारे, उप-प्राचार्य अर्चना बेलसरे, व्यवस्थापक अभिजीत जोशी, समन्वयक आसिफ जारीयावाला, सीबीएससी समन्वयक प्रशांत होळकर, स्पर्धा परीक्षा प्रमुख व्ही. अनुराधा आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मराठी विभागप्रमुख चंद्रकांत पोरे, विभाग उप-प्रमुख अनुराधा माहोरे, स्वाती ठाकरे, आनंद जोशी, सीमा साठे, रोहित हिवरकर, अविनाश तराळे, गुरुदास होले, वर्षा दांडगे, कविता कोल्हाळे, कविता विखे, दिपाली पोरे, मुक्ता धुमाळे, स्नेहल कडू, वृषाली खारोडे व कोमल झोड तसेच सांस्कृतिक विभाग, संगीत विभाग, नृत्य विभाग, आर्ट अँड क्राफ्ट विभाग यांचे विशेष योगदान लाभले.

**रिंगण ठरले आकर्षण**

प्रभात किड्स स्कूलच्या सभागृहात संपन्न झालेल्या 'आषाढी वारी' कार्यक्रमात 'भक्तीचा मळा' नाट्य, गजर कीर्तनाचाबहारदार नृत्य 'हरी ओम विठ्ठला' नृत्य, अभंग यासह विद्यार्थ्यांनी साकारलेले 'रिंगण' यामुळे टाळांचा किनकिनाटाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. 'विद्यार्थी झाले वारकरी प्रभात मध्ये अवतरली पंढरी' याची अनुभूती विद्यार्थ्यांनी घेतली.

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - २९ अंक २२१**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# भाजप आमदारांनी विधानभवनात मांडल्या बळीराजाच्या व्यथा

## एचटीबीटी बियाणाला परवानगी सह उत्पादन खर्चानुसार भाव देण्याची मागणी

**समुद्रपूर/ जनमाध्यम**

हिंगणघाट समुद्रपूर विधानसभा मतदारसंघाचे आ. समिर कुणावार यांनी महाराष्ट्रातील उच्च सभागृह असलेल्या मुंबई येथील विधानभवनात ४ जुलै रोजी शेतकरी आत्महत्या या भारतासह महाराष्ट्रासाठी कंलक असल्याची चिंता व्यक्त करीत बळीराजाच्या व्यथा ठामपणे मांडून संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष वेधले.

बळीराजाला या संकटातून बाहेर काढण्यासाठी आमदार समीर कुणावार यांनी शेतकऱ्यांना सुखी समृद्ध करण्यासाठी शेतकरी हिताचे अनेक चांगले प्रस्ताव सरकार समोर प्रभावीपणे माडून शेतकऱ्याचा मुलगा असल्याचे संपूर्ण महाराष्ट्राला दाखवून दिले. यावेळी तत्कालीन महाविकास आघाडी सरकारच्या विरोधात शेतकऱ्याची कृषी पंपांचे वीजकनेक्शन थकीत बिलासाठी कापले.होते आणि आपण ८ दिवस यासाठी आंदोलन केले हे विरोधकांना समजावून सांगितले.

यावेळी त्यांनी स्वातंत्र्यापासून कॉंग्रेस सरकारच्या शेतकरी विरोध धोरणाचा खरपूस समाचार घेतला आमदार कुणावार यांनी प्रामुख्याने शेतकऱ्यांना नवीन तंत्रज्ञान तयार करण्यात आलेली कपाशीच्या एचटिबीटी बियाण्याच्या



लागवडीसाठी परवानगी द्या हा मुद्दा मांडून दोन दिवसांपासून सभागृहात सुरू असलेल्या बोगस बियाण्याच्या चर्चेला पुर्ण विराम दिला.

बोगस कपाशीच्या बियाण्यावर आमदार कुणावार म्हणाले की कपाशीच्या बिटी २ बियाण्यावर बोंड अळी येत असल्याने शेतकऱ्यांना परवडत नाही.याला पर्याय म्हणून शेतकरी नवीन तंत्रज्ञानाने तयार झाले एचटिबीटी बियाणे गुजरात,आंध्र प्रदेश ,तेलंगणा, या राज्यातून येणाऱ्या एचटिबीटी बियाण्याची चोरून लपवून लागवड करीत आहे.त्यावर ग्लायफोसेट नावचे तनणाशकाची फवारणी करून मोठ्या प्रमाणात निंदनाचा खर्च वाचवित आहे. मात्र शेतकऱ्यांना चांगले बियाणे मिळत नसल्याने त्यांची फसवणूक होत आहे.तरी शेतकऱ्यांचे आर्थिक हित लक्षात घेऊन नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यासाठी शेतकऱ्यांना कपाशीच्या एचटिबीटी बियानाला परवानगी द्यावी तसेच शेतकऱ्यांचा आर्थिक फायदा घेण्यासाठी उत्पादन खर्चा नुसार शेतकऱ्यांना भाव देऊन बाजार पेठ उपलब्ध करून द्यावी शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी विशेष निधी उपलब्ध करून पांदनरस्ते उपलब्ध द्यावे, प्रत्येक कोरडवाहू शेतकऱ्यांना विहीरी, शेततळे उपलब्ध करून मुबलक सिंचन व्यवस्था करावी आदी शेतकरी हिताच्या मागण्या आमदार कुणावार यांनी सभागृहात मांडून सत्ताधारी व विरोधकांना शेतकऱ्याच्या व्यथांची जाणीव करून दिली. सदर मागणी सभागृहात प्रभावी पणे मांडल्याने सर्वत्र त्याचे कौतुक होत आहे.

## संक्षिप्त

### सार्वजनिक ठिकाणी दहशत पसविणारा पोलिसांच्या ताब्यात

**वर्धा-** धारदार लोखंडी चाकू घेऊन लोकांना शिवीगाळ करीत दहशत परविणाऱ्यास शहर पोलीसांनी ताब्यात घेतले आहे. ही घटना सिध्दार्थनगर बोरगाव मेघे परिसरात घडली.पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार शोहेब खान उर्फ टच मुखत्यार खान पठाण (वय २७) रा. सिध्दार्थनगर बोरगाव मेघे हा सार्वजनिक ठिकाणी लोखंडी चाकू घेवून लोकांना शिवीगाळ करुन दहशत पसरवित असताना पोलीसांना मिळून आला. पोलीसांनी त्याच्या ताब्यातून चाकू जप्त करून गुन्हा दाखल केला. पुढील तपास शहर पोलीस करीत आहे.

### पिकाचे नुकसान करण्यास हटकल्याने मारहाण

**सेलू-** शेतातील तुरी व सोयाबीन पिकाचे नुकसान का करत आहे, अशी विचारणा केली असता एकास पट्ट्याने मारहाण करुन जखमी करण्यात आले. ही घटना कोल्ही शेत शिवारातील राजस्थान धाब्यासमोर घडली.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जितेंद्र काळबांडे शेतात गेले होते. यादम्यान देविदास सुनिल काळबांडे हा शेतात जावून तुरी व सोयाबीन पिकाचे नुकसान करत होता. त्यावर जितेंद्र याने याबाबत हटकले असता देविदास याने हे माझे शेत आहे मी काहीही करीन असे म्हणून वाद केला आणि शिवीगाळ करीत पट्टयाने मारहाण केली. याप्रकरणी तक्रारीवरून सेलू पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सेलू पोलीस करीत आहे.

### जागेच्या कारणातून वाद, गुन्हा दाखल

**पुलगाव** -जागेच्या कारणातून वाद करत इसमास मारहाण केल्याची घटना वायफड येथे घडली. याप्रकरणी पुलगाव पोलिसांनी गुन्हा दाखल केला. वायफड येथील सलीम खाँ हिदायत खाँ पठाण यांचे घराचे बांधकाम सुरू होते. दरम्यान, अर्षद सलाफत खाँ पठाण, असलम सलाफत खाँ पठाण यांनी जागेवरून वाद करत मारहाण केली. याप्रकरणी तक्रारीवरून पुलगाव पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

### इसमावर चाकूने वार

**पुलगाव**-इसमावर चाकूने वार केल्याची घटना पुलगाव येथे घडली. पुलगाव येथील शिशूपाल उत्तम चवरे हे ऑटो घेऊन जात होते. दरम्यान, अलकेश शंकरराव फुलझेले याने ऑटो थांबवत चाकूने वार केले. त्यात शिशूपाल चवरे जखमी झाले. याप्करणी पुलगाव पोलिसांनी गुन्हा दाखल केला. पोलिसांचा पुढील तपास सुरू आहे.

### आजाराने इसमाचा मृत्यू

**वर्धा-**आजाराने इसमाचा मृत्यू झाला. याप्रकरणी समुद्रपूर पोलिसांनी नोंद केली. हेमंत कवडूजी पोटे (वय ४३) रा. समुद्रपूर असे मृताचे नावआहे. काविळ आजारामुळे हेमंत यांची प्रकृती बिघडली. त्यांना उपचारार्थ रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी तपासणी करून त्यांचा मृत्यू झाल्याचे सांगितले. याप्रकरणी समुद्रपूर पोलिसांनी नोंद केली.

### दुचाकीच्या अपघातात एकाचा मृत्यू

**वर्धा-**भरधाव दुचाकी स्लीप होऊन रस्त्यावर पडल्याने जखमी झालेल्या एकाचा उपचारादरम्यान सावंगी रुग्णालयात मृत्यू झाला. शौकत रहीम शेख (६३) रा. मिरणनाथ ले-आऊट, देवळी असे मृतकाचे नाव आहे. जलदगती महामार्गाने दुचाकीने जात असताना हिंदी विश्व विद्यालयासमोर अपघात होऊन दुचाकी स्लीप झाली. यात शौकत शेख हे रस्त्यावर पडल्याने त्यांच्या डोक्याला मार लागून जखमी झाले होते. त्यांना सावंगी रुग्णालयात उपचारार्थ दाखल केले असता त्यांचा मृत्यू झाला. घटनास्थळ सावंगी पोलीस ठाण्यांतर्गत येत अस ल्याने पोलिसांनी मृत्यूची नोंद केली. पुढील तपास सुरू आहे.

# कचरा व मलनिस्सारण योजनेला मसाळा ग्रामवासियांचा तीव्र विरोध



**वर्धा/जनमाध्यम**

नगरपरिषद क्षेत्रातील उर्वरित कचरा व मलनिस्सारण योजनेसाठी प्रस्तावित मसळा येथील सम्यक बुद्ध विहार सांस्कृतिक भवन प्रबुद्ध नगरला लागून असलेल्या वनविभागाच्या जागेत मलनिस्सारण कचरा व्यवस्थापन प्रकल्प प्रस्तावित आहे. या प्रकल्पामुळे परिसरात दुर्गंधी कीटकांचा उपद्रव व आरोग्याचा प्रश्न निर्माण होणार आहे. मल्लनिस्सारण व कचरा व्यवस्थापन प्रकल्पाच्या विरोधात ग्राम वासियांच्या वतीने ग्रामपंचायत अधिकारी सुधाकर आसूटकर यांना निवेदन देण्यात आले.

निवेदन देताना स्वीटी रामटेके, रवी निखाते, संघरत्न रामटेके, अमोल कांबळे, रत्नाकर पाटील, प्रकाश कांबळे, सतीश बिरे, प्रवीण खंडे, प्रमोद म्हैसकर, सुनील ढाले मदन भगत, वंदना पाटील, लीला खोब्रागडे, कान्होपात्रा वैद्य, शोभा रामटेके, हरीका ढाले, निखिल नन्नवरे , अविनाश इखार, वैभव ढाले, रमा तेलगोटे, रमा दारुंडे, उज्वला वाघमारे, छाया कांबळे, नमु भानसे, अनिता राऊत, स्नेहा थोरात, विमल मून, प्रवीण नंदागवळी, अनुप थोरात, स्नेहलता कांबळे, छाया गजभिये, रेखा खडककर इत्यादी उपस्थित होते.

# आषाढी एकादशीला मिळाली राष्ट्रसंतांना युग ग्रंथ ग्रामगीता लिखाणाची स्फूर्ती

## रामकृष्ण दादा पहिले ग्रामगीताचार्य यांचे प्रतिपादन

**वर्धा/जनमाध्यम**

ग्रामगीता ग्रंथ मानवाची आचारसंहिता, आजच्या काळाची संजीवनी बुटी २२ जुलै १९५३ रोजी आषाढी एकादशीला राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांना पंढरपूर येथे चंद्रभागेच्या तिरी ब्रह्म मुहूर्तावर ग्रामगीता लिखाणाची स्फूर्ती मिळाली येणाऱ्या रविवारी आषाढी एकादशीला या पवित्र शुभ घडीला ७१ वर्ष पूर्ण होत असून ग्रामगीता ग्रंथ ७२ व्या वर्षात



पदार्पण करीत आहे.ग्रामगीता हा ग्रंथ आडवा नसून उभा आहेत. मानवी जीवनात खरी उभारी देऊन मनुष्याला आदर्श नागरिक घडविण्याची गुरुकिल्ली आहेत. ग्रामगीता हा ग्रंथ स्वतंत्र भारताचे दुसरे संविधान असल्याची कबुली थोर महात्मे, तसेच ग्रामविकासावर कार्य करणाऱ्या मान्यवरांनी दिली.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्य क्षेत्र पंढरपूरच्या वाळवंटात ब्रह्म मुहूर्तावर ध्यानात बसले असताना. अद्भुत दृष्टांत झाला ग्रामगीतेच्या पहिल्या अध्यायात वंदनीय महाराज म्हणतात

**'तेथे दृष्टांतही होयी अदभुत.**
**कासया करावी विश्वाची मात,'**
**प्रथम ग्रामगीता हातात,**
**घ्यावी घ्यावी म्हणे,**

ओम नमोजी विश्व चालका या ईश्वरी मूळ अक्षरापासून महाराजांनी धावत्या प्रवासात खूप काही सहन करत ग्रामगीता युग ग्रंथ पूर्ण करून. मानव कल्याणार्थ प्रथम शेतकऱ्यांना अर्पण केला. राष्ट्रसंत म्हणतात

**पुण्यक्षेत्र पंढरपूरी,**
**बसलो असता चंद्रभागे तिरी,**
**स्फुरु लागली ऐसी अंतरी,**
**विश्वाकार वृत्ती,**

देशातील जनतेला कर्मकांड, पोथी पुराणामध्ये, गुरफटून न ठेवता त्यांनी दैनंदिन जीवन कसे जगावे. विश्वव्यापक दर्शन आधी अन्य माहिती ग्रामगीतेत समाविष्ट केली.

अंधश्रद्धा, ग्रामस्वच्छता, स्त्री पुरुष समानता, कुटुंब कल्याण, महिला विकास, आदर्श ग्रामविकास, बेटी बचाव बेटी पढाव, युवक संघटन, खेड्याकडे चला या विषयावर विस्तृत लेखन केले. ग्रामगीता युग ग्रंथ पाठांतराचा विषय नसून अभ्यासाचा विषय झालेला आहे अनेक विद्यापीठात ग्रामगीता युग ग्रंथाचा समावेश झालेला आहे.

वंदनीय राष्ट्रसंतांच्या सहवासात रामकृष्ण दादा बेलूरकर सेवेसाठी असायचे रामकृष्ण दादांना ग्रामगीता वाचनाचे प्रचार व प्रसार करण्याचे भाग्य लाभले. दादा ग्रामगीता ग्रंथावर विवेचन करू लागले. स्वतः राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी रामकृष्ण दादांना ग्रामगीताचार्य ही पदवी बहाल केली. आज हजारो विद्यार्थी. ग्रामगीता ग्रंथावर अभ्यास करीत आहेत. समाजाला दिशादर्शक ग्रामगीता ग्रंथ या आषाढी एकादशीला ७१ वर्षाचा झाला असून ७२व्या वर्षात पदार्पण होत आहेत. आषाढी एकादशीनिमित्त ही गोड आठवण सर्व भाविक भक्तांसाठी ग्रामगीता ग्रंथाचे वाचन,चिंतन, मनन,करून जीवनात बदल घडवून जीवन आदर्शमय करावे.

# शिवभोजन थाळी सुरुच राहणार

## प्रत्येक जिल्ह्यात मात्र पालकमंत्री आढावा घेणार

**वर्धा/जनमाध्यम**

महाविकास आघाडी सरकारकडून घेण्यात आलेल्या निर्णयांना बदलण्याचा सपाटाच शिंदे सरकारकडून लावला असतानाच शिवभोजन थाळी मात्र सुरु ठेवण्याचा मंत्रीमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे. शिवभोजन थाळी बंद होणार असल्याची चर्चा गेल्या काही दिवसांपासून रंगली होती. मात्र, या चर्चेला आज पूर्णविराम मिळाला आहे. शिवभोजन थाळी संदर्भात मंत्रीमंडळ बैठकीमध्ये आज चर्चा झाली. शिवभोजन थाळी सुरुच राहणार असली, तरी प्रत्येक जिल्ह्यात पालकमंत्री शिवभोजन थाळीचा आढावा घेणार आहेत.

राज्य सरकारकडून शिवभोजन केंद्र चालकांना अनुदान दिले जात होते. ग्रामीण भागातील केंद्रचालकांना एका थाळीमागे ५० रुपये आणि शहरी भागातील थाळी चालकांना ३५ रुपये अनुदान देण्यात येत होते. दरम्यान, शिवभोजन थाळी योजनेत गैरव्यवहार झाल्याचा संशय शिंदे-फडणवीस सरकारचा कयास आहे. त्यामुळे ही योजना बंद होणार असल्याची चर्चा रंगली होती. या योजनेतंर्गत राज्यातील जनतेला १० रुपयांत जेवण मिळत होते. कोरोना काळात याची किंमत ५ रुपये करण्यात आली होती. या योजनेमुळे गरिबांना मोठा आधार मिळत होता. महाविकास आघाडी सरकारच्या काळात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या पुढाकाराने ही शिवभोजन थाळी सुरू करण्यात आली होती. राज्यात एक लाख ८८ हजार ४६३ एवढ्या थाळ्यांची विक्री होते. शिवभोजन थाळीसाठी विविध ठिकाणी केंद्र सुरू करण्यात आली आहेत. ही केंद्र चालवणाऱ्यांना राज्य सरकारकडून विविध मदत दिली जाते. राज्यात सत्तांतर झाल्यानंतर शिवसेनेचे बंडखोर नेते एकनाथ शिंदे आणि भाजपचे नेते देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील सरकारने कारभार हाती घेतल्यानंतर महाविकास आघाडी सरकारच्या कार्यकाळात घेतलेल्या अनेक निर्णयांना स्थगिती दिली आहे.

# वर्धा मराठा सेवा संघाचे पुनर्गठन

## विभागीय निवड समितीद्वारा सभा

**वर्धा/जनमाध्यम**

राष्ट्रीय मराठा सेवा संघाच्या धोरणांतर्गत संपूर्ण देशात मराठा सेवा संघ तथा अंतर्गत सर्व कक्षांच्या पुनर्गठनाबाबत राज्य व विभाग निहाय ९ सदस्यीय निवड समितीची स्थापना करण्यात आली आहे. प्रदेश उपाध्यक्ष अरविंद गावंडे समिती प्रमुख असून जिजाऊ ब्रिगेडच्या प्रांताध्यक्ष सिमा बोके, दिगंबर जगताप, अशोक महाले, सुनिता जिचकार,व्ही.टी. शिंदे, ज्योती कोथाळकर, शिवाजी डोकर पाटील, वसंतराव देशमुख राज्यस्तरीय पदाधिकारी वर्गाचा त्यात समावेश आहे.

त्यानुषंगाने विदर्भ ग्रुपवर संपन्न झालेल्या ऑनलाईन सभेतील निर्णयानुसार विदर्भातील नागपुर व अमरावती विभागासह अकरा जिल्ह्यांचे व ६४ तालुक्यांचे पुनर्गठन करण्यासाठी २ जुलै २०२५ ते ७ जुलै २०२५ पर्यंत निवड समितीचा विदर्भ दौरा निश्चित करण्यात आला आहे. समितीच्या कार्यक्रमानुसारवर्धा जिल्हा मराठा सेवा संघ तथा प्रणित संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेड, वीर भगतसिंग विद्यार्थी परिषद, डॉ. पंजाबराव देशमुख राष्ट्रीय शिक्षक परिषद, जगदुरु तुकोबाराय साहित्य परिषद, छत्रपती शिवाजी मुस्लीम ब्रिगेड, बिरसा मुंडा आदिवासी कक्ष तथा उर्वरित ३३ कक्षांतर्गत जिल्हा व तालुका कार्यकारणीतील विद्यमान पदाधिकारी, सदस्य, मार्गदर्शक यांना शनिवार दिनांक ५ जुलै २०२५ रोजी शासकीय विश्रामगृह वर्धा येथे दुपारी ४ वाजता निवड

समितीच्या सभेला उपस्थित राहण्याचे आवाहन समितीकडून करण्यात आले असून सभेला जिल्हा तसेच जिल्ह्यांतर्गत सर्व तालुका पदाधिकारी उपस्थित असणे अनिवार्य असल्याची सूचना देण्यात आली आहे.सभेमध्ये वर्धा जिल्ह्यातील सर्व कक्षांची जिल्हा कार्यकारणी व जिल्हांतर्गत सर्व तालुका कार्यकारणीची निवड करण्यात येणार आहे. मराठा सेवा संघाशी सलग्नित बंधु आणि भगिनींना पसंतीच्या कक्षात कार्य करण्यासाठी पदनिहाय आवेदन पत्र भरुन देणे बंधनकारक करण्यात आले आहे. आवेदन पत्राचा नमुना प्रसारीत करण्यात आला आहे. इच्छुकांनी जिल्हा, तालुका निहाय पदाचे नाव आणि व्यक्तीगत माहीती नोंदवून सदर आवेदनपत्र वर्धा जिल्हा समन्वयक वीरेंद्र कडू यांचेकडे सुपूर्द करण्यात यावेत अशी सूचना जिल्हा सचिव यांनी केली आहे.

# लाडकी बहीण योजनेमुळे निराधार लाभार्थी अनुदानापासून वंचित

## अनेक दूर्धर आजारी निराधार वृद्ध आर्थिक संकटात

**साहूर/जनमाध्यम**

महाराष्ट्र शासनातर्फे संजय गांधी निराधार श्रावण बाळ या योजनेअंतर्गत निराश्रीताना पंधराशे रुपये अनुदान दिल्या जाते.त्या अनुदानाच्या भरवशावरच ते निराश्रीत आपले जीवन जगत आहे परंतु लाडकी बहीण योजना सुरू झाल्यापासून निराधारांच्या खात्यात अनुदानाची रक्कम जमा झाली नसल्याने दुर्धर आजाराने ग्रासलेल्या अनेक निराधार वृद्धांवर आर्थिक संकट ओढवले असून उपासमारीची वेळ आली आहे.

महाराष्ट्र शासनातर्फे संजय गांधी निराधार श्रावण बाळ या योजनेअंतर्गत वृद्ध व विधवा घटस्फोटीत महिला परित्यक्ता कुष्ठरोगी निराधार व दुर्धर आजाराने पीडित असलेल्या अनेक वृद्ध लाभार्थ्यांना शासनाकडून पंधराशे रुपये अनुदान दिल्या जाते. मात्र २०२४ मध्ये झालेल्या निवडणुकीत महिलांची गठ्ठा मते मिळविण्यासाठी सप्टेंबर २०२४ पासून सुरू झालेल्या लाडकी बहिणी योजनेमुळे सर्व निराधारांचे अनुदान रखडले असून त्यांच्या बँक खात्यात अद्यापही रक्कम जमा झाली नसल्याने वृद्ध निराधारा वर आर्थिक संकट ओढवत असून त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. या योजनेअंतर्गत समाजा तील दुबळे मागासवर्गीय विमुक्त आणि भटक्या जाती जमाती इतर मागासवर्गीय तसेच वृद्ध अपंग दिव्यांग अविवाहित क्षयरोगी घटस्फोटीत परितत्त्या कृष्टरोगी एड्सग्रस्त व इतर दुर्धर आजाराने पीडित असलेल्या व्यक्तींना केंद्र आणि राज्य शासनाकडून दरमहा हजार रुपये अनुदान दिल्या जात होते. ते आता सरकारने सरसकट पंधराशे रुपये केले आहे. त्यामुळे ते अनुदान दरमहा त्यांच्या बँक खात्यात जमा केले जायचे मात्र लाडकी बहीण योजना सुरू झाल्यापासून शासनाचे सर्व लक्ष आणि खर्च लाडक्या बहिणीसाठी सुरू असून गेल्या सहा-सात महिन्यापासून निराधारांच्या खात्या वर अनुदानच जमा होत नसल्याने वयोवृद्ध व गरजू नागरिक दररोज बँकेच्या चकरा मारत आहे. परिणामतः बँक खात्यात अनुदान जमा झाले नसल्याने वृद्ध निराधारांना आल्या पावली बँकेतून परत जावे लागत असून त्यांना हकनाक मनस्ताप होत असून वृद्ध निराधार केंद्र व राज्य शासनाबाबत रोष व्यक्त करत आहेत.

# पीएम किसानचा हप्ता १३ जुलैनंतरच

**वर्धा/जनमाध्यम**

शेती आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर पंतप्रधान किसान सन्मान निधीचा (पीएम किसान) गाजावाजा करणाऱ्या केंद्र सरकार ने २० व्या हप्त्याच्या वितरणावर मौन बाळगले आहे. पीएम किसानच्या हप्त्याचं वितरण पंतप्रधान मोदींच्या हस्ते केले जाते. परंतु पंतप्रधानाच्या विदेश दौऱ्यामुळे पीएम किसानच्या २० व्या हप्त्याची प्रतिक्षा करावी लागणार आहे.

सध्या पंतप्रधान नरेंद्र मोदी पाच देशांच्या दौऱ्यावर आहेत. पंतप्रधान मोदी या दौऱ्यावरून ९ जुलै रोजी भारतात परतणार आहेत. त्यामुळे १३ जुलैनंतर २० व्या हप्त्याच्या वितरणासाठी हालचाली सुरू होतील, अशी अटकळ बांधली जात आहे. २० हप्त्याचे वितरण शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जूनच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवड्यात होण्याची अपेक्षा होती. परंतु सरकारने लाभार्थी पडताळणीच्या प्रक्रियेला सुरुवात केली. तसेच पीएम किसानचा हप्ता चुकीने सरेंडर झालेल्या लाभार्थीचा पुन्हा योजनेत पीएम किसान सम्मान निधि समावेश करण्यासाठी प्रक्रिया मे महिन्याच्या शेवटीपासून राबवली गेली. तर सध्या पंतप्रधान विदेश दौऱ्यावर आहेत. त्यामुळे पीएम किसानच्या निधीला विलंब होत गेल्याचे अधिकारी सूत्रांनी सांगितले. २०१९ पासून पीएम किसान योजनेतून देशातील शेतकऱ्यांना वार्षिक ६ हजार रुपयांचे आर्थिक मदत दिली जाते. या योजनेत डिसेंबर मार्च, एप्रिल-जुलै आणि ऑगस्ट-नोव्हेंबर अशी तीन हप्त्यात शेतकऱ्यांना प्रति हप्ता २ हजार रुपयांप्रमाणे मदत दिली जाते. खरीप हंगामातील शेती कामांसाठी शेतकऱ्यांना पीएम किसानच्या निधीची मदत होते, असा दावा सरकारकडून करण्यात येतो. पीएम किसानमुळे ग्रामीण भागात आर्थिक व्यवहारांना चालना मिळाली असून शेतकऱ्यांच्या कर्जाच्या अडचणी कमी झाल्या आहेत. तसेच शेतकऱ्यांची निविष्ठामधील गुंतवणूक वाढल्याचे केंद्रीय कृषी मंत्रालयाने संसदेत सांगितले. वास्तविक मागील तीन वर्षांपासून केंद्र सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणांमुळे प्रमुख शेतमालाला हमीभावापेक्षा कमी दर मिळत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी झालेली आहे. या पार्श्वभूमीवर पीएम किसानच्या निधीमध्ये वाढ करण्याची मागणी जाणकार आणि शेतकरी नेते करत आहेत. परंतु केंद्र सरकार त्यासाठी अनुकूल नाही. दरम्यान, पीएम किसानच्या १९ हप्त्याचे वितरण फेब्रुवारी २०२५ मध्ये बिहार येथील भागलपूरमधून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आले. १९ हप्त्यापोटी १० कोटी शेतकऱ्यांना २२ हजार कोटींचा निधी वितरित करण्यात आला. राज्यातील ९३ लाख शेतकरी या योजनेसाठी पात्र असून २० हप्त्यात ५० हजार शेतकऱ्यांची नव्याने भर पडेल, अशी शक्यता आहे. परंतु शेतकऱ्यांना पीएम किसानचा २० हप्ता १३ जुलै नंतरच वितरित केला जाईल, अशी चिन्हे आहेत.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष - १३ अंक २२१
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# नव्या औद्योगिक धोरणात अमरावतीला प्राधान्य मिळणार का?

## - आ. संजय खोडके यांचा सवाल

### -अमरावतीचा औद्योगिक अनुशेष भरून काढण्यावर पावसाळी अधिवेशनात चर्चा

**मुंबई/प्रतिनिधीः-** आज महाराष्ट्रात औद्योगिक विकास हा ठराविक क्षेत्राचा जसे पुणे , मुंबई , नाशिक , औरंगाबाद व नागपुर मध्येच एकवटलेला दिसतो. त्या दृष्टीने पश्चिम विदर्भ अर्थात अमरावती विभाग औद्योगिक विकासाच्या बाबतीत पिछाडीवर आहे. कृषी क्षेत्रासाठी लागणाऱ्या सिंचनाचा अभाव, अविकसित औद्योगिक क्षेत्र व सेवा क्षेत्र, त्यामुळे अमरावती विभागाचे दरडोई सुद्धा महाराष्ट्रात सर्वात कमी आहे. अमरावती विभागात अनेक पायाभूत संसाधनांची भरमार असल्याने औद्योगिक क्षेत्रात गुंतवणुकीला चालना देणे महत्वाचे आहे. त्यामुळे नव्या उन्नत - प्रगत महाराष्ट्राच्या जडण घडण होत असतांना नव्या औद्योगिक धोरणात निदान आता तरी अमरावतीला प्राधान्य मिळणार का ? असा सवाल आ.संजय खोडके यांनी महाराष्ट्र विधान परिषदेतून उपस्थितीत केला.

अमरावतीच्या औदयोगिक विकासाचे मुद्दे मांडतांना आ.संजय खोडके यांनी सांगितले कि, महाराष्ट्राचे अंदाजित दरडोई उत्पन्न हे वर्ष २०२३-२०२४ मध्ये २,७८,६८१ रुपये असून मागील वर्षी वर्ष २०२४-२०२५ मध्ये २,५२,२८९ रुपये होते. त्यात अमरावती विभागाचे दरडोई सांकेतिक निव्वळ उत्पन्न हे १,६६,४६५ रुपये आहे. जे महाराष्ट्र राज्य सरासरी दरडोई उत्पन्नापेक्षा १,१२,२१६ रुपयांनी कमी आहे. यावरून लक्षात येते कि, अमरावती विभाग हा महाराष्ट्रात अन्य विभागांच्या तुलनेत किती मागासलेला आहे. या बाबत आ.संजय खोडके यांनी महाराष्ट्र राज्याच्या आर्थिक पाहणी अहवालावरून सभागृहाला विस्तृत माहिती दिली.

सूक्ष्म-लघु-मध्यम उपक्रमांच्या बाबतची सुद्धा अमरावती विभाग हा पुणे , मुंबई, नाशिक,नागपूर, विभागापेक्षा बराच पिछाडीवर आहे. नागपूर विभागात ६,९३,९५९ उपक्रम चालविण्यात आले असता २९.९५ लाख रोजगार निर्मिती झाली. पुणे विभागात ८९९,९८६ सूक्ष्म उपक्रम राबविण्यात आले असून ४५.८९ लाख रोजगार निर्मिती करण्यात आली. मुंबई विभागात



६,९०,६१३ सूक्ष्म उपक्रमांतर्गत १९.१९ लाख रोजगार निर्माण करण्यात आले. तर नाशिक मध्ये ५,९९, ९२७ सूक्ष्म उपक्रमांतर्गत १३.४५ लाख रोजगार निर्मिती करण्यात आली आहे. त्यातुलनेत सूक्ष्म उपक्रमात अमरावती विभागामध्ये ३,२९,७८१ उपक्रम राबविण्यात आले, यातून १०.५१ लाख रोजगार निर्मिती झाली आहे. तुलनात्मक दृष्टीने बघितले तर अमरावती विभाग किती कमी आहे हे ठळकपणे दिसून येते.

लघु उपक्रमाच्या बाबतीत सुद्धा सारखी स्थिती आहे. नागपूर विभागात ८,८१२ उपक्रम चालविण्यात आले असता २.०२ लाख रोजगार निर्मिती झाली. पुणे विभागात १७,९८७ लघु उपक्रम राबविण्यात आले असून ५.२५ लाख रोजगार निर्मिती करण्यात आली. मुंबई विभागात ५९,९९६ लघु उपक्रमांतर्गत १.७१ लाख रोजगार निर्माण करण्यात आले.तर नाशिक मध्ये १३,७९० लघु उपक्रमांतर्गत १.४८ लाख रोजगार निर्मिती करण्यात आली आहे. त्या तुलनेत अमरावती विभागात ३,९८९ लघु उपक्रम राबविण्यात आले.

लघु उपक्रमाबाबतही अमरावती विभाग हा मागासलेला असल्याचे दिसून येते. मध्यम उपक्रमातही अमरावती विभाग किती मागे पडला आहे हे आडकेवारी वरून लक्षात येते. अमरावती विभागात ९०७ उपक्रमातून १ लाख रोजगार निर्मिती करण्यात आली. पण नागपूर विभागात १,५९९ उपक्रमातून १.९१ रोजगार, पुणे विभागात ६,९९६ मध्यम उपक्रमातून ४.११ लाख रोजगार, मुंबई विभागात ४,९७८ उपक्रमांतून ३.५३ लाख रोजगार निर्मिती करण्यात आली. तर नाशिक विभागात १.०९८ मध्यम उपक्रम राबविण्यात आले. ज्यामध्ये १.५१ लाख रोजगार निर्मिती झाली आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळातील औद्योगिक व्यावसायिक घटकांच्या बाबतीत सुद्धा पश्चिम विदर्भ शेवटच्या क्रमांकावर आहे. नागपूर विभागात औद्योगिक व व्यावसायिक घटकांची संख्या ५,०४८ असून यामध्ये ८०,८९१ कोटी रुपयांची गुंतवणूक झाली आहे. पुणे येथे १४,५५० घटकांमध्ये १,४४,०१३ कोटी रुपयांची गुंतवणूक झाली असून ९२ हजार रोजगार निर्मिती झाली आहे. नाशिक अंतर्गत १०,७७२ औद्योगिक घटकांमध्ये ११,९२९ कोटी रुपयांची गुंतवणूक झाली आहे.यातून १.२२लाख रोजगार निर्मिती करण्यात आली.

नागपूर विभागात औद्योगिक व व्यावसायिक घटकांमध्ये अमरावती विभागापेक्षा दहा पट जास्त गुंतवूणक झाली असल्याचे या आकडीवारी वरून लक्षात असे अशी माहिती सुद्धा आ.संजय खोडके यांनी सभागृहा समक्ष सांगीतले.

# युनिर्व्हसिटी डिपार्टमेंट रँकिंग फ्रेमवर्कबाबत डॉ.स्मिता आचार्य यांचे विद्यापीठात उद्बोधन

**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभागांना दि.०७.०३.२०२५ च्या शासन निर्णयानुसार युनिर्व्हसिटी डिपार्टमेंट रँकिंग फ्रेमवर्कमध्ये सहभागी व्हायचे असून, दरवर्षी ३० जून पर्यंत विभागाची उपलब्धी क्रेडेनशीयल आणि कामगिरीची माहिती सादर करणे बंधनकारक असल्याची माहिती राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या आय.क्यू.ए.सी. संचालक डॉ. स्मिता आचार्य यांनी दिली. आयोजित कार्यक्रमप्रसंगी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, ननसा संचालक डॉ. अजय लाड उपस्थित होते.



युनिर्व्हसिटी डिपार्टमेंट रँकिंग फ्रेमवर्कबाबत माहिती देतांना डॉ. आचार्य म्हणाल्या, महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने 'युनिर्व्हसिटी डिपार्टमेंट रँकिंग फ्रेमवर्क' लागू केला असून, त्याचा शासन निर्णय प्रसिध्द केला आहे. या निर्णयानुसार, विद्यापीठांमधील शैक्षणिक विभागांना वर्षभरातील क्रेडेन्शियल्स, उपलब्धी आणि कामगिरीची माहिती सादर करणे बंधनकारक असणार आहे. यामध्ये संशोधन पेपर्स, पेटंट्स, मंजुरी पत्रे, निधी वितरणाची पत्रे, उपयोगिता प्रमाणपत्रे आणि शैक्षणिक ऑडिट अहवालासह सादर करावे लागणार आहे. बाह्य तज्ज्ञ समितीद्वारे या माहितीची छाननी होईल. या फ्रेमवर्कमध्ये विविध श्रेणींनुसार शैक्षणिक विभागांचे मूल्यांकन होणार आहे.

**मूल्यांकनाचे प्रमुख निकषः**

पीएच.डी. शिक्षकांची संख्या, पूर्णवेळ शिक्षकांची संख्या, शिक्षकांना मिळालेले राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार, आंतरराष्ट्रीय फेलोशिप, विभागातील पीएच.डी. मिळालेल्या विद्यार्थ्यांची संख्या यासाठी गुण ठेवण्यात आले आहे.

संशोधन प्रकल्पासाठी मिळालेले अनुदान, सल्लागार सेवा आणि कार्पोरेट प्रशिक्षणामधून मिळणारे उत्पन्न, सरकारी एजन्सीकडून मान्यता आणि पायाभूत सुविधांसाठी मिळालेला निधी, स्टार्ट-अप, इनक्यूबेशन, नोंदणीकृत स्टार्ट-अप्स, बौध्दीक संपदा अधिकार, प्रदान केलेले पेटंट्स आणि तंत्रज्ञान हस्तांतरण, वेब ऑफ सायन्समध्ये प्रकाशित झालेले संशोधन पेपर्स, शिक्षक संचयी प्रभाव, विभागाच्या संचयी एच-इंडेक्स, नॉन-स्कोप्स/वेब ऑफ सायन्सेस जर्नल्समधील प्रकाशन आणि इतर उपक्रम, प्रकाशित केलेली पुस्तके इत्यादी बाबी असणार आहेत. या नवीन फ्रेमवर्कमुळे विद्यापीठांच्या विभागांमध्ये गुणवत्ता आणि संशोधनाला चालना मिळेल, असेही त्या म्हणाल्या.

सुरुवातीला ननसा संचालक डॉ. अजय लाड यांनी पुष्पगुच्छ देवून कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते व डॉ. स्मिता आचार्य यांचे स्वागत केले. शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देवून डॉ. आचार्य यांचा कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी विद्यापीठाचेवतीने सत्कार केला. संचालन व अतिथींचा परिचय विकास विभागाच्या उपकुलसचिव डॉ. सुलभा पाटील यांनी, तर आभार जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी मानले. उपस्थित शैक्षणिक विभागप्रमुख व शिक्षकांनी प्रश्न विचारुन आपल्या अडचणी समजून घेतल्या. यावेळी विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभागप्रमुख, शिक्षक उपस्थित होते.

# एकविरा स्कुल ऑफ ब्रिलियंट्समध्ये आषाढी एकादशीनिमित्य हरीनामाचा गजर

**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर येथील एकविरा शाळेमध्ये आषाढी एकादशी निमित्ताने हुबेहूब वारकरी दिंडीचे आयोजन करण्यात आले.यामध्ये मराठी विषयाचे प्रमुख प्राध्यापक गोकुल कोरडे



यांनी आषाढी एकादशी दिनानिमित्ताने शाळेत साक्षात पंढरपूरचे दर्शन घडवले. विद्यार्थ्यांनी विठ्ठल रुक्मिणीची वेशभूषा परिधान करत नृत्य सादर केले तर सहभागी विद्यार्थ्यांनी सुद्धा वारकरी संप्रदायाचा पोशाख परिधान करून टाळ मृदंगाच्या गजरात हरिनामाचा गजर केला. विद्यार्थ्यांनी शालेय परिसरात वारकरी दिंडीचे यशस्वी आयोजन केले होते.

यामध्ये विठ्ठल रुक्मिणी सह वारकरी सुद्धा दिंडीत सहभागी होते. सदर कार्यक्रमाला प्राचार्य लिझेश रामकृष्णन यांचे मार्गदर्शन होते. शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी दिंडी यशस्वी मार्गस्थ केली.

**फ्लॅट ही फ्लॅट**

अगदी आपल्या बजेट मध्ये, पोद्दार शाळेच्या बाजुला कठोरा रोड व देसाई लेआऊट मध्ये तयार फ्लॅट

1-BHK-19.90

8788644334
9823255054
9823544446

# सिकची स्कुलचा नाविण्यपूर्ण उपक्रम, दर्यापूरातून निघाली शोभायात्रा

### संत परंपरा व भारतीय संस्कृतीची जोपासना

**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर येथील श्रीमती के.डी.सिकची एज्युकेशन अकॅडमी येथील वर्ग सहावी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी वारकऱ्यांच्या रूपात अख्ख्या जगाचा पोशिंदा असणाऱ्या शेतकऱ्यांच्या विकासासाठी विठ्ठल चरणी साकडे घातले. मुर्तीजापूर चौक, बस स्टॉप चौक येथे पथनाट्याद्वारे व नृत्याद्वारे विठ्ठल नामाच्या गजरात वातावरण विठ्ठलमय केले.



समाज प्रबोधन व संस्कृतीची जोपासना ही आजच्या काळाची गरज आहे हे सुद्धा विद्यार्थ्यांनी विठ्ठल दिंडी, पावल्या व फुगड्या घालून वारकरी संप्रदायाचे महत्त्व पटवून दिले. पंढरपूर दर्शन आज दर्यापूर या ठिकाणी घडवण्याचे काम सिकची स्कूलच्या चिमुकल्या वारकऱ्यांनी केले. विठ्ठल रुक्मिणीच्या वेशात असलेल्या विद्यार्थ्यांनी तर सर्व जनसमुदायाचे लक्ष वेधून घेतले होते.

या कार्यक्रमासाठी रामहरी चंद्रभान राऊत, नगर परिषद माजी मुख्याध्यापक लक्ष्मण जाधव, शाळेचे पालक अजय वर तसेच विशेष उपस्थिती पोलीस उपनिरीक्षक गजानन नागे व सोनटक्के यांनी दर्शविली.

तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका अंजुम शेख, सकाळ पाळीच्या मुख्याध्यापिका मोनिका वाटाणे, शारीरिक शिक्षिका अनुराधा गावंडे, वैशाली चऱ्हाटे मंगेश भांडे उपस्थित होते. कार्यक्रमासाठी संस्थेचे संस्थापक डॉ.आर. डी. सिकची , संस्थेच्या संचालिका डॉ. सरिता सिकची, संस्थेचे अध्यक्ष इंजि. अविनाश गायगोले यांचे मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमाला विद्यार्थी व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद व उपस्थिती लाभला. कार्यक्रमाची सांगता संत गजानन महाराज मंदिर, दर्यापूर येथे झाली.

# आषाढी एकादशी निमित्त गुरू ग्लोबल स्कुलमध्ये विविध उपक्रम

**नांदगावपेठ/प्रतिनिधीः-** येथील गुरू ग्लोबल स्कुल मध्ये आषाढी एकादशी निमित्त विविध धार्मिक आणि सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी पारंपारिक वेशभूषा साकारत परीसरातून दिंडी काढली.



सकाळी कार्यक्रमाची सुरुवात हरिपाठाने झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी फुगड्या, रिंगण, उखाणे, भजन सादर केले.चिमुकल्या विद्यार्थ्यांनी साकारलेल्या वेशभूषामुळे परिसरातील नागरिकांनी पंढरपूर येथील सोहळा शाळेतच अनुभवला.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनामध्ये मुख्याध्यापिका अश्विनी मानेकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षिका भाग्यश्री भगत, अंकिता पोटोडे, साक्षी भटकर प्रतीक्षा बावनकुळे, अविनाश शिंदे यांचेसह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी वर्गाचाही मोलाचा सहभाग होता.

विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक आणि अध्यात्मिक घडणीसाठी उपयुक्त ठरणाऱ्या या आयोजनाचे सर्वच स्तरातून कौतुक केले जात आहे.

**पाहिजेत**

श्री छत्रसाल शिक्षण संस्था इतवारा बाजार अमरावती रजी. क्र.एफ २६७ अल्पसंख्याक दर्जा प्राप्त संस्था व्दारा संचालित १०० टक्के अनुदानित श्री छत्रसाल प्राथमिक शाळा अमरावती इतवारा बाजार अमरावती येथे शासननिर्णयानुसार खालील पदे भरावयाची आहेत.

| अ.क्र. | पदांचे नांव | शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता | पद संख्या | संवर्ग | माध्यम | मानधन |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | शिक्षण सेवक | H.S.C./B.Sc./BA D-ED/B-ED (TET/ CTET Paper I/Paper II) | २ | खुला | हिंदी | शासन नियमानुसार |

वरिल पदाकरिता पात्र उमेदवारांची मुलाखत दिनांक ११/०७/२०२५ रोजी दु.१२.०० ते ३.०० या वेळात घेण्यात येईल. इच्छुक व पात्र उमेदवारांनी अर्ज व मुळ प्रमाणपत्रासह श्री छत्रसाल प्राथमिक शाळा इतवारा बाजार, अमरावती येथे स्वखर्चाने उपस्थित राहावे.

**टिप** - १.संस्था भाषिक अल्पसंख्याक असल्यामुळे शासनाच्या नियमांच्या अधिन राहुन पदे भरण्यात येईल.२. वरील सर्व पदांच्या नियुक्तीस मा.शिक्षणाधिकारी प्राथमिक जि.प.अमरावती यांचे मान्यतेची अट राहील.३. वयोमर्यादा शासन नियमानुसार शासनाने वेळोवेळी निश्चित केल्याप्रमाणे राहील.

अध्यक्ष
श्री छत्रसाल शिक्षण संस्था
इतवारा बाजार, अमरावती

Shri Gajanan Maharaj Shikshan Sanstha Amravati's
**Narayanrao Rana Mahavidyalaya**
Badnera, Dist. Amravati
( Affiliated to SGBAU Amravati)

**WANTED (CHB) 2025-26**

Application are invited for appointment of candidates for Teaching in the College on Contributory (C.H.B.) Basis as under :-
Vacancies for grant-in-aid course (as per regulation no.2/2020, and its para-11, G.R. Dated 17/10/2022

| S.N. | Subject/Course | Total No of Contributory posts |
|---|---|---|
| 1 | English | 02 |
| 2 | Economics | 02 |

**Eligibility:-** Academic Qualifications shall be as per U.G.C. regulations 2018 (university direction No. 08/2019 and 14/2019 for the post of Assistant Professor as directed in the Govt. Resolution no. संकीर्ण -2018 (185/18) / Mashi-03 Dt.14/11/2018. The other conditions and remuneration shall be as fixed by Govt. in the said G.R. eligible candidates should remain present in the college for the direct interview on dated **14/07/2025 between 10.30 am to 2.30 pm** alongwith application. original documents, xerox copies of documents at their own expenses.

Dr. G.S. Vairale
Principal
Narayanrao Rana
Mahavidyalaya, Badnera

Dr. A.R. Maloo
President
Shri Gajanan Maharaj
Shikshan Sanstha Amravati

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक- प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३६ अंक ३०१
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

**(C.J.J.D.) मा.दिवाणी न्यायाधिश (क.स्तर)**
**नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयात**

किरकोळ (RMJC) अर्ज क्र.१६४/२०२५ — ने.ता.०८.०८.२०२५

**मंगेश --वि--निरंक**

अर्जदार : १. **विजय मनोहर सावदे** रा.कणी मिर्झापुर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
२. **रजनीताई देवीदास चौधरी** रा. वार्ड नं.०३, सडक पुरा माहुली जहागिर ता.जि.अमरावती

// वि // निरंक

ज्याअर्थी **मयत मनोहर रामचंद्र सावदे मृत्यू दि.०५.०६.२०२४ रोजी कणी मिर्झापुर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती तसेच मयत प्रमिला मनोहर सावदे यांचा मृत्यू दि.०५.०२.२०२५ रोजी सुपर स्पेशालिटी, दवाखाना, अमरावती जि.अमरावती येथे झाला आहे. अर्जदार हेच मयत यांचे** कायदेशिर वारस आहेत. करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ०८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी **१०.३०** वाजता मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **०४ जुलै २०२५** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार,**
**सहायक अधीक्षक**
**मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर**

**(C.J.J.D.) मा.दिवाणी न्यायाधिश (क.स्तर)**
**नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयात**

किरकोळ (RMJC) अर्ज क्र.१५०/२०२५ — ने.ता.०१.०८.२०२५

**रेखा --वि--निरंक**

अर्जदार : १. **रेखा संतोषराव खानंदे**
२. **नंदिनी संतोष खानंदे**
३. **फाल्गून संतोष खानंदे** अ.क्र.१ व ३ रा.वार्ड क्र.१ प्रमोद नगर ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

// वि // निरंक

ज्याअर्थी **मयत संतोष भाउसिंग खानंदे यांचा मृत्यू दि.२७.०४.२०२५ रोजी मुंडनिशांकराव, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला आहे. मयत यांचे अर्जदार क्र.१ पत्नी, अ.क्र.२ मुलगी व अ.क्र.३ मुलगा आहे. अर्जदार हेच मयत यांचे** कायदेशिर वारस आहेत. करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ०८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी **१०.३०** वाजता मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **०४ जुलै २०२५** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार,**
**सहायक अधीक्षक**
**मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर**

**(C.J.J.D.) मा.दिवाणी न्यायाधिश (क.स्तर)**
**नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयात**

किरकोळ (RMJC) अर्ज क्र.१५६/२०२५ — ने.ता.२८.०७.२०२५

**अनुसया --वि--निरंक**

अर्जदार : १. **अनुसया विकम घोडेस्वार**
२. **प्रेमदास दौलतराव मेश्राम**
३. **राजेंद्र दौलतराव मेश्राम**
४. **रविंद्र दौलतराव मेश्राम**
५. **जयप्रकाश दौलतराव मेश्राम** अ.क्र.१ ते ४ रा.जळु, पो.दाभा ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

// वि // निरंक

ज्याअर्थी **मयत दौलत औगणु मेश्राम यांचा मृत्यू दि.०२.११.१९७८ रोजी जळु, पो.दाभा, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती तसेच मयत रंगुबाई दौलत मेश्राम यांचा मृत्यू दि. ३०.०५.२०१२ रोजी उमरठा, ता.नेर.जि.यवतमाळ येथे झाला आहे. अर्जदार हेच मयत यांचे** कायदेशिर वारस आहेत.करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ०८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी **१०.३०** वाजता मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

**आज दिनांक ०४ जुलै २०२५** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**मयत रंगुबाई दौलत मेश्राम यांचा मृत्यू दि. ३०.०५.२०१२ रोजी उमरठा, ता.नेर.जि.यवतमाळ येथे झाला आहे.याबाबतचे मृत्यूप्रमाणपत्र जोडले नाही.**

शिक्का

**आदेशानुसार,**
**सहायक अधीक्षक**
**मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर**

**पाहिजेत**

सीताबाई संगई एज्युकेशन सोसायटी, अंजनगाव सुर्जी
(जैन धार्मिक अल्पसंख्याक संस्था ) व्दारा संचालित

**सीताबाई संगई हायस्कूल/ कनिष्ठ महाविद्यालय, ( १००% अनुदानित) अंजनगाव सुर्जी, जि.अमरावती**

| पदांचे नांव | शैक्षणिक पात्रता | विषय | पदाची संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|
| शिक्षण सेवक (६ वी ते ८ वी करिता ) | B.A./ B. Ed. T.E.T./C.T.E.T. | इंग्रजी | १ पद | पदोन्नती मुळे रिक्त झालेल्या पदावर सदर नियुक्ती करण्यात येणार आहे. |

वरिल पदाकरिता **दिनांक १९/०७/२०२५ शनिवार रोजी सकाळी १०.००** वाजता स्वखर्चाने, स्वलिखित अर्ज तसेच मूळ कागदपत्रे, प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती व फोटोसह प्रत्यक्ष मुलाखतीस संस्थेच्या कार्यालयात उपस्थित राहावे.

संस्था जैन धार्मिक अल्पसंख्याक असल्याने आरक्षण/बिंदू नामावली लागू नाही.

अध्यक्ष,
सीताबाई संगई एज्युकेशन सोसायटी, अंजनगाव सुर्जी

सचिव,
शाळा समिती तथा मुख्याध्यापक/प्राचार्य
सीताबाई संगई हायस्कुल/क.म.वि.अंजनगाव

## जाहीर सुचना

१. सर्व जनतेस या जाहीर नोटीस व्दारे सुचित करण्यात येते की, श्री संतोष शंकरराव कळसकर व सौ.शारदा किशोर कळसकर यांच्या मालकीची खालील वर्णन केलेली शेत जमीन माझे पक्षकाराने विकत घेण्याचा सौदा केला आहे, त्या शेत जमिनीचे वर्णन खालील प्रमाणे :-

**-:मालमत्तेचे वर्णन :-**

नोंदणी पोट तुकडी चांदूर रेल्वे, जिल्हा परिषद, अमरावती, ग्राम पंचायत दहीगाव (धावडे) चे कक्षेतील, सब रजिस्ट्रार चांदूर रेल्वे च्या हददीतील मौजे दहीगाव (धावडे), ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती येथील गट क्र.१५६/४/२, क्षेत्रफळ ०१ हे ५१ आर, पोट खराब ०हे ०२ आर, एकूण ०१ हे ५३ आर, शेत सालीम कोरडवाहू शेत जमीन त्यातील झाडझुडपासह खोडबारासह या शेताची चतुःसिमा पूर्वेस : निलेश धावडे यांचे शेत, पश्चिमेस : विलास विनायक खुरड यांचे शेत, उत्तरेस : सुगंधाबाई पांडुरंगजी धावडे यांचे शेत, दक्षिणेस : सरकारी पांदन रस्ता.

२. सबब वरील वर्णन केलेल्या मालमत्तेवर कोणाचेही, कोणत्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध,गहाण,बोजा,वारसा, इजमेंटरी हक्क, सरकारी, निम सरकारी अथवा खाजगी कर्ज अथवा अन्य कोणतेही हक्क असल्यास ही नोटिस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आंत कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत माझेकडे घ्यावी. कोणत्याही प्रकारची हरकत माझेकडे न आल्यास माझे पक्षकार करारामध्ये ठरल्याप्रमाणे यांचेकडून वरील मालमत्तेची/शेताची खरेदी करतील, नंतर कोणाचाही उजर चालणार नाही, तरी सर्वांनी याची नोंद घ्यावी.

**दिनांक - ०४/०७/२०२५**
**अमरावती.**

**स्वाक्षरी/-**
**(ॲड.अतुल सोहोनी)**
**Adv. Atul Sohoni**
**Sohoni Complex**
**Vivekanand Colony**
**Amravati- 444606**

**दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती**
**वारसाचे प्रमाणपत्राबाबत जाहीरनामा**

आर.एम.जे.सी.क्र.१५८/२०२५ — ने.ता.२८.०७.२०२५

अर्जदार : १. **दिलीप रामभाऊ शेटे** (मुलगा), वय ५७ वर्षे, व्यवसाय- शेती रा.वडाळा, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
२. **संजय रामभाऊ शेटे** (मुलगा), वय ५३ वर्षे, व्यवसाय- शेती रा.वडाळा, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
३. **संध्या रमेश भाकरे** (मुलगी), वय ५७ वर्षे, व्यवसाय- गृहिणी रा.छाया कॉलनी, ता.जि.अमरावती
४. **उषा शंकर शिंदे** (मुलगी), वय ६३ वर्षे, व्यवसाय- गृहिणी रा.वडाळा, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** **निरंक**

ज्याअर्थी **मयत रामभाऊ दामोधर शेटे** हे दि.२६/०७/२०१६ रोजी वडाळा,ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे मरण पावले आहे. त्यांचा कायमचा पत्ता हा वडाळा,ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथील आहे. त्यांना अर्जदारा यांच्या व्यतिरिक्त कोणीही वारस नाही. अर्जदार हे उपरोक्त मयताचे कायदेशिर वारस आहेत. उपरोक्त मयतांचे कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदारांनी विद्यमान न्यायालयात मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२ अंतर्गत दिनांक **२४.०६.२०२५** रोजी अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी दिनांक **२८.०७.२०२५** रोजी सकाळी १०.३० वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर,नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक ०१ जुलै सन २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर

# फायटोफ्थोरा रोगाचा प्रादुर्भावामुळे जिल्ह्यातील संत्रा पीक नष्ट

## संत्रा लागवड क्षेत्रात कृषी विभागामार्फत चौकशी व पंचनामे कधी?

## आ.सुलभा खोडके यांनी पावसाळी अधिवेशनातून उपस्थित केला सवाल

**अमरावती/का.प्र.**

अमरावती जिल्ह्यातील संत्रा पिकांवर फायटोफथोरा या बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भाव झाला असल्याने संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना प्रचंड फटका बसला आहे.

गेल्या मे महिन्यापासूनचा अवकाळी पावसामुळे संत्रालागवड क्षेत्राला मोठा ओलावा असल्याने फायटोफ्थोराचे जिवाणूंची वाढ होऊन जमीनसुद्धा बाधित झाल्याचे गंभीर परिणाम दिसून येत आहे. अशा परिस्थिती शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान भरपाई मिळण्यासाठी जिल्ह्यातील संत्रा लागवड क्षेत्रात कृषी विभागामार्फत चौकशी व पंचनामे कधी करणार? असा प्रश्न आ.सुलभा खोडके यांनी पावसाळी अधिवेशनातून उपस्थित केला.



राज्यविधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात कामकाजा दरम्यान प्रशोत्तराच्या तासांमध्ये आ.खोडके यांनी अमरावती जिल्ह्यातील संत्रापिकांवर फायटोफ्थोरा रोगाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला असल्याने संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे .याबाबत सभागृहाला अवगत केले. अमरावती जिल्ह्यातील वरुड, मोर्शी , चांदुर बाजार भागात संत्रा पिकांची मोठ्या प्रमाणात लागवड केली जाते. शेतकऱ्यांना तीन वर्षातून एकदा चांगला संत्रा होत असल्याने शेतकऱ्यांना दरवर्षी चांगले संगोपन करून संत्राची झाडे जागवावी लागतात.

मात्र सध्या संत्रा पिकांवर फायटोफ्थोरा नामक बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने संत्रा पिके संकटात सापडली आहे. या रोगाची लक्षणे इतकी गंभीर आहे, कि संत्राफळे सडण्याबरोबरच यामध्ये पिकांच्या मुळाशी जिवाणू तयार होऊन आधी खोडं कुजली जातात , नंतर मुळे सुकतात व झाडे मरतात.नुकत्याच मे महिन्यात झालेल्या सततच्या पावसामुळे संत्रालागवड क्षेत्रात फायटोफथोराचे जिवाणू वाढले असल्याने संत्रा पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.अशी माहिती आ.खोडके यांनी सभागृहाला अवगत केली व जिल्ह्यातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची मागणी केली.

यावर शासनाच्या वतीने उत्तर देतांना कृषी राज्यमंत्री आशिष जैस्वाल यांनी सांगितले कि फायटोफ्थोरा रोगाचा प्रादुर्भावामुळे संत्रा पिकांचे मोठे नुकसान होते हे खरे असले तरी याबाबत अजूनपर्यंत कुठली तक्रार प्राप्त झाली नाही, ज्याभागात असे घडले असेल त्याभागात निश्चितपणे मदत करण्यात येईल असे आश्वासन दिले.

# कायमस्वरूपी उपाय योजनेतून समस्यांचे निराकरण-अशोक साळुंके

**अमरावती/का.प्र.**

औद्योगिक ग्राहकांना अखंड व स्थिर वीज पुरवठा देण्यासाठी महावितरण प्रयत्नशिल असून, आगामी काळात औद्योगिक वीज सेवेला अडथळा ठरणारे ब्लॅक स्पॉट शोधून त्यावर कायमस्वरूपी उपाय योजना करण्यात येईल असे प्रतिपादन मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी दिले.

मुख्य कार्यालय यांनी दिलेल्या निर्देशानुसार विद्युत भवन अमरावती येथे आज महावितरण आणि औद्योगिक संघटना यांची बैठक पार पडली. यावेळी अधीक्षक अभियंता दिपक देवहाते, कार्यकारी अभियंते प्रदीप पुनसे, अमित शिवलकर, राजेश घाटोळे, प्रफुल लांडे, उपविधी अधिकारी प्रशांत लहाने, सातुर्णा को. ऑप. इंडस्टीयल असोशिएशनचे अध्यक्ष विरेंद्र लड्डा, सचिव एम.आय.डी.सी. असोसिएशन आशिष सावजी, आतिरिक्त अमरावती एम.आय.डी.सी.नांदगावपेठ इंडस्ट्रीयालिस्ट असोशिएशनचे अध्यक्ष अफाक सुभेदार, सचिव जगदिश वाधवानी, रविकुमार डागा, व्ही.पी.बनारसे, नंदकिशोर पेटले, मंगेश चौधरी, निलेश काकीर्डे, , जावेद खान इत्यादी औद्योगिक ग्राहक उपस्थित होते.

यावेळी औद्योगिक ग्राहकांशी झालेल्या चर्चेनंतर मुख्य अभियंता म्हणाले की, औद्योगिक ग्राहक हे महावितरणसाठीच नाही तर, जिल्ह्याच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे असून, त्यांना दर्जेदार सेवा देणे ही महावितरणची जबाबदारी आहे. त्यामुळे यापुढे औद्योगिक ग्राहकांच्या समस्या सोडविण्याला प्राधान्य राहणार असून दुरूस्ती कालावधी कमीत -कमी करण्यावर भर देण्यात येईल.तथापि दरम्यानच्या काळात नांदगाव पेठ एमआयडीसीतील वीज समस्यावर तोडगा काढण्यासाठी विविध ठिकाणी एबी स्विच लावण्यात येणार असून वितरण पेट्या, किट- कॅट, आदीचे काम मेंटनंन्स आणि देखभाल दुरूस्तीच्या कामात तत्काळ हाती घेऊन ते दुरूस्त करण्याचे निर्देश मुख्य अभियंता यांनी कार्यकारी अभियंता यांना दिले.



**महावितरण औद्योगिक संघटनांची पार पडली बैठक**

विदर्भ-मराठवाडा येथील औद्योगिक ग्राहकांना शासनाने इलेक्ट्रीसीटी ड्यूटी माफ केलेली आहे, परंतू अजूनही काही ग्राहकांना जर ही ड्युटी लागून येत असेल तर त्याबाबत एक ड्राईव्ह घेऊन सवलतीस प्राप्त ग्राहकांना ती सवलत दिल्या जाईल. तसेच औद्योगिक ग्राहकांना प्राधान्याने वीज जोडणी देण्यासोबत प्रत्येक महिन्याला औद्योगिक ग्राहकांसोबत बैठक घेऊन वीज सेवेशी निगडीत समस्या जाणून घेतल्या जाणार असल्याचे मुख्य अभियंता यावेळी म्हणाले.


## जाहिर नोटीस

**दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती**
**श्री.ए.बी.कट्टे ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे**

आर.एम.जे.सी. क्र. १२३४/२०२५ ने.ता, १३/०८/२०२५ पुष्पलता व इतर वि निरंक

**अर्जदार- १.** पुष्पलता वामनराव वानखडे वय ७२ वर्षे, व्यवसायः घरकाम
२. मानसबंधू वामनराव वानखडे वय ५१ वर्षे, व्यवसायः खाजगी नोकरी
३. जनबंधू वामनराव वानखडे वय ४३ वर्षे, व्यवसायः खाजगी नोकरी
सर्व रा. कोणार्क कॉलनी गजानन कॉलनी कठोरा रोड विमवी अमरावती ता जि अमरावती

**विरूध्द**
**गैरअर्जदार :-निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की **मयत वामनराव नध्युजी वानखडे** हे **दि १९.११.२०१६** रोजी अमरावती येथे मयत झाल्या. **अर्जदार पुष्पलता वामनराव वानखडे व इतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **पुष्पलता वामनराव वानखडे** व इतर वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदहू मयत याचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. ०२.०७.२०२५ रोजी माल्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले

आदेशानुसार
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती
शिक्का

## जाहिर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क स्तर) बांदुर बाजार, जि. अमरावती,**

आर.एम.जे.सी. क्र. ४२१/२०२५ ने.ता, १४/०८/२०२५

**अर्जदार- १. अजरूद्दीन मिन्हाजुद्दीन इनामदार**, वय ३८ वर्षे, व्यवसाय - मजुरी
**२. मजहरूद्दीन मिन्हाजुद्दीन इनामदार**, वय ३६ वर्षे, व्यवसाय - मजुरी
**३. अनवार फातेमा कलीम जावेद**, वय ३४ वर्षे, व्यवसाय - घरकाम
अर्जदार क्र. १ व २ रा. खराळा, ता. चांदुर बाजार, जि. अमरावती
अर्जदार क्र. ३ रा. मस्जीद जवळ, फैजान गुलिस्ता नगर, अमरावती ता. जि. अमरावती

**विरूध्द**
**गैरअर्जदार :-निरंक**
**बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार वरील ठीकाणी राहतात. मय्यत **मिन्हाजुद्दीन करीमुद्दीन इनामदार** यांचा **मृत्यु दि. १५/०५/२०२५** रोजी रा. खराळा, ता. चांदुर बाजार जि. अमरावती येथे झालेला आहे. तसेच **मय्यत परविन बानो ज. मिन्हाजुद्दीन इनामदार** यांचा **मृत्यु दि. १०/०३/२०१४** रोजी रा. खराळा, ता. चांदुर बाजार जि. अमरावती येथे मरण पावले, त्याचबरोबर मय्यताचे वडील नाये करीमोद्दीन इसामोद्दीन इनामदार हे सुध्दा बरेच वर्षापूर्वी मय्यत झालेले आहेत.

यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदाराव्यतीरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

अर्जदारांना मय्यताचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरीता आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) चांदुर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.नं. ४२१/२०२५** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाच अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना बारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दि. २७/०६/२०२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

आदेशानुसार
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय चांदूर बाजार
शिक्का

## जाहिरनामा

**दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती**
**श्री एस एच खाडे, ९ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज २७३७/२०२४ पुढील तारीख - ११-८-२०२५
शालीनी गणेशराय कोल्हे वि रेयांश राहूल कोल्हे

**अर्जदार-Shalini Ganeshrao Kolhe**
Aged about-65 Years, Occu- Household R/o. Indrapuri High School, Ravi Naga Square, Amravati, Tq. Dist. Amravati.

**विरुध्द**

**गैरअर्जदार -Reyansh Rahul Kolhe**
Aged about-07 Years, Occu-Education Through legal Guardian Mother i.e., Priya Rahul Kolhe Rio, C/o, Bhaskarrao Karde, Mohan Nagar, Navsari, Amravati, Tq. Dist. Amravati.

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **Rahul Ganeshrao Kolhe** हे अर्जदाराचा मुलगा असून गैरअर्जदाराचे वडिल आहेत. मयत **Rahul Ganeshrao Kolhe** त्यांचे याचा दिनांक ११.०९.२०२४ रोजी त्यांच्या अमरावती येथे मृत्यू आला मयत **Rahul Ganeshrao Kolhe** यांचा गैरअर्जदार रेयांश राहूल कोल्हे हा मुलगा असून तसेच नामे प्रिया राहूल कोल्हे उर्फ प्रिया भास्कर करडे हि पत्नी आहे अर्जदार **Shalini Ganeshrao Kolhe** ही गैरअर्जदार **Reyansh Rahul Kolhe** चाची आली आहे अर्जदार **Shalini Ganeshrao Kolhe** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत याचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **Application under Section 2 of Bombay Regulation Act of 1827 for Grant of Legal Heir Certificate** प्रमागणे अर्ज दाहाल केलेला आहे.

त्यापेक्षा अर्जदार **Shalini Ganeshrao Kolhe** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि २०.०१.२०२५ रोजी माझ्यासहीने न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले

आदेशानुसार
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती
शिक्का

## जाहिरनामा

**वि.श्रीमती एम डी कांबळे ९ वे सह दिवाणी न्यायाधिश व. स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी. क्र. १०७८/२०२५ ने.ता, १५/०७/२०२५ श्री प्रफुल्ल अधिक एक व इतर वि निरंक

**अर्जदार** -1. Praful Sumantrao Gudadhe Age-63 yrs. Occu.: Retired R/o., bhumiputra Colony, Near Congress Nagar, Rukhmini Nagar, Amravati, Tq & Distt. Amravati. 444606
2. Sushma Sahebrao Deshmukh Age-62 yrs., Occ.: Household R/o. Bhosa Road, Vande Matram Chowk, Mangesh Nagar, Yavatmal, Tq. & Distt. Yavatmal.

**विरुध्द**
**गैरअर्जदार : निरंक**

सर्वत्र लोकांस सूचित करण्यात येते की **मयत सुमंतराय शंकरराव गुडधे** हे ०५.११ २०२१ रोजी ता.जि अमरावती येथे मयत झाले. अर्जदार प्रफुल्ल अधिक एक विरूध निरंक यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सबर्जु मर्मत मांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्री प्रफुल्ल अधिक एक विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयताचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि मा लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदर्हू मुदतीत कोणी योग्य हरकत न दासाविल्यास सबहू कोर्ट अर्जदार याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्याना सदहू मयत मांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. २६.०६.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी

आदेशानुसार
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती
शिक्का

## जाहिरनामा

**अंजनगाव सुर्जी जि. अमरावती येथील (श्रीमती एस.बी. राठोड) सह. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी. क्र. २३९/२०२५ ने.ता, २/०८/२०२५

**अर्जदार** -गुणवंत निळकंठ देशमुख वय -९० वर्षे व्यवसाय-रा.सातेगाव, ता. अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती

**विरूध्द**
**निरंक. गैरअर्जदार**

ज्याअर्थी या नोटीसद्वारे सर्वत्र लोकांस कळविण्यात येते की, **अर्जदाराचे पत्नी नामे वत्सलाबाई गुणवंत देशमुख** यांचा **दिनांक १४/१०/२०१९** रोजी मृत्यू झाला आहे. **अर्जात नमुद केल्याप्रमाणे यांचे वारस खालील प्रमाणे आहेत.**

| अ. क. | वारसाचे नाव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १. | गुणवंत निळकंठ देशमुख | वय ९० वर्षे | पती |
| २. | स्वाती दिलीप कदम (देशमुख) | वय ६० वर्षे | मुलगी |

**या व्यतिरीक्त ईतर कोणतेही कायदेशीर वारस नाहीत.**

**वत्सलाबाई गुणवंत देशमुख** हे मरण पावल्यामुळे त्यांच्या मृत्युनंतर अर्जदाराला शासकिय व निमशासकिय कामाकरीता तसेच इतर कामाकरीता वारसप्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता विद्यमान **सह. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), अजंनगाव सुर्जी येथे बाम्बे रेग्युलेशन ॲक्ट (१८२७) चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता** अर्ज केला असुन या अर्जावर कुणालाही आक्षेप घेणे असल्यास त्यांनी सदर जाहिर नोटीस प्रसिध्दी तारखेपासुन एक महिण्याचे आत आपले म्हणणे सादर करावे, अन्यथा या अर्जावर कुणाचाही आक्षेप, हरकत नाही असे गृहीत धरुन अर्जावर सुनावणी करुन अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र दिल्या जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ३०/०६/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**आदेशानुसार**
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क स्तर अंजनगांव सुर्जी जि. अमरावती.
शिक्का

## जाहिरनामा

**विजय जी. परवरे, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) भातकुली, जि अमरावती यांच्या न्यायालयात**

आर.एम.जे.सी. क्र. २५३/२०२५ ने.ता,२०/०८/२०२५

**अर्जदार** -१)शहीद वाहेद मिर्झा, वय ७५ वर्षे व्यवसाय मजुरी रा. साऊर, ता. भातकुली, जि. अमरावती
२)तय्यब वाहेद मिर्झा, वय ७३ वर्षे व्यवसाय मजुरी रा. साऊर, ता. भातकुली, जि. अमरावती
३)मालन बी सय्यद सादिक, वय ७४ वर्षे, व्यवसाय मजुरी रा. रेहमत नगर, अमरावती, ता. जि. अमरावती

**विरुध्द**
**गैरअर्जदार : निरंक**

**वाहेद मिर्झा भूरू मिर्झा हे दि. ०९/०६/१९९९ रोजी मयत झाले. अर्जदार शाहीद वाहेद मिर्झा, वय ७५ वर्षे व्यवसाय - मजुरी, रा. साऊर, ता. भातकुली, जि. अमरावती** यानी **बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ चे कलम २ प्रमाणे कायदेशिर वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता** या न्यायालयामध्ये दि. २४/०६/२०२५ रोजी अर्ज केला आहे या अर्जाप्रमाणे वरील **वाहेद मिर्झा भूरू मिर्झा** यांचे वारस आहेत. ते सदर अर्जदार फक्त **मयत वाहेद मिर्झा भूरू मिर्झा** यांचे वारस नाहीत असे कोणास सांगावयाचे असेल तर या जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यानी या न्यायालयात हजर होवून आपली हरकत नोंदवावी.

तसेच या लेखावरून अनेकविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दर्शविल्यास सदर्हू अर्जदारांना वारसा प्रमाणाबाबत पुरावा घेऊन त्याना सदर अर्जदारांना मयताचे वारस म्हणुन घोषित करण्यात येईल आणि त्या नंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही

आज दिनांक दि. २६/०६/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी शिक्क्यानिशी दिले असे

आदेशानुसार
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय (कनिष्ठ स्तर) भातकुली
शिक्का

## जाहिरनामा

**मा.सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर, नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**

आर.एम.जे.सी. क्र. ९६/२०२५ ने.ता, ११/०७/२०२५
दिलीप शालीकराम लाहे / वि./ निरंक

**अर्जदार** - १) दिलीप शालीकराम लाहे पिंपळगाव बैनाई ता. नांदगाव खंडश्वर जि. अमरावती २) भास्कर शालीकराम लाहे पिंपळगाव बैनाई ता. नांदगाव खंडश्वर जि. अमरावती ३) उज्वला श्रीकृष्ण लाहे पिंपळगाव बैनाई ता. नांदगाव खंडश्वर जि. अमरावती ४) कोकीळा सुभाष गावंडे येलवान अकोला विझोरा ता.जि. अकोला
५) वंदना राजेश खोपाडकर रत्नागिरी नगर तिवसा, ता जि अमरावती
६) रंजना महेंद्र पाटीदार नालदा परिसर राजेंद्र नगर इंदौर ता जि. अमरावती

**विरुध्द**
**गैरअर्जदार : निरंक**

ज्याअर्थी, **मयत.शालीग्राम दामदाजी लराहे मृत्यु दि.१६.०१.२०२३** रोजी. व त्यांच्या **पत्नी मयत कलावती शालीग्राम लाहे** यांचा मृत्यू दि. १९.३.१९९२ रोजी पिंपळगाव बैनाई ता. नादगांव खंडेश्वर जि. अमरावती येथे झाला आहे. मयतांचे अर्जदार अ.क्र. १ व ४ हे मयत यांचे मुलगा आणि मुलगी आहेत. अर्जदार हेच मयत यांचे कायदेशीर वारस आहेत, करीता कायदेशीर वारसदार म्हणुन प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम ०८ परीशिष्ट २ अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी कोणास वरील अर्जदाराविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस सकाळी १०.३० वाजता मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर वकीलांमार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवुन निकाल दिला जाईल.

आज दिनांक ९ एप्रिल २०२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशानुसार
**सहाय्यक अधिक्षक**
मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर
शिक्का

## जाहिरनामा

**मा. दिवाणी न्यायाधिश क. स्तर, नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**

आर.एम.जे.सी. क्र. ९०/२०२५ ने.ता, ७/०७/२०२५ **रामजी भिमराव मारबदे** व इतर वि निरंक

**अर्जदार** -१) रामजी भिमराव मारबदे २) लक्ष्मण भिमराव मारबदे ३) राजू भिमराव मारबदे ४) कल्पना छत्रुगन मारबदे ५) सुहास छत्रुगन मारबदे रा. धानोरा शिक्रा ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती ६)सौ जयश्री संजय कांबडे रा. कोदरी ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती

**विरुध्द**
**गैरअर्जदार : निरंक**

ज्याअर्थी, **मयत.भिमराव नारायण मारबदे मृत्यु दि.१९.०१.२०१९** रोजी. व त्यांच्या **पत्नी मयत नानीबाई नारायण मारबदे** यांचा **मृत्यू दि. १९.१०.२०२१ रोजी** ग्राम धानोरा शिक्रा ता. नादगांव खंडेश्वर जि. अमरावती येथे झाला आहे. मयतांचे अर्जदार अ.क्र. १ व ३ मुले व अ.क्र. ४ ही **मयत मुलगा छत्रगुन यांची पत्नी तसेच मयतांची सून आहे** आहेत. अ.क्र. ५ ते ६ **मयत मुलगा छत्रगुन यांचे मुलगा आणि मुलगी** असून मयतांचे नात नातू आहेत. अर्जदार हेच मयत यांचे कायदेशीर वारस आहेत, करीता कायदेशीर वारसदार म्हणुन प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम ०८ परीशिष्ट २ अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी कोणास वरील अर्जदाराविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस सकाळी १०.३० वाजता मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर वकीलांमार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवुन निकाल दिला जाईल.

आज दिनांक ४ एप्रिल २०२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशानुसार
**सहाय्यक अधिक्षक**
मा. दिवाणी न्यायालय नांदगाव खंडेश्वर
शिक्का

## जाहिरनामा

**मा.सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर, नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**

आर.एम.जे.सी. क्र. १३४/२०२५ ने.ता, २९/०७/२०२५ **राजेंद्र आणि इतर** वि. निरंक

**अर्जदार** -१) राजेंद्र निळकंठ कणसे रा. येणस ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती
२) प्रतिभा दिलीपराव पालेकर रा.कळमजापुर ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती

**विरुध्द**
**गैरअर्जदार : निरंक**

ज्याअर्थी, **मयत.निळकंठ आनंदराव कनसे मृत्यु दि.४.०७.२००५** रोजी. तसेच **कमलाबाई निळकंठ कनसे** यांचा **मृत्यू दि. १.११.२०१८** रोजी रा. येणस ता. नादगांव खंडेश्वर जि. अमरावती येथे झाला आहे. अ.क्र. १ व २ मुले आहेत. अर्जदार हेच मयत यांचे कायदेशीर वारस आहेत, करीता कायदेशीर वारसदार म्हणुन प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम ०८ परीशिष्ट २ अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी कोणास वरील अर्जदाराविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस सकाळी १०.३० वाजता मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर वकीलांमार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवुन निकाल दिला जाईल.

आज दिनांक १२ जुन २०२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशानुसार
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय , नांदगाव खंडेश्वर
शिक्का

## जाहिरनामा

**मा.सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर, नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**

आर.एम.जे.सी. क्र. १५४/२०२५ ने.ता, २८/०७/२०२५ ऊकंडा वि. निरंक

**अर्जदार** -१) उकंडा झोलबा मोडले मोडके
२) पंचफुला रमेशराव बावणे अ.क्र. १व २रा वार्ड क्र ३ पापळ ता.नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती
३) शकुंतला शेषराव सोनोने रा. शिवाजी नगर अमरावती
४)नंदा गजानन मात्रे रा.सावरगाव काळे पो सिरजगांव पांढरी ता. जि. यवतमाळ

**विरुध्द**
**गैरअर्जदार : निरंक**

ज्याअर्थी, **मयत.झोलबा रामा मोडले मोडके मृत्यु दि.३.०७.२०१३** रोजी. **पापळ ता. नादगांव खंडेश्वर जि. अमरावती येथे झाला आहे**.मयत यांचे **अर्जदार अ.क्र. १ पत्नी, अ.क्र.२ ते ४ मुली आणि अ.क्र.०४ पती आहेत. अर्जदार हेच मयत यांचे** कायदेशीर वारस आहेत, करीता कायदेशीर वारसदार म्हणुन प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम ०८ परीशिष्ट २ अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी कोणास वरील अर्जदाराविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस सकाळी १०.३० वाजता मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर वकीलांमार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवुन निकाल दिला जाईल.

आज दिनांक ०४ जुलै २०२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशानुसार
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर
शिक्का

## जाहिरनामा

**मा.सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर, नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**

आर.एम.जे.सी. क्र. ११५/२०२५ ने.ता, १०/०७/२०२५ **प्रभा आणि इतर** वि निरंक

**अर्जदार** -१)प्रभा उर्फ प्रभाताई रामदास थेटे
२) मनोज रामदास थेटे
३) योगेश रामदास थेटे
अर्जदार १ ते ३ रा मोरगाव ता. नांदगाव खंडेश्वर जि.अमरावती
४)सारीका अमोल खोपाले रा.रेणुका नगर अकोला ता जि अकोला

**विरुध्द**
**गैरअर्जदार : निरंक**

ज्याअर्थी, **मयत .रामदास चंपतराव थेटे यांचा मृत्यु दि.१५.१२.२०२३** रोजी. रा मोरगाव ता. नादगांव खंडेश्वर जि. अमरावती येथे झाला आहे. अ.क्र. १ पत्नी , अ.क्र.२ ते ४ मुले मुली आहेत. अर्जदार हेच मयत यांचे कायदेशीर वारस आहेत, करीता कायदेशीर वारसदार म्हणुन प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम ०८ परीशिष्ट २ अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी कोणास वरील अर्जदाराविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस सकाळी १०.३० वाजता मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर वकीलांमार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवुन निकाल दिला जाईल.

आज दिनांक ०७ मे २०२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशानुसार
प्रभारी **सहाय्यक अधिक्षक**
मा. दिवाणी न्यायालय नांदगाव खंडेश्वर
शिक्का

## जाहिरनामा

**मा.सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर, नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**

आर.एम.जे.सी. क्र. ८७/२०२५ ने.ता, ७/०८/२०२५

**अर्जदार** -१) छाया रमेश गायकवाड पुर्वाश्रमीचे नाव छाया रामकृष्ण फुल्लुके रा. गणगाव पो. देउरवाडी लाड ता. आर्णी जि. यवतमाळ
२) महेंद्र रामकृष्ण फुल्लुके
३)जितेंद्र रामकृष्ण फुल्लुके
४)रामकृष्ण किसन फुल्लुके
अर्जदार २ ते ४ रा.येवती ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती

**विरुध्द**
**गैरअर्जदार : निरंक**

ज्याअर्थी, **मयत . रत्नकला रामकृष्ण फुल्लूके मृत्यु दि.१४.०६.२०२१** रोजी. येवती ता. नादगांव खंडेश्वर जि. अमरावती येथे झाला आहे. अ.क्र. १ मुलगी, अ.क्र.२ ते ३ मुले आणि अ.क्र.०४ पती आहेत. **अर्जदार हेच मयत यांचे कायदेशीर वारस आहेत, करीता कायदेशीर वारसदार म्हणुन प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम ०८ परीशिष्ट २ अंतर्गत अर्ज सादर केला आहे.**

त्याअर्थी कोणास वरील अर्जदाराविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस सकाळी १०.३० वाजता मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर वकीलांमार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवुन निकाल दिला जाईल.

आज दिनांक ०४ जुलै २०२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशानुसार
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, नांदगाव खंडेश्वर
शिक्का

## जाहिरनामा / सायटेशन

**दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.एस.एस. बिंगरदेव ८ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,**

आर.एम.जे.सी. क्र. १२५१/२०२५ ने.ता, ८/८/२०२५
श्रीमती जयश्री अधिक तीन विरुदध निरंक

**अर्जदार -1.Smt.Jayashree Parag Raool,**Age 55 yrs. Occu. Housewife
**2. Darshan Parag Raool,** Age 24 yrs, Occu- Service
**3. Sau. Pratibha Ashok Raool,**Age 79 yrs, Occu- Housewife
**4. Ashok Maganlal Raool,** Age 86 yrs, Occu- Retired
All R/o Near Vyankatesh lawn, Trimurti Colony, New Swastik Nagar, Sai Nagar S.O. Amravati, Tq. & Dist. Amravati- 444607

**विरुध्द**
**गैरअर्जदार : निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की **मयत पराग अशोक राउळ** हे १५.०२.२०२५ रोजी अमरावती ता. जि अमरावती येथे मयत झाले. अर्जदार **जयश्री अधिक तीन विरूध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.त्यापेक्षा **श्रीमती. जयश्री अधिक तीन विरुदध निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदई कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल,

आज दि. ०१.०७.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशानुसार
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, अमरावती
शिक्का

## जाहिरनामा / सायटेशन

**दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती**
**श्री.एस.बी. कळदाते २रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती**

आर.एम.जे.सी. क्र. ११९८/२०२५ ने.ता, १४/०८/२०२५ **विनोद व इतर** वि. निरंक

**अर्जदार- १.** विनोद महादेव नवलकर (मयत) **१ (ए)** विशाल विनोद नवलकर वय -२७ वर्षे, व्यवसायः रा. रोहन खेडा अमरावती ता जि. अमरावती **२.** प्रमोद महादेव नवलकर रा. रोहन खेडा, पर्वतपूर पोस्ट देवरा अमरावती ता जि. अमरावतीं वय- ५३ वर्षे, व्यवसायः मजूरी **३.** उषाबाई सुरेशराव तायडे (मयत) **३ (ए)** शितल गोपालराव वाघमारे वय -३५ वर्षे, व्यवसायः गृहिणी रा. श्री दत्त नवनाथ मंदिर नवसारी, विदयुत तांत्रिक नगर नवसारी अमरावती ता.जि. अमरावती **३ (बी)** जागती निलेशराव घडेकर वय ३३ वर्षे, व्यवसाय : मजूरी रा. ओल्ड टाउन बडनेरा अमरावती ता जि. अमरावती **३ (सी)** पवन सुरेशराव तायडे वय ३० वर्षे, व्यवसाय : मजूरी रा. महात्मा फुले नगर नवसारी विमवी अमरावती ता जि. अमरावती **४.** आशा रमेश गि-हे (मयत) **४ (ए)** अश्विनी राजेश तायडे वय- ३० वर्षे, व्यवसायः गृहिणी रा. वाठोडा हिम्मतपूर पोस्ट निरूल अमरावती ता जि. अमरावती **४ (बी)** पवन रमेश गि-हे,वय ३२ वर्षे, व्यवसायः मजूरी रा. निमखेड बाजार अंजनगाव सुर्जी अमरावती ता जि. अमरावती

**विरुध्द**
**गैरअर्जदार : निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की **मयत महादेव किसनराव नवलकर** हे दि. १९.११.२००१ रोजी अमरावती येथे मयत झाल्या. अर्जदार **विनोद महादेव नवलकर** व इतर यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. त्यापेक्षा **विनोद महादेव नवलकर व इतर** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास, त्यांना सदर्हु मयत याचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दि. ०१.०७.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशानुसार
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती
शिक्का

# परतवाडा येथील अल्पवयीन मुलीचा अकोल्यात विनयभंग

## धावत्या ऑटोमध्ये चालकाने केली छेडछाड

### आरोपीला अटक

**अकोला/प्रतिनिधीः-** एका अल्पवयीन मुलीचा ऑटो रिक्षा चालकाने विनयभंग केला. त्यानंतर तिच्यावर अत्याचार करण्याचा प्रयत्न केला. या संपूर्ण प्रकरणात सिव्हिल लाईन पोलिसांनी ऑटो चालकाला अटक करीत त्याच्यावर गुन्हे दाखल केले. जाफर खान सुभेदार खान (रा.बकेट कारखान्या जवळ शहनवाजपुरा, नयेगाव, अकोला) असे अटक करण्यात आलेल्या रिक्षा चालकाचे नाव आहे. माहितीनुसार अमरावती जिल्ह्यातील परतवाडा येथील एक १६ वर्षीय विद्यार्थिनी ही अकोला शहरात नीटचे क्लासेस करीत आहे. त्यासाठी तिने राहायला खोली देखील भाड्याने केली आहे. गेल्या दोन दिवसांपासून ती आजारी होती. त्यामुळे परतवाडा येथे गावी गेली होती. काल



दुपारी बसने अकोल्याकडे रवाना झाली. सायंकाळी साडेपाच वाजताच्या सुमारास ती बसस्थानकावर पोचली. त्यानंतर रूमवर जाण्यासाठी एक ऑटो रिक्षा बघितला. आणि त्यामध्ये बसून रूमकडं रवाना झाली. मात्र ऑटो रिक्षा चालकाने ऑटो वेगळ्याच रस्त्यावर नेला, तिला संशय आला. तिने मित्राला फोनवर सांगितलं. दरम्यान, अगदी थोड्या वेळातच चालत्या रिक्षात चालकाने मुलीचा हात पकडून स्वतःजवळ ओढत तिचा विनयभंग केलाय. पीडित मुलीने प्रतिकार केला असता त्याने मुलीच्या डाव्या हातावर आणि हाताच्या दंडाला चावा घेतला. थोड्या वेळातच तिने सुटका करत ऑटो मधून पळ काढला आणि सिव्हिल लाईन पोलीस ठाण्यात दाखल झाली. घडलेल्या प्रकरणाबद्दल तक्रार नोंदवली. पोलिसांनी घटनेचे गांभीर्य पाहता तातडीने रिक्षा चालकाचा शोध घेतला आणि त्याला अटक केली. विशेष म्हणजे मुलीने ऑटो (पान २ वर)

### बजरंग दल, प्रहार कार्यकर्ते धडकले ठाण्यावर

अकोला शहरातील मुख्य पोस्ट ऑफिस रोड ते अनोळखी ठिकाणादरम्यान ही घटना घडली आहे. दरम्यान या घटनेनंतर पोलीस ठाण्यात प्रहार आणि बजरंग दलाचे कार्यकर्ते दाखल झाले होते. त्यांनी पोलीस ठाण्यावर धडक देऊन विनयभंग करणाऱ्या रिक्षा चालकावर कठोर कारवाईची मागणी केली.

# परवाना दरवाढ, वॅट वाढीचा बार असोसिएशनने केला विरोध

**अमरावती/प्रतिनिधीः-** शासनाच्या वतीने विदेशी दारूवर दिड पट वृद्धी आणि परवाना वार्षिक दरांवर १५ टक्के आणि वॅट पाच टक्के वाढवला आहे. या दरवृद्धीचा विदर्भ बार असोसिएशनच्या वतीने विरोध करण्यात आलेला आहे.शासनाला हा निर्णय परत घेण्याची मागणी संचालकांनी केली आहे. या संदर्भात असोसिएशनच्या वतीने १४ जुलै रोजी परमिट रूम बंद ठेवून मोर्चा काढण्यात येणार असल्याची माहिती आज शनिवारी ५ जुलै रोजी पत्रकार परिषद मध्ये परमिट रूम असोसिएशनचे अध्यक्ष नितीन मोहोड यांनी दिली आहे.

त्यांनी सांगितले की, शासनाने बारा वर्षांपूर्वी लावलेला



### १४ ला परमिट रूम बंदचा निर्णय
### लाडकी बहीणमुळे बार व्यवसायावर अन्याय

अन्याकारक वॅट आणि त्यामध्ये केलेल्या वृद्धीमुळे पूर्वीपासूनच बार व्यवसायीक यांच्यावर संकट कोसळले आहे. आता लायसन्स नवीनीकरण वार्षिक शुल्क मध्ये पंधरा टक्के आणि वॅटमध्ये पाच टक्के वाढ करण्याचा निर्णय घेतलेला आहे. दारूवर दीड पट वृद्धी करण्यात आलेली आहे. यामुळे बार व्यवसायिकांवर अन्याय होत आहे. राज्यभरात २० हजार बार (पान २ वर)

# शहरामध्ये टॅक्सच्या नावाखाली दंड आकारणी

### मालमत्ताधारकांना महिन्याला दोन टक्के दंड
### जिल्हाधिकाऱ्यांकडेच हवे दंड माफ करण्याचे सर्वाधिकार
### आमदार लिंगाडे यांची विधिमंडळात मागणी

**बुलढाणा/प्रतिनिधीः-** नगरपालिका क्षेत्रातील मालमत्ताधारकांसाठी आधी मॅन्युअली अर्थात माणसांच्या मार्फत टॅक्स आकारणीचे रजिस्टर लिहिले जायचे. त्यात वर्षभराचा टॅक्स एकदाच यायचा. मात्र आता राज्यभर ऑनलाईन स्वरूपात कॉम्पुटराईज प्रणाली स्वीकारण्यात आली आहे .त्यात एप्रिल ते सप्टेंबर आणि सप्टेंबर ते मार्च असे दोन टप्पे पाडण्यात आले. महत्त्वाचे म्हणजे



पहिला टप्प्याचे ऑक्टोबर पर्यंत टॅक्स बिल न भरल्यास त्यावर महिन्याला दोन टक्के आणि दुसऱ्या टप्प्याचं बिल मार्चपर्यंत न भरल्यास त्यावर प्रत्येक महिन्याचे दोन टक्के अतिरिक्त च्या नावाखाली दंड आकारणी (पान २ वर)

### 'त्या '२६ हजार शिक्षकांना जुनी पेन्शन केव्हा?

राज्यात २००५ पूर्वी टप्पा अनुदानावर लागलेल्या शिक्षकांचा मोठा प्रश्न प्रलंबित आहे. २६ हजार कर्मचाऱ्यांची नेमणूक एक नोव्हेंबर २००५ पूर्वी झाली आहे. मात्र तरी देखील त्यांच्या जुन्या पेन्शनच्या संदर्भातला निर्णय झालेला नाही. सर्वोच्च न्यायालय मध्ये यात याचिका सुरू आहे. त्यात निवडणूक पूर्वी तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी आश्वासन दिले होते की या संदर्भात सरकार सकारात्मक शपथपत्र दाखल करेल. त्यामुळे हे शपथपत्र राज्य सरकारच्या वतीने दाखल झाले आहे काय? जेणेकरून या २६ हजार कर्मचाऱ्यांच्या जुन्या पेन्शनचा मुद्दा निकाली निघेल अशी मागणी आमदार धीरज लिंगाडे यांनी केली आहे.

# भाजप संत गाडगेबाबा मंडळ व विद्यापीठ मंडळ अध्यक्षांच्या कार्यकारीणीची डॉ. नितीन धांडे यांच्याकडून घोषणा

**अमरावती/प्रतिनिधीः-** भाजपा अमरावती शहर जिल्ह्याचे अध्यक्ष यांनी मंडळाच्या बैठकी व नियोजन सुरु केले असुन सुक्ष्म पातळीवर मंडळाचे नियोजन करण्यात येत आहे. यात नुकतेच त्यांनी संत गाडगेबाबा मंडळ व विद्यापीठ मंडळाच्या कार्यकारीणीची नुकतीच घोषणा केली आहे. संत गाडगेबाबा मंडळाच्या अध्यक्षपदी अभिजीत वानखडे यांच्या नेतृत्वात व डॉ. नितीन धांडे यांच्या मार्गदर्शनात कार्यकारीणी पुढील प्रमाणे आहे. यात उपाध्यक्ष पदी अरुणराव मोरे, प्रकाशराव अटाळकर, अनुप देशमुख, विरेंद्र देशमुख, गजानन पानबुडे, वैभव डेहणकर, अमोल सांळुके, राजेंद्र जवंजाळ, रविंद्र दळवी सरचिटणीस पदी अमोल आगरकर, आकाश दानखडे, गणेश खोत, आकाश जाधव. सचिव पदी आश्विन राऊत, प्रियंका चावरे, अर्चना पुंड, सविता ठाकरे, उमेश खोडे, दिपक कवटकर, शरद बावणेर, जयश्री कुबडे, तुळशीदास माने, गणेश राऊत, प्रदिप कुळकर्णी, जयश्री गोवर्धन वानखडे, कोषाध्यक्ष पदी संतोष रामकृष्णराव गोरले व सोशल मेडीया प्रमुखपदी गजानन तोंडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



तसेच मंडळाच्या महिला मोर्चा अध्यक्षपदी माधुरी नितीन दारोकार, युवा मोर्चा अध्यक्षपदी सुमित गुल्हाने, ओ.बी.सी. मोर्चा अध्यक्षपदी राजेंद्र कांगटे व अनुसुचित जाती मोर्चापदी जोगेंद्र दहातोंडे व मन की बात च्या अध्यक्ष पदी वर्षा तायडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

विद्यापीठ मंडळ अध्यक्ष प्रफुल बोके यांच्या नेतृत्वात व डॉ. नितीन धांडे यांच्या मार्गदर्शनात उपाध्यक्ष पदी बाबाराव डीके, अरुण आंबेकर, प्रकाश घाटे, पुंडलिक अंबुलकर, अजय मुधोळकर, अंकीत वाजुरकर तर सरचिटणीस पदी अमित कुळवंत, प्रविण खंडारे, चिटणिस पदी संजय चावके, विशाल लोथे, (पान २ वर)

# २२ दिवसाच्या बाळाला गरम सळाखीने दिले चटके

### अघोरी इलाजाने पुन्हा हादरले मेळघाट

**अमरावती/प्रतिनिधीः-** आजच्या विज्ञान युगातही अंधश्रद्धा ग्रामीण विभागात पाहावयास मिळते. देश चंद्र आणि मंगळ ग्रहावर पोहोचलेला आहे. इंटरनेटने सोशल क्रांती केली आहे. तरी देखील काही आदिवासी कुटुंब आजही अघोरी उपचाराला



प्राथमिकता देतात. एका बावीस २२ दिवसाच्या बाळाला गरम सळाखीने चटके दिल्याचा प्रकार उघडकीस आल्याने मेळघाट पुन्हा एकदा हादरला आहे. या संदर्भात अचलपूर पोलिसांनी गुन्हा देखील दाखल केला आहे. चिखलदरा तालुक्यातील खरपी गावात एका बावीस दिवसाच्या बाळाचे पोट फुलले होते.त्याला कुटुंबाने रुग्णालयात नेण्या ऐवजी एका तांत्रिकाकडे नेले, त्याने अघोरी उपचार म्हणून सरळ त्याच्या पोटावर चटके दिले. कुटुंबाला वाटले होते की बाळाच्या पोटाला जो विकार झाला तो जादूटोण्यामुळे झाला आहे. अंधश्रद्धेच्या चक्रव्यूहात फसलेल्या कुटुंबाने त्या नवजात बालकाला तांत्रिकाच्या (पान २ वर)

# नेट मीटर मंजुरीसाठी लाच मागणारा सहाय्यक अभियंता जाळ्यात

### एसीबीची कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** सौर ऊर्जेला प्रोत्साहन देण्याच्या सरकारी धोरणाच्या पार्श्वभूमीवर नागरिक नेट मीटरसाठी अर्ज करत आहेत. मात्र, याच प्रक्रियेमध्ये अडथळा बनलेल्या महावितरणच्या एका सहाय्यक अभियंत्याला लाच घेताना रंगेहाथ पकडण्यात आल्याची धक्कादायक घटना वरुड येथे घडली आहे. नितीन भगत (वय ४५) असे या



आरोपीचे नाव असून, त्याने ४ हजार रुपयांची लाच मागून तडजोडीअंती ३ हजार रुपयांवर सौदा करताच एसीबीने सापळा रचत त्याला अटक केली. 'सोलर एनर्जी' या कंपनीचे संचालक (पान २ वर)

# मध्यप्रदेशातून आलेल्या ४५० लिटर दारूसह २ लाखांचा मुद्देमाल जप्त

### -एक्साईज विभागाची कारवाई

**वरूड/प्रतिनिधीः-** राज्यात मध्यप्रदेशातून अवैधपणे आणली जाणारी गावठी हातभट्टी दारूची वाहतूक रोखण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाने विशेष मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेअंतर्गत अमरावती विभागाच्या भरारी पथकाने वरूड तालुक्यातील भेमडी शिवारात छापा टाकून सुमारे ४५० लिटर गावठी हातभट्टी दारू जप्त केली. या कारवाईत एकूण २ लाख ८



हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे भेमडी ते शेंदूरजना घाट रस्त्यावर दोन वाहनावर (पान २ वर)

# खुनाच्या गुन्ह्यातील फरार आरोपींना अटक

### चार जणांचा समावेश ; अकोट फाईल पोलिसांची कारवाई

**अकोला/प्रतिनिधीः-** अकोट फाईल पोलिसांनी खुनाच्या गुन्ह्यातील फरार चार आरोपींना मोठ्या शिताफीने अटक केली आहे. इंदौरजवळील महू (मध्यप्रदेश) येथून आरोपींना अटक करून अकोट फाईल पोलिस ठाण्यात आणण्यात आले आहे.

दि. २६ एप्रिल २०२५ रोजी मुलानी चौक येथील सुलताना बी मेहमुद खान (वय ४५) हिला जागेच्या वादातून तिच्या सुनेच्या माहेरच्यांनी संगनमत करून पेट्रोल टाकून



जाळले होते. उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला होता. तिच्या मृत्यूपूर्वीच्या जबाबावरून अकोट फाईल पोलिस ठाण्यात गुन्हा क्र. २५७/२५ भा.दं.सं. कलम १०३(१), ३(५) बीएनएस अंतर्गत खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपी फरार झाले होते. पोलीस निरीक्षक शेख रहीम यांच्या मार्गदर्शनाखाली तीन पथके तयार करण्यात आली. आरोपी सतत आपले ठिकाण आणि मोबाईल सिमकार्ड बदलत असल्याने शोधकार्य कठीण झाले होते. तरीही पोलिसांनी तांत्रिक व बौद्धिक कौशल्याचा वापर करून आरोपींचा (पान २ वर)

# लॉटरी सेंटरच्या आड ऑनलाइन जुगाराचा अड्डा उघड

### गुन्हे शाखेची कारवाई, टीव्ही व इतर साहित्य जप्त- दोन आरोपी अटकेत, दोन फरार

**अमरावती/प्रतिनिधीः-** गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत संत गाडगेबाबा संकुल येथे ऑनलाइन लॉटरी सेंटरच्या आड सुरू असलेल्या अवैध जुगार अड्ड्यावर गुन्हे शाखा युनिट क्रमांक दोनच्या पथकाने छापा टाकत कारवाई केली. या कारवाईत पोलिसांनी टीव्ही व अन्य साहित्य असा एकूण ४८ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. चार जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यापैकी पवन राजू कैथवास (वय २४, महादेवखोरी) आणि



अमन प्रदीप सोनोने (वय २३, केवल कॉलनी) या दोघांना अटक करण्यात आली आहे. तर सेंटरचा मालक अरबाज जानीवाले (फ्रेजरपुरा) आणि नीलेश भेंडे (चैतन्य कॉलनी) हे दोघे फरार आहेत. गुन्हे शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक महेश इंगोले यांच्या नेतृत्वात चमुकडून गुप्त माहितीवरून ४ जुलै रोजी दुपारी ३.१५ वाजता ही कारवाई करण्यात आली. 'फन टारगेट' या वेबसाईटच्या माध्यमातून चक्री ऑनलाइन गेमवर पैशांची बाजी लावून जुगार खेळला जात असल्याचे उघड झाले. पोलिसांनी छाप्यावेळी पवन कैथवास व अमन सोनोने या दोघांना रंगेहाथ पकडले. चौकशीत अरबाज जानीवाले आणि नीलेश भेंडे यांची नावे पुढे आली. मात्र, हे दोघे घटनास्थळी मिळून आले नाहीत. (पान २ वर)

# तेरा फूट लांबीच्या अजगराने घेतला बकरीचा जीव

### सर्पमित्राने वाचविले अजगराचे प्राण

**तिवसा/प्रतिनिधीः-** तालुक्यातील सुरवाडी खुर्द शेत शिवार परिसरात एका १३ फूट लांबीच्या अजगराने अंदाजे वीस किलो वजनाच्या बकरीचा अक्षरशः जीवच घेतला.ही माहिती



सर्पमित्राला मिळताच त्याच्या अथक प्रयत्नाने अजगराचे तर प्राण वाचले मात्र बकरीला यात जीव गमवावा लागला. शुक्रवारी दुपारच्या सुमारास ही घटना घडली तालुक्यातील सुरवाडी येथील शिवारात एका १३ फूट अजगराने (पान २ वर)

# जिल्हा काँग्रेस कमिटीच्यावतीने मंडळ अध्यक्षांची बैठक

### स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी संघटनात्मक तयारीला गती

### बबलू देशमुख यांचे मार्गदर्शन

**अमरावती/प्रतिनिधीः-** आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षाने संघटनात्मक पातळीवर तयारी सुरू केली आहे. याचाच एक भाग म्हणून जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने मंडळ अध्यक्षांची महत्वपूर्ण बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीत



स्थानिक स्तरावर पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यावर जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांनी भर दिला.सदर बैठक माजी मंत्री यशोमती ठाकूर, खासदार बळवंत वानखडे, माजी आमदार वीरेंद्र जगताप, सुधाकरराव भारसाकळे, प्रदीपराव देशमुख,गिरीश कराळे यांच्या प्रमुख उपस्थित पार पडली, याशिवाय बैठकीला जिल्हा काँग्रेसचे पदाधिकारी, तालुका अध्यक्ष (पान २ वर)

# इंस्टाग्रामवर पिस्टलसह 'माफिया आया' ची रील

### राजापेठ पोलिसांची तत्काळ कारवाई

**अमरावती /प्रतिनिधीः-** तरुणाईमध्ये सोशल मीडियावर प्रसिद्धी मिळवण्यासाठी काहीजण मर्यादा ओलांडत आहेत. असाच एक प्रकार अमरावतीतील राजापेठ पोलिसांच्या हद्दीत उघडकीस आला, जिथे एका युवकाने प्लास्टिकच्या पिस्टलसह 'माफिया आया' म्हणत धक्कादायक रील बनवली आणि ती इंस्टाग्रामवर व्हायरल केली. हा प्रकार समाजात भीती पसरवणारा असल्यामुळे पोलिसांनी तात्काळ कारवाई करत



आरोपीला ताब्यात घेतले.

नवाथे चौकातील तापडिया मॉल परिसरात ही रील चित्रीत करण्यात आली होती. पिस्टल हातात घेऊन, माफिया स्टाईलने हा तरुण फिरताना दिसत होता, त्यामुळे (पान २ वर)

# प्रकाशराव सराड यांचे निधन

टाकरखेडा संभू/प्रतिनिधीः- प्रकाशराव यशवंतराव सराड (वय ७६, रा.सोनगाव ह. मु. श्याम नगर,अमरावती) यांचे शुक्रवार दि.०४ जुलै २०२५ ला सायंकाळी ५.१७ वाजता हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले.



ते दि अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे सेवानिवृत्त लेखाधिकारी होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, पुतणे, नातू असा आप्त परिवार आहे. त्यांच्यावर स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

# सारांश

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

❐ रविवार,६ जुलै २०२५ ❐ E-paper - www.janmadhyam.com


## चारोळी

यशाचे मूल्य त्याग असते
त्यागाचे मूल्य प्रेम असते
प्रेमाचे मूल्य जीवन असते
जीवनाचे मूल्य अमूल्य असते...

पौर्णिमेचा चंद्र आज
फारच जवळ आला
माझ्या प्रियेचा मुखडा
त्यात मला दिसला...

मी पोहचत नाही
माझी बदनामी पोहचते
मला लोकांच्या नजरेत
रोज मोठ करते...

तू दिलेल्या जखमेवरील
खपली काढायला हवी
ती काढणारी आता
मला शोधायला हवी ...

**आषाढी एकादशीचे महत्त्व केवळ धार्मिक दृष्टिकोनातूनच नाही तर सांस्कृतिक आणि सामाजिक दृष्टिकोनातूनही खूप मोठे आहे. या दिवशी भक्तांचे एकत्र येणे, उपासना, आणि वारीमधून एकता आणि समर्पणाचे महत्त्व अधोरेखित होते. आषाढी एकादशीच्या दिवशी उपवास केल्याने शरीराला शुद्धता मिळते आणि मनाला शांती मिळते. या दिवशी भक्तांची प्रार्थना आणि उपासना भगवान विष्णूच्या चरणी समर्पित होते.**

# आषाढी एकादशी वारीची परंपरा

आषाढी एकादशी ही हिंदू धर्मातील एक अत्यंत महत्त्वाची आणि पवित्र तिथी आहे. या दिवशी भगवान विष्णूची पूजा केली जाते आणि विशेषत: महाराष्ट्रात पंढरपूरच्या विठोबाच्या मंदिरात लाखो भक्तांची गर्दी होते. वारकरी पूर्ण महाराष्ट्रातून विठ्ठलाच्या दर्शनासाठी पायी दिंडीने येतात. या दिवशी व्रत ठेवले जाते आणि उपवास करून भक्त भगवान विष्णूची उपासना करतात. आषाढी एकादशीला 'देवशयनी एकादशी' असेही म्हणतात कारण या दिवशी भगवान विष्णू क्षीरसागरात योगनिद्रेत जातात.

वारीची परंपरा

आषाढी एकादशीच्या दिवशी महाराष्ट्रातील पंढरपूर येथे विठ्ठलाची वारी केली जाते. ही वारी म्हणजे महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाची एक अत्यंत महत्त्वाची धार्मिक यात्रा आहे. या वारीत हजारो वारकरी पंढरपूरकडे जातात आणि विठोबाच्या चरणी माथा टेकवतात. पंढरपूरची वारी ही भक्ती आणि श्रद्धेचा महाकुंभ आहे ज्यात वारकरी, महिला, मुले, आणि वृद्ध सर्वजण सहभाग घेतात. वारीचे गीत, भजन, आणि अभंग यांचे गायन भक्तांना आध्यात्मिक आनंद देतात.

वारीत सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांना आध्यात्मिक आनंद मिळतो. त्यांना वाटेत आलेल्या कष्टांची पर्वा नसते. वारकरी एकमेकांना 'माऊली' म्हणून संबोधतात आणि सर्वजण एकत्र येऊन विठोबाच्या भक्तीत मग्न होतात. वारीतून आपसातील एकता, प्रेम, आणि समर्पणाचे दर्शन घडते. वारकरी संप्रदायात कोणताही भेदभाव नसतो आणि सर्वजण एकत्र येऊन विठोबाच्या भक्तीत लीन होतात.

वारीमधून सामाजिक समरसता आणि एकतेचे महत्त्व स्पष्ट होते. वारकरी संप्रदायात कोणत्याही जाती, धर्म, किंवा वर्गाचा भेदभाव नसतो. सर्वजण एकत्र येऊन विठोबाच्या भक्तीत लीन होतात. वारीतून आपसातील भेदभाव दूर होतो आणि एकतेचा संदेश दिला जातो. वारीच्या माध्यमातून सर्वजण एकत्र येऊन भक्तीमय वातावरणात भगवान विष्णूच्या उपासनेत तल्लीन होतात.

पंढरपूरचे विठ्ठल मंदिर

पंढरपूरचे विठ्ठल मंदिर महाराष्ट्रातील एक अत्यंत प्रसिद्ध तीर्थक्षेत्र आहे. या मंदिरात आषाढी एकादशीच्या दिवशी लाखो भक्तांची गर्दी होते. पंढरपूरच्या विठोबाला भगवान कृष्णाचे स्वरूप मानले जाते. या मंदिरात रुक्मिणी देवीचेही दर्शन घेता येते. मंदिराच्या परिसरात भक्तगण विठोबाच्या नामस्मरणात तल्लीन होऊन भजन, कीर्तन, आणि अभंग गायन करतात.

आषाढी एकादशीचे धार्मिक महत्त्व

आषाढी एकादशीचे धार्मिक महत्त्व खूप मोठे आहे. या दिवशी उपवास करून भगवान विष्णूची उपासना केल्यास सर्व पापांचे निवारण होते आणि मोक्षाची प्राप्ती होते असे मानले जाते. या तिथीला 'पद्म एकादशी' असेही म्हटले जाते. भक्त या दिवशी निर्जळी उपवास करतात आणि संध्याकाळी विष्णूची कथा ऐकून व्रत समाप्त करतात. भगवान विष्णूच्या या उपासनेमुळे त्यांच्या भक्तांच्या जीवनात शांती, समृद्धी, आणि सुख येते असे मानले जाते.

आषाढी एकादशीची व्रत परंपरा

आषाढी एकादशीच्या दिवशी उपवास आणि व्रत करण्याची परंपरा आहे. या दिवशी भक्त अन्न आणि पाणी त्याग करून भगवान विष्णूची उपासना करतात. काही भक्त निर्जळी उपवास करतात तर काही फळाहार घेतात. व्रताच्या दिवशी भक्त ध्यान, जप, आणि प्रार्थना करतात. भगवान विष्णूच्या कथा ऐकून भक्तांना त्यांच्या जीवनातील अडचणींवर मात करण्याची प्रेरणा मिळते.

आषाढी एकादशीचे महत्त्व

आषाढी एकादशीचे महत्त्व केवळ धार्मिक दृष्टिकोनातूनच नाही तर सांस्कृतिक आणि सामाजिक दृष्टिकोनातूनही खूप मोठे आहे. या दिवशी भक्तांचे एकत्र येणे, उपासना, आणि वारीमधून एकता आणि समर्पणाचे महत्त्व अधोरेखित होते. आषाढी एकादशीच्या दिवशी उपवास केल्याने शरीराला शुद्धता मिळते आणि मनाला शांती मिळते. या दिवशी भक्तांची प्रार्थना आणि उपासना भगवान विष्णूच्या चरणी समर्पित होते.




**आधुनिक काळातील आषाढी एकादशी**

आधुनिक काळातही आषाढी एकादशीचे महत्त्व कमी झालेले नाही. आजही लाखो भक्त या दिवशी उपवास करतात आणि भगवान विष्णूची उपासना करतात. पंढरपूरची वारीही आजही अत्यंत भव्य आणि दिव्य स्वरूपात साजरी केली जाते. वारीच्या माध्यमातून भक्तांना एकत्र येण्याची आणि आपसातील प्रेम, श्रद्धा, आणि भक्तीचे दर्शन घडवण्याची संधी मिळते.

**निष्कर्ष**

आषाढी एकादशी ही हिंदू धर्मातील एक अत्यंत पवित्र आणि महत्त्वपूर्ण तिथी आहे. या दिवशी उपवास करून भगवान विष्णूची उपासना केल्यास भक्तांना पापमुक्ती आणि मोक्ष प्राप्त होते असे मानले जाते. पंढरपूरची वारी ही भक्ती आणि श्रद्धेचा महाकुंभ आहे ज्यात वारकरी संप्रदायातील लाखो भक्त सहभागी होतात. आषाढी एकादशीच्या उपासनेमुळे भक्तांना शांती, समृद्धी, आणि सुख प्राप्त होते. आधुनिक काळातही या तिथीचे महत्त्व अबाधित आहे आणि भक्त या दिवशी उपवास आणि उपासनेत तल्लीन होतात.

आषाढी एकादशीच्या माध्यमातून आपसातील एकता, प्रेम, आणि श्रद्धेचे महत्त्व अधोरेखित होते. या तिथीच्या उपासनेमुळे भक्तांना जीवनातील अडचणींवर मात करण्याची प्रेरणा मिळते. आषाढी एकादशीच्या पवित्र दिवशी भगवान विष्णूच्या चरणी समर्पित होऊन भक्तांना आध्यात्मिक आनंदाची प्राप्ती होते.



# एक तरी वारी...

**अनुभवावी घरोघरी**

महाराष्ट्राची वैभवी परंपरा असलेली व लाखो लोकांचे श्रद्धास्थान असलेली पंढरपूरची 'आषाढी वारी' म्हणजे सगळ्यांच्याच जिव्हाळ्याचा विषय. मात्र सध्याच्या एकूणच परिस्थितीमुळे यंदाही वारी नेहमीच्या पद्धतीने, लाखोंच्या समुदायाने टाळ-मृदंगाच्या गजरात जात नसून सुरक्षेचे नियम पाळत मोजक्या लोकांच्या उपस्थितीत जात आहे. गेल्या वर्षीही वारी अशीच झालेली. त्याची खंत प्रत्येकाला आहे. मात्र सध्या तरी धोका पत्करण्यात अर्थ नाही हेही तितकेच खरे.

*मागे पदार्थ जाला तो बरा।*
*परी आतां तरी विचार धरा।*
*यदर्थी तटावला तोचि खरा।*
*रामीरामदास म्हणे ।।*

सारांश : याआधी जे काय झाले ते झाले, पण आता तरी तू विचार कर. यामध्ये (परमार्थामध्ये) धैर्याने टिकला तोच खरा! असं मला वाटते. त्यामुळे मनाशी दुःख न बाळगता आताही आपण वारीचा आनंद कसा घेऊ शकतो हे पाहणे जास्त श्रेयस्कर! सेवाभावातला पांडुरंग आपल्याला सहज दिसू शकेल. वारीला जाता आले नसले, तरी सेवाभाव जागवत भक्तांना मनामनातील पांडुरंग जपता येऊ शकतो, हे मी स्वानुभवाने सांगतो.

ठराविक दिवसांची वारी तर एक निमित्त आहे. त्या दिवसाव्यतिरिक्त अगदी वर्षभर आपण वारीचा आनंद घेऊ शकतो. इतकेच नव्हे तर त्यातून जो आत्मानंद मिळतो, तो प्रत्यक्ष वारीत सहभागी झाल्याइतकाच उच्च असतो.



मी स्वतः काही वर्ष पुणे ते सासवड अशी वारी केली आहे आणि दुसऱ्या बाजूला समाजातील वंचित घटकांमध्ये पांडुरंग पाहून त्याची जमेल तशी सेवाही केली आहे. माझी प्रत्येक दिवाळी अशा वंचित घटकांसोबत साजरी होते. त्यासाठी मग कधी श्रीगोंद्याचा महामानव बाबा आमटे वसतिगृहातील पारध्यांच्या मुलामध्ये मिसळतो. तिथले प्रत्येक मूल कौतुकाने जवळ घेत त्याच्या हातावर दिवाळीचा फराळ ठेवतो. त्यावेळी त्या बालमुखातून जणू मला पांडुरंग दिसतो. तिथल्या वसतिगृहातील खांबाला धरून मी उभा राहून त्या मुलांशी गप्पा मारताना नकळत पंढरपूर मंदिरातील गरुडखांबाचा भास होतो. तर कधी इंदापूरला गेल्यावर तिथल्या श्रावणबाळ आश्रमातील अनाथ विद्यार्थ्यांना मिठी मारताना साक्षात जिवाशिवाची भेट झाल्याचा आनंद होतो. ज्या शेतकऱ्यांनी दुर्दैवाने आत्महत्या केल्या त्यांच्यापैकी काहींच्या अनाथ मुलांना सांभाळणारे अहमदनगर जवळच्या केडगाव येथे 'सावली' वसतिगृह आहे. तिथेही माझी दिवाळी अशीच मस्त साजरी होते.

जसे प्रत्यक्ष वारीतल्या वारकऱ्यांची सेवा करणारे, त्यांच्या चपला दुरुस्त करून देणारे, पाय दाबून देणारे इतर अनेक असतात जे त्या कामाचे एक तर पैसे घेत नाहीत किंवा अतिशय किरकोळ किंमत घेतात. याचे कारण त्यांच्या मते त्यांना स्वतःला जरी वारीला जाता येत नसले तरी किमान जे जात आहेत त्यांची सेवा केली तरी ती पांडुरंगापर्यंत पोहोचते, ही त्यामागची श्रद्धा असते. अगदी तसाच अनुभव मलाही आला. लॉकडाऊन काळात हातावर पोट असणाऱ्या ज्या-ज्या घटकांना आम्ही रेशन पुरवठा सुरू केला त्या-त्या वेळी ज्यांच्याकडून आम्ही धान्य घ्यायचो ते दुकानदार अगदी कमी किमतीत ते आम्हाला द्यायचे. हे धान्य वाहून नेण्यासाठी आम्ही जो टेम्पोवाला ठरवला होता तर त्यानेही 'फक्त डिझेल भरून द्या, बाकी भाडे नको' असे म्हणाला. ज्यांचे स्वतःचेच जगण्याचे वांदे झालेले तेही जेव्हा असे मदतीसाठी पुढे येतात. तेव्हा मी निरुत्तर होतो. सेवाभावातला पांडुरंग मला असा ठायी ठायी अगदी सदेह रूपात पाहायला मिळतो.

आता मला सांगा, अशी वारी तुम्हीदेखील घरोघरी करू शकता ना? त्यातून तितकाच परम आनंद मिळणार आहे. आणि संत गाडगेबाबांनी तरी वेगळं काय सांगितलं? 'माणसात देव पाहा, त्याची सेवा करा, तीच खरी देवपूजा आहे.' विशेष म्हणजे अशा सामाजिक वारीसाठी कधी काही अडले तर जसे जनाबाईच्या मदतीला पांडुरंग धावून आला, तसा तो इतर कुठल्या रूपातून तुमच्याही मदतीला येतोच येतो. अनेक निमित्ते जणू पांडुरंगच समोर आणून ठेवतो असे मला वाटते आणि कमरेवर हात ठेवून जणू तो विचारतो की, 'न मागता तुला सगळं मी दिलं आहे. आता तू काय करतो ते मला पाहायचं आहे.'

पांडुरंगाच्या त्या आत्मिक आवाहनाला सार्थ ठरवण्यासाठी मग जणू दहा हत्तीचे बळ अंगी येते. शिवाय या कामात प्रसंगी आपण अडचणीत येऊ शकतो, हा विचारही मनात येत नाही कारण त्यावेळी मनाशी एक विश्वास असतो की, मी जर लोकांच्या अडचणी सोडवण्यासाठी जातोय तर त्यावेळी एक तर मला काही अडचण येणार नाही आणि आलीच तर देव ते पाहून घेईल. हे सगळे मी जे स्वतः अनुभवले तेच इथे सांगितले. याचे कारण म्हणजे उगीच पुस्तकी भाषा व उदाहरणे देत बसण्यापेक्षा जे स्वतः अनुभवले तेच मांडणे जास्त श्रेयस्कर!

आपण जिथे कुठे असू, तिथूनही बसल्या जागी वारी करता येते. अगदी तुमच्या घरी कामाला येणाऱ्या बाई असतील किंवा सोसायटीचा वॉचमन असेल, दूधवाला असेल, भाजीवाली असेल अशा सगळ्यांमध्ये तुम्हाला देव भेटू शकतो. कारण आपल्या संस्कृतीतच म्हटले आहे की आपण सगळी देवाची लेकरे असून प्रत्येकामध्ये देवाचा अंश आहे. मग त्या 'अंशांचीच' पूजा बांधूया. त्याच्यासाठी त्याच्यापर्यंत आपण आपल्या पायांनी जाणे हीच तर आताची वारी होईल ना? आणि मग पहा, खरोखर तुम्हाला पांडुरंगाचे दर्शन तर घडेलच, शिवाय ज्याच्यासाठी तुम्ही मदतीला धावून गेलात ती मंडळीसुद्धा जन्मभर तुमचे जणू सगेसोयरे होतील !

संतांनीही हाती घेतलेल्या कामातच देव पाहिला व भोवताली असलेल्या लोकांची सेवा करण्यात धन्यता मानली. अशी ही त्यांनीच घालून दिलेली परंपरा आपण पुढे नेऊया आणि अनोखी अशी समाजवारी करूया!





# उन्हाळ्यात 'हे' फुटवेअर ट्रेंडमध्ये



उन्हाळ्याच्या कडक उन्हात केवळ कपड्यांचीच नव्हे, तर पावलांवरील फुटवेअरची निवडही तितकीच महत्त्वाची ठरते. यंदाच्या उन्हाळ्यात फॅशनच्या दुनियेत काही खास फुटवेअर प्रकारांची चलती पाहायला मिळत आहे. स्टाईल आणि कम्फर्टचा योग्य मेळ साधणाऱ्या या ट्रेंडनी तरुणाईला आकर्षित केले आहे.फॅशनेबल दिसणं महत्त्वाचं असलं, तरी दीर्घकाळाच्या आरोग्यासाठी योग्य फुटवेअरची निवड अत्यावश्यक ठरते. चुकीच्या पद्धतीच्या चपला, बूट किंवा सँडलमुळे पायांमध्ये वेदना, पंजातील बिघाड, गुडघ्यांचे त्रास आणि पाठीचा ताण निर्माण होतो. त्यामुळे 'स्टाईलपेक्षा हेल्थ' हे धोरण पाळून आरोग्यासाठी उपयुक्त फुटवेअरची निवड करणं गरजेचं आहे.

फुटवेअरची योग्य निवड म्हणजेच दीर्घकालीन आरोग्याचा पाया -फॅशनच्या नादात आरोग्याचा विचार न करता चपला खरेदी केल्या जातात. मात्र, योग्य फुटवेअरमुळे फक्त पाय नव्हे, तर गुडघे, कंबर आणि मणक्यालाही आधार मिळतो. त्यामुळे 'आरामदायक चपला म्हणजे फक्त ज्येष्ठांसाठी' हा गैरसमज दूर करून प्रत्येक वयोगट

**१. स्लायडर्स आणि फ्लॅट्सचा जलवा**

हवेशीर, सहज घालता येणारे आणि स्टायलिश असे स्लायडर्स तरुणांमध्ये सर्वाधिक लोकप्रिय आहेत. विविध रंग, डिझाईन्स आणिब्रँड्समध्ये उपलब्ध असलेले हे फ्लॅट फुटवेअर कॉलेज युवतींपासून ऑफिसगोईंग महिलांपर्यंत सगळ्यांची पसंती मिळवत आहेत.

**२. स्पोर्ट्स सँडल्स – ॲक्टिव्ह लुकसाठी हिट**

दैनंदिन वापरासाठी आरामदायक आणि टिकाऊ पर्याय म्हणून स्पोर्ट्स सँडल्सना पसंती दिली जात आहे. खासकरून बाहेर फिरणाऱ्या तरुणांमध्ये त्यांची मागणी वाढली आहे.

**३. कोल्हापुरी चप्पल्स – पारंपरिक लुकला मॉडर्न टच**

कोल्हापुरी चप्पल्स पुन्हा एकदा फॅशनमध्ये परतल्या आहेत. हलक्याफुलक्या कापडी कुर्त्यांबरोबर या चप्पल्स फारच खुलून दिसतात. यामध्ये रंगीबेरंगी धाग्यांनी सजवलेले मॉडर्न डिझाइन्स सध्या हिट आहेत.

**४. व्हाइट स्नीकर्स – ऑल टाइम फॅशन स्टेटमेंट**

अगदी साडीपासून जीन्सपर्यंत कोणत्याही आउटफिटवर शोभून दिसणारे व्हाइट स्नीकर्स हे यंदाच्या उन्हाळ्यातील 'मस्ट हॅव' फुटवेअर ठरले आहेत. मुलींच्या फॅशनमध्ये याने वेगळीच क्रांती घडवली आहे.

**५. रफ अँड टफ चप्पल्स – ट्रॅव्हलर्ससाठी खास**

ट्रेकिंगला जाणाऱ्यांपासून लॉन्ग वॉक करणाऱ्यांसाठी रफ अँड टफ चप्पल्स हे बेस्ट ऑप्शन मानले जात आहे. त्यातील अँटी-स्लिप आणि वॉटर रेसिस्टंट फीचर्समुळे यांची लोकप्रियता वाढली आहे.

... तर आरोयसाठी उपयुक्त

**१. ऑर्थोपेडिक चप्पल्स – पाठीचा त्रास टाळण्यासाठी लाभदायक**


कम्फर्टेबल सोल्स, योग्य आर्च सपोर्ट आणि शॉक अब्जॉर्बिंग तळव्यासह येणाऱ्या ऑर्थोपेडिक चप्पल्स मध्यमवयीन आणि ज्येष्ठांसाठी फायदेशीर ठरतात. विशेषतः लांब वेळ उभं राहणाऱ्यांना याचा उपयोग होतो.

ॲनाटॉमिक सोल्स असलेले फुटवेअरज्याच्या सोलची रचना पायाच्या नैसर्गिक वाकड्यांनुसार केली जाते, अशा फुटवेअरमध्ये चालताना ताण कमी होतो. हाय आर्च किंवा फ्लॅट फुट असणाऱ्यांसाठी हे आदर्श ठरते.

**३. मेमरी फोम इनसोल शूज – सतत चालणाऱ्यांसाठी वरदान**

मेमरी फोम शूज हे पायाच्या शेपप्रमाणे सोलला आकार देतात आणि चालताना झालेल्या दडपणाचा परिणाम कमी करतात. धावपळीच्या जीवनशैलीत हे शूज आरोग्याच्या दृष्टीने लाभदायक ठरतात. त्वचेला श्वास घेण्यासाठी मोकळीक उन्हाळ्यात ओपन-टो सँडल्समुळे पायाला हवा मिळते आणि घामामुळे होणाऱ्या संसर्गांचा धोका कमी होतो. विशेषतः डायबेटिक रुग्णांसाठी अशा प्रकारचे सँडल्स सुरक्षित मानले जातात.

# साता समुद्रापलीकडे एक वेगळेच जग



१५०६ मध्ये पोर्तुगीज संशोधक ट्रिस्टाओ दा कुन्हा यांनी शोधलेला हा द्वीपसमूह सात समुद्रांच्या पलीकडे एक वेगळाच जग आहे आणि तो मनमोहकपणे सुंदर आहे. त्याच्या दुर्गम स्थानामुळे आणि प्रतिकूल हवामानामुळे, हे बेट अनेक शतके निर्जन राहिले आणि आजही या बेटाची लोकसंख्या फक्त २३४ आहे. या बेटाचे नाव ट्रिस्टन दा कुन्हा आहे. हे दक्षिण आफ्रिकेतील केपटाऊनपासून अंदाजे २,७८७ किमी अंतरावर आहे आणि दक्षिण अटलांटिक महासागरात वेगळे आहे. ज्वालामुखी बेटांचा हा समूह सर्व बाजूंनी समुद्राने वेढलेला आहे, येथे पोहोचल्यावर तुम्हाला स्वर्गात पोहोचल्यासारखे वाटेल.

**ट्रिस्टन दा कुन्हा**

२०१८ पर्यंत या बेटावर ब्रिटिश ओव्हरसीज टेरिटरीज नागरिकत्व असलेले २५० कायमचे रहिवासी होते आणि मिळालेल्या माहितीनुसार, आता तेथे फक्त २३४ लोक राहतात.

ब्रिटीश ओव्हरसीज टेरिटरी म्हणून, ट्रिस्टन दा कुन्हाचे स्वतःचे संविधान देखील आहे, तथापि, मुख्य बेटावर कोणतेही हवाई पट्टी नाही आणि प्रवास फक्त बोटीनेच करावा लागतो. येथे पोहोचण्यासाठी दक्षिण आफ्रिकेपासून सहा दिवसांचा प्रवास करावा लागतो. ट्रिस्टन दा कुन्हा हे स्वतः एक ज्वालामुखी बेट आहे, ज्याचे एक प्रमुख ज्वालामुखी शिखर आहे. त्याला क्वीन मेरी पीक म्हणतात.

१५०६ मध्ये पोर्तुगीज संशोधक ट्रिस्टाओ दा कुन्हा याने द्वीपसमूह शोधला आणि अनेक शतके बेटे निर्जन राहिले. १८१६ मध्ये ब्रिटीश सैनिकांचा एक गट काही नागरिकांसह येथे आला, ज्यात काही मुले आणि महिलांचा समावेश होता.

नेपोलियन बोनापार्टला सेंट हेलेना येथून पळून जाण्यापासून रोखण्यासाठी ब्रिटिश सैन्य ट्रिस्टन दा कुन्हा येथे राहत होते असे म्हटले जाते.

Tristan da Cunha निर्जन बेट असल्याने, हे बेट अद्वितीय वनस्पती आणि प्राण्यांचे घर आहे आणि वन्यजीव प्रेमी आणि संशोधकांसाठी एक स्वर्ग आहे. मेगाहर्ब्ससारख्या अद्वितीय वनस्पती प्रजाती येथे आढळतात. या बेटाचे आणखी एक खास वैशिष्ट्य म्हणजे येथे अटलांटिक पिवळ्या नाकाचे अल्बट्रॉस आणि नॉर्दर्न रॉकहॉपर पेंग्विन सहज पाहता येतात. ही अशी जागा आहे जिथे वेळ थांबतो आणि शांती अनुभवतो.

## राशीभविष्य

**दिनविशेष- ६ जुलै देवशयनी एकादशी,८ जुलै भौमप्रदोष, १० जुलै गुरूपौर्णिमा**

**ग्रहयोग-गुरू, रवि,मिथुन, बुध वक्र,मंगळ, केतु,सिंह, राहू,कुंभ**

**चंद्रभ्रमण- तुळ ,वृश्चीक, धनु, मकर**

**दिनांक ६ ते १२ जुलै २०२५**

प्राचार्य डॉ.अनिल श्री.खांडेकर
अमरावती. मो.९४२२९१५६६६

### करार लाभदायी होतील

**मेष** - राशीस्वाामी मंगळ पंचमात, लाभात राहु पराक्रमात रवि गुरु असुन शुक्र द्वितियात प्रवेश करील असल्याने सप्ताहाची सुरूवात दमदार असून भक्तीमार्गात याल. पंढरपूर यात्रा पावन करील गुरू पौर्णिमा भाग्याची साथ मिळून सर्वच क्षेत्रात यशस्वी राहाल.उद्दीष्ट पूर्ण कराल.संपर्क होवून निर्णय घ्याल. सप्ताहाचा उत्तरार्ध प्रशस्त राहून यश टप्प्यात राहील. दि. १० ते १२

### आर्थिक उलाढाली होतील

**वृषभ** - राशीस्वामी शुक्र राशीवर द्वितियात रवि गुरु पराक्रमात बुध असून पत्र व्यवहार सुरळीत होतील देवशयनी एकादशी भावभक्तीने न्हावून निघेल. व्यावसायीक समस्या सुटतील गुरू पौर्णिमा शुभवार्ता देवून आर्थिक स्थैर्य लाभेल, सोमवार, मंगळवार आराखडा पूर्ण कराल सप्ताहअखेर वळण मिळेल. एजंट,एजन्सी, मंगडळींनी पथ्य बाळगावी लागेल. दि. ७,८,१२

### सर्वस्तरातुन संधी येतील

**मिथुन**- राशीस्वामी बुध द्वितियात, रवि गुरू राशीवर पराक्रमात मंगळ असल्याने देवशयनी एकादशी भक्तिरसात डुबेल गुरू पौर्णिमा आत्मबल वाढवील. मनोकामना पूर्ण होइन आत्मविश् वास वृध्दीगंत होईल. एजेन्ट, एजन्सी कमीशन वर्गाना अनुकूलता लाभून देवघेव करू शकाल वसुली होइल.. व्यावसायीक बाजु भक्कम राहील शैक्षणीक संधी चालुन येतील. अति आत्मविश्वास दाखवू नका. विचाराने वागा. दि. ६,९१०

### वर्चस्व कायम

**कर्क** - राशीस्वामी चंद्र-चतुर्थात असुन सप्ताह अखेर अष्टमातुन जाईल, राशीवर बुध, लाभात शुरू, द्वितियात मंगळ असुन व्यवहार हातावेगळी करू शकाल. रवि गुरु धार्मीक ठिकाणी प्रवास घडवतील एकादशी मनोकामना पूर्ण करील गुरुपौर्णिमा पारमार्थीक कार्यात योगदान देईल यासाठी वेळ दयाल, सोमवार, मंगळवार भेटीगाठी उत्साह वाढतील योजना गती होईल. प्रतिक्रिया किंवा शब्दजपून वापरा. वाहनानियंत्रण ठेवा.दि.७,८,१२

### क्षेत्रात दैदिप्यमान राहाल ?

**सिंह** - राशीस्वामी रवि लाभात गुरू सोबत, राशीवर मंगळ, सप्तमात राहु असुन दशमात शुक्र त्यायोगे सिंह वलय वाढेल देवशयनी एकादशी योजना कार्यान्वीत करील, निर्णय राबवाल गुरू पौर्णिमा संधी चालून आणील कार्यक्षेत्र विस्तारेल, दिलासा देणारी घटना घडतील, सप्ताहाची सुरुवात दमदार राहुन बुधवार, गुरुवार प्रगतीच्या टप्पा पूर्ण कराल. सरकारी दरबारात वर्चस्व स्थापन कराल.दूर्लक्ष करू नका दि. ८, ९, १०,

### सामाजिक क्षेत्र विस्तारेल

**कन्या**- राशीस्वानी बुध लाभात, दशमात रवि शुरु भाग्यात शुक्र, सप्ताहात शुक्र असल्याने सप्ताहात चंद्रभ्रमणाची जोड लाभेल. धार्मीक कार्यात रुची असून देवशयनी एकादशी आर्थीक प्रश्न सोडतील पुर्वार्ध यशदायी ठरेल गुरू पौर्णिमा सामाजीक स्तर व माननीय असेल कार्यात पारदर्शी भुमिकेमुळे खुलून दिसाल अधिकारी वर्गाची साथ मिळून शैक्षणीक क्षेत्रात एक पाऊल पुढे पडेल. साप्ताहअखेर कार्यात दिलासा मिळेल. दि.६ ते ८,१२

### बोलणी यशस्वी होईल

**तुळ** - राशीस्वामी शुक्र अष्टमात, भाग्यात रवि, शुक्र, दशमात बुध असुन त्यायोगे भाग्याची जोड लाभेल धार्मीक कार्यातुन देवदर्शन, यात्रा घडतील. भकिमार्गात देवशयनी एकादशी मंत्रमुग्ध करील गुरू पौर्णिमा करार-मदाराचीठरेल बोलणी यशस्वी होईल .चंद्र भ्रमन उत्साह वाढवील इतरांवर विसंबुन राहू नका मित्रपरिवारात दक्ष राहा बंधु भावंडाकडून शुभसंकेत मिळतील सामाजीक क्षेत्रात वर्चस्व राहील वारसा हक्काचे प्रश्न सुटतील.दि. ६, ८ से १०

### उत्साहाचे वातावरण

**वृश्चीक** -राशीस्वामी मंगळ दशमात, भाग्यात बुध, सप्तमात शुक्र असल्याने जोडीदाराची मोलाची साथ मिळेल पंढरपुरीएकादशी पारमार्थीक कार्यात योगदानाची असेल. संपर्क होवुन ज्येष्ठाची साथ मिळेल गुरू पौर्णिमा आर्थीक स्त्रोत वाढतील संधी चालुन येईल उत्तरार्थ प्रभावी असेल पारीवारात उत्साही वातावरण दिसुन येईल. व्यवहारात लाभ होवून उद्योगी, व्यावसायीक मंडळी समाधानी दिसतील. दि. ९ ते १२

### आत्मबल उंचावेल

**धनु**-राशीस्वामी गुरू सप्तमात रवि सोबत, भाग्यात मंगळ, पराक्रमात राहु व्यापारातील कार्यक्षेत्र विस्तारेल बाजारपेठेत शब्दाला किंमत राहील, प्रवासातुन संधी-चालुन येईल, उद्योगी स्वभाव स्वस्थ् बसू देत नाही, वरिष्ठांच्या भावना जपाला लागतील, देवशयनी एकादशी व्यवहारात फायदा करून देईल गुरू पुर्णिमा आत्मविश्वास वाढतील, कौतुकास पात्र असतील, व्यकितमत्वाचा प्रभाव पडेल. अनावश्यक खर्च वाढला. १० ते १२

### कर्तव्य पार पाडाल

**मकर**- राशीस्वामी शनि तृतीयात, द्वितिमात राहु,पंचमात शुक्र असुन प्रणाली रवि, शुरु षष्ठात सामाजीक क्षेत्रात उल्लेखनीय राहाल. अनुकूल वातावरण प्रसन्न राहुल देवशयनी एकादशी प्रतिष्ठेत भर टाकील, गुरुपुर्णिमा परोपकारी कार्यात झोकुन देईल कृती अचुक राहुन व्यवहारातील प्रकरणे मार्गी लावाल पुर्वार्ध फायदा करून देणारी आहे सप्ताहअखेर परिस्थिती पुर्वपदावर होईल आरोग्याची वेळीच काळजी घ्या. खर्चावर नियंत्रण हवा. दि. ६,८,१२

### पताका फडकवाल

**कुंभ**- राशीस्वामी शनि द्वितियात, पंचमात रवि, गुरू सप्तमात मंगळ, केतु असल्याने चंद्रभ्रमणाची जोड लाभून चढत्या क्रमाने यशस्वी असेल पंढरपुरयात्रा सर्वस्तरातुन महत्वपूर्ण ठरेल आर्शीवाद मिळेल गुरू पौर्णिमा पताका फडकविल. महत्वाकांक्षा पूर्ण होतील, माननीय राहाल घरात उत्तम खरेदी होईल वर्दळ राहुन शैक्षणीक कार्यात प्रतिसाद मिळेल जोडीदाराच्या भावना सांभाळा मतभेद वेळीच हाताळा, विद्यार्थ्यांना उत्तम मार्गदर्शन मिळेल.दि. ६ से १०

### प्रशसनीय राहाल

**मीन** -राशीस्वामी शुक्र रवि सोबत पराक्रमात शुक्र, पंचमात बुध पंढरपुरी एकादशी भक्तिरसात नेईल. शुभसंकेत मिळेल कमीशन, दलाल, एजन्सी वर्गाना लाभ दिसेल गुरू पौर्णिमा सामाजीक क्षेत्रात महत्वपुर्ण ठरेल प्रशसनीय राहाल कार्यात यशाची झालर बहरेल चंद्रभ्रमात यश, प्रतिष्ठा लाभून चढत्या क्रमाने देईल स्थावर युक्त उलाढाल कराल बंधुभावंडाची मोलाची ठरेल. दि. ७ ते १२

# घरात ताजेपणा देणारी रोपे



पारंपरिकपणे म्हणजे रखरखीत हवा, वाढते तापमान आणि सुकलेली झाडंझुडपं. पण घराच्या आतील वातावरणात निसर्गाची हरित सळसळ टिकवण्यासाठी काही खास रोपे उपयुक्त ठरतात. ही रोपे केवळ सौंदर्य वाढवत नाहीत, तर हवेतला ताजेपणाही जपतात.उन्हाळ्याचे तापते चटके सगळीकडे जाणवतात. घरात थोडा हरितस्पर्श आणि थंडावा मिळावा यासाठी घरगुती रोपे लावण्याची परंपरा महाराष्ट्रात पूर्वीपासून आहे. आजही बाजारात सहज उपलब्ध असलेली काही स्थानिक आणि सुलभ देखभाल करता येणारी रोपे उन्हाळ्यात घरासाठी उत्तम ठरतात.हे रोप घराच्या कोपऱ्यात ठेवण्यासाठी योग्य आहे. यामुळे घरात थंडावा आणि हरित सौंदर्य टिकते.

**सापाचा वनस्पती (स्नेक प्लांट)**

या रोपाला कमी पाणी लागते आणि कमी उजेडातही हे उत्तम वाढते. हे हवेतले विषारी घटक शैंषून घरात शुद्ध हवा तयार करण्यास मदत करते.

**मनी प्लांट**

सहज एल्स्सी वाढणारे आणि कमी देखभालीची गरज असलेले हे रोप घरात सकारात्मक ऊर्जा वाढवते, असे मानले जाते. पाण्यात किंवा मातीमध्ये लावता येते.औषधी गुणधर्मांनी भरलेले हे रोप उन्हाळ्यात त्वचेसाठी तर फायदेशीर आहेच, पण घरात थोडी आर्द्रता राखण्यासही मदत करते.

**पोथोस (डेव्हिल्स आयव्ही)**

ही लवचिक वेलीप्रमाणे वाढणारी वनस्पती आहे. ती लटकवून किंवा मातीमध्ये लावून सजावटही करता येते.

**तुलसी (पवित्र व हवा शुद्ध करणारी)**

तुळशीचं झाड हे प्रत्येक मराठी घराच्या अंगणात किंवा गॅलरीत दिसतं. उन्हाळ्यात या रोपाला थोडं पाणी, थोडा सूर्यप्रकाश आणि मायेची निगा लागते. याचे धार्मिक महत्त्व तर आहेच, पण तुलसी हवेतले जीवाणू नष्ट करण्यातही मदत करते.

**अडुळसा (औषधी गुणधर्म असलेले स्थानिक रोप)**

अडुळसा हे दम्याच्या व खोकल्याच्या त्रासावर उपयोगी पडणारे वनस्पती आहे. उन्हाळ्यात याच्या पानांचा उपयोग थंडावा देण्यासाठी केला जातो. घरात मोकळ्या जागी हे लावल्यास आरोग्यासाठीही फायदेशीर ठरते.

**गुलबकावली (गंध आणि थंडावा देणारे फुलझाड)**

हे फुलझाड एल्स्सी घरात लावल्यास दरवळ आणि थोडा थंडावा मिळतो. सकाळच्या सौम्य उन्हात हे चांगले फुलते. गॅलरीमध्ये कुंडीत लावले तर सौंदर्यही वाढते.

**पारिजातक (शेवंतीसारखे फुलणारे झाड)**

पारिजातकाचे फूल सौंदर्य व सुवास देणारे असते. याचे पान आणि फुलांचा उपयोग आयुर्वेदातही होतो. सकाळी याच्या फुलांचा गंध घरात प्रसन्नता आणतो.

**कृष्णकमळ**

उन्हाळ्यात फुलणारे कृष्णकमळ हे एक आकर्षक वेल आहे. घराच्या ग्रीलला किंवा बाल्कनीत वाढवता येते. याचे फूल फुलले की घरात उत्साह वाटतो.उन्हाळ्यात या घरगुती रोपांची निवड करून, घरात हरित वातावरण तयार करता येते. या रोपांची विशेष गोष्ट म्हणजे यांना फारशी देखभाल लागत नाही, त्यामुळे दिवसभर ऑफिसमध्ये असणाऱ्यांसाठीही या वनस्पती परिपूर्ण आहेत.

# घरच्या घरी भाज्यांची बाग

एप्रिल महिन्यात उन्हाळ्याचा कडाका वाढतो. अशा कठीण हवामानात बागकाम करणे आव्हानात्मक वाटू शकते. मात्र काही विशिष्ट भाज्या आहेत ज्या या दिवसांत सहज उगवतात आणि घरच्या घरी ताजी भाजी मिळवण्याचा उत्तम पर्याय ठरतात. अंगण असो की टेरेस, लहान कुंड्यांमध्येही या भाज्या लावता येतात. त्यामुळे तुमच्या जेवणात ताजेपणा तर येतोच, पण बागकामामुळे मनालाही प्रसन्नता लाभते. चला तर जाणून घेऊया उन्हाळ्यात सहज लागवड करता येणाऱ्या काही महत्त्वाच्या भाज्यांबद्दल—

**भेंडी:** उन्हाळ्यात सहज उगवणाऱ्या भाज्यांमध्ये भेंडी आघाडीवर आहे. सुपीक मातीने भरलेल्या कुंडीत भेंडीची बियाणं सुमारे १२ इंच अंतरावर पेरावीत.

नियमित पाणी दिल्यास काही आठवड्यांत भेंडीचे रोप जोमाने वाढू लागते आणि लवकरच त्याला शेंगा येतात.

**हिरवी मिरची:** मिरचीची लागवड करणं फारसे कठीण नाही. कुंडीत बियाणं टाकताना दर दोन बियाण्यांमध्ये सुमारे १० इंचाचं अंतर ठेवावं. जमिनीत ओलावा टिकवण्यासाठी दर दोन दिवसांनी पाणी द्यावं. योग्य काळजी घेतल्यास काही दिवसांतच मिरचीचे रोप तयार होते.

**काकडी:** काकडी ही उन्हाळ्यातील एक आरोग्यदायी भाजी.


कुंडीत तिची लागवड करून नियमित पाणी दिल्यास काकडी काही आठवड्यांत फळधारणा करू लागते. थोडी जागा आणि नियमित देखभाल ही काकडीच्या चांगल्या उत्पादनासाठी महत्त्वाची असते.

**वांगी:** वांग्याचं रोप उन्हात चांगले वाढते. कुंड्या लहान असल्या तरी त्यात वांगी सहज उगवतं. लागवडीनंतर दररोज पाणी द्यावं लागतं. भरपूर सूर्यप्रकाशात वांगी लवकर फळधारणा करतं.

**टोमॅटो:** घरच्या बागेत सहज उगवणारी आणि झपाट्याने फळ देणारी भाजी म्हणजे टोमॅटो. सुपीक माती, भरपूर सूर्यप्रकाश आणि नियमित पाणी व खत दिल्यास टोमॅटोचं भरघोस उत्पादन मिळू शकतं.उन्हाळ्यातील ऊन आणि उष्मा लक्षात घेता योग्य वेळ, बियाण्यांची निवड आणि पाण्याचं योग्य नियोजन केल्यास घरच्या घरी सहजपणे ताज्या भाज्या उगवता येतात. त्यामुळे हिवाळ्याइतकेच उन्हाळेही तुमच्या घरात हरित आणि आरोग्यदायी ठरू शकतात.



# महाराष्ट्रातही सफरचंदाची यशस्वी लागवड



हिमालयाच्या पायथ्याजवळील थंड हवामानातील परिसरांमध्येच पारंपरिकपणे सफरचंदाची लागवड शक्य मानली जात होती. मात्र, हवामान बदलाचे परिणाम आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे आता महाराष्ट्रातील काही भागांमध्येही सफरचंद उत्पादन शक्य झाले आहे. विशेषतः सातारा, पुणे, नाशिक, कोल्हापूर, अहमदनगर आणि विदर्भातील थोड्या उंचीवरील भागांमध्ये सफरचंद लागवडीचे यशस्वी प्रयोग होत आहेत.

**कोणती जात निवडावी?**

महाराष्ट्रात सफरचंद लागवडीसाठी एल्म्मेल्त्ज्ज्त म्ल्त्र्न्ग्दह उष्णकटिबंधीय हवामानात तग धरणाऱ्या अ्दने,इळ्ग् 'डोवर', 'फुजी', 'hRMN 99', 'एना', 'शेम्रॉक', आणि 'गाला' या जाती वापरण्यात येतात. यामध्ये ही जात विशेष लोकप्रिय ठरली असून ती उत्तराखंडच्या हरमन सिंग यांनी विकसित केली आहे. उष्ण हवामानातही उत्तम उत्पादन देणारी ही जात महाराष्ट्रातील अनेक शेतकऱ्यांसाठी आशेचा किरण ठरत आहे.सफरचंद लागवडीसाठी थंड आणि कोरडे हवामान फायदेशीर असते. जरी उष्ण व दमट हवामानात लागवड केली जात असली तरी त्यासाठी योग्य छाटणी, पाणी व्यवस्थापन आणि रोगनियंत्रण या गोष्टींवर विशेष लक्ष देणे आवश्यक आहे.

मध्यम ते भारी, उत्तम निचऱ्याची जमीन या पिकासाठी योग्य मानली जाते. जमिनीचा ज्प् ५.५ ते ६.५ दरम्यान असावा.

साधारणपणे जून ते जुलै महिन्यांत सफरचंद लागवड केली जाते. एक एकर क्षेत्रात १० फूट १० फूट अंतर ठेवून झाडे लावता येतात. लागवडीपूर्वी २ फूट २ फूट आकाराचे खड्डे खोदून त्यात शेणखत, सेंद्रिय खत व जिवाणू मिसळून भरावेत. रोपे लावताना मुळांचा थेट संपर्क खताशी होणार नाही याची काळजी घ्यावी.

**सिंचन आणि खत व्यवस्थापन**

सुरुवातीच्या टप्प्यात ठिबक सिंचनाच्या मदतीने झाडांना आवश्यक तेवढेच पाणी द्यावे. झाडे स्थिरस्थावर झाल्यावर पाण्याची गरज कमी होते. सेंद्रिय खते, नत्र, स्फुरद आणि पालाश यांचे योग्य प्रमाणात व्यवस्थापन केल्यास दर्जेदार उत्पादन घेता येते.सफरचंद पिकावर करपा, बुरशी, फळमाशी यांसारख्या रोग-कीडांचा प्रादुर्भाव होऊ शकतो. त्यामुळे नियमित निरीक्षण, जैविक कीटकनाशकांचा वापर आणि योग्य फवारणी करणे अत्यावश्यक आहे.

# सजावटीसाठी उत्तम – आकर्षक व स्टायलिश घड्याळ



घराची सजावट करताना भिंतीवरील घड्याळ एक महत्त्वाचा भाग ठरतो. केवळ वेळ दाखवणारे उपकरण म्हणून नव्हे, तर घराच्या लुकमध्ये भर घालणारा एक महत्त्वाचा डेकोरेटिव्ह आयटम म्हणूनही घड्याळाकडे पाहिले जाते.

सध्या बाजारात विविध प्रकारची घड्याळे उपलब्ध असून ती घराच्या इंटिरियरनुसार निवडता येतात. मॉडर्न, व्हिंटेज, अँटिक, मिनिमलिस्टिक किंवा आर्टिस्टिक डिझाईनमधील भित्ती घड्याळे विशेष लोकप्रिय आहेत. लिव्हिंग रूमसाठी मोठ्या आकाराचे आणि आकर्षक आकृत्यांमध्ये डिझाइन केलेले घड्याळ आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरतात. तर बेडरूम किंवा किचनसाठी छोट्या, पण स्टायलिश घड्याळांचा पर्याय निवडता येतो.

आजकाल डिजिटल घड्याळांबरोबरच विंटेज लुक देणारी पेंडुलम घड्याळे, वुडन फ्रेम असलेली किंवा मेटल आर्ट वर्क असलेली घड्याळे ग्राहकांच्या पसंतीस उतरत आहेत.

काही डिझाईन्समध्ये घड्याळासोबत फोटोज लावण्याचीही सोय असते, त्यामुळे त्याचा वापर पर्सनल टच देण्यासाठीही होतो.घराच्या रंगसंगतीनुसार किंवा थीमनुसार घड्याळ निवडल्यास संपूर्ण इंटिरियरला एकसंध लुक देता येतो.

म्हणूनच, घड्याळाची निवड करताना त्याचा डिझाईन, साइज, आणि रंग यांचा विचार करणे आवश्यक असते.घराला आकर्षक आणि स्टायलिश लुक देण्यासाठी एक सुंदर घड्याळ ही एक उत्तम निवड ठरू शकते.

सुंदर घड्याळ कोणती?' या प्रश्नाचे उत्तर तुमच्या घराच्या सजावटीच्या थीम, भिंतीच्या रंगसंगती, आणि तुमच्या पसंतीवर अवलंबून असते.

**१. अँटिक वुडन वॉल क्लॉक**

पारंपरिक लुक देणारी घड्याळे

लिव्हिंग रूमसाठी परफेक्ट

टिकाऊ आणि क्लासिक लुक

२. सनबर्स्ट डिझाईन क्लॉक भिंतीवर लक्ष वेधून घेणारे

मॉडर्न किंवा आर्ट डेको सजावटीला शोभणारे

**३. मेटल आर्ट वॉल क्लॉक**

धातूपासून बनवलेली आकर्षक डिझाईन

समकालीन लुकसाठी योग्य

**४. पेंडुलम क्लॉक**

हलणाऱ्या पेंडुलमसह एक विशिष्ट लय

पारंपरिक आणि शांत लुक

५. डिजिटल एलईडी वॉल क्लॉक

आधुनिक आणि स्टायलिश

ऑफिस किंवा बेडरूमसाठी योग्य

६. फोटो फ्रेमसह वॉल क्लॉक

घड्याळाभोवती कुटुंबीयांचे फोटो लावता येतात

वैयक्तिक टचसाठी खास

७. व्हिंटेज रोमन नयुमरल्स क्लॉक

रोमन आकड्यांसह क्लासिक फील

एखाद्या व्हिंटेज थीम असलेल्या घराला शोभणारे

**साजेशा पेहराव, आकर्षक मेकअप आणि ट्रेंडी ॲक्सेसरीजसोबत आता 'नेल आर्ट' देखील फॅशनचा अविभाज्य भाग बनला आहे. खासकरून आर्टिफिशियल नखे (नखांचे सेट्स) लावण्याकडे तरुणींमध्ये झपाट्याने ओढ वाढत आहे. पार्टी, फॅशन शो, लग्नसराई किंवा अगदी कॉलेज फंक्शनसाठीसुद्धा आर्टिफिशियल नखांची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे.**



# आर्टिफिशियल नखांचा फॅशन क्रेझ

बाजारात सध्या विविध रंग, डिझाईन आणि लांबीमध्ये आर्टिफिशियल नखे उपलब्ध आहेत. काही नखे प्रेस-ऑन प्रकारात मिळतात, तर काही विशेष जेल किंवा ॲक्रेलिक पद्धतीने लावले जातात. या नखांवर आकर्षक नेल आर्ट करून संपूर्ण लूक अधिक खुलतोबी. सध्याच्या सोशल मीडियावरही नेल आर्टचे व्हिडीओ, रील्स यामुळे या फॅशनचा प्रचार वेगाने होत आहे. मात्र दीर्घकाळ वापरल्यास नखांना इजा होण्याची शक्यता असते, म्हणून सौंदर्यतज्ज्ञ योग्य काळजी घेण्याचा सल्ला देतात.

आर्टिफिशियल नखांचे (नखांचे सेट्स) अनेक प्रकार असतात, जे लावण्याच्या पद्धतीनुसार आणि त्यांच्या टिकाऊपणानुसार वेगवेगळे विभागले जातात. खाली प्रमुख प्रकार दिले आहेत

**१. प्रेस-ऑन नेल्स**

सहज वापरण्याजोगे, घरच्या घरी लावता येतात.

यामध्ये नखाच्या आतील बाजूस आधीच गोंद असतो किंवा वेगळा गोंद वापरावा लागतो.

काही दिवस टिकतात; पार्टी किंवा एका इव्हेंटसाठी योग्य.

**२. जेल नेल्स**

जेल बेस वापरून लावले जातात आणि ळन्न् लाइटखाली वाळवले जातात.

नैसर्गिक नखांवर सरळ जेल लेयर लावून लांबी वाढवली जाते.

साधारणतः २-३ आठवडे टिकतात.

नखांना चमकदार आणि मजबूत लुक मिळतो.

३. ॲक्रेलिक नेल्स

लिक्विड मोनॉमर आणि पावडरचा वापर करून नखे तयार केली जातात.

या नखांचे स्वरूप घट्ट आणि टिकाऊ असते.

दीर्घकाळ टिकतात, पण देखभाल आवश्यक.

**४. डिप पावडर नेल्स**

नखांना आधी बेस कोट लावून त्यावर रंगीत पावडर लावली जाते.

हे नखे जेलपेक्षा अधिक टिकाऊ आणि नैसर्गिक दिसतात.

३ ते ४ आठवडे टिकू शकतात.

**५. स्कल्पचर्ड नेल्स**

नैसर्गिक नखांवर मोल्ड वापरून हवी तितकी लांबी तयार केली जाते.

जेल किंवा ॲक्रेलिक वापरून ही प्रक्रिया केली जाते.

हे नखे व्यक्तिनुसार खास डिझाईन केले जातात.

**६. फाइबर ग्लास किंवा सिल्क रॅप्स:**

नखांवर सिल्क किंवा फाइबर ग्लासचे पट्टे लावले जातात.

नैसर्गिक नखे मजबूत करण्यासाठी वापरले जातात.

सौम्य आणि नैसर्गिक लुक देतात.

# फळबाग घरी कशी फुलवायची?

वनस्पतींना विशेष निगा राखावी लागते. जर तुम्ही घरच्या अंगणात, गच्चीत किंवा बाल्कनीत फळबाग फुलवायची इच्छा बाळगली असेल, तर योग्य नियोजन आणि काळजी घेतल्यास उन्हाळ्यातही तुम्ही चांगली फळझाडे वाढवू शकता.

**१. योग्य झाडांची निवड करा**

उन्हाळ्यात फळ देणारी आणि गरम हवामानात टिकणारी झाडे निवडणे महत्त्वाचे आहे. खालील झाडे उन्हाळ्यासाठी योग्य मानली जातात:

**पेरू** – कमी पाण्यातही तग धरणारे झाड.

**सीताफळ (सिटाफळ)** – कोरड्या हवामानात वाढणारे.

**लिंबू** – उन्हाळ्यात उपयोगी आणि छोट्या कुंडीत वाढू शकते.

आंबा – जागा असेल तर छोट्या वानमया प्रकारांचा विचार करा.

द्राक्षे – जरा अधिक निगा लागणारी, पण उन्हाळ्यात भरपूर फळे देणारी वेल.

चिकू – उष्ण हवामानात चांगले फळ देणारे.

**२. कुंडी आणि मातीची योग्य निवड**

झाडांसाठी मोठ्या आकाराच्या कुंड्या निवडा ज्यामुळे मुळांना जागा मिळेल.

मातीचा मिश्रण असा असावा – बागायती माती, शेणखत, आणि थोडेसे वाळलेले पानांचे खत (कंपोस्ट).

माती पाणी साठवणारी पण चांगली निचरा करणारी असावी.

**३. पाण्याची योग्य मात्रा**



उन्हाळ्यात पाणी रोज द्यावे लागते, पण झाडांच्या गरजेनुसार प्रमाणात.

सकाळी लवकर किंवा संध्याकाळी पाणी द्या, जेणेकरून बाष्पीभवन कमी होईल.

थेंब थेंब पाण्याचा वापर करणारे ड्रिप सिंचन पद्धतीचा उपयोग केल्यास अधिक फायदेशीर ठरतो.

**४. सावली आणि संरक्षण**

अधिक तीव्र उन्हापासून संरक्षणासाठी झाडांना नेट, पालखी किंवा कागदाच्या छायाचित्राचा वापर करा.

कुंड्या थेट सिमेंटच्या जमिनीवर न ठेवता लाकडी किंवा प्लास्टिक स्टँडवर ठेवा, ज्यामुळे उष्णता थेट मुळांवर येणार नाही.

**५. खते आणि निगा**

महिन्यातून एकदा सेंद्रिय खत टाकावे. कंपोस्ट किंवा शेणखत वापरले तरी चालेल.

झाडांची फांदी वेळोवेळी कापून टाका, त्यामुळे नवीन फांद्या फुटतात आणि फळधारणा चांगली होते.

कीडनाशक म्हणून घरगुती उपाय वापरू शकता, जसे की लसणाचा अर्क, हळद आणि तंबाखूचा काढा.

उन्हाळ्यात फळबाग फुलवणे थोडे आव्हानात्मक असले तरी योग्य झाडांची निवड, पुरेशी निगा आणि नियमित पाणी व खत दिल्यास ही फळबाग तुमच्या घराचे सौंदर्य वाढवेलच, शिवाय तुमच्या आहारातही नैसर्गिक गोडवा आणेल.

# काळा गुलाब घरी लावायचा?

सर्वसामान्यपणे गुलाब म्हटलं की डोळ्यांसमोर येतो तो लाल, पांढरा, पिवळा किंवा गुलाबी रंग. मात्र काळा गुलाब हा अनेकांचा कुतूहलाचा विषय ठरतो. पूर्वी काळ्या गुलाबाची फुलं ही केवळ चित्रात किंवा कथांमध्ये पाहायला मिळायची. पण आता काळा गुलाब प्रत्यक्षात घरीही लावता येतो, आणि त्यासाठी फारशी अडचणही येत नाही.

**काय आहे काळा गुलाब?**

काळींदो गुलाब हा तुर्कीमधील हाफेटी प्रांतात सर्वप्रथम पाहायला मिळाला. तो पूर्णपणे काळा नसून गडद जांभळसर रंगाचा असतो, पण दिसायला पूर्ण काळा भासतो. आधुनिक बागायतीत काही जाती विशेष प्रक्रिया करून काळ्या गुलाबासारखा रंग प्राप्त करतात.

**घरी काळा गुलाब लावण्यासाठी काय करावे?**

काळ्या गुलाबाची कलमे किंवा



बियाणे ऑनलाइन किंवा काही खास नर्सरीमधून मिळू शकतात.

ही झाडं थोड्या थंड हवामानात चांगली वाढतात. त्यामुळे उन्हापासून थोडं सावली असलेलं ठिकाण निवडणं योग्य.

कुंडीत किंवा बागेत लावताना चांगल्या प्रतीची खत मिसळलेली मातीत लागवड करावी.

नियमित पाणी देणं आवश्यक असून पाण्याचा निचरा योग्य प्रकारे व्हावा याची काळजी घ्यावी.

**सजावटीसाठी उत्तम पर्याय**

काळ्या गुलाबाचं फुल एक वेगळाच रुबाब दाखवतं. घरच्या बागेत हे फूल फुललं की पाहणाऱ्यांचं लक्ष वेधून घेतं. त्यामुळे सजावटीसाठी, फोटोशूटसाठी किंवा अनोख्या भेटवस्तू म्हणून काळ्या गुलाबाला मागणी वाढते आहे.

**शेतीसाठी संधी**

काळ्या गुलाबाचं उत्पादन मोठ्या प्रमाणावर घेतलं तर त्याचा व्यापारी उपयोगही होऊ शकतो. खास करून सजावटी फुलांच्या बाजारात काळ्या गुलाबाला चांगला दर मिळतो.

# मासिक पाळी वेळेत येत नाही? या पाच सवयी बदला

महिलांना मासिक पाळीशी संबंधित अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. मासिक पाळी उशिरा येणे किंवा अनेक महिने न येणे हे देखील त्रासाचे कारण बनते. मासिक पाळीत काही महिन्यांचे अंतर असल्यास आणि जर पिरियड सायकल बिघडायला लागली तर डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. खरं तर, या कालावधीत त्रास होणे हे काही वाईट सवयींचे लक्षण असू शकते. मुलींनी या सवयी काढून टाकण्यावर आणि त्या सुधारण्यावर भर द्यावा, अन्यथा ही समस्या काळानुसार वाढू शकते.

महिलांनी जास्त वेळ झोपू नये. आपल्या शरीराला गरज आहे तेवढीच झोप घ्यावी. गरजेप्रमाणे झोप घेतल्यास, तुमची मासिक पाळी देखील नियमित होईल.

**वजनात बदल**

अचानक वजनात फरक दिसून आला, तर त्याचा परिणाम मासिक पाळीवर देखील होतो. झपाट्याने वजन कमी झाल्यामुळे किंवा वाढल्यामुळे शरीरात अनेक बदल होतात, ज्यामुळे पीरियड सायकल देखील बदलू शकते. म्हणजेच जर तुम्ही आवश्यकतेपेक्षा जास्त व्यायाम करत असाल किंवा तुमच्या वजनाकडे अजिबात लक्ष दिले नाही तर तुमची मासिक पाळी देखील अनियमित होऊ शकते.

उत्तम आहार हे उत्तम आरोग्याचे रहस्य आहे. जर तुमचा आहार योग्य नसेल तर त्याचा फटका तुमच्या शरीराला सहन करावा लागतो. जरी तुम्ही बाहेरचे जंक फूड जास्त खाल्ले किंवा तुमच्या आहारात आवश्यक पोषक तत्वांचा समावेश केला नाही तरीही तुमची मासिक पाळी वेळेवर येणे थांबू शकते. त्यामुळे सकस आहार खा. बाहेरील जंक फूड जास्त खाणे टाळा. ज्या पदार्थांत पोषक तत्वांचा समावेश असेल, असे पदार्थ खा.

अनेक मुली गर्भधारणा टाळण्यासाठी लग्नाआधी किंवा लग्नांनंतर गर्भनिरोधक गोळ्या जास्त प्रमाणात सेवन करतात. गर्भनिरोधक गोळ्या शरीरातील हार्मोन्सचे संतुलन बिघडवतात, ज्यामुळे अनियमित मासिक पाळीची समस्या देखील उद्भवते.

तणावामुळे शरीराचे अनेक नुकसान होते. जसा आरोग्या साठी ताण हानीकारक आहे, तसाच हा ताण पीरियड सायकलवर देखील परिणाम करू शकतो. तणाव कमी करणे महत्त्वाचे आहे.

# चहा पिण्याने आरोग्याली नुकसान जाणून घ्या.....

चहा पिणे पूर्णपणे टाळावे की चालू ठेवावे, हे काही गोष्टींवर अवलंबून असते. चहाचे काही फायदे आहेत, पण त्याचे जास्त सेवन केल्यास काही दुष्परिणामही होऊ शकतात.

चहा पिण्याचे फायदे (फायदे)

अँटीऑक्सिडंट्स: चहामध्ये अँटीऑक्सिडंट्स (विशेषतः ग्रीन टीमध्ये) असतात, जे शरीरातील पेशींचे नुकसान होण्यापासून संरक्षण करतात आणि काही आजारांचा धोका कमी करू शकतात.

ऊर्जा: चहामध्ये कॅफीन असते, ज्यामुळे तात्पुरती ऊर्जा मिळते आणि ताजेतवाने वाटते.

तणाव कमी: काही लोकांना चहा प्यायल्याने आराम मिळतो आणि तणाव कमी झाल्यासारखे वाटते.

**काही आजारांवर फायदा:** काही अभ्यासांनुसार, मर्यादित प्रमाणात चहा प्यायल्याने कर्करोग, जाडेपणा, मधुमेह आणि हृदयविकाराचा धोका कमी होऊ शकतो.

चहा पिण्याचे दुष्परिणाम (तोटे). ॲसिडिटी आणि पोटाचे विकार:

रिकाम्या पोटी चहा प्यायल्याने किंवा जास्त प्रमाणात चहा प्यायल्याने ?सिडिटी, गॅस, अपचन आणि छातीत जळजळ होऊ शकते.

**झोपेच्या समस्या:**

चहामध्ये असलेल्या कॅफीनमुळे झोपेवर परिणाम होऊ शकतो, विशेषतः रात्रीच्या वेळी जास्त चहा प्यायल्यास. यामुळे निद्रानाश आणि चिडचिड होऊ शकते.

**लोह आणि कॅल्शियमची कमतरता:**



चहामध्ये 'टॅनिन' नावाचा पदार्थ असतो, जो शरीरात लोह आणि कॅल्शियमचे शोषण कमी करतो. यामुळे ?निमिया (रक्तक्षय) किंवा हाडे ठिसूळ होण्याची शक्यता वाढते. ज्यांना ?निमियाचा त्रास आहे त्यांनी चहा टाळणे चांगले.

मधुमेह आणि वजन: चहामध्ये साखर मिसळून प्यायल्यास रक्तातील साखरेची पातळी वाढू शकते, ज्यामुळे मधुमेहाचा धोका वाढतो. तसेच, साखर आणि दुधामुळे वजन वाढू शकते.

**कॅफीनची सवय:**

जास्त प्रमाणात चहा प्यायल्याने कॅफीनची सवय लागते. चहा न मिळाल्यास डोकेदुखी, थकवा किंवा चिडचिड होऊ शकते.

**दातांवर परिणाम:**

चहामुळे दातांवर डाग पडू शकतात आणि दातांचे इनॅमल कमकुवत होऊ शकते.

# आषाढी एकादशीच्या दिवशी घरच्या घरी अशी करा पूजा

हिंदू धर्मात एकादशीला खूप महत्त्व असते. वर्षभरातील २४ एकादशींमध्ये आषाढी एकादशी खूप महत्वाची असते. आषाढ महिन्यातील शुक्ल पक्षातील एकादशी तिथीला आषाढी एकादशी म्हणतात. या एकादशीला देवशयनी एकादशीसुद्धा म्हटले जाते. आषाढ महिन्यातील शुक्ल पक्ष एकादशीच्या दिवशी भगवान विष्णू चार महिन्यासाठी योग निद्रेत जाऊन झोपी जातात. या काळात सर्व शुभ कार्ये थांबतात. भगवान विष्णू चार महिने झोपतात म्हणून याला चातुर्मास असेही म्हणतात. आषाढी एकादशीचा दिवस सर्वांसाठीच खास असतो. वारकरी सांप्रादायासाठी तर हा दिवस दिवाळी इतकाच मोठा असतो. महाराष्ट्रात लाखो वारकरी चालत जाऊन पंढरपुरात विठूरायाच्या चरणी नतमस्तक होऊन आशीर्वाद घेतात. तसेच या दिवशी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते विठ्ठल-रुक्मिणीची शासकीय महापूजाही होते.

पण काही असेही लोक असतात, ज्यांना काही कारणामुळे पंढरपूरला जाणं शक्य होत नाही. मात्र या शुभ दिवशी तुम्ही घरच्या घरीही विठूरायाला नमन करून पूजा करू शकता आणि घरच्या घरी देखील आषाढी एकादशी साजरी करू शकतात.

**यंदा कधी आहे आषाढी एकादशी ?**

तिथीनुसार आषाढ शुक्ल एकादशी अर्थात देवशयनी एकादशीचे व्रत उदया बुधवार, १७ जुलै रोजी करण्यात येणार आहे.

**अशी साजरी करा आषाढी एकादशी**

वर्षभरातील सर्व एकादशींमध्ये आषाढी एकादशीचे विशेष महत्त्व आहे. या दिवशी उपवास केला जातो. एकादशीचा हा दिवस भगवान विष्णूला समर्पित असते. आजच्या दिवशी विठ्ठलासह भगवान विष्णूचीही उपासना करावी.

सकाळी आंघोळ आटोपून देवाजवळ दिवा लावावा. उदबत्ती, धूप, निरांजन लावावे. त्यानंतर मनोभावे पूजा करावी.

देवांना आधी शुद्ध पाण्याने स्नान घालावे, त्यानंतर पंचांमृताने स्नान घालावे. परत शुद्ध पाण्याने स्नान घालावे. स्वस्छ वस्त्राने पुसून देवांना देव्हाऱ्यात ठेवावे.

त्यांना अष्ट गंध अथवा कुंकू लावावे. पिवळी फुलं आणि तुळस वाहावी. एकादशीच्या दिवशी देवाचा उपवास असतो असे म्हणतात, त्यामुळे देवाला उपवासाच्या पदार्थांचा नैवेद्य दाखववा.

देवाची आरती करावी आणि सुख समृध्दीसाठी प्रार्थना करावी. घरच्या मंडळींना प्रसादाचे वाटप करावे. शक्य झाल्यास जवळच्या विठ्ठल मंदिरात दर्शनासाठी जावे.

एकादशीच्या दिवशी पुर्णवेळ उपवास केला जातो. या दिवशी उपवास केल्याने अक्षय फळ प्राप्त होते. एकादशीच्या दिवशी ब्रह्मचार्याचे पालन करण्याचा सल्ला धर्म शास्त्रात देण्यात आलेला आहे.

**एकादशीचे महत्व**

धार्मिक मान्यतेनुसार आषाढी एकादशीचे व्रत सर्व मनोकामना पूर्ण करणारे मानले जाते. या दिवशी नियमानुसार पूजा व दान केल्यास अक्षय पुण्य प्राप्त होते. या दिवसापासून चातुर्मासही सुरू होतो. त्यानंतर कोणतेही शुभ कार्य करण्यास मनाई आहे. धार्मिक शास्त्रानुसार या दिवशी काही कामं करण्याचा सल्ला देण्यात येतो. एकादशीच्या दिवशी काही नियम सांगण्यात आले आहेत. ज्याचे पालन केल्याने भगवान विष्णू लवकर प्रसन्न होतात.
त्यामुळे एकादशीच्या दिवशी काही गोष्टी करणे टाळावे.

एकादशीच्या दिवशी ब्रह्मचर्य पाळावे आणि देवाच्या मंत्रांचा जप करावा. भक्तीमध्ये तल्लीन होऊन भगवंतावरची श्रद्धा व्यक्त केली पाहिजे.

**तामसिक पदार्थांपासून दूर रहावे**

देवशयनी एकादशीच्या दिवशी सात्विक आहार घ्यावा. या दिवशी चुकूनही मांस, दारू, लसूण, कांदा यांचे सेवन करू नये. याशिवाय या दिवशी कोणतेही नशा करणारे पदार्थ सेवन करू नयेत.

-वाईट विचार नकोत

एकादशीच्या दिवशी कोणाशीही वाईट वागू

# आधिकारिक नाव देवशयनी आषाढी एकादशी

आषाढी एकादशी किंवा देवशयनी एकादशी, ही हिंदू पंचांगातील एक तिथी आहे.ड१ . हा वारकरी सांप्रदायाचा सर्वात मोठा उत्सव आहे. वैष्णवांसाठी या पवित्र दिवसाचे विशेष महत्त्व आहे. आषाढी एकादशीच्या दिवशी लाखोंच्या संख्येने वारकरी, भक्त पंढरपूरमध्ये विठ्ठलाच्या दर्शनासाठी दाखल होतात. आषाढ महिन्यातील शुक्ल पक्षात येणाऱ्या एकादशीला 'देवशयनी आषाढी एकादशी' असे म्हणतात. आध्यात्मिक व धार्मिक दृष्टिकोनातून या दिवसाला खूप महत्त्व आहे. या दिवशी देव निद्रिस्त होतात अशी समजूत आहे.

हिंदू पंचांगप्रमाणे प्रत्येक महिन्यात दोन पक्ष पंधरवडे असतात, त्यामुळे दोन तिथी असतात, एक शुद्ध तिथी आणि एक वद्य तिथी. म्हणून आषाढ महिन्यात एकादशी दोनदा येते, आषाढ शुद्ध एकादशी आणि आषाढी वद्य एकादशी. आषाढ महिन्यातील शुक्ल पक्षातील एकादशीला देवशयनी आषाढी एकादशी म्हणतात. आषाढ वद्य एकादशीला कामिका एकादशी म्हणतात.

प्रत्येक चांद्रमासातील शुक्ल व कृष्ण पक्षातील ११व्या तिथीला एकादशी म्हणले जाते.
चांद्रमास गणनेतील फरकामुळे तिथीची वृद्धी झाल्यास स्मार्त आणि भागवत एकादशी, असे दोन भेद सांगितले आहे. ज्या पक्षात हे दोन भेद येतात. त्यावेळी पंचांगात पहिल्या दिवशी 'स्मार्त' व दुसऱ्या दिवशी 'भागवत', असे लिहिलेले असते. अनेकदा एका पक्षात 'स्मार्त' आणि 'भागवत', अशा एका पाठोपाठ दोन एकादशी असतात. यातील पहिल्या येणाऱ्या स्मार्त एकादशीला नाव असते. परंतु, भागवत एकादशीला नाव नसते.

अधिक मास आल्यास अधिक महिन्याच्या आणखी दोन एकादशी येतात. अधिक महिन्यात येणाऱ्या दोनही एकादश्यांना कमला एकादशी हेच एकमेव नाव असते. अशावेळी निज महिन्यातील तिथी ग्राह्य धरली जाते.

देवशयनी एकादशीबद्दल असे मानले जाते की या दिवशी भगवान विष्णू क्षीरसागरात (एक वैश्विक महासागर) शेषनागावर झोपी जातात. धार्मिक मान्यतेनुसार मनुष्याचं एक वर्ष हे देवांची एक अहोरात्र असते. दक्षिणायन ही देवांची रात्र असते आणि उत्तरायण हा दिवस असतो. आषाढ महिन्यातील कर्क संक्रांतीला उत्तरायण पूर्ण होते आणि दक्षिणायनाला सुरुवात होते. म्हणून आषाढ महिन्याच्या शुक्ल पक्षातील एकादशीला देवशयनी एकादशी किंवा हरि शयनी एकादशी असे म्हणले जाते.ड५ .यानंतर भगवान विष्णू कार्तिक महिन्याच्या शुक्ल पक्षातील एकदशीला म्हणजेच प्रबोधनी एकादशीला जागे होतात. हा काळ चतुर्मास (चार महिने) म्हणून ओळखला जातो आणि हा पावसाळ्यासोबतच असतो. शयनी एकादशी म्हणजे चातुर्मासाची सुरुवात असते. या दिवशी विष्णूला प्रसन्न करण्यासाठी उपासना आणि उपवास केले जातात.

तुळशीमाळा तयार करणारा विक्रेता, पुणे

भविष्योत्तर पुराणात, कृष्णाने युधिष्ठिराला शयनी एकादशीचे महत्त्व सांगितले आहे, कारण निर्माता-देव ब्रह्मदेवाने त्यांच्या पुत्र नारदांना एकदा त्याचे महत्त्व सांगितले होते. राजा मंडताची कथा याच संदर्भात सांगितली आहे. धर्मनिष्ठ राजाच्या देशात तीन वर्षे दुष्काळ पडला होता, परंतु राजाला पर्जन्य देवतांना प्रसन्न करण्याचा उपाय सापडला नाही. अखेरीस, अंगिरस ऋषींनी राजाला देव-शयनी एकादशीचे व्रत (व्रत) पाळण्याचा सल्ला दिला. असे केल्यावर विष्णूच्या कृपेने राज्यात पाऊस पडला.



# समतेची प्रेरणा

कोणतीही शस्त्रे न घेता किंवा आशीर्वादाचा हात पुढे न करता, भरजरी वस्त्रे, अलंकार धारण न करता, कमरेवर हात ठेवून शांत, प्रसन्न चित्ताने विठ्ठल उभा आहे. काही देण्यापेक्षा त्या मूर्तीकडे पाहिल्यास सर्व काही मिळाल्याचा आनंद मिळावा, एवढे सावळे सोज्वळ रूप. यातून सर्व जगाला समतेची प्रेरणा देत आहे.

बाराव्या शतकात आपेगावच्या विठ्ठलपंत व रुक्मिणीदेवी कुलकर्णी यांचे पोटी निवृत्ती, सोपान, ज्ञानदेव, मुक्ताबाई या चार भावंडांचा जन्म झाला. हे कुटुंब धार्मिकतेने वागणारे आणि पंढरपूरच्या पांडुरंगाचे भक्त. रुढी परंपरेप्रमाणे विठ्ठलपंतांनी आपल्या मुलांच्या मुंजी करावयाच्या ठरवल्या. परंतु धर्ममार्तंड, विद्वान पंडितांच्याकडून त्यास तीव्र स्वरूपाचा विरोध झाला. याचे कारण लग्नानंतर वैराग्याची भावना निर्माण झाल्यामुळे त्यांनी संसाराचा त्याग करून संन्यास आश्रम स्वीकारला होता. परंतु गुरू आज्ञेने त्यांना पुन्हा गृहस्थाश्रम स्वीकारावा लागला. त्यानंतर त्यांना ही चार मुले झाली. धर्ममार्तंडांनी संन्याशाच्या मुलांना मुंज करून घेण्याचा अधिकारच नाही, असे म्हणून या भावंडांच्या मुंजीस विरोध केला.

धर्मशास्त्राप्रमाणे मुलांच्या मुंजी तर व्हायलाच पाहिजेत म्हणून विठ्ठलपंतांनी अनंत प्रयत्न केले. परंतु यश आले नाही. शेवटी त्यांनी धर्ममार्तंडाची विनवणी करून विचारले, 'अपराधाबद्दल वाटेल ते प्रायश्चित घ्यायला तयार आहोत. परंतु आमच्या मुलांना व्रतबंधाच्या संस्कारापासून वंचित ठेवू नका.' पंडितांनी दोघा मातापित्यांनी देहांत प्रायश्चित घ्यावे असा आदेश दिला. त्यांनी तो शिरसावंद्य मानून गंगेत देहविसर्जित केला. पण व्रतबंधाचा मार्ग सुकर झाला नाही. भावंडांना अनेक कसोट्यांना उतरावे लागले. धर्माच्या नावाखाली धर्ममार्तंडांनी केलेला छळवाद, कर्मकांडांच्या नावाखाली होणारी भरडणूक, स्पृश्य-अस्पृश्य, उच्च-नीच आदी भाव चातुर्वण्य व्यवस्थेने समाजाचे केलेले विभाजन स्त्री-पुरुषांचे अधिकार अशा किती तरी सामाजिक रुढी, मनूचे धर्माचरणाचे सिद्धांत या सर्वामुळे हिंदू धर्मियांचे समाजजीवन सडत चालले आहे. मनुष्य जन्माला येऊनही माणूस म्हणून जगण्याचे अधिकार नाकारले जात होते.

या सर्वाचे तीव्र चटके या भावंडांना सोसावे लागत होते. ते इतरांना भोगायला लागू नये म्हणून त्यांच्या जीवाची सारखी घालमेल होत होती. आणि मार्ग सापडला.

विठ्ठलपंत दरवर्षी आषाढीवारीला पंढरीला जात असत. त्यांची परंपरा चालवण्यासाठी चारही भावंडे पंढरपूरला जात. तेथे संतश्रेष्ठ नामदेव महाराजांशी त्यांचा परिचय झाला. पुढे त्याचे रुपांकर दृढ स्नेहात झाले. नामदेव महाराज त्या काळात आषाढी व कार्तिकीला वारकऱ्यांचा मेळावा भरवत. त्यातून हिंदू धर्मातील दुष्ट प्रथा, अनिष्ठ चालीरीती यामुळे धर्मावर होणारे अघात, त्यात होणारा लोकांचा छळ थांबला पाहिजे. ऱ्या भावनेने प्रत्येकाला आपले जीवन जगता आले पाहिजे. असे चिंतन, मनन होऊन एका नव्या कार्यशैलीने समाज पुष्ट करण्याचा विचार आकार घेऊ लागला होता. अगदी हाच विचार ज्ञानेश्वरांच्या मनात घोळत होता. चंद्रभागेच्या वाळवंटात नामदेवांच्या सान्निध्याचा लाभ घेण्यासाठी जमलेल्या विठ्ठलभक्तांच्या मेळ्यात चर्चेत हा विषय पुढे आला.

कर्मकांडाशिवाय व नाथ संप्रदायातील तथाकथित अघोरीउपायाशिवाय सामान्य जनांना ईश्वरप्राप्तीचे समाधान मिळवता आले पाहिजे.

# आनंदाच्या कल्लोळातले निखळ माणूसपण

महाराष्ट्रीयन समाजमनावर संत विचारांचा खोलवर परिणाम झालेला आहे. संत विचारांचे प्रतिबिंब आपल्याला इथल्या प्रथा, परंपरा इतकेच नव्हे, सामाजिक चळवळीमध्येही पाहायला मिळते. महाराष्ट्रीयन समाजमनाची मशागत समताधिष्ठित संतविचाराने केली. म्हणूनच इथे सामाजिक बदलांच्या चळवळी उभ्या राहिल्या आणि त्यांनी समृद्ध महाराष्ट्र उभा केला.

बाराव्या-तेराव्या शतकाच्या आसपास हे संत आंदोलन समाजाची एक निकड म्हणून उदयास आले. पूर्वापार चालत आलेल्या भक्ती परंपरेला या संत चळवळीने काही धक्के दिले. अज्ञानाने अंधारलेल्या समाजमनाला

ज्ञानाच्या उजेडात योग्य वाटा दाखविण्याची किमया संतांनी केली.

कर्मकांडे, जातीय, धार्मिक कट्टरतेचे स्तोम माजलेले होते, चातुर्वर्ण्य व्यवस्थेच्या टाचेखाली समाज रगडला जात होता; त्याच काळात परकीय आक्रमकांनी आपली मुळे इथे रुजवायला सुरुवात केली होती. म्हणजे परकीयांचा सत्तालोलूप मस्तवालपणा आणि स्थानिक वर्चस्ववाद्यांची मग्रुरी यात समाज भरडला जात होता. त्यावेळी संतांची प्रबोधन चळवळ उभी राहिली. वारकरी संतांनी उभी केलेली ही भागवत धर्माची भक्कम इमारत आज सातशे वर्षे उभी आहे. पंढरपूरच्या वाळवंटात मांडलेल्या या खेळात सर्वच इतके रंगून गेले की, सर्व भेद आपोआप गळून पडले. किंबहुना त्यासाठीच हा जात-धर्मविरहित भागवत धर्माचा खेळ मांडलेला आहे.

कोणतेही अवघड कर्मकांड नाही, कोणतेही बाह्य उपचार नाहीत. गळ्यात तुळशीची माळ, कपाळावर गोपीचंदनाचा टीळा लावला की, अन्य कोणताही देखावा करावा लागत नाही. टाळ-मृदंगाच्या तालावर आपोआपच आनंदाचा कल्लोळ निर्माण होतो. पंडित, ज्ञानी, योगी, महानुभाव, सिद्ध, साधक, स्त्री-पुरुष हे सर्व भेद गळून पडतात.

एरवी आपल्या उपाधीच्या श्रेष्ठत्वाचा डोलारा घेऊन मिरवणारे पंढरपूरच्या वाळवंटात मांडलेल्या खेळात सहभागी होतात, तेव्हा त्यांच्या या सर्व उपाध्या गळून पडतात आणि उरते ते केवळ निखळ माणूसपण!

निर्मळ मनाने उचनीचतेचा गढूळपणा मागे सारुन स्वच्छ समाज निर्मितीची वाट संत चळवळीने मोकळी केली. अवघड दुस्तर वाटा मोडून टाकून भक्तीपंथ बहुसोपा केला.

# तरुणाई चालते पंढरीची वाट!



इंद्रायणीच्या काठावरून सुरू झालेला वारीचा भक्तिप्रवाह आता चंद्रभागेच्या वाळवंटात पोहोचू लागला आहे आणि वारकऱ्यांची विठुरायाच्या दर्शनाची ओढ अधिकच तीव्र होत चालली आहे. डोळ्यांत पांडुरंगाच्या दर्शनाची आस, पायांत भक्तीची गती, मुखात हरिनामाचा गजर आणि या लाखो वारकऱ्यांची पंढरीकडे चाललेली वारी असं देखणं चित्र महाराष्ट्र गेली कित्येक शतके पाहतो आहे. मात्र गेल्या काही वर्षांत या चित्रात एक नवा रंग मिसळला आहेष्ठ तरुणाईचा!

आषाढीच्या या पंढरपूरच्या वारीतील भक्तीरसात तरुणाईचा रंग अगदी सहजपणे मिसळतो आहेष्ठ कधी टाळ-मृदंग हातात घेत, तर कधी कॅमेऱ्याच्या लेन्समधून क्षण टिपत, कधी अभंग गात, तर कधी सेवा करत. विविध क्षेत्रांतली तरुण मंडळी आज वारीत सहभागी होतात. मोबाइल आणि सोशल मीडियावर रमणारी ही टेक्नोसॅव्ही पिढी, हातात टाळ घेऊन 'ज्ञानोबा-तुकाराम'च्या गजरात तितक्याच तल्लीनतेने सहभागी होते. भक्ती, सेवा आणि तंत्रज्ञानाचा सुरेख संगम साधत, ही तरुणाई वारीला नव्या युगाशी जोडते आहे.

एमसीएचा विद्यार्थी असणारा धैर्यशील लाड असाच एक वारकरी तरुण. सातारकर फडाच्या दिंडीसोबत तो वारीत सहभागी होतो. धैर्यशील सांगतो, 'वारी प्रत्यक्षात जरी १८-२० दिवसांची असली तरी तिच्यातून मिळणारी ऊर्जा मात्र वर्षभर पुरते. आहे त्या परिस्थितीत जुळवून घेण्याची सवय असो किंवा प्रत्येकाला 'माउली' म्हणत समानतेने पाहण्याचा दृष्टिकोन या सगळ्याच गोष्टी वारीत अंगी भिनतात. आजच्या काळात इंटरनेट, सोशल मीडियामुळे अनेक पर्याय समोर असूनही मन अधिकच भिरभिरतं. अशा वेळी साधन-सुविधांचा अभाव असूनही वारीतला शांत, समाधानी आनंद ही एक विलक्षण शिकवण असते. हीच शिकवण पुढील आयुष्यासाठी शिदोरी ठरते.'

सोशल मीडियामुळे वारी आज 'ट्रेंडिंग' झाली आहे. अनेक तरुण वारीतले काही क्षण अनुभवायला येतात, तर काहीजण ते क्षण टिपायला. आणि मग यातली बरीच मंडळी वारीच्या प्रेमात पडतात. पुण्याचे डॉ. मितेश आणि लतिका खैरनार हे यूट्यूबवर जोडपं गेले काही वर्षे वारीच्या एखाद्या टप्प्यात सहभागी होतं. यंदा मात्र त्यांनी संपूर्ण वारी करायची ठरवलं आहे. वारीच्या रोजच्या अनुभवांचे व्लॉग सोशल मीडियावर ते शेअर करतात. डॉ. मितेश सांगतात, 'दिंड्यांसोबत चालणं हा अनुभव तर असाधारण असतोच, पण विसाव्याच्या ठिकाणी स्वयंपाकाची तयारी, जेवणाच्या पंगती, वैद्याकीय सेवा, स्वच्छता यांसारख्या अनेक घडामोडीही तितक्याच महत्त्वाच्या वाटतात. वारी एक सांघिक भावना आहे. हे सगळं आम्ही अनुभवतो आहोत.

वारीदरम्यान हे दोघं रोज वारकऱ्यांशी संवाद साधतात. चालताना, मुक्कामाच्या ठिकाणी, तिथले गावकरी, स्वयंसेवक, दर्शनाला आलेले भाविकष्ठ या सगळ्यांशी बोलताना त्यांना वारीचे नवे आयाम समजत जातात. या अनुभवांविषयी लतिका खैरनार सांगतात, 'आम्ही जितक्या वारकऱ्यांना विचारलं, 'तुम्ही विठोबाला काय मागता?' त्यावर एकही उत्तर पैशाचं, जमिनीचं किंवा अडचणींचं नव्हतं. 'वारीची सेवा अखंड घडो' हीच बहुतेकांची मागणी असते. आजच्या या 'नेव्हर एंडिंग डिमांड्स'च्या जगात ही मागणी खरंच अद्भुत आहे'.

काही तरुणांना पंढरपूरपर्यंत पूर्ण वारी करणं शक्य नसतं. अशी काही मंडळी आपल्या सोयीनुसार वारीतला एखादा दिवस अनुभवतात. वारी पुण्यातून जात असताना, पुण्यातील आयटी क्षेत्रातील अनेकांना तिच्याबद्दल अपार कुतूहल वाटायचं. 'आपण प्रत्यक्ष वारीत सहभागी होऊ शकतो का?' अशी इच्छा त्यांच्या मनात असायची. या कुतूहलाला कृतीचं रूप देत, २००६ साली काही आयटी व्यावसायिक एकत्र आले आणि त्यांनी आळंदी ते पुणे हा टप्पा पायी चालत पूर्ण केला. याच अनुभवातून 'आयटी दिंडी' ही संकल्पना जन्माला आली. हळूहळू अनेक तरुण या प्रवासात सामील होत गेले. 'चल ग सखे ,चल रे ब्रो पंढरीला' म्हणत अनेक झेन-झीदेखील यांच्या सोबत वारी अनुभवत आहेत. आज जवळपास दोन दशकांनंतर, ही दिंडी फक्त आयटी क्षेत्रापुरती मर्यादित राहिलेली नाही, तर ती 'एआय दिंडी' म्हणून नव्या स्वरूपात सर्वांसाठी खुली झाली आहे! 'एआय' म्हणजे ऑल इन्क्लुझिव्हष्ठ भाषा, प्रांत, वय, व्यवसाय यापलीकडे जाऊन सगळ्यांना सामावून घेणारी, सर्वसमावेशक अशी ही आधुनिक दिंडी आहे.

वारीत ज्या दिवशी तुम्हाला वेळ आहे, त्या दिवशीच्या टप्प्यावर सहभागी होता यावं यासाठी पुण्यातून विशेष बसची सोय केली जाते. त्या दिवशीचा वारीचा अनुभव घेऊन संध्याकाळी परत पुण्यात आणलं जातं. तसंच वारीपूर्व टाळ-मृदंग प्रशिक्षण, अभंग शिकवणं, वारीतले पारंपरिक खेळ शिकवणं हे उपक्रमही पुण्यात आयोजित केले जातात. तरुणाईला वारीचा थेट अनुभव देणारा, त्यांना आध्यात्मिकतेशी जोडणारा हा उपक्रम नक्कीच वैशिष्ट्यपूर्ण ठरतो आहे.

वारी अनुभवायची तीव्र इच्छा असूनही काही कारणांमुळे ते प्रत्यक्षात शक्य होत नाही, अशा असंख्य भाविकांसाठी काही तरुणांनी 'व्हर्च्युअल वारी'चा अद्भुत पर्याय शोधून काढला आहे. संत तुकाराम महाराजांचे वंशज आणि आयटी क्षेत्रात कार्यरत असलेले देहूचे स्वप्निल मोरे यांच्या मनात वारीचे अपडेट्स फेसबुकवर शेअर करण्याची कल्पना आली. संतपरंपरेचा वारसा आणि तंत्रज्ञानाची ताकद यांचा सुरेख संगम साधत 'फेसबुक दिंडी' या उपक्रमाची सुरुवात झाली. स्वप्निल मोरे यांच्यासोबत सुमित चव्हाण, मंगेश मोरे, अक्षय जोशी, अमित कुलकर्णी, सूरज दिघे या तरुण मित्रांची टीम या उपक्रमात सहभागी झाली. सुरुवातीला केवळ फेसबुक अपडेट्सवर आधारित असलेली ही दिंडी आता स्वतंत्र अ?पच्या स्वरूपातही उपलब्ध आहे. या उपक्रमाचे हे १५वे वर्ष! या उपक्रमाविषयी बोलताना स्वप्निल मोरे म्हणतात, 'फेसबुक दिंडी'मुळे वारी खऱ्या अर्थाने ग्लोबल झाली आहे. देश-विदेशातील प्रत्यक्ष वारीत सहभागी होऊ न शकणाऱ्या भाविकांसाठी ही वारी आता एका क्लिकवर उपलब्ध आहे'.

या अ?पद्वारे पालखीचा मुक्काम, विसावे, रिंगणं, नीरा स्नान यांसारख्या परंपरांचा अनुभव फोटो, व्हिडीओ आणि थेट लोकेशनसह एका ठिकाणी मिळतो. गेल्या काही वर्षांपासून या व्हर्च्युअल वारीसाठी दरवर्षी एक सामाजिक संकल्पना निश्चित केली जाते. 'पाणी वाचवा', 'पर्यावरण संरक्षण', 'महिला सशक्तीकरण', 'नेत्रदान', 'अवयवदान', 'वारीतला पोशिंदा' अशा उपक्रमांमुळे ही वारी केवळ आध्यात्मिकच नव्हे, तर सामाजिकदृष्ट्याही अधिक अर्थपूर्ण ठरते. यावर्षी मायमराठीच्या जपणुकीचा आणि अभिमानाचा जागर करणारी थीम आहे – 'वारी अभिजात मराठीची'. दरवर्षीप्रमाणे, यंदाही खास थीम सॉन्ग तयार करण्यात आलं आहे. 'वारी चुकायची नाही' या गाजलेल्या गीतानंतर यंदाचं 'चला पाहू रे सोहळा पंढरीचा' हे गीत सोशल मीडियावर विशेष लोकप्रिय ठरतं आहे.

वारीत फक्त चालणं किंवा अनुभव घेणं इतक्यापुरताच तरुणांचा सहभाग मर्यादित नाही. अनेक तरुण वारीदरम्यान विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय योगदान देतात.

पुण्यातील 'सेवा सहयोग फाउंडेशन' ही स्वयंसेवी संस्था गेल्या दशकभरापासून 'निर्मल वारी' या उपक्रमाच्या माध्यमातून वारी मार्ग स्वच्छ ठेवण्याचं महत्त्वपूर्ण कार्य करते आहे. या उपक्रमात दरवर्षी अनेक तरुण उत्स्फूर्तपणे सहभागी होतात. वारी मार्गावर फिरती शौचालयं बसवणे, मैल्याची शास्त्रशुद्ध पद्धतीने विल्हेवाट लावणं, तसेच शौचालयांचा योग्य वापर व्हावा यासाठी वारकऱ्यांमध्ये जनजागृती करणं, अशी अनेक महत्त्वाची कामं हे तरुण नेटाने पार पाडतात.